**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २१**

**सभावृत्तांत**

दिनांक – २०.०८.२०१८ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगस्ट - २०१८ ची मासिक मा. महापालिका सभा सोमवार दि.२०.८.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ४) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ५) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ६) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ७) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ८) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ९) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १०) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| ११) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १२) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १३) | मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन | |
| १४) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| १५) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |
| १६) | मा.गोफणे अनुराधा देविदास | |

१७) मा.बारसे प्रियांका प्रविण

१८) मा.लांडगे रवि लक्ष्मण

१९) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२०) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२१) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२२) मा.फुगे भिमाबाई पोपट

२३) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२४) मा.सावळे सिमा रविंद्र

२५) मा.लोंढे नम्रता योगेश

२६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२७) मा.लांडे विक्रांत विलास

२८) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२९) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३०) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३१) मा.अनुराधा गणपत गोरखे

३२) मा.मंगला अशोक कदम

३३) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३४) मा.अश्विनी भिमा बोबडे

३५) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३६) मा.संजय बबन नेवाळे

३७) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३८) मा.भालेकर प्रविण महादेव

३९) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४०) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४१) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४२) मा.घोलप कमल अनिल

४३) मा.चिखले सचिन तुकाराम

४४) मा.जावेद रमजान शेख

४५) मा.यादव मीनल विशाल

४६) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४७) मा.प्रमोद कुटे

४८) मा.राजू मिसाळ

४९) मा.शैलजा अविनाश मोरे

५०) मा.बाबर शर्मिला राजू

५१) मा.अमित राजेंद्र गावडे

५२) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५३) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५५) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५६) मा.ढाके नामदेव जनार्दन

५७) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५८) मा.करुणा शेखर चिंचवडे

५९) मा.भोईर सुरेश शिवाजी

६०) मा.अपर्णा निलेश डोके

६१) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६२) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६३) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६४) मा.जयश्री वसंत गावडे

६५) मा.कोमल दिपक मेवानी

६६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६७) मा.सुलक्षणा राजू धर

६८) मा.शाम गणपतराव लांडे

६९) मा.सुजाता सुनिल पालांडे

७०) मा.कदम निकीता अर्जुन

७१) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७२) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७३) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७४) मा.नढे विनोद जयवंत

७५) मा.काळे उषा दिलीप

७६) मा.कोकणे संतोष अंकुश

७७) मा.पवार मनिषा प्रमोद

७८) मा.बारणे अर्चना तानाजी

७९) मा.अभिषेक गोविंद बारणे

८०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८१) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

८२) मा.बारणे माया संतोष

८३) मा.निलेश हिरामण बारणे

८४) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८५) मा.दर्शले रेखा राजेश

८६) मा.कलाटे राहुल तानाजी

८७) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८८) मा.कामठे तुषार गजानन

८९) मा.चोंधे आरती सुरेश

९०) मा.कस्पटे संदिप अरुण

९१) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९२) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९३) मा.सुनिता हेमंत तापकीर

९४) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९५) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९६) मा.कुटे निर्मला संजय
९७) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
९८) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे
९९) मा.आंगोळकर सागर सुनिल
१००) मा.मुंढे उषा अंकुश
१०१) मा.लोखंडे चंदा राजू
१०२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१०३) मा.आशा धायगुडे-शेंडगे
१०४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
१०५) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे
१०६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र
१०८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय
१०९) मा.नवनाथ दत्तू जगताप
११०) मा.संतोष बबन कांबळे
१११) मा.सोनवणे शारदा हिरेन
११२) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे
११३) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
११४) मा. वाबळे संजय मल्हारराव
११५) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
११६) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर
११७) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू
११८) मा.अॅड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.दिलीप गावडे-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.तुपे, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.बोददे, मा.राऊत, मा.दांगट-सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.शिंदे-प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे, मा.तांबे, मा.कुलकर्णी, मा.घोडे, मा.कांबळे, मा.मोरे-कार्यकारी अभियंता, मा.माने-पीएमपीएमएल अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर-** मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. नगरसेविका, सर्व अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू, नागरीक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, श्रीनगरमध्ये दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत ठाण्याचे मेजर कौस्तुभ राणेसह ३ जवानांचे निधन, पोलादपूर-महाबळेश्वर मार्गावरील अंबेनळी घाटात झालेल्या भीषण अपघातात दापोली कृषी विद्यापीठातील ३० जणांचे निधन, केरळ येथे आलेल्या पुरामध्ये ३२५ जणांचे बुडून निधन तसेच भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी -भारताचे माजी पंतप्रधान, अजित वाडेकर-भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार, एम. करुनानिधी-द्रमुक पक्षाचे सर्वेसर्वा व तामीळनाडू राज्याचे माजी मुख्यमंत्री, इंदुबाई निवृत्ती कामठे-पिंपळे निलख मधील नगरसेवक तुषार कामठे यांच्या आजी, आर.के.धवन- काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते व माजी मंत्री, सोमनाथ चटर्जी-माजी लोकसभा अध्यक्ष व माकपचे जेष्ठ नेते, कोफी अन्नान-संयुक्त राष्ट्रसंघाचे माजी सरचिटणीस, जयवंत नाडकर्णी-जेष्ठ नाटयकर्मी, सुधा नरवणे-आकाशवाणीच्या प्रसिध्द निवेदिका, प्रल्हाद सावंत-जेष्ठ क्रीडा संघटक आणि क्रीडा पत्रकार, काशीनाथ श्रीपती वाडेकर-चिंचवडगावातील सामजिक कार्येकर्ते, सुवर्णा जालींदर गावडे-चिंचवडगांव, रमेश विनायक अंतोरे-चिंचवडगांव, कृष्णाबाई भिकाजी हगवणे, बाळासाहेब शंकर भालेकर, मारुती सुभाजी कामठे, कुणाल संजय कांबळे, बाबासाहेब दत्तात्रय काळोखे, निवृत्ती हरिभाऊ जवळकर, ज्ञानेश अरुण कोल्हे, प्रशांत कोळमकर, प्रकाश जाधव, विशाल वाणी, पोपट तुकाराम वाघेरे, अनिल राजाराम नाणेकर, दत्तोबा कुदळे, सुनिल गणपत शिवणकर, ज्योती भिमाशंकर गौडंगाव, हिंदुराव पांडुरंग थोरात, गजानन तात्याबा

जगताप यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली  वाहण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.सुजाता पालांडे** - मा. महापौर. मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु आज आपण इथे शोकाकूल अवस्थेमध्ये बसलो आहोत, आज आपण श्रध्दांजली वाहतोय भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना. विचारांची लढाई ही विचारानेच लढली पाहीजे असे समर्पित आणि देशाच्या प्रगतीसाठी परिपूर्ण जीवन वाजपेयी लढले. राजकीय अस्पृश्यता दूर सारुन सा-या समाजाचे प्रेम त्यांनी प्राप्त केले. अशा पुरोगामी व्यक्तीमत्वाचा विचार पुढे नेणे मला वाटते हीच त्यांना श्रध्दांजली ठरेल. त्यांच्या अनेक कविता सर्वांना ज्ञात आहेतच. त्यातील एक कविता तुम्हां सर्वांना समर्पित करते आणि त्यांना श्रध्दांजली वाहते. “ये बंधन की धरती है, ये बंधन की धरती है अभिनंदन की धरती है ये अर्पण की धरती है. ये तर्पण की भूमी है. ये वंदन की धरती है. अभिनंदन की धरती है. ये अर्पण की धरती है. ये तर्पण की भूमी है. इसकी नली नली हमारे लिए गंगा है. इसकी नली नली हमारे लिए गंगा है इसका कंकण कंकण शंकर है. हम जियेंगे तो इस भारत के लिए, हम जियेंगे इस भारत के लिए हम मरेंगे तो इस भारत के लिए. मरने बाद भी इस गंगाजलमे  बहती हुई हमारी अस्थींयो को कोई छान लगोके सुनेगा. मरने बाद भी इस गंगाजलमे  बहती हुई हमारी अस्थींयो को कोई छान लगोके सुनेगा. तो एकही आवाज आयेगी भारत  माता की जय, भारत माता की जय, भारत माता की जय”, धन्यवाद.

**मा. अश्विनी चिंचवडे-पाटील** - मा. महापौर. मा. आयुक्त सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु मी प्रथमत: भारतमातेचे थोर सुपूत्र माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करते. जनसंघ, भारतीय जनता पार्टी, विरोधी पक्षनेते, तीन वेळा पंतप्रधान अशी शुन्यातून विश्व निर्माण करणारी त्यांची कारकीर्द ही पुढील पिढीसाठी आदर्श आणि प्रेरणादायी आहे. छत्रपती शिवरायांनी ज्याप्रमाणे मूठभर मावळयांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्याचप्रमाणे वेगवेगळया

विचारसरणीच्या आणि वेगवेगळे जाहीरनामे असणारे विविध पक्षांना एनडीएच्या माध्यमातून बरोबर घेऊन सर्वसमावेशक निर्णय घेतले. त्यानंतर १३ दिवस असेल, १३ महिने असेल व पुढे ५ वर्षे बलशाली भारत बनविण्यासाठी कारगील युध्द, पोखरण अनुचाचणी, लाहोर बससेवा, सर्वशिक्षा अभियान, प्रधानमंत्री सडक योजना यासारखे अनेक देशहिताचे निर्णय घेतले. अटलजी हे अजातशत्रू व्यक्तीमत्व होते. त्यांनी आयुष्यभर लोकशाही मूल्य जपली. संपुर्ण आयुष्य देशासाठी समर्पित केले. अटलजी यांचा जन्म ग्वालेरचा आहे. त्यावेळी ग्वालेर हे मराठा संस्थान होते. त्यामुळे मराठी भाषा संस्कृतीबद्दल त्यांना विशेष आदर होता. १९८० साली गीतरामायणाचा रौप्यमहोत्सवी कार्यक्रम असो किंवा १९८६ साली झालेले मराठी साहित्य संमेलन यास ते आर्वजून उपस्थित होते. वाचन, लेखन, कविता या माध्यमातून त्यांच्या अमोघ अशा भाषणशैलीने ते सर्वांनाच परिचित होते. त्यांच्या आवडीचा छंद वाचन, लेखन जोपासण्यासाठी महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड शहरामध्ये अटलजींच्या नावाने अदयावत सेंट्रल लायब्ररी मध्यवर्ती ठिकाणी उभारावी. निश्चितच त्यांचे विचार पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरतील. असे काम आपण भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सेंट्रल लायब्ररी उभारुन करावे अशी मी मा. महापौर, मा. आयुक्त, तसेच सभागृहाला विनंती करते. हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल असे मला वाटते, धन्यवाद.

**मा. स्विनल म्हेत्रे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. “सवेरे सवेरे यारोसे मिल के हाम, बंधनके निकले हम, स्कुल चले हम” आम्ही पाचवी ते सहावीत असताना अटलजींची कविता खूप गाजली होती आणि आम्ही शाळेत असताना ती कविता नक्कीच म्हणायचो. असे कवी मनाचे हे नेतृत्व होतं. ज्यांची पोखरण येथील अनुचाचणी सर्वांनाच ज्ञात आहे. आदर्श असे राजकारणी, राजकारणातील विश्वपर्व आज आपल्यातून गेलेले आहे. तरी त्यांची एक कविता मी तुमच्यासमोर सादर करते. “हार नही मानूंगा, रार नई ठानूंगा, काल के कपाल पे लिखता मिटाता हूं, गीत नया गाता हूँ. या आपल्या कवितेसारख कणखर जीवन जगणारे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयीजी यांना भावपूर्ण श्रध्दांजली, धन्यवाद.

**मा.माया बारणे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. सत्ता का खेल तो चलता रहेगा, पार्टीया आयेगी जायेगी सरकारे बनेगी बिगडेगी मगर

ये देश रहना चाहीये इस देश का लोकतंत्र रहना चाहीये. अशी विचारसरणी ज्यांची ते मा. पंतप्रधान अटलजी वाजपेयी. त्यांच्या आयुष्यातील एक महत्वाची घटना याठिकाणी मी सभागृहामध्ये नमुद करते. त्यांची वाक्यपटूता याचा कोण दिवाना नसेल. लाहोर ते दिल्ली ही बससेवा त्यांच्या कार्यकाळामध्ये पहिल्यांदा सुरु झाली आणि या लाहोरमध्ये बसने प्रवास करीत असताना त्यांची भेट एका पाकिस्तानी महिला पत्रकाराशी झाली. त्यावेळेस त्या महिला पत्रकार अटलजींना येऊन म्हणाल्या. अभी तक आप कूँवारे है, तर अटलजी बोले, हां. तो मै आपसे शादी करना चाहती हूँ, अटलजी हांसे और बोले ठीक है. तो वो बोली की मेरी एक शर्त है की आप मुझे शादीके बाद मूँह दिखाईमें कश्मीर गिफ्ट करे. अटलजी हांसे और बोले कबूल है पर मेरी भी एक शर्त है. मुझे दहेजमे पाकिस्तान गिफ्ट चाहिये. म्हणजे अशी त्यांची वाक्यपटूता सगळयांनाच ज्ञात आहे. आपल्या अजातशत्रु, उमदया व्यक्तीमत्वाने भारतीय राजकारणात स्वतंत्र ठसा उमटवणारे तसेच कवी मनाचे कणखर पंतप्रधान अशी प्रतिमा असणारे भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे गुरुवारी देहावस्थान झाले ते ९३ वर्षाचे होते. त्यांच्या कार्यकाळामध्ये लाहोर आणि दिल्ली ही बससेवा सुरु झाली. आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची छाप होती. स्वतंत्र भारताचे बीगर काँग्रेसचे ते तीन वेळा पंतप्रधान झाले. त्यामध्ये त्यांचा कार्यकाल १३ महिने, १३ दिवस आणि ५ वर्षे असा होता त्यामध्ये त्यांनी उत्तम प्रकारे काम केले आहे. त्यांची कौटूंबिक दु:खे बाजूला ठेवून त्यांनी नेहमी जनसेवेला प्राधान्य दिले आणि याचीच प्रचिती १९९७ च्या पिंपरी चिंचवडच्या निवडणुकीमध्ये सर्वांनी पाहिली. भावनेपेक्षा कर्तव्याला त्यांनी जास्त महत्व दिले आणि विरोधकातही मैत्रीचे नाते निर्माण करुन त्यांनी राजकारणात एक आदर्श निर्माण करुन दिलेला आहे. दोन कर्णधार दोन दिवसांत काळाच्या पडद्याआड गेले. एक राजकारणी आणि दुसरे क्रिकेटप्रेमी. एकाने देशाबाहेर विजयाची सवय लावली आणि दुस-याने जगाच्या राजकरणात दखल घेणे भाग पाडले. या दोघांनाही वाजपेयी आणि वाडेकर या नावाने ओळखतात. या दोघांचीही नावे अ ने सुरु होतात म्हणजे हा एक योगायोग म्हणावा लागेल. या दोघांनाही मी माझ्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. खरतर श्रध्दांजली वाहण्याकरीता आणि आपण ज्या व्यक्तीला श्रध्दांजली वाहणार

आहे ती व्यक्तीच अशी होती की बोलाल तेवढे कमीच आहे. सगळयांनाच श्रध्दांजली वाहायची आहे, सगळयांनाच बोलायचय. मी फक्त म्हणू इच्छिते की भारत देशाचे पंतप्रधान भारतरत्न, कवी, संसदीय पटू आपल्या सर्वांना परिचयाचे असलेले खंबीर नेतृत्व अटलजी बिहारी आपल्यातून गेले. खरतर सर्वांना दु:ख असं झालेले आहे. खरतर पंतप्रधान म्हटले की सर्वाच्याच चेह-यासमोर अतिशय सुंदर असं देश चालविलेले आपले अटलजी अतिशय संवेदनशील की ज्यावेळेस ते भाषणाला उभे राहायचे त्या त्या वेळेस ते विरोधकांना व्यवस्थित बोलायचे परंतु मने त्यांची कधी दुखावली गेली नाहीत. अशा पध्दतीने त्यांचं भाषण. स्वर्गीयवासी पंतप्रधान इंदिराजीं गांधी यांना ते नेहमी म्हणायचे की देशाची गुडीया ही. अशा पध्दतीने त्यांचे गोड बोलण असायचं. अशा या थोर नेत्याला मी माझ्या वतीने, माझ्या प्रभागाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहते.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. प्रथम मी भारतरत्न संपुर्ण देशाचे प्रेरणास्थान अटलजी वाजपेयी यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. याठिकाणी मी कालच माझ मत सर्वपक्षीय सभेमध्ये व्यक्त केलेले आहे. परंतु महापौर साहेब, आपणही काल हजर होता. व्यक्ती हा विचाराने, कर्तत्वाने मोठा होत असतो. पदाने मोठा कधीच होत नसतो. पद हे फार छोटया कालावधीसाठी असते. विचार आणि कर्तुत्व हे दिर्घकाळ, अनंतकाळ टिकणारे असते. म्हणून तो विचार आपल्या सगळयांना प्रेरणादायी राहावा म्हणून सभागृहाच्या वतीने प्रथम मी अशी मागणी करतो की, अटलजींचे तैलचित्र या सभागृहामध्ये किंबहूना सभागृहामध्ये एंट्री करताना लावणेत यावे. पूर्वी राजकारणामध्ये अशी पध्दत होती. आमचं नशीब चांगलं की आम्ही डायरेक्ट राजकीय प्रभावामध्ये न येता विदयार्थी चळवळीतून राजकारणामध्ये प्रवेश केला. आमचे नेते प्राध्यापक रामकृष्ण मोरे असतील, त्या काळातील आदरनीय पवारसाहेब असतील, त्यावेळेस मुलाखत घेतली जायची की नेमके तुम्ही राजकारणामध्ये का येता. तुम्हाला नेमके राजकारणातच का यावेसे वाटते. आजच्या मुलाखतीमध्ये वेगळे विचारले जाते. निवडणुकीमध्ये तुम्ही किती खर्च करणार हे विचारले जाते. पूर्वी निवडणूक का लढवावयाची आहे म्हणून त्यासाठी हे विचारले जायचे. तर आम्हाला असं चाफेकर चौकात बोलण्याचे आकर्षण असायचं. ही माणसं बोलतात कशी. काल म्हटल्या प्रमाणे संस्कृतमध्ये शब्द आहे की

ते संस्कृतमधील शब्द मला  बोलता येत नाहीत. परंतु असं म्हणतात की लाखातून एक वक्ता असतो वक्ता हा काही एका दिवसात, दोन दिवसात घडत नसतो. ती घडण्याची प्रक्रीया फार मोठी असते. म्हणून मी सर्वांना विदयार्थी दशेत असताना मला बोलायला शिकायच होतं, तर काय केल पाहीजे.  तर ते म्हणले की पहिले भाषणं ऐकायला शिकायची. आचार्य अत्रे सुध्दा मोठे वक्ते झाले ते चि.म.जोशीची यांची भाषणे ऐकायला गावोगाव ते जायचे. त्यावेळेला एसटी असायची. कोणताही प्रवास करण्यासाठी साधनसामग्री नसायची. अटलजींचे कुठे भाषण असेल त्यावेळेस विरोधीपक्षाच्या लोकांची जी भाषण करण्याची जी शैली होती, अभ्यासू प्रवृत्ती आहे आणि एकाग्रता, संयम, निरीक्षण, आणि शैली कशा पध्दतीने आत्मसात करायाची. त्यातल नाव अटलबिहारी वाजपेयींचे नाव घेतल जातं. तेव्हापासून मी अटलजींची भाषणे ऐकायचो. माझ नशीब एवढ चांगल की संत तुकाराम महाराजांच्या तिकीटाच अनावरण ज्यावेळेस होते त्यावेळेस प्रा.रामकृष्णजी मोरे हे सांस्कृतिक कार्यमंत्री होते. कोणकोण येणार आहे महाराष्ट्रातून माझे पहिले नाव दिले. त्यावेळेस बाबू नायर, आम्ही स्वत: दिल्लीला गेलो. मी जेवढया अंतरावर आता इथं बसलो होतो तेवढयाच अंतरावर त्यावेळेस तीथं बसलो होतो आणि अटलजींचे ते भाषण ऐकलं. असे प्रसंग आयुष्यामध्ये घडल्यानंतर असं वाटतं की  व्यक्ती हा पदाने कधीच मोठा होत नसतो. अटलजी फक्त आयुष्याच्या ८० ते ८२ वय त्यांच तसं दहा वर्षे ते अज्ञातवासामध्ये गेले. १९८२ च्या कालखंडामध्ये फक्त ते साडेसात वर्षे सत्तेत होते. कालांतराने आमच्या पिढीला किंवा राजकारणामध्ये काम करणा-या पिढीला की कोणते आत्मसात विचार करणे आवश्यक आहे. सामाजीक संतुलन राखण्यासाठी, राजकारण करण्यासाठी, राजकारणामध्ये सुसंस्कृतपणे वाटचाल करण्यासाठी नेमके कोणते विचार आवश्यक आहेत त्याचे अध्ययन करणे फार गरजेचे असते. आठरा प्रगट जातीचे आठरा संत या महाराष्ट्राने दिलेले आहेत. नामदेवापासून ते आतापर्यंत संतांची मांदीयाळी फार मोठी आहे. त्यांनी काही आळंदीला आणि देहूला उत्तम ब्रीज बांधले, उत्तम थिएटर बांधले म्हणून काही त्यांची पूजा होत नाही तर त्यांनी विचार या महाराष्ट्राला दिले आणि विचाराच्या आधारे हा महाराष्ट्र चालला आहे. ऋषीमुनींचा हा भारत देश समजला जातो. अटलजी हे एक अस वेगळ व्यक्तीमत्व होतं की त्यांच्या भाषणामध्ये माधुर्य होतं. आणि एखाद्यावर टीका करायची आहे तर टीका करीत असताना ते इतका संयम की टीका ज्याच्यावर होतेय तो रागाने न पाहता त्यांच्याकडे पाहून हास्य स्मीत करायचे. परवा दिवशी त्यांची एक व्हिडीओ क्लीप

दाखवली. नरेंद्र मोदीसाहेब आजचे पंतप्रधान. नरेंद्र मोदीसाहेब त्यांच्या शेजारी बसले होते आणि गोद्रा त्या काळामध्ये गुजरात पेटलेला होता. त्यांची भाषण करण्याची पत्रकारांसमोर बोलण्याची जी शैली जर आपण प्रत्येकातून एक जर गुण घेतला तर मला वाटत राजकारणात जाऊन पराभवाला आला तरी त्यांनी दु:खी होणार नाही एवढी पॉवर त्यांच्या शब्दामध्ये होती. म्हणजे राजाने राजधर्मका पालन करना चाहिए. आणि परत पॉज घेतला भाषणामध्ये. त्यांना भाषणामध्ये पॉज घ्यायची खूप सवय होती. आणि परत थांबून परत तेच वाक्य बोलले की राजाने राजधर्मका पालन करना चाहिए. एवढा संदेश त्यांनी एका वाक्यातून संपूर्ण देशाला दिला. मी नेहमी सांगत असतो की काही व्यक्ती अशा असतात की, त्या पक्षामुळे नावारुपास येतात. पण ते एवढे मोठे होतात की ते पक्षासारखे विचारच होऊन जातात. तसे या महाराष्ट्रामध्ये बाळासाहेब ठाकरे असतील, आदरनीय पवारसाहेब असतील, यशवंतराव चव्हाण असतील, वसंतदादा पाटील असतील. आणि हे अटलजी हे भारताचे नेतृत्व असं आहे की त्यांनी हा पक्ष आहे आणि म्हणून अटलजी आहेत असं कधीच त्यांनी त्यांच्या कृतीतून किंवा कृर्तूत्वातून सिध्द केलेले नाही. त्यांनी ज्या पध्दतीने या देशाला एक सुसंस्कृत नेता कसा असावा विरोधकांशी कशी वाटचाल करावी. त्यादिवशी पवार साहेबांचे एक भाषण मी यूट्यूबवर ऐकले. त्यांनी ७५० खासदार राज्यसभा आणि लोकसभा धरुन. तर ते म्हणले हा एकमेव व्यक्ती असा आहे की, गुजरातमध्ये भूकंप झाला त्यावेळेस लातूरमध्ये भूकंप झाल्यानंतर मला अनुभव आहे की, भूकंपाच काम मी चांगल्या पध्दतीने पाहू शकतो असं पवारसाहेबांनी विनंती केल्यानंतर खास कमिटी नेमण्यात आली भारताच्या पातळीवर. या आप्तकालीन ज्या घटना देशामध्ये घडतात. जसा केरळचा हाहाकार माजला आहे. अशा पध्दतीचे अचानक जे संकट देशावर ओढवले जाते. त्या कालखंडामध्ये संपूर्ण विचार करणारी, दूरदृष्टी ठेवून काम करणारी ही माणसे या देशामध्ये असतील मग ती कोणत्याही पक्षाची असू दया. त्या कालखंडामध्ये पवारसाहेबांना त्या कमिटीचे अध्यक्ष केले ते अटलजी यांनी केले होते. म्हणून हा एक संपूर्ण संदेश विशेषत: संस्कार आपल्या पिढीला असणे अत्यंत आवश्यक आहे. आज आमची राष्ट्रीय परिस्थिती आणि त्या राष्ट्रीय परिस्थितीचा जर आपण समतोल साधण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला एकच गोष्ट वाचवू शकते. म्हणजे हयांचे हे जेवढे मंडळी आहेत त्यांचे अध्ययन करणे, वाचन करणे कारण का "वाचाल तर वाचाल" असे म्हटले जाते. आणि म्हणून राजकारणामध्ये वाटचाल करीत असताना

२५-३० वर्षामध्ये मी अनेक मंडळी पाहिली. अनेक आले, अनेक गेले. पण ते पाहात असताना जी मंडळी आपल्या विश्वासावर ठाम राहिली. आपल्या तत्वावर ठाम राहिली, आपल्या विचारावर ठाम राहिली. आणि अजात शत्रूत्व आहे आणि जो गुण आत्मसात केला. तेच राजकारणामध्ये टिकले. त्यातील अटलजी होते. म्हणून अटलजी किती वर्षे राजकारणामध्ये सत्तेवर  होते त्याही पेक्षा त्यांचा कालखंड त्यांनी केलेला त्याग, त्यांनी केलेली समर्पणाची भावना, प्रचारक म्हणून काल मला कळलं की प्रचारक म्हणून चालतात, भारतामध्ये तीन हजार प्रचारक आहेत. त्यातील अटलजी हे एक पूर्ण वेळ काम करणारे कार्यकर्ते म्हणून ज्यावेळेस त्यांनी आपला मानसीक ठाम आत्मविश्वास होता की मी एक दिवस या देशाचे नेतृत्व करेन. कारण त्यावेळेसची अशी पध्दत होती की चांगल, बोललं तर चांगल म्हणण्याची. पंडीत नेहरुंनी स्वत: सांगितल की हा उदयाचा देशाचा पंतप्रधान होईल. हे त्या कालखंडामध्ये सांगितलं होतं. म्हणून हा सुसंस्कृतपणा जो आहे, जो विचार आहे आणि खरतर मला विशेष वेगळा आनंद काय आहे. तर ते आमच्या पंथातील म्हणजे साहित्य, कला या क्षेत्राशी निगडीत होते. आणि एवढया दिग्गज लोकांच्या बरोबर वाटचाल करीत असताना एवढया दिग्गज लोकांच्या विचारांच्या सहवासामध्ये ज्यावेळेस बसलो ज्यावेळेस विचारांची देवाण घेवाण होते. त्यावेळेस आपल्याला कळते की आपण किती छोटी माणसे आहोत. आपल्याला फक्त ज्ञान आणि ज्ञान आत्मसात करणेसाठी धडपडावे लागणार आहे. ही वृत्ती या क्षेत्रामध्ये ज्ञान घेतल्यानंतरच समजते.  आणि म्हणून अटलजींचे ज्ञान हे अखंडपणे नवीन पिढीला, आमच्या पिढीला आणि सर्वच पिढीला विशेषत: आज तर फार गरज आहे राजकारणामध्ये हयांचे संस्कार घेण्यासाठी. यांच्या संस्कारामधील एकएक गुण जरी घेतला तरी पुढचे दिवस चांगले जातील आपले. त्यामुळे हया सगळया परिस्थितीचे भान ठेवून आटलजी कोणत्या पक्षाचे होते, त्यांनी काय केलं, त्यांची विचारसरणी काय होती. त्यांची विचारसरणी राजधर्माची होती. त्यांची विचारसरणी या देशाच्या विकासात्मक दृष्टीकोनातून होती. त्यांची विचारसरणी देशामध्ये कोणीही विरोधक नाहीत. विरोधक सुध्दा विकासाच्या दृष्टीकोनातून विरोध करीत असतात. हीच प्रवृत्ती त्यांनी जोपासली आणि म्हणून अटलजींचे नांव खाजगीमध्ये सुध्दा त्यांच्या नावाबद्दल कोणीही चर्चा केली नाही. रामजन्मभूमीचा मुद्दा ज्यावेळेस गाजला त्यावेळेस अनेक नेत्यांबद्दल खाजगीमध्ये बोलायचं. परंतु अटलजी असं एकमेव व्यक्तीमत्व आहे की वादग्रस्त पक्षामध्ये असताना देखील त्याठिकाणी कोणतेही विधान त्यांनी जातीयवाचक

केले नाही. राजधर्म भारताची संस्कृती त्यांनी ख-या अर्थाने जोपासली. म्हणून आदरनीय अटलजी यांचे तैलचित्र नक्की करायलाच हवं. आणि फार वेळ लावू नका. त्याच्या परवानग्यासाठी बराचवेळ घालून त्यांच्या तैलचित्राचा एवढा अवमान करु नका. याठिकाणी एवढी मोठी व्यक्ती आहे खर तर त्यांचं असं नाव घेतोय आणि नाव घेण्याच्या इतपत देखील आपली उंची नाहीय एवढ त्यांच व्यक्तीमत्व मोठं होतं त्यांच एकतर सभागृहामध्ये किंवा इमारतीमध्ये एंट्री करताना एक मोठं तैलचित्र लावण्यात यावं. व ते अशा ठिकाणी लावा की ते दिसलें पाहिजेत. असं एक सुंदर तैलचित्र करा की अटलजी हे वेगळे होते. त्यांच्याबद्दल आपल्याला बोलायला मिळतय हेच फार मोठे आपले भाग्य आहे. म्हणून अशा एक थोर व्यक्तीत्व, थोर विचारवंत, थोर साहित्यिक या साहित्यिक कवी मनाचा. मी परत एकदा त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द संपवितो.

**मा.अश्विनी बोबडे -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. आताच भाऊंनी दिलेल्या अटलजींच्या तैलचित्रासाठी मी अनुमोदन देत आहे. मी अटलजींबद्दल एवढच बोलते की न भूतो न भविष्यती अटलजींसारखे असे महापुरुष या भारतामध्ये झाले नाहीत आणि होणारही नाहीत, धन्यवाद.

**मा.जावेद शेख -** मा. महापौर. मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. ख-या अर्थाने आपल्या देशातला एक फार मोठा हिरा आपल्यातून गेलेला आहे. मी जास्त काही बोलणार नाही. परंतु एक विचारवंत साहित्यिक कवी, सामजिक सर्वधर्मभाव घेऊन चालणारा असा एक खूप मोठा नेता, जो या देशाची खूप मोठी ताकद होती. विरोधी असताना देखील सत्ताधा-यांना त्यांच्या सल्ल्याची गरज भासत होती. असे खूप मोठे व्यक्तीमत्व आणि त्यांनी जो सर्वधर्म समभावचे प्रतीक दाखविले होते. ते इतकं अत्यंत सुंदर आहे की आमच्या मुस्लिम समाजामध्ये रमजानच्या महिन्यामध्ये त्यांच्या कारकिर्दीमध्ये त्यांनी एक निर्णय पास केला होता की रमजानच्या महिन्यामध्ये पाकिस्तानने जरी आपल्यावर गोळी झाडण्याचा प्रयत्न केला तरी आपल्याकडून आपण गोळीबार करायचा नाही. मग विचार करा तुम्ही की त्यांचे विचार किती विचारवंत होते. म्हणजे विरोधामधले असलेतरी लोक त्यांना मनापासून प्रेम करतील. अशा प्रकारचे व्यक्तीमत्व त्यांच होत. पण दुर्दैवाने पुढच्या काळात पाकीस्तानने ते स्ट्राईक तोडले. आणि त्या गोष्टी रद्द झाल्या. परंतु अशा विचारवंत

माणसाला मी सेल्युट करतो आणि ख-या अर्थाने काल का परवा दिवशी औरंगाबादमध्ये जो प्रकार घडला. तो मतीन सय्यद. मी तर म्हणतो, मी जर असतो सभागृहामध्ये तर त्याला फक्त मारलच नसत तर त्याचे हात पाय तोडले असते. खरच सांगतो मी एमआयएमचे जे ओवेसी असतील त्यांनाही संदेश पाठवू इच्छितो की तुम्हाला जर तुमच्या पक्षामध्ये असे कार्यकर्ते ठेवायचे असतील तर तुम्ही खुशाल पाकिस्तानला निघून जावा. अजिबात भारतात राहायचे काम नाही तुमचं. पंतप्रधान हा कुठल्या जातीचा नसतो. कुठल्या समाजाचा नसतो. कुठल्या व्यक्तीचा नसतो. पंतप्रधान हा देशातल्या प्रत्येक नागरीकांचा आहे. मग तो गरीब असो श्रीमंत असो, कमी जातीचा असो, उच्च जातीचा असो. प्रत्येकाचा हा पंतप्रधान असतो. आणि जर भारत देशामध्ये राहून तुम्हाला तुमच्या पंतप्रधानावरती त्यांच्या श्रध्दांजलीवरती विरोध नोंदवावयाचा असेल तर अशा लोकांचे भारतात काही काम नाही. मी ही गोष्ट माझ्या मनापासून सांगतोय. मा. महापौर, आज ही श्रध्दांजली माझं हे आजचं व्यक्तव्य माझ्याकडून सुटू नये आणि अटलजींवरच प्रेम हे सगळयांच्या समोर यावे माझ्या मनातलं म्हणून आमच्या समाजाचे कुलगूरुकडून काही तास त्यांच्याकडून मी सुट्टीचे घेतले. मला सभागृहामध्ये पोहोचायला जो उशीर झाला त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. आणि मी लवकरही जाणार आहे त्याच्याबद्दलही दिलगिरी व्यक्त करतो. परंतु असे व्यक्तीमत्व आपल्या भारतामध्ये पुन्हा कधी लाभणार नाही. आणि लाभल तर अती उत्तम गोष्ट आहे. त्यांच्याकडून सर्वांना शिकण्यासारखे होतं. सगळेच त्यांच्याकडून शिकू शकले असते. मी औरंगाबाद सभागृहामध्ये जो काही प्रकार घडला त्याचा जाहीरपणे निषेध करतो. आणि माझ्याकडून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, सर्व नगरसेवक, पत्रकार बंधु. आज भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी भारताचे माजी पंतप्रधान यांना आपण सर्वजण श्रध्दांजली देत आहोत. भाऊसाहेब भोईर यांनी एक चांगली सूचना मांडली आहे. अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र या सभागृहामध्ये लवकरात लवकर लावून अनावरण करणे फार आवश्यक बाब आहे. अटलजींचे कार्य एवढं मोठं होत की शब्दरुपाने कधीच आपण श्रध्दांजली वाहू शकत नाही. कारण कार्य एवढया वर्षाचे आणि एवढ मोठं होत. परंतु काही गोष्टी आजच्या नवीन पिढीच्या राजकारणात किंवा समाजकारणामध्ये आल्या. त्यांना खूप शिकण्यासारखे अनेक विषय

आहेत. राजकारण करीत असताना पक्ष आणि जाती  धर्म याच्या पलीकडे जाऊन जेव्हा माणूस काम करतो तेव्हा एखादा अटलजींसारखा व्यक्ती आणि विचार निर्माण होतो. अटलजी हे व्यक्ती नव्हे परंतु एक विचार होते. १९८० साली भारतीय जनता पार्टीची जी स्थापना झाली. आणि १९८० नंतर ज्या भारतीय जनता पार्टीला ८४ मध्ये फक्त चार खासदार निवडून आले. तेथून पंतप्रधानपर्यंत सर्व मानअपमान सगळ  सहन करुन सत्ता स्थापन करण्याचे काम अटलबिहारी वाजपेयींनी केले. आणि आज भारतीय जनता पार्टी ज्या रुपामध्ये आज २२ राज्यामध्ये, देशामध्ये, राज्यामध्ये, महापालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायत सगळीकडे भारतीय जनता पार्टी आज दिसत आहे. ते केवळ मला वाटतं त्याचे बीज जे रचले असेल अटलबिहारी वाजपेयी यांनी. म्हणून आज श्रध्दांजली अर्पण करीत असताना एखादा स्वातंत्र्य काळानंतर एखादया पक्षाची जी वाटचाल आहे म्हणजे एखादया विचारांची जी वाटचाल आहे ते अटलजींकडून आपल्याला शिकण्यासारखी आहे. अटलजी आज आपल्यामध्ये नाहीत परंतु केवळ आपण तैलचित्रामध्ये निर्माण न ठेवता मला वाटत की अनेक शिक्षण संस्थांच्या माध्यमातून आपण त्यांनी केलेले काम आणि त्यांनी केलेले कार्य जस एखाद छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत आपण मॅनेजमेंट गुरु म्हणून एखाद प्रशिक्षण घेत असतो तसंच मला वाटत की पॉलिटीकल सायन्समध्ये पॉलिटीकल    विचारामध्ये अटलबिहारी वाजपेयी यांचे  पुस्तक किंवा  त्यांचे विचार त्यांच्या कार्यपध्दती आणि कुठल्या पध्दतीने समाजकारण आणि राजकारण करावे याचे पाठयपुस्तक आपण निर्माण करुन तरुणपिढीला पण एक संदेश देण्याचे फार गरजेचे आहे. मी भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.बाळासाहेब ओव्हाळ -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु.  आज हा माझ्या भाग्याचा दिवस आहे. आज भारतभूषण, भारतरत्न, समाजभूषण, कवीभूषण अशा व्यक्तीमत्वाला श्रध्दांजली अर्पण करण्याची वेळ माझ्यावरती आलेली आहे. त्यामुळे मी माझा भाग्याचा दिवस समजतो. आणि त्याचबरोबर अटलजींच्याबद्दल थोडासा एक माझा अनुभव सांगायचा आहे. ज्यावेळेस आम्ही लहान होतो. ते भोसरीला आले होते. भोसरीला सभा होती. भोसरीच्या गावमैदानावरती पाठीमागच्या जत्रामैदानावरती ती सभा होती. त्यावेळेस माझा एक स्वत:चा अनुभव सांगायचा म्हटल तर आम्ही भाषण ऐकण्यासाठी सायकलवरती गेलो होतो. त्यावेळेस

सायकलवरतीच भाषण ऐकण्यासाठी १० मिनिटे उभा राहिलो, १५ मिनिटे उभा राहिलो पण अटलजींचा स्वभाव असा होता की त्यांच्या त्या स्वभावाची मला अशी जाणीव झाली की खरोखर एक वाघासारखे त्यांचे नेतृत्व होते. वाघासारखी त्यांची छबी होती. त्याच कारण म्हणजे एक १० ते १५ मिनिटे झाले की ते पाच मिनिटां नंतर पॉज घ्यायचे, शांत राहायचे. आम्ही म्हणायचो की चला आता हे काय बोलणार आहेत काही माहीत नाही. परंतु फिरल्यानंतर परत असा अंदाज यायचा की त्यांच्याकडून जो शब्द सुटतोय तो ऐकण्यासारखा असायचा. ज्याप्रमाणे वाघ एखादी शिकार करीत असतो. शिकार करताना तो चार पावले पाठीमागे येतो आणि झडप टाकतो त्यावेळेस प्रत्येकाचे ह्रदयाचे ठोके लागलेले असतात. प्रत्येकजण विचार करीत असतो की हा कशी उडी मारणार आहे. त्याप्रमाणे अटलजींची छाप असायची, जे शब्द निघायचे ते त्याप्रमाणे असायचे. वाघाच्या नेतृत्वासारखे, वाघ ज्याप्रमाणे शिकार करतो त्याप्रमाणे त्यांचे शब्द सुटायचे. आणि तो शब्द ऐकण्यासाठी, त्यावेळेस माझ २० ते २२ वय असेल त्यावेळेस सुध्दा मी थांबलो होतो. म्हणजे हे त्यांचे नेतृत्व कशा प्रकारचे होते हे दाखविते. त्यांचा तो पॉज घेऊन ते परत उडी मारायचे. आणि ते जे शब्द फेकायचे, ते शब्द ऐकण्यासाठी लोकांचे कान अतुरतेने वाट पहायचे की आता अटलजी काय बोलणार आहेत पुढे. असे त्यांचे खूप महत्वाचे शब्द असायचे. म्हणून त्यांचे नेतृत्व हे अगदी वाघासारखे नेतृत्व होते. वाघासारखे व्यक्तीमत्व होतं. ते जर समाजभूषण, भारतरत्न, भारतभूषण, या सर्व पदव्या त्यांच्यासाठी शून्य आहेत. आताच भाऊसाहेबांनी सांगितलं कालही ते बोलले होते की खरोखरच अटलजी हा एक विचार आहे. आणि खरोखरच अशा विचारांची लोक ज्यावेळेस या भारतामध्ये हे महामानव तयार होतात त्यावेळेस कुठेतरी भारत देशाला आपल्याला पुढे गेलेला आपल्याला जाणवते. शिवाजी महाराजांचा काळ असेल, इंदिराजींचा असेल, लालबहादूर शास्त्रीजींचा असेल, पंडीत जवाहरलाल नेहरुचा असेल. त्यावेळेस या लोकांनी अगदी वाघासारखे नेतृत्व केलेले आहे. दोन पावले पाठीमागे येऊन त्यांनी पुढे झेप टाकलेली आहे. त्या झेपेमध्ये भारत हा देश निश्चितच तुम्हाला सांगतो महासत्तेकडे वाटचाल केलेली आहे. प्रत्येक महामानवाच्या काळामध्ये महासत्तेकडे वाटचाल केलेली आहे. त्यावेळेस तुम्हाला सांगतो महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुध्दा असतील. त्यावेळेस सुध्दा अशीच वेळ आलेली आहे. की प्रत्येक काळामध्ये प्रत्येक वेळेस भारताने महासत्तेकडे वाटचाल केलेली आहे आणि

त्यामुळे अशा या महान महाव्यक्तीला  मी माझ्यातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. एवढ बोलून मी थांबतो.

**मा.वैशाली काळभोर -** मा. महापौर. मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. खरतर लोकनेता, भीष्मपितामह, संवेदनशील कवी सर्वांना बरोबर घेऊन जाणारा असे आदरनीय माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी १६ ऑगस्ट २०१८ रोजी संध्याकाळी पाच वाजता अनंतात विलीन झाले. अशा या महान नेत्याला राष्ट्रवादी महिला कॉग्रेसच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते. खर सांगायच म्हणजे ते जनसंघाचे प्रचारक होते १९७७ साली. १९७७ ला आणीबाणी डिक्लेअर झाली आणि त्यावेळेस माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना नाशिक या ठिकाणी जेल झाली. त्याचवेळेस आमचे मामा त्याच जेलमध्ये होते.  आणि आम्ही त्यावेळेस मामाला भेटायला जायचो. त्यावेळेस वाजपेयी तिथे कविता करीत असायचे. त्यावेळेस मी खूप लहान म्हणजे सातआठ वर्षाची असेल. तर तो सहवास आम्ही जवळजवळ महिन्यातून दोनदा तीनदा पाहीला, तिथे जेलला जायचो भेटायला त्यावेळेस ते जेलमध्ये कविताच करीत असत. त्यांची कविता, भाषणे आम्ही लहानपणापासूनच ऐकलेली आहेत. अशा महान नेत्याला मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

**मा. नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. भारतरत्न माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना याठिकाणी आपल्या ब-याच सहका-यांनी त्यांना आदरांजली वाहिलेली आहे. परंतु ख-या अर्थाने एक कर्तृत्व, वकृत्व आणि नेतृत्व या तिन्हीवरती संयम असणारा अनेक विचारांचा वारसा असणारा भारताचे एक सुपूत्र आज आपल्या पडदयाआड गेलेले आहेत आणि मगाशी सांगितल फार व्यक्ती अशा कमी असतात की ज्यांच्या विचारावरती आणि त्यांच्या विचारसरणीवरती चालणारे कार्यकर्ते तयार होणा-या मधला मी एक कार्यकर्ता आहे. १९९१ ला ज्यावेळेला लोकसभेच्या निवडणुकीच्या माध्यमातून मी त्यावेळेला शाळेमध्ये होतो. कॉलेजमध्ये असताना त्यांचा योग मला जळगाव याठिकाणी त्यांची सभा ऐकण्याचा आला. आणि एक त्यांचे भाषण ऐकल्यानंतर प्रभावी होऊन ख-या अर्थाने जो व्यक्ती स्वत:चा कुठलाही विचार न करता देशामधील जो शेवटचा घटक आहे त्या घटकासाठी काम करण्याचे नेतृत्व आहे त्यांच्या माध्यमातून मी त्याठिकाणी प्रभावीत झालो आणि ख-या अर्थाने भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून मी

त्यावेळेला सुरुवात केली. आणि निवडणुकी आल्यानंतर आम्ही म्हणायचो कदाचित त्यांचा तो कार्यकाळ होता त्या कार्यकाळामध्ये एक घोषणा असायची “अबकी बारी अटल बिहारी, अटल बिहारी” अशी गोष्ट असायची. आणि मग त्या विचाराने पुन्हा प्रेरीत होऊन आम्ही त्याठिकाणी काम करीत असायचो. मला असं वाटतं की अटलजींच्या बद्दल भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले आणि ते खरे आहे. त्यांचा जो विश्वास होतो तो लोकतंत्रावर होता, लोकशाहीवर होता. आणि ज्या वेळेला १३ दिवसांचे सरकार कोसळलेच्या नंतर त्यांनी त्या ठिकाणी सांगितले. निवडणुका येतील आणि निवडणुका जातील. परंतु लोकतंत्रावरती माझा विश्वास आहे. पुन्हा निवडणुकांना सामोरे जाऊन पुन्हा विश्वास संपादन करुन पुन्हा सत्तेमध्ये येईल हा विश्वास त्यांचा लोकतंत्रावर असल्यामुळे त्यांनी त्याठिकाणी त्यांचे भाषण हे अतिशय प्रभावीपणे आमच्या सारख्या कार्यकर्त्यांच्यावरती झालं. आरएसएसचे प्रचारक असल्यापासून तर पंतप्रधान असण्यापर्यंत त्यांनी जे काम केले ते अत्यंत प्रभावीपणे काम केले. ते काम आपल्या सर्वांना ज्ञात आहे. मला असं वाटतं की माझ्यासारख्या कार्यकर्त्याला त्यांच्याबद्दल आपण कितीही बोललो तरी कमी आहे. त्यांचे जे कर्तृत्व आहे त्या कर्तृत्वाविषयी बोलण्याचा आमच्या सारख्या छोटया कार्यकर्त्यांचा बिलकूल हे नाही. परंतु त्यांच्या विचारावरती चालत असताना भाऊसाहेबांनी सांगितलं की त्यांचे तैलचित्र याठिकाणी लावले पाहिजे. मी खर म्हणजे याठिकाणी भाऊसाहेब भोईरांचे आभार व्यक्त करेन की ख-या अर्थाने लोकशाहीमध्ये ज्या विचारांचा वारसा आणि त्या विचारांच्यामुळे आपण याठिकाणी घडतोय असे विचार याठिकाणी आमच्यासारख्या या महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये येताना एक दर्शनी भागामध्ये अटलजींचे त्याठिकाणी तैलचित्र आपण जर का लावल तर मला असं वाटत की आज आपण इथे बघतोय की निवडणुकी झाल्याच्यानंतर काय परिस्थिती येतेय त्याही पेक्षा अशा विचारांचा वारसा आमच्या मनावरती बिंबत राहिला तर निवडणुका आल्याच्यानंतर निवडणुकीमध्ये जिंकणे किंवा हारणे हयाच्याहीपेक्षा मी लोकांसाठी काय करणार आहे जनमाणसांसाठी काय करणार आहे. हे आम्हाला लोकशाहीमध्ये निवडून दिलेले आहे त्याचा वापर मी जनतेसाठी कसा करेन हा जो काही त्यांचा मानस होता. त्या माध्यमातून याठिकाणी अटलजींचे तैलचित्र दर्शनी भागामध्ये लावण्यात यावे. महापौर साहेब, अशी मी याठिकाणी सभागृहाला विनंती करतोय. त्यानंतर अटलजींची कारकीर्द मगाशी मी म्हणलं डिसेंबर २५ ला १९२४ मध्ये ग्वालेर या राज्यामध्ये त्यांचा जन्म झाला. १९४२

ला वाजपेयी यांचा ख-या अर्थाने राजकारणाशी संबंध आला. भारत छोडोच्या चळवळच्या माध्यमातून त्यांचा संबंध आला. तीन वेळा ते पंतप्रधान राहिले. महापौर साहेब, मला याठिकाणी एकच विनंती करायची आहे की त्यांची जी काय वाणी होती किंवा त्यांचे जे काही कर्तृत्व होतं. ती जी काही समर्पित भावना होती. ती राष्ट्रासाठी होती आणि शेवटच्या घटकासाठी समाजामध्ये काम करण्याची भावना होती. याठिकाणी आपण त्यातून एक गुण जरी आपल्यामध्ये घेतलातर मला असं वाटतं की ख-या अर्थाने आपण त्यांना याठिकाणी श्रध्दांजली अर्पण करु या. येणा-या काळामध्ये स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा घेऊन येणा-या काळामध्ये आम्ही सर्वजण काम करण्याचा प्रयत्न करु. ख-या अर्थाने त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन जर काम केलं त्यांना ख-या अर्थाने या सभागृहामध्ये श्रध्दांजली वाहिली असं मला वाटेल. खर त्यांचे जे कार्य आहे ते कार्य पुढे नेण्यासाठी आज आमच्या सारख्या कार्यकर्त्यांना वाटते की ते अजुनही आमच्यामध्ये आहेत. ते आमच्या पाठीवरती थाप टाकत आहेत. आज देशामध्ये जे काही घडत आहे. मला अस वाटत की त्यांच्या विचारांच्या माध्यमातून देशामध्ये परिवर्तन होतेय. हेच एक परिवर्तन प्रत्येकाला समाजामध्ये काय अपेक्षित आहे. समाजाला आपण काय दयायच आहे. या भावनेमधून जे काही चाललेले आहे अटलबिहारी वाजपेयींच्या काळापासून ते आतापर्यंत या भावनेमधून आम्ही काम करतोय. मला असं वाटतं की आपण या ठिकाणी अटलजींच्या विचारांचा वारसा घेऊन पुढे जाऊ या मला असं वाटतं की त्यांना हीच ख-या अर्थाने श्रध्दांजली ठरेल. याठिकाणी मी थांबतो माझी श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.मुंढे उषा -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. १९८४ मध्ये इंद्राजींच्या हत्येनंतर भाजपाचे केवळ दोन खासदार निवडून आले होते. वाजपेयीजी हरले होते त्यांना राज्यसभेवर घेण्यात आले होते. संसदेत त्यांना आपल्या पराभवावर हास्य केले होते जे पेपरमध्ये आले होते. “ना हार मे, ना जीत मे, किंचीत भी भयभीत मे, कर्तव्य पर जो भी मिले, यही भी सही है, वहाँ भी सही है. ते आपल्यामधून गेले त्यांना मी माझ्या वतीने व प्रभाग क्रमांक २९ च्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहते.

**मा.मोरेश्वर शेडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. एक महिन्यापूर्वी अटलजींना डॉक्टरांनी ज्यावेळेस ऍडमीट केले होते त्याचवेळेस खरतर

मनामध्ये पाल चुकचुकली होती. १६ ऑगस्ट रोजी त्यांच्या निधनाची बातमी आली त्यावेळेस लहानपणापासून त्यांना पाहात आलो त्यांच्याकडे पाहात आम्ही राजकारणामध्ये आलो आणि असे अटलजी गेले ही कल्पनाच मुळात सहन होत नाही. माझ्या आधीच्या सर्व वक्त्यांनी, मान्यवरांनी अटलजींच्या इतिहासाबद्दल त्यांच्या बद्दल अनेक माहिती दिली. त्यांच्या कार्यपध्दतीबद्दल सर्वजण बोलले. आमचे अटलजी जेव्हा राष्ट्रीय अध्यक्ष झाले आणि मुंबईमध्ये पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये अटलजींनी आपल्या अमोघ वाघेरे सर्व कार्यकर्त्यांना प्रोत्साहीत केले. त्यावेळेस अटलजी बोलले की या पश्चिमी महासागराच्या किना-यावरुन मी भविष्यवाणी करीत आहे. की “अंधेरा छटेगा, सूरज उगेगा कमल खिलेगा” आणि आज अटलजींची भविष्यवाणी सत्य झालेली आहे. देशातील ३१ राज्यापैकी १९ राज्यामध्ये आज भारतीय जनता पार्टीची सत्ता आली आहे. आपले अमोघ वाघेरे आपल्या देशाच्या लोकशाहीचा बळकट करण्यासाठी कायम त्यांच्या सहवासामध्ये तसे ते राहिलेत. माझे सहकारी कार्यकर्ते अटलजींकडे पाहून आज समाजामध्ये किंवा राजकारणामध्ये आलेले आहेत. अटलजींनी त्यांच्या पंतप्रधान पदाच्या काळामध्ये सुवर्ण चतुष्कोणातील देशाच्या चारही बाजूंनी एक सरल योजना त्यांनी राबविण्याचा प्रकल्प केला आणि त्याप्र कल्पाचे नाव होते सुवर्णचतुष्कोण. अटलजींचा अजुन एक महत्वकांशी प्रकल्प होता. पोखरणमधील अनुस्फोट असतील किंवा कारगीलमध्ये झालेले युध्द असेल अटलजींनी देशहितासाठी कुठल्याही प्रकारचा विचार न करता केवळ देशहीत पाहिले. अशा अटलजींना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. आणि आदरनीय भाऊसाहेब भोईर आणि नामदेव ढाके यांनी जी मागणी केलेली आहे की अटलजींचे तैलचित्र या सभागृहाच्या दर्शनी स्थानी असावे. किंवा सभागृहामध्ये किंवा महानगरपालिकेमध्ये आपण आत येताच अशा दर्शनी स्थानी अटलजींचे तैलचित्र असावे की जेणेकरुन या पवित्र सभागृहामध्ये आल्यानंतर अटलजींकडे पाहून आपण अजून चांगल्या पध्दतीने या लोकशाही बळकट करण्याकरीता काम करु. मी पुन्हा एकदा माझ्या कुटूंबाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा. मनिषा पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. अटलजी यांना माझ्या वतीने, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली.

**मा.सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. आज खरतर आपण सर्वजण दु:खामध्येच आहोत. आपल्या सर्वांचेच आदरनीय भारतरत्न या देशाचे माजी पंतप्रधान आदरनीय अटलबिहारी वाजपेयी व त्याचप्रमाणे परदेशामध्ये ज्यांनी भारताचे नेतृत्व केले आणि पहिली क्रिकेटमधील कसोटी मॅच जिंकण्याचा मान ज्यांना मिळाला असे अजित वाडेकर यांना मी माझ्या पक्षाच्या वतीने, आदरनीय राजसाहेबांच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करतो. आदरनीय अटलबिहारी वाजपेयीजी हे देशाचे १० वे पंतप्रधान होते. त्यांचा जन्म ग्वालेर, मध्यप्रदेश याठिकाणी झाला होता. अटलबिहारी वाजपेयींची पूर्ण जडणघडण हे संघ परिवारामधून झाली. संघ परिवारामध्ये वाढत असताना पुढे त्यांना भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद मिळाले. एकदम एक हळवा कवी, प्रखर प्रवक्ता आणि राजकारणावर एक चांगली पकड असणारा नेता आज आपल्या सर्वांना या पिढीतील सर्वच लोकांना पाहायला मिळालेला आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की ज्यावेळेस भारताबरोबर अमेरिका, चीन आपले जे शेजारील राष्ट्र असेल त्यांचे अधिकाधिक संबंध सुदृढ करण्यामध्ये मजबूत करण्यामध्ये अटलबिहारी वाजपेयींचा एक मोठा वाटा होता. पुर्ण देशाने पाहिले असेल ज्यावेळेस भारत आणि पाकिस्तान एक तेढ निर्माण झाले होते. एक युध्दाचे वातावरण तयार झाले होते. त्याचवेळेस आख्या भारतातील लोक एक नजरेने पाहात होते. आणि आजूबाजूचे देश भारत आणि पाकिस्तानवर नजर ठेवून होते. आणि त्याचवेळेस पोखरणमध्ये १९९८ साली पाच अनुचाचण्या आदरनीय अटलबिहारी वाजपेयी, आदरनीय राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम या दोघांच्या नेतृत्वाखाली या अनुचाचण्या झाल्या. आणि भारताकडे सर्व देशाने एक अनुराष्ट्र म्हणून त्यावेळेस पाहायला सुरुवात केली. आदरनीय देशाचे स्व. पंतप्रधान राजीवजी गांधी साहेब यांनी टेलीकॉम क्षेत्राची सुरुवात केली. आणि ते गेल्यानंतर आपण जर का सर्व क्षेत्रामध्ये टेलिकॉम जर का पाहात असू तर किंवा हातात जर का स्मार्ट फोन पाहात असू तर अग्रगन्य काम, एक मुळापर्यंत नेण्याचे काम ते त्यांच्या कालखंडामध्ये केले गेले. त्याचप्रमाणे आदरनीय अटलबिहारी वाजपेयी यांना घरी येऊन बेस्ट लिव्हींग हा अवॉर्ड देण्यात आला. मी अशा आदरनीय अटलबिहारी वाजपेयी यांना त्रिवार अभिवादन करतो आणि भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा. राजू बनसोडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, सन्मा. सभागृह, सर्व पत्रकार बंधु. अटलबिहारी वाजपेयी यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि हारीभाऊ जवळकर यांनाही भावपूर्ण_श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**मा. सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मी पुन्हा एकदा सभागृहाला सांगू इच्छितो की आताच भाऊसाहेबांनी जे सांगितलं की आदरनीय अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र उभे केले पाहिजे. त्याचप्रमाणे माझी अशी सुचना असेल की त्यांच्याबरोबर या देशाचे माजी राष्ट्रपती आदरनीय ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचेही तैलचित्र याठिकाणी लावण्यात यावे. अशी मी याठिकाणी सुचना करतो, धन्यवाद.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा. महापौर, साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, सर्व पत्रकार बंधु. भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय अटलबिहारीजी वाजपेयी साहेबांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण सर्वजण उपस्थित आहात. राजकीय जीवनामध्ये ४० वर्षे ते राजकीय जीवनाच्या प्रवासामध्ये राजकारणामध्ये होते. त्यांचा एक किस्सा आठवतो. सभागृहामध्ये ते असताना नरसिंहराव या देशाचे गृहमंत्री होते आणि अनावधानाने त्यांच्याकडून काही आरोप नरसिंहरावांच्या वरती झाले. तत्कालीन त्याकाळचे ते गृहमंत्री होते. पण अटलजीं ते बैचेन झाले, त्यांना झोप आली नाही. थोर मनाचा व्यक्तीच ते सांगू शकतो. त्यांनी केलेली चूक अनावधानाने त्यांचेकडून काही शब्द ते गृहमंत्र्यांना गेले होते. दुस-या दिवशी त्यांनी लगेच स्वत: पत्र त्याठिकाणी लिहीले आणि जे काही आपल्याकडून चुकीचे शब्द गेले त्यांची माफी अटलजींनी मागितली. तर माफी मागण्यापासून ते या देशाचा पंतप्रधान पदापर्यंत त्यांना कुठल्याही गोष्टीचा कमीपणा वाटत नव्हता. त्यांच्या जीवनामध्ये त्यांच्या नेहमी बोलण्यामध्ये होते छोटे मन से कोई भी बडा नही होता, छोटे मन से कोई भी बडा नही होता, छुठे मनसे कोईभी खरा नही होता मग असे अनेक त्यांनी आपल्या जीवनामध्ये अजात शत्रूप्रमाणे ते या देशामध्ये राहिले. त्यांनी सभागृहामध्ये पण ज्या ज्या वेळेस तत्कालीन सरकारवरती कुठलेही संकट आले तर विरोधकाची भूमिका म्हणून त्यांनी कधी विरोधी भूमिका मांडली नाही. ज्या वेळेस या देशाचे नेतृत्व करायला एक विरोधीपक्षाचा नेता म्हणून जिनिव्हा या ठिकाणी परिषद होती. आपल्या देशाचे नेतृत्व करण्यासाठी त्यांना त्याठिकाणी विरोधी नेता म्हणून पाठविण्यात आले. आणि त्यांनी ठामपणे पाकिस्तानच्या विरोधात आपली बाजू मांडली. म्हणजे एका सरकारच्या विरोधात सुध्दा

त्यांनी आपल्या देशाच्या बाजूने कसे बोलायचे याचे जिवंत उदाहरण म्हणजे आदरनीय अटलजी असे होते. खरतर भाऊसाहेबांनी सांगितलं की अटलजींचे तैलचित्र या सभागृहामध्ये लावण्यात यावे. मला असं वाटतं की त्यांचा आदर्श कायम या शहरामध्ये राहण्यासाठी आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमिक आणि प्राथमिक जेवढया आपल्या शाळा आहेत. त्या शाळांमध्ये स्वर्गीय अटलजींचे तैलचित्र लावण्यात यावे अशी माझी सभागृहाला विनंती आहे. मी माझ्या वतीने, या सभागृहाच्या वतीने अटलजींना भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि या ठिकाणी थांबतो, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. खरतर निश्चितपणे आपल्या देशावर शोककळा पसरली आहे. कारण आपल्या देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट रोजी ते सगळयांना सोडून गेले. ख-या अर्थाने अटलजीं बीहारींच्या व्यक्तीमत्वाबद्दल या सभागृहामध्ये अनेकांनी  आपआपले विचार मांडले. अटलजींबद्दल बोलू तेवढं कमीच आहे. कारण अटल बिहारी वाजपेयीबद्दल येथे अनेकांनी सांगीतल की ते फक्त बोलण्यामध्येच नाहीतर त्यांचे विचार जे होते त्यांचा विचार ज्यावेळेस आपल्या आचारणामध्ये येईल त्याचवेळेस आपल्या सगळयांच्या वतीने त्यांना ख-या अर्थाने आदरांजली ठरेल. जरी मी मागच्या पाच वर्षापासून नगरसेवक असले तरी मला चांगले आठवते की आम्ही सातवी-आठवीला असताना आमच्या मनामध्ये प्रचारक म्हणजे नेमके काय असते अनेकांना माहीत नसेल परंतु ज्या ज्यावेळेस प्रचारक पिंपरी चिंचवडला यायचे त्या त्या वेळेस त्यांच्या निवासाची व्यवस्था आमच्याकडे असायची. अनेकांना माहीत असेल किंवा नसेल. त्यांचे राहणं, खाणपिणं या सगळया गोष्टी ते आपल्याबरोबर आपल्या घरातील, कुंटूबातील पाच व्यक्ती असतील तर ते सहावी व्यक्ती म्हणून आपल्या घरामध्ये राहात असतात आणि अशा प्रकारे प्रचारक आमच्याकडे राहायला असल्या कारणाने अनेक वेळा चर्चा व्हायची. ज्या वेळेला गप्पा व्हायच्या त्या वेळेला सांगायचे की ताई आता आम्ही मुंबईला जाऊन आलो, दिल्लीला जाऊन आलो. आम्हांला अटलबीहारी वाजपेयी भेटले होते. मग त्यांच्या कविता असतील. त्यांच्या कवी मनावर त्यांच्या कवितातून देशप्रेम व्यक्त होणारे हे सगळे सातत्याने आमच्यावरती, आमच्या डोक्यावरती या सगळया गोष्टींचा एक वेगळा पगडा होता. अटलबिहारी वाजपेयी म्हणजे नुसतेच देशप्रेम नाही तर, देशभक्ती नाही तर देशासाठी

जीवन समर्पित करणारे एक व्यक्तीमत्व म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव या देशामध्ये निश्चितपणे येथून मागे घेतले जायचे येथून पुढच्या काळामध्ये देखील घेतले जाईल. अटलबिहारी वाजपेयी यांच्या भाषणामध्ये जर आपण बघितलं तर नेहमी बोलताना अत्यंत प्रेमळ मधुर वाणी त्यांच्या हास्यामध्ये सुध्दा एक सुंदर स्माईल आपुलकी असायची परंतु ज्यावेळेस देशहिताचा एक विचार यायचा. देशहिताबद्दलचे विचार हे ज्यावेळेस सभागृहामध्ये मांडायचे तितकच कणखर, तितकच प्रखर असं त्यांच भाषण असायचं. अनेकवेळा विचार मनामध्ये यायचा की, आपण कवी मनाचे हसून बोलणारे अटलबिहारी वाजपेयी काल टिव्ही वर पाहीले आणि आज आपण भाषण ऐकतोय. त्यावेळेस ते अत्यंत चिडलेले असायचे देशहिताच्या विरोधात कोणी बोललं तर त्यांचा राग अनावर व्हायचा. त्यांच्या देशहिताच्या बद्दल आपण सगळेजण शून्य आहोत. असे विचार त्यांनी कायम आयुष्यभर आपल्या हया देशासाठी पन्नास वर्षे राजकीय आयुष्य त्यांनी आपल्या देशाला दिले असे अटलबिहारी वाजपेयींना याठिकाणी आदरांजली वाहताना दु:ख होत असले तरी नगरसेवक आहे म्हणून किमान त्यांचेबद्दलचे विचार जे मनामध्ये आहेत ते या सभागृहामध्ये मांडण्याची संधी तरी मिळाली. खर अटलबिहारी वाजपेयी ज्यादिवशी गेले १६ ऑगस्टला, त्यादिवशी माझ्या भावाचा मला फोन आला होता मी बाहेरगावी होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्यावर एक कविता लिहीली ती या सभागृहामध्ये त्यांच्या चरणी अर्पण करण्याचा प्रयत्न करते. “तूच चंद्र, तूच सूर्य, तू अटल नभाचा तारा, तूच चंद्र, तूच सूर्य, तू अटल नभाचा तारा, श्वासामध्ये धरुन न्यावा असा तू वारा, श्वासामध्ये धरुन न्यावा असा तू वारा, जल ही तू, अग्नी तू, जल ही तू अग्नी तू, तू देशामधली माती, घट्ट बोटी काळोख तू प्रकाशकिरण वाती, चिखलामधला कमळ तू, चिखलामधला कमळ तू, तू देशाची शान, शत्रूसाठी वणवा तू, तू अटल पेटले रान, तू अटल पेटले रान, या देशाच्या लोकशाहीचा, या देशाच्या लोकशाहीचा स्तंभ पाचवा तू, कितीक झाले नेते परी, कितीक झाले नेते परी, कृष्ण आठवा तू. कडकडणारा असूड तू, कडकडणारा असूड तू, तू गर्जना सिंहाची, तुला तमा ना कधी, तुला तमा ना कधी वाटली, नाशवंत या देहाची, नाशवंत या देहाची. उंच इतका तू अटल की, उंच इतका तू अटल की, हात नभा लागले, देशासाठी तू अटल रे, नात्यांचे त्यागले. देशासाठी तू अटल रे, नात्यांनाही तू त्यागले. तुझेच घ्यावे गुण अंगि. तुझेच यावे गुण अंगिरे आहे एवढेच म्हणणे, चराचरात आता तू रे.

अटल शोधणे, अटल शोधणे. अशा प्रकारे ख-या अर्थाने माझ्या कुटूंबाच्या वतीने माझ्या सभागृहाच्या वतीने त्यांना याठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

**मा.सुनिता तापकीर -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. भारतरत्न पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहते. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नागरवस्ती विभागातर्फे ज्येष्ठ नागरीक धोरण अवलंबिले जाते त्यास भारतरत्न पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात यावे. तसेच निगडी ते पुणे जो महामेट्रो मार्ग आहे त्यास सुध्दा मा.भारतरत्न पंतप्रधान  अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यात यावे. असा ठराव मंजुर करणेत यावा, धन्यवाद.

**मा.विकास डोळस-** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी साहेब यांचे १६ ऑगस्टला  निधन झाले. एक सच्चा राष्ट्रभक्त या देशातून हरपला. अटलबिहारी वाजपेयी साहेब खरोखर सच्चे राष्टभक्त होते आणि अशा राष्ट्रभक्तासमोर मृत्यूही हारला. कारण १५ ऑगस्टला आपण भारताचा ७२ वा स्वातंत्र्यदिन साजरा केला मृत्यूशी झुंज देत असताना स्वातंञ्यदिनी मृत्यू न पत्करता १६ ऑगस्टला त्यांना मृत्यू आला. त्यांचेसमोर खरोखर मृत्यू हारला. जेव्हा केव्हा अधुनिक भारताचा स्वतंत्र भारताचा इतिहास लिहीला जाईल तेव्हा त्या इतिहासामध्ये अटलबिहारी वाजपेयी साहेबांचे नांव सुवर्ण अक्षरामध्ये असेल. मला आठवतेय मी विदयार्थी दशेत असताना  भारतामध्ये पोखरणच्या वाळवंटामध्ये अनुचाचणी घेण्यात आली होती. तेव्हा वर्तमानपत्रामध्ये बरीच चर्चा झाली होती. संयुक्त राष्ट्रसंघाचा जो दबाव होता, जे निर्बंध होते ते निर्बंध जुगारुन भारताला ख-या अर्थाने न्युक्लेअरसेप करण्याचे काम अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी केले. माझ्यासारख्या तरुणांना जे राजकारणामध्ये येण्यासाठी इच्छूक असायचे त्यांच्यासाठी वाजपेयी साहेब हे नेहमीच प्रेरणा राहतील. वाजपेयी साहेब हे उत्तम साहित्यिकही होते. त्यांच्या कविता हया नेहमी युवकांना प्रेरणादायी राहतील. “क्या हार मे क्या जीत मे, किचींत नही भयभीत में. कर्तव्यबध्द जो भी मिला ये भी सही, वो भी सही, वरदान नही मागूँगा, हो कुछ पर हार नही मानूँगा” त्यांची ही वाक्ये नेहमीच माझ्या आयुष्यामध्ये राहतील. मी आपल्या सर्वांच्या वतीने, या सभागृहाच्या वतीने,

पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने साहेबांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा. सचिन चिंचवडे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. आज भारतरत्न माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आपल्यातून, सर्व देशातून या जगातून निघून गेलेले आहेत. त्यांना श्रध्दाजंली प्रत्येकाने आपआपल्या परीने वाहीली. "मरावे परी किर्तीरुपी उरावे" असे जीवन या माणसाने जगले. माझ्या परिवारातर्फे मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. केरळमधील मृत आपल्या बांधवांना सुध्दा श्रध्दांजली अर्पण करतो. केरळमधील जी भीषण परिस्थिती आहे त्या परिस्थितीला एक खारीचा वाटा म्हणून सामाजिक बांधिलकी म्हणून मी माझे सहकारी नगरसेवक अभिषेक बारणे, माझे सहकारी नगरसेवक तुषारभाऊ कामठे आमच्या तिघांचे एक महिन्याचे मानधन आम्ही त्या निमित्ताने तिथे देतोय आणि सर्वांना आवाहन करतो की आपल्या परीने आपल्या बांधवांना ज्यांना ज्यांना शक्य होईल, जेवढे शक्य होईल तेवढी मदत आपण त्याठिकाणी करावी एवढे बोलतो आणि हीच खरी श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. आज आपण गेले एक ते दिड तास झाले स्वर्गीय पंतप्रधान अटलबिहारीजी वाजपेयी यांना श्रध्दांजली संपुर्ण सभागृहामध्ये संपुर्ण नगरसदस्य आपआपल्या परिवाराच्या वतीने आपल्या वतीने सर्वजण वाहात असताना मला आठवतय की या सभागृहामध्ये एक कविता त्यांनी १३ दिवस, १३ महिने, आणि ०५ वर्षे असे या भारत देशाचे पंतप्रधानपद भूषविले. ते केवळ भाजपाचेच नाही तर या संपुर्ण देशाचे सर्वोच्च नेते होते. त्यांचा आदर सन्मान फार मोजक्या नेत्यांना जगभरामध्ये लाभला. आपण त्यांच्या अंत्यविधीत देखील पाहिले असेल पुर्ण जगातले, त्या त्या देशातले कॉन्सलेट असतील, परराष्ट्रमंत्री असतील त्यांनी देखील स्वर्गीय अटलजींना आपआपल्या परीने श्रध्दांजली वाहिली आहे. राजकारणात सर्वांना बरोबर घेऊन काम करीत असताना अटलजींनी एक आदर्श आचारसंहिता या देशाला दाखवून दिली. ज्याच्यावर पुढे अनेक वर्षे अनेक राजकीय पक्षांनी देशाची सर्वोच्च सत्ता अटलजींच्या विचाराने आचाराने आज आपण सर्वजण भारत देशामध्ये पाहत आहोत. राजकारणाबाबतचे त्यांचे विचार कवितेद्वारे मी आपणासमोर मांडतो. "देश एक मंदीर है.

हम पुजारी है, पुजारी है. राष्ट्रदेव की पूजा मे हमे खुद को समीट करना चाहिये". तरी अशा पध्दतीने त्यांनी देश चालवीत असताना पोखरण बाबत टिका होत असताना, बांगला देशाच्या फाळणीच्या वेळेस परवाच्या लोकसत्तामध्ये संपादकीयमध्ये त्यांचा लेख आहे. जेव्हा ते पहिल्यांदा पंतप्रधान झाले त्यांनी गुलामनबी आझाद यांना फोन केला की आपण या देशाचे खूप वर्षे संसदीय कामकाज मंत्री होते. आम्हाला आपल्या मार्गदर्शनाची गरज आहे. म्हणजे असे अजात शत्रू ज्यांना कुठलाही कमीपणा नव्हता. अशा एका मोठया नेत्याला १० वेळा लोकसभा, दोन वेळा राज्यसभा, सहा ते सात वर्षे पंतप्रधान पद या देशाचे भूषविले या सर्वोच्च नेत्याला श्रध्दांजली वाहत असताना त्यांची एक शेवटची कविता आपल्यासमोर मांडू इच्छितो. "ठन गई मौत से ठन गई, मै जी भर जीया मै मनसे मरु. लौटकर आऊंगा खुदसे क्या डरु". अशा पध्दतींच्या विचारांचे प्रत्येक वयोगटाला आपल्यामध्ये चिरंतर राहतील असे विचारांचे नेते अटल, अचल, आढळ असणारे हे नेतृत्व नित्य आपल्या समोर विचारांने राहील. दिशादर्शक म्हणून राहील, मार्गदर्शक म्हणून राहील. त्यांचे विचार जीवंत ठेवून तुम्ही आम्ही जर भविष्यात वाटचाल करु शकलोतर तीच खरी त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली असेल. मी माझ्या कुटूंबीयाच्या वतीने, प्रभाग क्रमांक २५ च्या वतीने, पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहत असताना भाऊसाहेबांनी तैलचित्राच सांगितले. चिंचवडेताईनी सांगितले. मी सभागृहाला अशी विनंती करेन की, महापौरांना विनंती करेन की याठिकाणी कुठेतरी असं एक ठोस कार्य त्यांच्या विचारांनी कायम या शहराला दिशा दिसेल अशा प्रकारचे कार्य करावे. सचिनजी यांनी सांगितल्याप्रमाणे मदत देण्यासाठी मा. महापौर साहेब यांनी, पक्षनेते यांनी सर्वांची बैठक घेऊन काय मदत करता येईल हे बघावे. एक महिन्याचे वेतनच काय वर्षभराचे वेतनही देता येईल. तशी बैठक घेवून आपल्याला मदत करता आलीतर करावी. तसेच भारताचे पुर्व कॅप्टन अजितजी वाडेकर, करुणानिधी अशा थोर आत्म्यांना पुन्हा एकदा भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि थांबतो.

**मा.अश्विनी जाधव -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. "सत्ता का खेल तो चलता रहेगा, सत्ता आयेगी, सत्ता जायेगी. पार्टीया बनेगी, पार्टीया बिगडेगी, लेकीन किसी हाल मे मेरा देश रहना चाहिय." एका या महान

व्यक्तीला श्रध्दांजली  वाहातोय. खरंच त्यांच महान व्यक्तीमत्व आहे. मी जास्त काही बोलणार नाही. पण या थोर व्यक्तीला मी श्रध्दांजली वाहते व माझे दोन शब्द थांबविते.

**मा. प्रियांका बारसे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व  पत्रकार बंधु. आज याठिकाणी खरतर मा.माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी इतकी शब्दसुमने उधळली गेलेली आहेत की निश्चितच हा जो विचारांचा सुगंध आहे, किंवा शब्दांचा सुगंध आहे तो निश्चितच येथून पुढच्या काळामध्ये दरवळलेला आपल्याला, निश्चितच विचारांमध्ये आणि आपल्या आचारांमध्ये दिसेल अशी अपेक्षा मी याठिकाणी व्यक्त करते. कारण आपण भाषण करुन जातो शब्द बोलून जातो. परंतु कृती करायची मात्र राहून जाते. तर निश्चितच पुढच्या काळामध्ये सभागृहामध्ये किंवा सभागृहाच्या बाहेर आपण ज्या प्रभागामध्ये कम्र करणार आहोत. त्या प्रभागामध्ये हे जे अटलजींचे विचार आहेत. त्या विचारांनी प्रभावीत होऊन आपण जर काम केले तर निश्चितच ख-या अर्थाने त्यांना श्रध्दांजली वाहणार आहे. पण अटलजींचा व माझा मी अर्थाअर्थी सुध्दा संबंध म्हणणार नाही आपण पुस्तकातून किंवा ऐकीव गोष्टीतून त्यांचे जे अनुभव आम्हाला कानावर पडलेले आहेत. परवा दिवशी पटवर्धन साहेबांनी अनुभव सांगितला की जो महिलांच्या बाबतीतला खरतर ते अविवाहित होते. पण तरी सुध्दा त्यांनी स्त्रीला दुर्गेचे रुप मानलेले होते आणि इंदिराजींच्या आणि त्यांच्या विचारांमध्ये इतके खटके उडायचे त्या काळामध्ये. पण तरीसुध्दा जर चांगला विचार सभागृहासमोर मांडला तर  त्या विचाराला एक पाठींबा देण्याचे खूप खंबीर असे काम त्यांनी केलेले आहे. आणि ते नेहमी म्हणायचे की मतभेद कितीही असू देत पण मनभेद होऊ नयेत हा जो विचार आहे तो आपण सर्वांनी सभागृहामध्ये आणि सभागृहाच्या बाहेर जर पाळला तर निश्चितच ख-या अर्थाने त्यांना ती श्रध्दांजली वाहिली जाणार आहे. माझ्या ज्या सहकारी मैत्रिणी आहेत गोरखेताई, योगिता नागरगोजे, बाबरताई, नंतर घोलपताई, मोरेताई यांनी स्वत:हून सांगितल की आमच्यातर्फे सुध्दा श्रध्दांजली वाहा. फक्त मी त्यांची नावे घेतेय असे नाही, प्रत्येकालाच बोलता येत असं नाही किंवा बोलायला संधी मिळते असे नाही. जे बोलले नाही, बोलले त्या या संपुर्ण सभागृहाच्या वतीने  आणि आमच्या प्रभाग क्रमांक पाचच्या वतीने मी अटलबिहारी वाजपेयी यांना श्रध्दांजली वाहते, धन्यवाद.

**मा. लांडगे राजेंद्र -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. आज प्रत्येक जण आपआपल्या परीने स्वर्गीय भारतरत्न पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना आपल्या विचारातून आपल्या अनुभवातून किंवा ऐकले, वाचलं याच्यातून आज श्रध्दांजली वाहात आहेत. माझाही अनुभव असाच आहे की ज्यावेळेस मी नववीला होतो त्यावेळेस भोसरीत स्वर्गीय अंकुशभाऊ लांडगे यांच्या माध्यमातून भोसरी गावजत्रा मैदानामध्ये त्यावेळेस सभा आयोजित झाली होती. त्यावेळेस राजकारण विषय माझ्यासाठी खूपच वेगळा होता कारण मी नववीमध्ये शिकत होतो. त्यावेळेस भैरवनाथ शाळा याठिकाणी आपला पीएमपीएमएलचा डेपो आहे. त्याठिकाणी वाजपेयी साहेबांचे हेलिकॉप्टर त्याठिकाणी उतरले आणि आम्हांला असं कळल की याठिकाणी मोठे नेते भाषणाला येणार आहेत. आम्ही पळतपळत त्याठिकाणी गेलो. त्यांचे जे विचार ऐकले आणि त्या विचारातून राजकारण हे काही माहीत नव्हते पण त्यावेळेस त्यांचे विचार ऐकून मी एवढा भारावून गेलो आणि तेव्हापासून मी भाजपाचा एक सच्चा कार्यकर्ता म्हणून राहण्याचा प्रयत्न केला. आणि आजमिती पर्यंत मी कोणता पक्ष असेल किंवा काय असेल याच्यापेक्षा मी एक भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता म्हणून याठिकाणी काम करतोय आज प्रत्येकाने सांगितलं, भाऊसाहेबांनी पण सांगितलं, इतरांनी पण सांगितलं की त्यांचे तैलचित्र लावले पाहिजे. निश्चितच लावले पाहिजे आणि आता पण मी त्यादिवशी पेपरमध्ये पण वाचलं. आपले भोसरी विधानसभेचे कार्यसम्राट आमदार महेशदादा लांडगे यांनी पण जो नदी सुधार प्रकल्प होईल त्याला ही अटलबिहारी वाजपेयी यांचे नांव देण्यात यावे. आणि हीच आपल्या शहराच्या वतीने त्यांना खूप मोठी श्रध्दांजली ठरेल, धन्यवाद.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांना श्रध्दांजली वाहतो. सर्वप्रथम मी राष्ट्रवादी कॉग्रेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो भारतीय लोकशाहीच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलणारे सर्वप्रिय नेते भारतरत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट रोजी देहावसन झाले. कारकिर्दचा बहुतांश काळ विरोधी पक्षात राहूनही राष्ट्रीय प्रश्नावर प्रसंगी सत्ताधा-यांच्या खांद्यास खांदा लावून उभा राहणारा उदारमतवादी राजकारणी अशी त्यांची उंच प्रतिमा होती. विसंवादाच्या वातावरणात त्यांच्या सारख्या संवादी नेतृत्वाची उणीव जाणवत

राहिल. त्यांच्या जाण्याने भारतीय लोकशाहीचा एक आधार स्तंभ निखळला आहे. असं म्हटल तरी वावग ठरणार नाही. भारताच्या राजकारणातील समन्वयाचा संवादाचा स्वर क्षीण होत असताना अटलबिहारी वाजपेयीचे नुसते असणे देखील दिलासादायक होते. पण आता तो आधार नाहीसा झाला आहे. शालीनसभ्य राजकारणाने विरोधकांना जिंकणारे आदरणीय व्यक्तीमत्व म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडे पाहिले गेले. देशाचे परराष्ट्र धोरण संरक्षणापासून ते ग्रामीण भागातील कष्टक-यांपर्यंत प्रत्येक बाबतीत रुची असणारे त्यांनी आपल्या कार्यकर्तृव्याची मुद्रा देशाच्या राजकारणावर उमटवली. घणघणाती वक्तृत्वाने श्रोत्यांची मने जिंकणारे, देशप्रेमाने ओथंबलेल्या अंत:करणाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात देशहितासाठी आपल्या ध्येयधारणाचे प्रतिबिंब उमटवू पाहणारे व्यक्तीमत्व म्हणजे अटलबिहारी वाजपेयी. गौतम बुध्दांचा शांततेचा आदर्श पुढे नेत असतानाच प्रसंगी अणुचाचण्या करुन सीमेपलीकडील शत्रुला धडा शिकवू पाहणारे व्यक्तीमत्व म्हणजे अटलबिहारी वाजपेयी. राजकारणात राहूनही स्वपक्षासह विरोधकांमध्येही आदराचे आणि मित्रत्वाचे स्थान मिळवणा-या अटलबिहारी वाजपेयीच्या हसतमुख व्यक्तीमहत्वाची मोहनी भारतीयांच्या मनावर कायमची कोरली गेली आहे. अटलबिहारी वाजपेयी यांच्या दिलखुलास व्यक्तीमत्वाचे एक उदाहरण ज्यावेळी गुजरातमधील भूजमध्ये भूकंप झाला त्यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांना आदरणीय शरद पवार साहेब भेटले व त्यांना पवार साहेबांनी सांगितले की, गुजरात येथील भूकंपाचे निवारण करण्यासाठी मी जातो. मला महाराष्ट्रात ९०-९१ साली झालेल्या खिल्लारी येथील भूकंपाचे निवारण करण्याचा अनुभव आहे. त्यावेळी वाजपेयी यांनी पवार साहेबांना गुजरात येथे भूकंप निवारणाच्या कामासाठी पाठविले. व नंतर एका जाहीर सभेमध्ये म्हणजे आदरनीय शरद पवार साहेबांचा ६१ वा वाढदिवस असताना वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी जाहीर सभेमध्ये बोलले गेले की त्यांनी बोलताना सांगितले की राज्यसभेमध्ये आणि लोकसभेमध्ये ७५० संसद सदस्यापैकी फक्त शरद पवार असे आहेत की त्यांनी स्वत:हून माझ्याकडे येऊन गुजरात येथील भूकंप निवारण्यासाठी पाठविण्याची विनंती केली व त्यांनी त्याठिकाणी जाहीरपणे पवार साहेबांचे कौतुक केले. सत्ता येती, सत्ता जाती माझा लोकशाहीवर विश्वास आहे असे म्हणणारे अटलबिहारी वाजपेयी. अटलबिहारी वाजपेयींच्या राजकारणातील आगळे वेगळे दिलखुलास व्यक्तीमत्व होते. त्यांच्या निधनामुळे एका भारतमातेच्या सुपुत्राला आपण मुकलो आहोत. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या

वतीने आणि पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मी या थोर नेत्यास भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो. आणि आदरनीय भाऊसाहेबांनी जे सांगितले आहे की या सभागृहामध्ये दर्शनीभागामध्ये एक तैलचित्र उभारावे. अशी मी राष्ट्रवादी कॉंग्रेच्या वतीने आदरनीय महापौरांना विनंती करतो की आपण या साहेबांचे तैलचित्र या सभागृहामध्ये उभारावे अशी मी विनंती करतो. त्यांच्यावरची एक छोटी कविता मी म्हणतो "छोटे मनसे कोई बडा नही होता, टूटे मनसे कोई खडा नही होता". असं हे व्यक्तीमत्व आपल्यातून गेल्यामुळे आपल्या भारताची खूप मोठी हानी झालेली आहे. त्यासाठी त्यांना भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करतो. त्यानंतर संयुक्त राष्ट्राचे (यू.एन.) माजी सरचिटणीस कोफी अन्नान यांचे निधन झाले आहे. संयुक्त राष्ट्राचे (यू.एन.) माजी सरचिटणीस, नोबल पारितोषक विजेते कोफी अन्नान यांचे रविवार दि. १९ ऑगस्ट रोजी निधन झाले. जागतिक शांतता आणि गरीबी निर्मूलनाच्या कामासाठी आयुष्य झोकून देणा-या अन्नान यांनी आपल्या सरचिटणीस पदाच्या कार्यकाळात संयुक्त राष्ट्राला (यू.एन.) मोठी प्रतिष्ठा मिळवून दिली. १९९७ ते २००६ या काळात त्यांनी यू.एन. चे सरचिटणीस पद भूषिविले. अन्नान आणि यूएनला २००१ मध्ये संयुक्तपणे शांततेसाठी दिला जाणारा नोबल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. अशा शांतताप्रिय नेत्याला राष्ट्रवादी कॉग्रेसच्या वतीने, संपुर्ण पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने, सभागृहाच्या वतीने व माझ्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

तसेच केरळ येथील महापुरातील मृत्यू पडलेले नागरीक केरळ राज्याला देवभूमीचे राज्य म्हणून ओळखले जाते. या देवभूमी केरळचे सौंदर्य जणू शापित असाव तस कोसळत्या पावसात आणि बेफाम पुरात तिथल सार उजाड झाल आहे तर तीनशेच्यावर तेथील नागरीक मृत्यूमुखी पडले आहेत. सुमारे २० हजार कोटीचे नुकसान त्याठिकाणी झालेले आहे. पर्यटन व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. लक्षावधी नागरीक हालअपेष्टांनी घेरल आहे. तेथील रुग्णालयामध्ये जागा उरली नाही. केरळी बांधवासाठी आपण सर्वांनी त्यांना आधार देण्यासाठी माणुसकीचे हात पुढे यायला हवेत. मी पिंपरी चिंचवड शहरातील समस्त नागरीकांना आवाहन करतो की, आपल्या केरळी बांधवासाठी जास्तीत जास्त मदत करावी. तसेच या महापुरामध्ये मृत्यू झालेल्या नागरीकांना राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष व माझ्या सर्व बंधू भगिनीतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो. तसेच मी पक्षनेत्यांना विनंती करतो महापौर आपल्यालाही विनंती करतो की या केरळ बांधवांचे आपल्या परिसरामध्ये अनेक नातेवाईक कुटूंबे आहेत तर त्यांनाही

आपल्या महानगरपालिकेतर्फे, आपल्या सभागृहातर्फे त्यांना काही मदत करता आली तर करावी त्यांना आज मदतीची खूप गरज आहे. त्याठिकाणी अनेक कॅम्प आपल्या महाराष्ट्रातून गेलेले आहेत. आपण ही त्यांना या पिंपरी चिंचवड महापालिकेकडून मदत करावी अशी मी आदरनीय पक्षनेते आणि महापौर आपल्याला विनंती करतो. तसेच ज्येष्ठ क्रिकेटपट्टू अजित वाडेकर. अजित हे नाव सार्थ करुन दाखविणारे भारताचे यशस्वी क्रिकेट कर्णधार अजित वाडेकर यांचे निधन १५ ऑगस्ट रोजी झाले. परेदशात भारतीय संघाला विजयाची सवय सर्वप्रथम वाडेकर यांनी लावली. यशस्वी क्रिकेटपट्टू, कर्णधार, संघ प्रशिक्षक, संघटक अशा विविध भूमिका वाडेकर समरसून जगले. ६० च्या दशकातील लोकप्रिय क्रिकेटपट्टू म्हणून ख्याती मिळवणा-या अजित वाडेकर यांच्या जाण्याने क्रिकेटच्या क्षितीजावरील तेजस्वी तारा निखळला आहे. त्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. तसेच ज्येष्ठ नेते करुणानिधी. तमिळनाडूतील राजकीय पटावर ६१ वर्षाच्या प्रर्दीघ कारकिर्दीत अमीट ठसा उमटविणारे लोकप्रिय नेते, तमिळ भाषेमध्ये दर्जेदार साहित्य निर्मिती करुन तमिळ भाषिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे तब्बल पाच वेळा तमिळनाडूचा राज्यपटावर असणारे मुख्यमंत्री, उत्तम वक्ते, प्रभावी नेते आणि कलेचे मर्मज्ञ म्हणून ओळखले जाणारे करणानिधी यांचे मंगळवारी दिनांक ७ ऑगस्ट रोजी निधन झाले. प्रादेशिक भाषा आणि राज्यांचे हक्क यांच्यासाठी लढणा-या एका लढवय्या प्रखर सूर्याचा अस्त झाला आहे. करुणानिधी यांची कारकिर्द तमिळ चित्रपटसृष्टी आणि तमिळनाडूचे राजकारण अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये बहरली तमिळ भाषेवर असलेल्या प्रभूत्वाच्या जोरावर त्यांनी दोन्ही क्षेत्रांमध्ये स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले. आपल्या साहित्यातून त्यांनी जाती व्यवस्थेवर कठोर प्रहार केले तर सामाजिक दृष्ट्या मागासवर्गियांसाठी त्यांच्या उत्कर्षासाठी राजकीय सत्तेचा उपयोग त्यांनी केला. मागासवर्गीय आणि महिलांसाठी त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये अनेक योजना सुरु केल्या. अशा दिग्गज नेत्याला राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

तसेच ज्येष्ठ नेते सोमनाथ चटर्जी. ज्येष्ठ कम्युनिष्ट नेते आणि लोकसभेचे माजी अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांचे मंगळवार दि. १४ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदांपैकी एक असलेल्या लोकसभा अध्यक्षपदाला प्रतिष्ठा वाढविणारे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. त्यांनी आपल्या दिर्घकाळच्या राजकीय कारकिर्दीत मोठ्या प्रमाणावर ख्याती मिळविली. मात्र लोकसभा अध्यक्षपदाचा कार्यकाळ

विशेष चर्चेत राहिला. त्यांनी लोकसभेला कडक शिस्त लावण्याची महत्वाची कामगिरी बजावली. तब्बल १० वेळा ते लोकसभेचे खासदार म्हणून निवडून आले. तसेच ते प्रख्यात वकील होते. कै. सोमनाथ चटर्जी यांना सन १९९६ मध्ये उत्कृष्ट संसदपटू या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. अशा लोकशाही मुल्यांचे रक्षक असणा-या कै. सोमनाथ चटर्जी यांना सुध्दा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने व सभागृहाच्या वतीने व संपुर्ण शहराच्या वतीने मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

**मा. घुले नानी उर्फ हिराबाई -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. आज अटलबिहारी वाजपेयी यांना मी श्रध्दांजली अर्पण करते. बोपखेल गावातील सुरेश उमाजी बाराहाथे यांचे निधन झाले आहे. त्यांना ही मी श्रध्दांजली अर्पण करते. अटलबिहारी वाजपेयी साहेबांच्या बद्दल सांगायचे झाले तर आज त्यांनी पूर्ण देशात महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर जे पेरले ते उगवणारच आहे, ते प्रत्येकाने घ्यायचे आहे एवढेच मी सांगते आणि परत एकदा श्रध्दांजली वाहते आणि थांबते.

**मा.करुणा चिंचवडे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. भारतभूषण भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आज आपल्यातून निघून गेलेले आहेत खरोखरच एक असं आदर्श व्यक्तीमत्व आपल्यातून निघून गेलेले आहे. मी माझ्या प्रभाग क्रमांक १७ व चिंचवडे कुटूंबियांच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहते आणि थांबते, जयहिंय जय महाराष्ट.

**मा. सिमा सावळे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा.सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. भारतरत्न स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांना प्रथमत: श्रध्दांजली अर्पण करते. गेली दहा दशक त्यांनी संसदेवर राज्य केले. तीन वेळा पंतप्रधानपद भूषविले. पंडीत जवाहरलाल नेहरु नंतर पहिल्यांदा जर कोणी तीनवेळा प्रधानमंत्री पद भूषविले असेल तर ते सन्मा. स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांनी भूषविलेलं आहे. त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची माझी वेळ कधी आली नाही. परंतु त्यांच भाषण मात्र भोसरीच्या सभांचे मी ऐकलेले आहे. एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून त्याठिकाणी त्यांच्या भाषणाने प्रभावीत होऊन सेना-भाजप युती असताना त्याठिकाणी त्यांनी सभा घेतली होती. ती सभा ऐकण्याच सौभाग्य मला प्राप्त झालं. सगळयाच नेत्यांना भेटता येते असं काही होत नाही. पण म्हणून समाजामधल्या ज्या काही आदर्श व्यक्ती आहेत त्या व्यक्ती आपल्यापासून दूर जात नाहीत हे सुध्दा सत्य आहे. राजकारणा मधल्या एकंदर

घडामोडी पाहता कारगील युध्द त्यांच्या काळामध्ये झाले. अडचणीत आणणारे युध्दा असताना सुध्दा त्यावरती विजय मिळविला. कंधारच विमान अपहरण असेल ते सुध्दा त्यांच्याच काळात झाल. अनेक आपत्तींना तोंड देत देत त्यांनी याठिकाणी आपली कारकीर्द पुर्ण केलेली आहे. राजकारणात राहून सुध्दा आपले कवी मन जोपासणारे आणि कविता करणारे अत्यंत हळव्या मनाचे असे अटलबिहारी वाजपेयी आपण पाहिले त्याचबरोबर तेवढे कणखर असे प्रधानमंत्री म्हणून सुध्दा त्यांची कारकीर्द म्हणून त्यांच्याकडे आपल्याला बघता येईल. कारण की त्यांनी अनेक निर्णय घेतलेले आहेत. मगाशी भाऊसाहेबांनी सांगितले की आम्ही गुजरातमध्ये ज्यावेळेस गोध्राकांड झाले त्यावेळेस अटलबिहारी वाजपेयी आणि आताचे जे प्रधानमंत्री आहेत मा.मोदीसाहेब यांच्या दोघांची ती एकत्रित प्रेस कॉन्फरन्स आहे. त्यांनी जे काही सांगितले. म्हणजे एकीकडे कवीमन आणि दुसरीकडे प्रधानमंत्री म्हणून माझी काय भूमिका आहे, मी पक्षाचा ज्येष्ठ म्हणून माझी काय भूमिका आहे. हेही तितकेच खंबीरपणे मांडणारे असे स्व.अटलबिहारी वाजपेयी आज आपल्यातून गेलेले आहेत. खरतर अनेकांनी त्यांच्या कविता याठिकाणी मांडलेल्या आहेत. त्यांच्या कविता या सभागृहामध्ये वाचून दाखविल्यात. मला असं वाटतं की त्यांच्या कवितेमध्ये देश आणि देश प्रेम. ज्या देशप्रेमाला लोक हसतात. तर देशाच्या बद्दल प्रेम दाखविल्यानंतर त्या त्या वेळेस ज्या ज्या लोकांनी त्यांची खिल्ली उडविली असेल. आज त्याच लोकांना त्यांचे देशभक्ती, प्रेम फार अमूल्य वाटतं. कारण की माणूस जिवंत असला की त्याच्या मूल्यांची कदर होत नाही. आणि मग गेल्यानंतर असं वाटत की अरे बापरे इतका मोठा थॉट, इतका मोठा विचार या व्यक्तीने आपल्याला दिलेला आहे. आणि मग त्या व्यक्तींच्या विचारांवरती आपण चालण्याचा प्रयत्न करतो आणि त्यातली मी सुध्दा एक आहे. त्यामुळे मी एकच सांगेन की ज्यावेळेस त्यांनी दहा वर्षे सलग संसदेत काढलेत. त्यावेळेसची कारगील युध्दाच्या वेळेसची त्यांची एक कविता आहे. “दू ध मे दरार पड गई. खून क्यों सफेद हो गया? भेद में अभेद खो गया. खून क्यों सफेद हो गया? भेद में अभेद खो गया, बट गये शहीद, गीत कट गए, कलेजे में कटार दड़ गई, दू ध में दरार पड़ गई खेतों में बारूदी गंध, टूट गये नानक के छंद, सतलुज सहम उठी, व्यथित सी बितस्ता है, वसंत से बहार झड़ गई, दू ध में दरार पड़ गई. अपनी ही छाया से बैर, गले लगने लगे हैं ग़ैर, ख़ुदकुशी का रास्ता, तुम्हें वतन का वास्ता, बात बनएँ बिगड़ गई, दू ध में दरार पड़ गई”. ज्यावेळेस कारगील युध्द झाले त्या युध्दाच्या पाश्वभूमीवर त्यांनी लिहलेली कविता

अत्यंत मनाला प्रेरणा देऊन जाते आणि आपण एक टर्म दोन टर्म निवडून आल्यानंतर आपल्यामधला जो अहंकार आहे. तिथे दहा दशके ज्याने म्हणजे खासदार, खासदाराच्या नंतर दुसरे कुठलेच दार नाही. अशा त्या एका वेगळया संसदेमध्ये जेथे कायदे होतात तेथे संविधानामध्ये नवीन काही बदल घडवायचे असतात त्याठिकाणी त्या सभागृहामध्ये ५० वर्षे एखादया व्यक्तीने बसणे आणि त्याची वेगळी प्रतिमा तयार करणे. अजात शत्रू म्हणून ज्यांच्याकडे संपूर्ण देश पाहतो अशा या अजात शत्रूला मी त्रिवार नमन करते. आणि त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहते आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.नितीन (आप्पा) काळजे -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे दु:खद निधन झाले. त्यानिमित्त आपण सर्वजण श्रध्दांजलीसाठी उपस्थित आहात. सर्वच नेत्यांनी वाजपेयींच्या बद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तसं पाहिलं तर त्यांच्या बाबतीत बोलायच म्हटलं तर त्यांच भारत देशासाठी खूप असं मोठ योगदान म्हटल जायच. त्यांनी आपल्या राजकीय जीवनामध्ये अतिशय लहानपणा पासून तर आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत आपलं संपुर्ण जीवन त्यांनी या आपल्या भारत देशाला अर्पण केले आहे. राजकीय जीवनामध्ये काम करीत असताना, देशासाठी काम करीत असताना आपला कुठलाही स्वार्थ न ठेवता राजकीय जीवनामध्ये आपल्या कुठल्या कुटूंबातील व्यक्तींना सुध्दा त्यांनी राजकीय जीवनामध्ये आणले नाही. तसं पाहिलं तर काही गोष्टी मी त्यांच्या ऐकून आहे. त्यांनी आपल्या राजकीय स्वत:च्या स्वार्थासाठी काहीच कधी केले नाही. एक उदाहरण म्हणजे माझ्या ऐकण्यामध्ये आलेले आहे की त्यांच्या बहिणीने गॅस कनेक्शनसाठी अर्ज केला होता. आणि त्या काळामध्ये त्यावेळेस खासदारांची शिफारसपत्र असेल तर त्या कुटूंबातील व्यक्तीला गॅस कनेक्शन दिले जायचे. परंतु स्वत:च्या सख्ख्या बहिणीला सुध्दा त्यांनी आपलं स्वत:चं पत्र दिले नाही. म्हणजे कुठलाही आपला स्वत:चा स्वार्थ त्यांनी साधला नाही. तसं पाहिलं तर आजच्या जीवनामध्ये कुठला असा राजकीय नेता नसेल की त्यांनी आपला स्वत:चा स्वार्थ साधला नाही. अशा या थोर नेत्याला मी आदरांजली वाहतो आणि त्यांचे विचार जर आपण आचरणामध्ये आणले तर हीच खरी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली होईल. थोडक्यामध्ये भारतीयांच्या मनावर अधिराज्य करणारा लोकमान्य नेता अमोघ वकृत्व

असलेला सरस्वतीचा पूत्र राष्ट्रवादावर अटल निष्ठा असलेला प्रखर देशभक्त, सौजन्याचे आणि शालिनतेचे मूर्तीमंत उदाहरण, कर्तृत्वाचा उत्तुंग मानदंड असलेल्या अटलजींना भावपूर्ण आदरांजली वाहतो. तसेच  समर्थ भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणे हीच त्यांना श्रध्दांजली होईल आणि बापू काटे यांनी मांडलेल्या सूचनेला की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये स्वर्गीय अटलजींचे तैलचित्र लावणेची जी मागणी केली होती. त्या सुचनलेला माझे अनुमोदन देतो आणि थांबतो.

**मा. नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा.सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. सभागृहामध्ये केरळमध्ये जे काही नैसर्गिक आपत्ती झाली त्याच्यावर चर्चा झाली. मी आपल्याला बोलू इच्छितो की, केरळ बांधवाच्या वतीने साधारण ६० ते ७० हजार लोक पिंपरी चिंचवडमध्ये राहतात. एक सव्वालाख लोक पुण्यामध्ये राहतात. आणि साधारण ३० ते ३५ अनेक  सामजिक संस्था इथ कार्यरत आहेत. या केरळ बांधवांच्या वतीने ओनमचा फार मोठा सण या २५ तारखेला आहे. दिवाळीसारखा मोठा सण असतो. आणि पुण्यात आणि पिंपरी चिंचवडच्या सर्व संघटनांनी सर्व केरळ बांधवांनी ओनम न साजरा करता हे सगळे जे काही आहे ते पैसे वाचवून संस्थेच्या माध्यमातून केरळमध्ये पाठविण्याचा निर्णय घेतलेला आहे. सभागृहामध्ये सचीन चिंचवडे, राहुल कलाटे यांनी पण सूचना मांडलेली आहे, दत्ताभाऊ साने यांनी पण सूचना मांडलेली आहे की एक महिन्याचे जे काही मानधन आहे ते आपण सर्वजण या केरळच्या कामासाठी देण्याची विनंती केलेली आहे. मी महापौर साहेब आणि पक्षनेत्यांना विनंती करतो की सर्व नगरसेवक आणि नगरसेविकांचा तसेच एक दिवसाचा पगार जर कर्मचा-यांनी पण दिला. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने एक दिवसाचा पगार तर संयुक्तरित्या या केरळ बांधवांना पाठविण्याची व्यवस्था करावी अशी मी विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त, मा. सभागृह, सर्व नगरसेवक, सर्व पत्रकार बंधु. खरतर स्वर्गीय अटलजींच्या आजच्या श्रध्दांजलीच्या सभेसाठी आपण याठिकाणी आहोत. मी माझ्या अगोदरच्या ज्या ज्या वक्त्यांनी अटलजींच्याबद्दल खरतर भावना व्यक्त केल्या आहेत. माझ्या अगोदरच्या काही वक्त्यांनी सांगितल की अटलजींचे वय जर बघितले तर ९३ वर्षाचे होते. राजकारण आणि समाजकारणामधले त्यांचे वय जर बघितल तर ते ८० वर्षाचे होते आणि नंतर राजकीय पक्षाचे म्हणजे

१९५२ पासून ते आजपर्यंत काळामध्ये राजकीय पक्षाचे काम केले. त्याच्या अगोदर १९८५ ला जेव्हा संघाची स्थापना झाली. संघ स्थापनेनंतर बालवयामध्ये संघसेवक म्हणून काम केले. खरतर एवढ आयुष्य एखादया माणसाला मिळण आणि एवढ समर्पित जीवन म्हणजे सगळयाच वक्त्यांनी खूप चांगल बोललं. अटलजीं सारखं उत्तुंग व्यक्तीमत्व. मला अस वाटते की न भूतो न भविष्यती असं एवढ मोठं उत्तुंग व्यक्तीमत्व या देशामध्ये निर्माणच होणार नाही. एवढ उत्तुंग व्यक्तीमत्व अटलजींच्या रुपाने या देशाला दिले. खरतर सगळयांच्या भावना त्याच होत्या की अटलजींच्या बद्दलच्या भावना व्यक्त करीत असताना म्हणजे त्यांचे त्याग, त्यांची तपस्या. मगाशी माझ्या काही सहकारी मित्रांनी सांगितलं. अटलजींचा जर त्याग बघितलातर ज्यावेळेस १९४७ साली देश स्वतंत्र झाला आणि स्वर्गीय शामाप्रसाद मुखर्जीच्या नेतृत्वाखाली १९५२ साली जनसंघाची स्थापना झाली. जनसंघापासून ते १९८० भारतीय जनता पार्टीची सत्ता मोरारजींच्या काळामध्ये १९७७ ला थोडया काळासाठी ते परराष्ट्र मंत्री होते. पण ते १७ ते १८ महिन्यांचा काळ होता. पण एखादी गोष्ट मिळवायची म्हणजे त्यावेळेसची जी परिस्थिती होती ती इंदिराजींच्या हत्येनंतर ती परिस्थिती बदलली. दोन खासदार निवडून आले. त्यावेळेस निश्चितपणे एक गोष्ट अशी होती की पर्याय पर्याय म्हणून आहेत कोण ज्यांचे निवडून आलेत दोन. ज्या पक्षाचे देशभरामध्ये दोन खासदार निवडून येऊ शकतात तो पर्याय देणार का खरतर ही परिस्थिती त्या काळामध्ये होती. पण ज्यावेळी १९८० साली भारतीय जनता पार्टीची सत्ता आली. आणि पहिले भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष अटलजी झाले. म्हणजे ८० च्या नंतर ते सत्तेमध्ये आले. १३ महिन्याचे सरकार असेल, १३ दिवसाचे सरकार असेल किंवा पुढच्या काळामध्ये ०५ वर्षाचे सरकार. म्हणजे अटलजींच्या व्यक्तीमत्वाचे जर बघितलं तर सगळयांनी सांगितल की भोसरीची सभा. म्हणजे आपल्या सगळयांना सभागृहाच्या माध्यमातून अवगत करु शकतो की ज्या दिवशी भोसरीची सभा होती त्याचदिवशी त्यांच्या भावाचे निधन झाले होते. सख्ख्या भावाचे निधन झालेला एखादा माणूस आपण एखादया मित्राचे निधन झाले तर एखादया गोष्टीला, कार्यक्रमाला टाळतो. खरतर ती सभा विराज ठाकरे व्हर्सेस शरद पवार अशी ती लढाई होती. अशी परिस्थिती कधी कधी होवू शकते की विराज ठाकरे तर निवडून येणारच नाहीत. तर त्या वेळेसची राजकीय परिस्थिती अशी होती की शरद पवार १०० टक्के निवडून येऊ शकतात. एक सभा टाळली तर काय फरक पडू शकतो. परंतु स्वत:च्या भावाचे निधन झालेले असताना ही एखादया

सभेला जाणे त्याठिकाणी मार्गदर्शन करणे. मला असा वाटतं की तेवढा त्याग, तेवढे समर्पित देशाबद्दलचे जीवन मला असं वाटत की कुठल्याही राजकीय नेत्यामध्ये कधीच नव्हते. म्हणजे अटलजींच्या बद्दल ज्या ज्या माझ्या मित्रानेही सांगितले की पोखरणचा अनुस्फोट आपल्या सगळयांना माहीत आहे. तर पोखरणचा अनुस्फोट कधी झाला तर बुध्द जयंतीच्या दिवशी. आपल्या सगळयांना आठवत असेल आणि अशा पध्दतीच्या भावना म्हणजे परमपूज्य भगवान गौतम बुध्दांच्या बद्दलचे त्यांच्या मनामधले प्रेम असेल किंवा अब्दूल कलाम जावेद भाईंनी त्यांच्या बोलण्यामध्ये सांगितले की ओवीसीच्या पक्षाच्या नगरसेवकाचे काय केले पाहिजे. म्हणजे अटलजींनी अब्दूल कलामांना या देशाचे राष्ट्रपती करावे असा उद्दात विचारधारेचा हा नेता खरतर मी आपल्या सगळयांना सांगतो की ज्या पध्दतीने आज देश एका विकासाच्या दिशेला घेऊन जातोय म्हणजे त्या काळामध्ये अटलजींच्या नंतर नरेंद्रभाई या देशाचे पंतप्रधान होतील. अशा पध्दतीच चित्र खरतर मागच्या काळामध्ये नव्हते. पण ज्यावेळेस पंतप्रधान ग्राम सडक योजना असेल, सुवर्ण चतुष्कोण योजना असेल, पोखरणचा अनुस्फोट असेल, कारगीलच्या युध्दाच्या नंतरच्या त्या काळामध्ये लोकांच्या मध्ये असलेली देशप्रेमाची भावना असेल मला असं वाटते की अटलजी जगले. खरतर अटलजींच्या बद्दल सगळेच सांगतात की त्यांचे कुटूंब काय. या देशाचा प्रत्येक नागरीक म्हणजे अटलजींचं कुटूंब होतं. ज्या पध्दतीने परवा आपण बघितलं खरतर १६ तारखेला ही घटना घडली त्यावेळेस दिवसभर आपण सगळे जण या सगळया वातावरणामध्ये होतो. मी खरतर १९९० पासून अटलजींच्या विचाराबरोबर, पक्षाबरोबर काम करणारा कार्यकर्ता आहे. मला आठवतय की त्यांच बाबरी मशीद पाडत असताना भाषण खरतर त्या गोष्टीचा मी साक्षीदार होतो. अनेक भाषणातून वेगवेगळया पक्षाच्या माध्यमातून अधिवेशन असेल अटलजींच भाषण ऐकायचच सौभाग्य मिळालेला खरतर मी एक कार्यकर्ता आहे. मी तुम्हाला एवढच सांगेन की खरतर अटलजींच्या आठवणीबरोबर मी तुम्हाला एक विनंती करणार आहे. भाऊसाहेबांनी खूप चांगल बोललं. सगळया वक्त्यांनी सचीनजी, राहुल खरतर या सगळया वक्त्यांनी खूप चांगलं आपल्या अटलजींच्या भावना व्यक्त करण्यासाठी खरतर त्यांनी चांगल्या पध्दतीचे बोलले. खरतर देशप्रेमाबद्दल मी तुम्हाला एवढच सांगेन की अटलजींच्या देहाला अग्नी देण्यासाठी त्यांच्या मानस कन्या यांनी अग्नी दिला. म्हणजे कुटूंब काय आजची परिस्थिती बघितली तर ४० वर्षे, ५० वर्षे, ६० वर्षे राजकारणामध्ये राहणे आणि निष्कलंक

राहणे. कधीही कोणी बोट दाखवावे अशा पध्दतीचे चित्र खरतर अटलजींच्या ५०, ६० वर्षाच्या सत्तेच्या काळामध्ये  खरतर अशा पध्दतीचा दुर्मिळ नेता खरतर मिळणे नाही, होणे नाही अशी परिस्थिती आहे. मी खरतर या निमित्ताने भाऊसाहेबांनी सांगितलं की एका देशप्रेमाने भारावलेल्या व्यक्तीमत्वाला खरतर देश मुकलेला आहे. म्हणजे अटलजींच्या ५१ कवितांचे त्यांचे खूप चांगले पुस्तक आहे. म्हणजे प्रत्येक जण आपण म्हणतो की माझ्या आयुष्यामधला एक क्षण अटलजींसारखा जगण्याचा प्रयत्न केला तर मला अस वाटतं की खरच माझ्या देशासाठी मी उत्तरदायी होऊ शकतो. अशा पध्दतीची परिस्थिती निर्माण होऊ शकते. एवढ देशप्रेमाने उत्तुंग असलेले अटलजींचे व्यक्तीमत्व होतं.  भारताबद्दलची त्यांनी केलेली कविता मी आपल्या सगळयांना वाचून दाखवितो. “भारत जमीन का टुकडा नही, भारत जमीन का टुकडा नही,  जीता जागता राष्ट्रपुरुष है, हिमालय मस्तक है, कश्मीर किरीट है, पंजाब और बंगाल दो विशाल कंधे हैं, पूर्वी और पश्चिमी घाट दो विशाल जंघायें हैं, कन्याकुमारी इसके चरण हैं, सागर इसके पग पखारता है, यह चन्दन की भूमि है, अभिनन्दन की भूमि है, यह तर्पण की भूमि है, यह अर्पण की भूमि है. इसका कंकर-कंकर शंकर है, इसका बिन्दु-बिन्दु गंगाजल है. हम जिएंगे तो इसके लिए, हाम मरेंगे तो इसके लिए.” अशा पध्दतीचे खरतर देशाबद्दलची भावना अटलजींचे उत्तुंग व्यक्तमत्व म्हणजे देशाला भारतमाता म्हणायचे. देश ही माझी आई आहे. या देशाबद्दलचे माझे प्रेम व्यक्त केले पाहिजे. या देशाबद्दलचे माझं ऋण व्यक्त केले पाहिजे. आणि त्या ऋणामध्ये जगणारे एक उतूंग व्यक्तीमत्व अटलजीं होते. खरतर माझ्या अगोदरच्या सगळया वक्त्यांनी सांगीतले आहे, खरतर मी सगळयांचे आभार मानेन. या सत्ताधारी पक्षाचा नेता म्हणून अटलजींच्या बद्दलच्या भावना व्यक्त करीत असताना, त्यांच्याबद्दलचा आपला आदर व्यक्त करीत असताना अटलजींचे तैलचित्र लावावे. अटलजींच्या बद्दलच्या प्रत्येक शाळेमध्ये त्यांचे तैलचित्र लावावे. खरतर अटलजींच्या बद्दल आपण काहीही करु शकलो आणि सगळया सन्माननीय सदस्यांनी मनापासून त्याला पाठींबा दिला. मी या सगळया पक्षाचे खूप खूप आभार मानतो आणि खरतर अटलजी सगळयांचे प्रेरणास्थान असले पाहिजे. आणि खरतर दत्ताकाका तुम्ही बोलत होते. म्हणजे अटलजीं एक उत्तुंग व्यक्तीमत्व होतं. माझ्याअगोदर राहुल कलाटेंनी सांगितलं की गुलामनबी आझाद, संसदीय कामकाज मंत्री कशा पध्दतीचे असले पाहिजे. काय कामकाज असले पाहिजे हे विचारणारे अटलबिहारी वाजपेयी होते. जेव्हा भूजला गुजरातमध्ये भूकंप झाला. हे खरे आहे की एखादया

पक्षाची सत्ता आल्यानंतर त्याच पक्षाच्या कार्यकर्त्याची त्याठिकाणी नेमणूक होऊ शकते. परंतु आपत्तीच्या संदर्भामध्ये जी घटना घडली त्यावेळेस शरद पवार साहेबांना त्यांनी खरतर त्या मोहीमेचे प्रमुख केले हे मला आठवतेय. अशी परिस्थिती खरतर अटलजींच निर्माण करु शकतात हे लक्षात ठेवा. माझी तुम्हाला विनंती आहे. पुढच्या काळामध्ये या शहरामध्ये, या राज्यामध्ये या देशामध्ये अटलजींच प्रेरणास्थान निर्माण करायचे आहे. तर अशा पध्दतीचे तैलचित्र आपण सभागृहामध्ये लावले, आपण तर सभागृहामध्ये एक दिवस येतो परंतु एखादया चांगल्या दर्शनी भागामध्ये अटलजींचे तैलचित्र लावले. किंवा महापालिकेच्या  बिल्डींगमध्ये आपण प्रवेश करताना लावले तर आपल्या डोळयासमोर आदर्श दिसला पाहिजे. तो म्हणजे अटलबिहारी वाजपेयी, अटलबिहारी वाजपेयी. अशा पध्दतीचे चित्र खरतर आपल्याला पुढच्या काळामध्ये निर्माण करायचय. माझी तुम्हाला सगळयांना विनंती आहे की पुढच्या काळामध्ये अटलजींसारखे जगण्याचा आपण एक दिवस निश्चितच आपण सर्वजण प्रयत्न करु या. मी खरतर केरळच्या संदर्भामध्ये माझ्या अगोदरच्या काही सदस्यांनी आपलं मत व्यक्त सांगितलं. केरळची परिस्थिती अशी होती की केरळला देवभूमी म्हणले जाते.  खरतर केरळची काही मंडळी माझ्याकडे आली होती. काही जणांनी भेट करण्याचा प्रयत्न केला. राहुलदादा आपण सगळयांनी सांगितलं की केरळच्या लोकांच्या बरोबर आपण शंभर टक्के आहोत. आपण खरतर मदत केली पाहिजे. किती खरतर नुकसान जर बघितलं तर नुकसान भरुन निघणार नाही. खरतर आजची परिस्थिती बघितली तर केरळच्या १४ जिल्हयांपैकी १२ जिल्हयांमध्ये पुराने हाहाकार केला आहे. खरतर आज त्याठिकाणी ३००-४०० मिडीया आहे. परंतु अनेक गावच्या गावं पावसाच्या पुराबरोबर वाहून गेलेली आहेत. जनावरांची परिस्थिती सुध्दा बिकट झालेली आहे. एक-एक दोन-दोन मजल्याच्या फ्लोअरच्या बिल्डींगमध्ये सुध्दा पूरग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली आहे. किती लोक गेली असतील त्याचा खरतर आज अंदाज नाही. आपण फक्त वर्तमानपत्राच्या बातम्यामध्ये वाचतो. माझी तुम्हाला विनंती आहे की याही संदर्भामध्ये सगळया पक्षाच्या गटनेत्यांनी, सगळया पक्षांनी विचार केला. कधी कधी घोषणा सभागृहामध्ये होते. परंतु घोषणेची अंमलबजावणी प्रामाणिपणाने झाली पाहिजे. सभागृहामध्ये एखादी गोष्ट झाल्याच्यानंतर सगळया पक्षाच्या गटनेत्यांनी जर अकाऊंटला पत्र दिले तर पक्षाच्या गटनेत्यांचे. मला अस वाटतं की त्यांचा एक महिन्याचा पगार आपण निश्चितच काढून देऊ शकतो. ही सुरुवात जर आपल्यापासून

केली तर कर्मचारी महासंघ त्यांच्या पध्दतीने करेल. अधिकारी त्यांच्या पध्दतीने करतील. परंतु या शहराचे एक जबाबदार नागरीक म्हणून आपण एक महिन्याचे मानधन केरळच्या बांधवांसाठी जर दिलेतर मला वाटत की तेवढा हातभार लागेल. मा.कमिशनरांशी या संदर्भामध्ये बोललो होतो. त्यांनी आपत्ती व्यवस्थापनांतर्गत आपल्या तीन तुकडया केरळला पाठवून दिल्या. आपण त्या संदर्भामध्ये वर्कींगही करतोय. काही ठिकाणी धान्य दिले जातेय. सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांना आता त्याठिकाणी त्यांचे जे कॅम्प आहेत हे निश्चितपणे पुढच्या काळामध्ये तिथली परिस्थिती सुधारेपर्यंत त्यांच्या जेवणा खाण्या पिण्याची व्यवस्था करायची. आणि खरतर आपल्या सगळयांना विनंती करतो की अटलजींच्या श्रध्दांजलीच्या दिवशी आज खरतर त्यांच्याबरोबर सोमनाथ बाबू असतील, करुणानिधी असतील, अजित वाडेकर असतील, किंवा ज्यांच्या ज्यांच्या अपघातामध्ये गेलेले काही मंडळी असतील. खरतर ही दोनतीन व्यक्तीमत्व बघितली. अटलजींचं व्यक्तीमत्व उत्तुंग व्यक्तीमत्व होतं. हिमालयाहून उंच्च असं अटलजींचं व्यक्तीमत्व होतं. सोमनाथ बाबूंची परिस्थिती खरतर बघितली तर कम्युनिष्ठ पक्षाचा विचार घेवून लढणारा सत्ता कधी येईल, नाही येईल. खासदार होईल ना होईल अशा परिस्थितीमध्ये लढणारा खरतर सोमनाथ बाबूंचे व्यक्तीमत्व होते. आणि अनेक वर्षे तामिळनाडूच्या जनतेवर राज्य करणारे करुणानिधी. अजित वाडेकर. खरतर आज आपल्याला आजचा दिवस दुर्भाग्याचा असा दिवस कधीही येऊ नये. एवढया मोठया नेत्यांची श्रृंखला. खरतर या महिन्यामध्ये आपल्यावर त्यांना श्रध्दांजली वाहण्याची वेळ आली. खरतर या देशाची खूप मोठी हानी होईल अशा पध्दतीची परिस्थिती आहे. मी या सर्वांना आपल्या सर्वांच्या वतीने मनापासून भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि आपल्या सगळयांना सचिनदादा तुम्ही सांगितलं की अब्दुल कलामांचे तैलचित्र लावायचे. मी तुम्हांला विनंती करतो की तैलचित्र या सभागृहामध्ये असली पाहिजेत. त्यांची प्रेरणा आपण घेऊ. खरतर अब्दूल कलाम यांचे खूप मोठ कार्य या भारतामध्ये झालेले आहे. सचिनदादा तुमच्याही मताला मी याठिकाणी पाठिंबा देतो. मा. महापौरांना मी विनंती करतो की आजच्या सभेचे कामकाज करीत असताना आपण एवढया मोठया व्यक्तींना श्रध्दांजली वाहत असताना ही सभा ६ सप्टेंबरपर्यंत आपण तहकूब करावी. आणि याठिकाणी स्वर्गीय अब्दूल कलामांचे तैलचित्र या सभागृहामध्ये लावावे. आणि दर्शनी भागामध्ये पूज्यनीय अटल बिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र लावावे

अशा पध्दतीची विनंती मा. महापौर आपल्याला करतो आणि आपल्या शब्दांना विराम देतो, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, सत्तारुढ पक्षनेते यांनी जी सुचना सभागृहामध्ये मांडलेली आहे त्याला मी अनुमोदन देत आहे.

**मा. महापौर -** उपस्थित सर्व नगरसदस्य, नगरसदस्या आज याठिकाणी या देशाचे पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी त्याचबरोबर भारतीय क्रिकेटचे कर्णधार अजित वाडेकर यांना या सभागृहामध्ये श्रध्दांजली वाहिलेली आहे. श्रध्दांजली वाहात असताना सर्व माझ्या सहकारी सदस्यांनी काही विनंती काही सुचना याठिकाणी केलेल्या आहेत. त्यामध्ये या सभागृहामध्ये आदरनीय ए. पी. जी. अब्दूल कलाम यांचे तैलचित्र लावण्यात यावे. त्याचबरोबर या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भवनामध्ये आदरनीय भारतरत्न पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र दर्शनी भागामध्ये लावण्यात यावे. त्याच बरोबर आदरनीय अटलबिहारी वाजपेयी यांचे आचार विचार या शहरामध्ये कायम तेवत राहावेत यासाठी म्हणून त्यांच्या काही आठवणी या शहराला असाव्यात त्यासाठी म्हणून काही सदस्यांनी काही प्रस्तावामध्ये नदी सुधार प्रकल्पाला अटलजींचे नाव दयावे अशा काही सुचना याठिकाणी केल्या. त्याचबरोबर केरळ राज्यामध्ये जो पाऊस पडला त्यामुळे त्या पूर परिस्थितीमुळे त्या राज्यामध्ये अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. त्यांना देखील आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने काही मदत करावी असे काही सदस्यांनी सुचविले. त्याचबरोबर काही सदस्यांनी शाळेमध्ये अटलजींचे तैलचित्र लावावे अशा पध्दतीच्या काही सुचना मांडल्या. त्याचबरोबर काही नेत्यांनी सांगितलं की एक महिन्याचे मानधन हे आपण केरळ राज्याला मदत म्हणून दयावे अशीच ब-याच सदस्यांची मागणी आहे. मी देखील आपल्या सर्वांच्या वतीने, या शहराच्या वतीने या महान पुरुषाला आदरनीय अटलबिहारी वाजपेयी यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्याचबरोबर या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भवनामध्ये दर्शनी भागामध्ये अटलजींचे तैलचित्र लावले जाईल. त्याचबरोबर ए. पी. जी. अब्दूल कलाम यांचे तैलचित्र या सभागृहामध्ये लावले जाईल. एक महिन्याचे मानधन केरळ राज्याला सर्व सदस्यांचे दिले जाईल. त्याचबरोबर नदी सुधार प्रकल्पाला आदरनीय भारतरत्न पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी नदी सुधार प्रकल्प असं नामकरण केलं जाईल हे या निमित्ताने आपल्या सर्वांना मी याठिकाणी

सांगतो. आणि आजची ही सभा दिनांक ०६/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

-----

( राहुल गुलाब जाधव )

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २१</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दि.२०/०८/२०१८ ची तहकूब सभा)**

<u>दिनांक – ६.०९.२०१८</u>                                        <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.८.२०१८ ची तहकूब मा. महापालिका सभा गुरुवार दि.६.९.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| १०) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ११) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १२) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| १३) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |

१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२१) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२२) मा.सावळे सिमा रविंद्र

२३) मा.लोंढे नम्रता योगेश

२४) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२५) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२६) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२७) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२८) मा.अनुराधा गणपत गोरखे

२९) मा.केशव हनुमंत घोळवे

३०) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३१) मा.अश्विनी भिमा बोबडे

३२) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३३) मा.संजय बबन नेवाळे

३४) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३५) मा.भालेकर प्रविण महादेव

३६) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३७) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३८) मा.घोलप कमल अनिल

३९) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४०) मा.पवळे सुमनताई मधुकर

४१) मा.चिखले सचिन तुकाराम

४२) मा.जावेद रमजान शेख

४३) मा.यादव मीनल विशाल

४४) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४५) मा.प्रमोद कुटे

४६) मा.राजू मिसाळ

४७) मा.शैलजा अविनाश मोरे

४८) मा.बाबर शर्मिला राजू

४९) मा.अमित राजेंद्र गावडे

५०) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५१) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५२) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५३) मा.ढाके नामदेव जनार्दन

५४) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५५) मा.करुणा शेखर चिंचवडे

५६) मा.भोईर सुरेश शिवाजी

५७) मा.अपर्णा निलेश डोके

५८) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

५९) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६०) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६१) मा.कोमल दिपक मेवानी

६२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६३) मा.सुलक्षणा राजू धर

६४) मा.सुजाता सुनिल पालांडे

६५) मा.कदम निकीता अर्जुन

६६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

६७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६८) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

६९) मा.नढे विनोद जयवंत

७०) मा.पाडाळे निता विलास

७१) मा.काळे उषा दिलीप

७२) मा.कोकणे संतोष अंकुश

७३) मा.पवार मनिषा प्रमोद

७४) मा.बारणे अर्चना तानाजी

७५) मा.अभिषेक गोविंद बारणे

७६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७७) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

७८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७९) मा.बारणे माया संतोष

८०) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८१) मा.दर्शले रेखा राजेश

८२) मा.कलाटे राहुल तानाजी

८३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८४) मा.ममता विनायक गायकवाड

८५) मा.कामठे तुषार गजानन

८६) मा.चोंधे आरती सुरेश

८७) मा.कस्पटे संदिप अरुण

८८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९०) मा.सुनिता हेमंत तापकीर

९१) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९२) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९५) मा.आंगोळकर सागर सुनिल

९६) मा.लोखंडे चंदा राजू

९७) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

९८) मा.आशा धायगुडे-शेंडगे

९९) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१००) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०१) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०२) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०३) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०४) मा.संतोष बबन कांबळे

१०५) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०६) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१०८) मा. वाबळे संजय मल्हारराव

१०९) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११०) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१११) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर-अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.नयना गुंडे-व्यावस्थापकीय अध्यक्ष (पीएमपीएमएल), मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.कोळंबे-मुख्यलेखापाल, मा.पाटील, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.चितळे, मा.खोराटे, मा.खोत, मा.दुरगूडे, मा.इंदलकर-सहा.आयुक्त, मा.साळूंके-मुख्य

उदयान अधिक्षक, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.कांबळे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.पाटील, मा.पवार, मा.सुपेकर -कार्यकारी अभियंता, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर-** मा. आयुक्त, सर्व सन्मा. नगरसेवक, सन्मा. नगरसेविका, सर्व अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू, नागरीक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.विशेष महापालिका सभा क्र. २० दि.४/८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(मा.जितेंद्र कोळंबे, मुख्यलेखापाल यांनी त्यांचा परिचय सभागृहास करुन दिला.)

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, गुरुदास कामत - काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते व माजी मंत्री कुलदीप नय्यर - जेष्ठ पत्रकार, विचारवंत, विजय चव्हाण - जेष्ठ मराठी अभिनेते, वसंतराव थोरात - काँग्रेस पक्षाचे माजी आमदार व पुणे महापालिकेचे माजी महापौर, तरुणसागरजी महाराज – राष्ट्रसंत, शुभांगी जोशी -जेष्ठ मराठी अभिनेत्री, कैलास ऊर्फ बाळासाहेब दिनकर भोईर - चिंचवड येथील सामजिक कार्यकर्ते, सौ. सुमन मच्छिंद्र गावडे – चिंचवडगाव, श्रीम. सुवर्णा जालिंदर गावडे – चिंचवडगाव, कै. पांडुरंग महादू भालेकर -प्रभाग क्रमांक १२ तळवडे, कै.लक्ष्मीबाई किसन कुडपणे - प्रभाग क्रमांक १२ तळवडे, कै. कुंडलिक बबन वरुटे - प्रभाग क्रमांक १२ तळवडे, बाळासाहेब आहेर, चंद्रकात कस्पटे, महादेव दामोदर कस्पटे, श्रीम. छबुबाई निवृत्ती गवारे, दामोदर बाळोबा माळी कानपिळे, सुमन अशोक देवचक्के – भाजपाचे माजी नगरसेवक/कार्यकर्ते अशोक देवचक्के यांच्या पत्नी, अनिकेत पंडीत यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.
**मा.सुरेश भोईर -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, अध्यात्मिक गुरु, परखड प्रवचनकार, किंर्तनकार आणि ज्यांची भारतभर ख्याती होती ते एक क्रांतीकारी म्हणून ओळखले जात होते असे जैन समाजाचे तरुणसागर महाराज यांच मागच्या दोन दिवसात एका आजाराने दु:खद निधन झाल. मी आपल्या सभागृहाच्या वतीने आणि पुर्ण पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या वतीने आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तरुणसागर महाराजाना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.मिनल यादव** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. सर्वात प्रथम रक्षाबंधन हा महिलांचा सण देशभरामध्ये उत्साहामध्ये होत असताना भाजपाचे जे आमदार साहेब आहेत राम कदम यांनी महिलांबद्दल जे व्यक्तव्य केले त्यांचा सगळया सभागृहातर्फे मी निषेध करते आणि सगळया महिलांना म्हणजे त्यांनी डायरेक्ट महिलांवर आरोप केलेला आहे. प्रत्येक महिलेने या सभागृहामध्ये निषेध केला पाहिजे. पक्ष सोडून याचेकडे बघितले पाहिजे. सगळे पक्ष बाजूला ठेवून सगळया महिलांनी मा.आमदार राम कदम यांचा जाहीर निषेध केला पाहिजे आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल केला पाहिजे. ते एवढया मोठया पदावर असताना सुध्दा.

**मा. महापौर -** ताई, आपल्या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा विषय आहे त्याच्यावर तुम्ही बोला.

(सभागृहामध्ये गोंधळ)

**मा.मिनल यादव-** मा.महापौर साहेब, हा सभागृहाचा प्रश्न नाही. हा समस्त महिलांचा प्रश्न आहे. त्याच्यामुळे सभागृह आज तहकूब झाले तरी चालेल पण त्यांचा निषेध इथं नोंदविला गेला पाहिजे. नंतर सभा घ्या किंवा नका घेऊ याच्याशी काही घेणं देणं नाही. महिलांना सन्मान मिळत नाही मग त्याचा काय उपयोग, बाकीचे विषय करुन त्याचा काही उपयोग नाही आधी निषेध करा.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह याठिकाणी आताच माझ्या सहकारी नगरसदस्या म्हटल्या की दहीहंडीच्या दिवशी अतिशय अपमानस्पद  वक्तव्य राम कदम यांनी त्याठिकाणी केले आहे. एखादया महिलेला माझ्या भगिनींना, मुलींना पळवून नेण्याची भाषा त्यांनी त्याठिकाणी केलेली आहे. मग आम्हाला खरच असं कधी कधी वाटतं की मनुष्यवृत्ती हे परत याठिकाणी आणण्याचा प्रयत्न याठिकाणी आपल्या सगळयांकडून होतोय का. याबाबतीत राम

कदमांच्या निषेधाचा ठराव मी याठिकाणी मांडते. आणि आमच्या सर्व महिला, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व महिलांकडून आणि उपस्थित असणा-या सर्व महिलांकडून त्यांचा मी याठिकाणी निषेध करते.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, माझे अनुमोदन आहे.

**मा.आश्विनी चिंचवडे –** मा.महापौर साहेब, मिनल ताईंनी विषय मांडला त्याला माझे अनुमोदन आहे.

(सभागृहामध्ये गोंधळ)

**मा.नगरसचिव -** प्रश्नोत्तरे- मा.तुषार हिंगे यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर -** ताई आमदार ज्या पक्षाचे आहेत त्या पक्षाने त्यांची सिडी मागविलेली आहे. त्या सिडीचा खुलासा केल्यानंतर पक्ष योग्य ती भूमिका मांडेल. प्रश्नोत्तरे घ्यावीत मा.तुषार हिंगे.

मा. तुषार हिंगे :- मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह गेल्या अनेक वर्षापासून ....

(सभागृहामध्ये गोंधळ)

**मा. भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. प्रथमत: मी महापौर यांना धन्यवाद देतो. मी सर्वांच्या भावना व्यक्त करतो. प्रथमत: मी महापौर पहील आपल्याला धन्यवाद देतो की आपण सभागृहातीलच नाहीतर महाराष्ट्रातील सर्व महिलांचा तुम्ही आदर ठेवला. निषेध करण्यासाठी आपण जी भूमिका घेतली त्यामुळे मी व्यक्तीश: आपल्याला  धन्यवाद देतो. सर्वात महत्वाचे म्हणजे याठिकाणी निषेध ही व्यक्तीदोष नसतो. निषेध हा एका विशिष्ठ शब्दांचा, विचारांचा निषेध असतो. कोणावर राग, कोणावर लोभ किंवा कोणती पार्टी, आज भाजपाचा असेल, उदया काँग्रेस आयचा कोणतरी बोलेल. प्रश्न असा येतो की ज्यावेळेस असा प्रश्न येतो त्यावेळेस सभागृहामध्ये आपण काही तरी पळवाट काढत जाऊ नका. कारण अचानक जर केरळमध्ये पूर आला हे काही ठरवून होत नसते की कुठल्या वर्षी केरळला महापुर येणार आहे. सभागृहातील सदस्यांना भावना मांडू दया ना. तुम्ही आता महापौर झालांत ना. आता शांत चित्त् ठेवून ऐकत बसा. भावना व्यक्त करुन देत जा.

तुम्हाला ती सवय होईल चांगल्या पध्दतीची. भविष्यामध्ये आमदारकी कडे चांगल्या पध्दतीने वाटचाल होईल. म्हणून हे निषेध करताना तुम्ही तेवढ पवित्र काम करता. एका महिलेवरचा शाब्दीक एवढा, किती अविचार लोकांच्या मनामध्ये सत्तेच्या माध्यमातून येत असतो हे कालचे जिवंत उदाहरण म्हणजे राम कदम. नाव राम असली की काय झाल हे सध्या काही मला कळत नाही. आसाराम, राम, रामदेवबाबा ही सगळी माणसे का बिघडतात हेच मला कळत नाही. हया सगळया परिस्थितीचे भान आपण त्यांना जागृत ठेवण्याचे काम या सभागृहाच्या माध्यमातून आपण निषेधाच्या माध्यमातून करतो. मिनलताई यांना मी धन्यवाद देतो. त्या कोणत्या पक्षाच्या आहेत याही पेक्षा त्यांनी सर्व सभागृहातील महिलांच्या नाहीतर संपुर्ण पिंपरी चिंचवड शहरातील महिलांच्या भावना याठिकाणी व्यक्त केल्या आहेत. हे सर्व करीत असताना आपण सभागृहामध्ये मी विजया रहाटकर यांच आता तुम्ही म्हणताल तुम्ही त्यांच कशाला अभिनंदन करता आता त्या भारतीय जनता पक्षाच्या आहेत. त्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा आहेत पण मी त्यांचे अभिनंदन करतो की धाडसाने त्यांनी पहिले स्टेटमेंट केले आहे की मी याची चौकशी करते. बीजेपीच्या महिलांनी टाळया वाजवून त्यांचं स्वागत करा, वाजवा टाळा. म्हणजे याची दखल घेतली जाईल आणि म्हणून या सगळया परिस्थितीचे अशी काही माणसे आहेत ती केवळ पक्षा पेक्षाही आपले संस्कार किती महत्वाचे आहेत पक्षाच्या दृष्टिकोनातून, पार्टी कोणतीही असू दया राम कदमांनी काय भारतीय जनता पक्षाच्या मिटींगमध्ये ठराव होऊन अस काय भाष्य केलेय का, ते त्यांचे व्यक्तीगत मत आहे. मग तुम्ही व्यक्तीचा द्वेष करताय, व्यक्तीचा निषेध करतोय, पक्षाचा नाही. त्यामुळे पक्षीय बाजू याठिकाणी घ्यायची गरज नाही. तोच प्रकार महानगरपालिकेमध्ये काल परवा आमचे विरोधी पक्षनेते दत्ताकाका साने यांच्या माध्यमातून घडला. मला असं वाटत की आयुक्त साहेब आपण देखील, महापौर साहेब आपण देखील एकनाथजी पवार आपण पक्षनेते आहात. ज्यावेळेस जबाबदारीने आपण एका खुर्चीवर बसतो त्यावेळेस अत्यंत संयम असावा लागतो. कारण घरात एकमत नसतं हे तर तुम्ही शहरांचे नेतृत्व करीत आहात. प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकांचे पक्षामध्ये एकमत नसतं. माणसा माणसामध्ये बोलण्याच्या पध्दती वेगळया असतात. एखादा व्यक्ती हुशार असेल तर समोरचा व्यक्ती हुशार असला पाहिजे असं गृहीत धरुन जर राजकारण केले असं गृहीत धरुन जर तुम्ही कायदे केले तर इथं एकही माणुस तुम्हाला दिसणार नाही. आणि म्हणून एखादी भावना मांडायची

आणि व्यक्त करण्याच्या पध्दती वेगळया असतात. त्यावर कोणाच अज्ञान काढू नये किंवा त्यांची व्यक्तीगत वृत्ती त्याच्यामध्ये विचारली जाऊ नये. यातून सभागृहाचा नव्हेतर दत्ता साने हे एका प्रभागाचे नगरसेवक नसून ते आमच्या राष्ट्रवादी आणि विशेषतः सभागृहाचे ते गटनेते आहेत. एकनाथ पवार आपण सभागृहाचे नेते आहात. ज्यावेळेस आपल्यावर अन्याय होतो त्यावेळेस आपली जबाबदारी आहे या सभागृहामध्ये या अन्यायाला वाचा फोडण्याच धाडस आमच्या वतीन केल. तुषार कामठेवर ज्यावेळेस या ठिकाणी आरोप झाले त्यावेळेस राष्ट्रवादीचा नगरसेवक म्हणून मी भाष्य केले नाही तर आपण एक नगरसेवक म्हणून एक जमात आहे आणि प्रशासन एक जमात आहे. रथाची दोन चाक असा आपण शब्दप्रयोग ज्यावेळेस करतो, प्रशासन चालवित असताना दोन चाके आहेत. दोन चाकांच्या जीवावर सगळं चालतं. आता तुम्ही त्यातलं सारख एक चाक पंक्चरच करीत बसले, कायम तुम्ही जर त्यांना पाण्यात जर पाहील तर आम्ही तुमच्या समोर प्रश्न मांडताना कोणत्या भाषेत मांडायचे. मग एक काम करा. भाषा कशा पध्दतीने वापरायची त्याच पुस्तक दया आम्हाला. त्या पुस्तकानुसार सरळ सरळ भाषेत किंवा कायदयात बसवून चाकोरीबध्द त्याचा अभ्यास करुन आणि मगच तुमच्या समोर प्रश्न मांडू. तुम्हांला एवढां जर त्या भाषेचा राग येत असेल तर आणि म्हणून आयुक्त साहेब हे चुकीचे आहे. तुम्ही या शहराचे आयुक्त आहात. संपुर्ण २२ लाख लोकसंख्येचे तुम्ही रक्षण करीत असता. २२ लाख लोकांच्या विकासाच्या समस्येचे निवारण तुम्ही करीत असतात. २२ लाख लोकांचा आत्मसन्मान तुम्ही आहात. आणि तुमच्या वक्त्व्यातून आमचा सन्मान जर धुळीस मिळत असेलतर त्याचा मी या सभागृहामध्ये जाहीर निषेध करतो. आयुक्त म्हणून आमचा जमीनीचा वाद नाही किंवा पक्षाच्या कोणत्या नगरसेवकाचा नाही. हर्डीकर साहेब, मी तुम्हाला पहिल्या दिवशीच सांगितलं होतं की या सभागृहामध्ये सर्जीकल स्ट्राईक जसा होतोना तसा हार्डीकर स्ट्राईक करा. चांगल्या गोष्टीसाठी आम्ही तुमच्या बरोबर आहोत. पण ज्या पध्दतीने लोकसदस्यांचा जर तुम्ही अपमान करीत असाल आणि त्यांचा अनादर करुन तुम्ही काम करीत असाल तुम्हाला असं वाटत असेल तर आम्ही केले तरी चालेल. परंतु काळ माफ करीत नाही, काळ हा माफ करीत नाही. वेळ निघून जाते. आम्ही या सभागृहामध्ये २५-३० वर्षापासून आहोत, खूप आले खूप गेले. कशा पध्दतीने वागलेत. त्यांना काय प्रायश्चित्त करायला लागले हे आम्ही सगळं आमच्या डोळयांनी पाहात आहोत. सगळया गोष्टी इथच घडल्या आहेत. परंतु दत्ताकाका म्हणून नाहीतर आमचे

नेते म्हणून किंवा सभागृहाचे नेते आहेत एकनाथजी. पक्षनेते तुम्ही अनुमोदन दयायचे, सभागृहाचे पावित्र्य सांभाळा. मी तुम्हाला विनम्र आवाहान करतो हात जोडून आवाहन करतो तरच आपण एकमेकांच्या बरोबर राहू. एका अधिका-याला बोलले तर सगळे काळया फिती लावून उभे राहतात. ते म्हणत नाहीत की सत्ता कोणाची आहे. एखादया नगरसेवकांने बोलू दे एखादया अधिका-याला. बघा कसे चवताळतात सगळे. इथं आपण आदर्श म्हणून भाषण करतो, त्यांचा गुण घ्या एक तरी. सभागृह हे आपलं आहे. आणि ज्यादिवशी तुम्ही या सभागृहात प्रवेश करता. त्यावेळेस सभागृह हे पक्षाचे नसते हे महानगरपालिकेचे, जनतेचे असते. आपण या जनतेचे विश्वस्त म्हणून याठिकाणी भाष्य करीत असतो. आणि मी विश्वस्त म्हणून याठिकाणी भाषण करीत असतो. म्हणून अनुमोदन एकनाथ पवार देतील. एकनाथ पवार यांनी अनुमोदन दिल्यानंतरच ही सभा सुरळीत चालेल. एकनाथ पवार जर अनुमोदन नसेल देणार तर आम्ही निषेध करु इथे. मग पक्षाचा निषेध होईल कदाचित. आम्ही व्यक्तीचा निषेध करीत नाही. आयुक्त आणि सदस्यांचा सन्मान. हा सर्वांचा राहीला पाहिजे. राम कदम हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ञ आहेत का त्यांचेबद्दल तुम्ही भाष्य करु दयायचे नाही महिलांना. काहीही कोणीही उठायच, परिचारीकांनी देखील पंढरपुरला माजी सैनिकांबद्दल, आहो आज ईथं आपण सुरक्षीत आहेतनां. रोज २५ जवान बलिदान देतात. मग त्या व्यक्तीचा निषेध आम्ही करतोय. पक्षाचा नाही. व्यक्तीचा निषेध आम्ही याठिकाणी करतोय. पक्षाचा नाही. त्याच पध्दतीने राम कदम यांचा निषेध करीत असताना दत्ता साने बद्दल जे घडलेले प्रकरण आहे ते अतिशय निषेधार्य आहे. व्यक्ती कोणीही असू दयात काही फरक पडत नाही. कोणाच्या कोणत्याही गोष्टीवर काहीही फरक पडत नाही. आणि म्हणून कोणी सत्तेचे ताम्रपट घेऊन जन्माला आलेल नसतं. सत्ता परीवर्तन हे अटळ असतं. त्याला काळ यावा लागतो. पण त्या काळाचा एक विनियोग हा विचाराने, संयमाने, आणि चांगल्या पध्दतीने माणसाचा आदर झाला पाहिजे. म्हणून जाधव साहेब तुम्हाला काय आदेश पक्षाचा येईल त्याच पालन करण्यापेक्षा सभागृहाचे पावित्र्य हा या शहराचा आत्मसन्मान आहे. दत्ता काका हे शहराचे विरोधी पक्षनेते आहेत हे विसरु नका. भविष्यामध्ये तुमच्यावर ही वेळ येऊ शकते. तेव्हा तुमची सभागृहामध्ये मी बाजू घेतली होती. तेव्हा तुमचे चार नगरसेवक होते. त्यावेळेस सुध्दा तुमची बाजू घेतली होती का तर नगरसेवक हा आमचा घटक आहे. इतक्या वर्षे तुम्ही रस्त्यावर

होते आता आम्ही रस्त्यावर आहेत. त्यामुळे या सगळया परिस्थितीचे भान ठेवून हा निषेध करतो व माझे दोन शब्द संपवितो.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह खरतर भाऊसाहेब तुम्ही ज्या पध्दतीने तळमळीने एखादया विषयाचा निषेध केला पाहिजे ही भावना मांडली आणि खरतर आता तुम्ही विरोधी पक्षामध्ये आहात. माझ्यासारखा कार्यकर्ता तर वर्षानुवर्षे विरोधी पक्षामध्येच काम करणारा कार्यकर्ता आहे. एखादया नगरसदस्यांच्या बद्दल एखादया अधिका-याने जर चुकीचे केलतर १०० टक्के त्याचा निषेध केला पाहिजे. याच्याबद्दल दुमत नाही पण कधी कधी काय होते. मला असं वाटते की पहिल्यांदा एक चांगला अधिकारी सुध्दा हर्डीकरांच्या रुपाने पिंपरी चिंचवडला मिळाला आहे की जो एकाही पैशाचे करप्शन करीत नाही. कधी कधी चांगल्या अधिका-याच्या पाठीमागे आपण चांगल्या ताकदीने भाऊसाहेब उभे राहिले पाहिजे. परिस्थिती अशी नाही की ज्यावेळेस एखादा विषय  एखादया मिटींगमध्ये येतो त्यावेळेस तुम्हाला माहीत आहे. आज ज्या पध्दतीने आपण सभागृहामध्ये आलो. सभागृहामध्ये आल्यानंतर आपण महापौरांना विनंती की आम्हाला बोलायचे. आणि बोलण्याच्या हयाच्यामध्ये एकमेकाच्या बोलण्यामध्ये एखादयाच्या बद्दल अशी परिस्थिती निर्माण होते की हा खरच माझ्या अंगावर आलाय का. अंगावर येतोय. खरतर त्या बैठकीला मी पण होतो. म्हणजे कमिशनरांनी विरोधी पक्षनेत्याचा सन्मान राखला पाहिजे, इज्जत राखली पाहीजे, त्यांचा मान, सन्मान हा १०० टक्के केला पाहिजे. पण इन्टेन्शीली एखादी गोष्ट घडते की खरच एखादया गोष्टीच्या संदर्भामध्ये मा. कमिशनर अशा पध्दतीचे वागतात. मला वाटते की कमिशनर आणि दत्ता साने यांच्यामध्ये मिस कम्यूनिकेशन झालेले आहे. कारण मी त्यादिवशीचा साक्षीदार आहे. आणि दत्ताकाका तर माझे मित्र आहेत. भाऊसाहेब भोईर ज्या पध्दतीने तुम्ही बोलले की तुम्ही अनुमोदन दिले पाहिजे, अनुमोदनाचा विषय नाही, खरतर सभागृहामध्ये सगळयात आज तुम्ही सिनियर नगरसदस्य आहात. सभागृह कसं चालविलं पाहिजे. कारण हे सभागृह कुठल्या पक्षाचे सभागृह नाहीय. हे मी मान्य करतो. परंतु कधी कधी प्रामाणिकपणाने आपण हा पण विचार केला पाहिजे की एखादया अधिका-याला वारंवार खरंतर तुम्ही १५-२० दिवसांच्या सगळया प्रेस जर बघितल्या तर आपण कमिशनरांना कशा पध्दतीच आपण करतो. म्हणजे एखादा अधिकारी जर कामाच्यासाठी थांबला तर

या शहरामध्ये काम करता येईल. चुकत असेल तर १०० टक्के आपण त्या अधिका-याला वठणीवर आणण्याचे आपण काम करु. खरतर या शहराला २५-३० वर्षानंतरची व्हीजन काय असली पाहिजे खरतर अशा पध्दतीची भावना, स्मार्ट सिटी असेल, त्याच्या माध्यमातून आयुक्त साहेब काम करीत असतील. आणि खरतर कधीतरी भाऊसाहेब आपण एखादया मिंटीग मध्ये आपण बसलोय. अधिकारी बसलेत किंवा आपण बसलोय. तर आपण एकमेकांच्या बद्दल बोलतोच की. आपण एकमेकांना क्रॉस ब-याच वेळा करतो. त्या शब्दाचा अर्थ खरतर त्यावेळेला काकांच्या संदर्भामध्ये एकच गोष्ट बोलली गेली की तुम्ही अज्ञानाच्या माध्यमातून म्हणजे अज्ञानाने हा निर्णय घेऊन उपयोग नाही. त्यामुळे थोडेसे त्यांनाही असं वाटलं की ते चुकीच्या पध्दतीने काकांनाही असं वाटलं की माझा अपमानच केला किंवा मला असे बोलले. एखादया गोष्टीमध्ये किंवा एखादया बैठकीमध्ये उगीच एकमेकांच्या अंगावर धावून जाऊ शकतो अशाही पध्दतीची परिस्थिती होऊ शकते. भाऊसाहेब या पुढच्या काळामध्ये म्हणजे सभागृहात मला कल्पना आहे की तुषार कामठेच्या संदर्भा मधला विषय सभागृहामध्ये तुम्ही चर्चेला आणला आणि ती परिस्थिती आहे. म्हणजे तुषारच्या संदर्भामध्ये किंवा आपण पाहतोय काका विरोधी पक्षनेते आहेत, खरतर अशी परिस्थिती आहे आणि तुम्ही म्हणताय ते १०० टक्के खरं आहे. कोणीही ताम्रपट घेऊन जन्माला येत नाही. मी आज सकाळी बघितलं. मी आणि नामदेवराव याठिकाणी पिंपरी चिंचवडच्या नाटयगृहाच्या तेथून जात होतो मला आनंद वाटला. भाऊसाहेब असतील, संजोग वाघेरे पाटील असतील, गाडीला ढकलत ढकलत चालले होते. मी नामदेवरांवाना म्हटले की २५ वर्षे आपण हेच केलंय नामदेवराव. अजुन हयांना १५-२० वर्षे हेच करावे लागेल. त्यामुळे ही परिस्थिती आहे लक्षात ठेवा. त्यामुळे आपण चांगल्याच्या मागे १०० टक्के उभा राहिले पाहिजे. कुठल्याही एखादया सन्मानियाचा अपमान होतोयतर आपण त्यांनाही समज देण्याचे काम करु. आणि या सभागृहाचे पावित्र्य राखण्याचे काम आपण निश्चितच सर्वजण करु. मा. महापौरांची खरतर आज पहिली सभा आहे. मागची सभा आपण खरतर घेतली ती श्रध्दांजलीची सभा घेतली. मला असं वाटत की महापौरांना पुढच्या काळामध्ये तुम्ही ज्या पध्दतीने सांगितले की शांत ऐकले पाहिजे. निश्चितच महापौर शांत ऐकतील. या सभागृहाचे पावित्र्य म्हणजे ज्या पध्दतीने एखादा विषय नाही झाला. मला असं वाटतं की महापौरांचे पुढचे सव्वा वर्षे आहे. या पुढच्या काळामध्ये महापौर या सभागृहाचे पावित्र्य राखणे आणि प्रत्येक सदस्याला त्याचा मान

सन्मान देण्यासाठी निश्चितच या सभागृहाच्या माध्यमातून भाऊसाहेब आपण सर्वजण प्रयत्न करु या. मा. महापौरांना विनंती करतो की या संदर्भामधले मा. भाऊसाहेबांच्या नंतर खरतर मी पक्षनेता म्हणून बोलतोय, सभागृह नेता म्हणून बोलतोय. भाऊसाहेब माझी ही विनंती आहे की या पुढच्या काळामध्ये भाऊसाहेब तुमच्या सगळयांच्या माध्यमातून सभागृहाचे पावित्र्य राखून मा. महापौरांना विनंती करतो की आपण विषयाला सुरुवात करावी. धन्यवाद.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. पक्षनेते तुम्हाला एकच वाक्य सांगतो. कुठल्याही आपल्या सगळया नगरसेवकांनी, तुम्ही फक्त दत्ताकाका आणि आयुक्त साहेबांचे झाले. आयुक्त आणि दत्ताकाका काही गैरसमज झाला असेल, आम्ही त्या बैठकीला नव्हतो. परंतु आपण एकत्र काम करीत असताना आपण सगळे नागरीकांच्या साठी काम करीत असतो. कुठेतरी सगळयांच्या मध्ये कोऑर्डीनेशन असले पाहिजे. आम्ही आयुक्त साहेबांनाच विनंती करतो की खरच दत्ताकाकांचा आपल्याकडून अपमान झाला असेल तर आपण एक दोन मिनिटांमध्ये सांगाना नक्की काय झालेयं. दत्ताकाकांच मत आहे की अज्ञान हा शब्द तुम्ही वापरला काय झाले. तुम्ही दोन मिनीटात क्लेरीफिकेशन दिलतर विषय संपुन जाईल. जरा आम्हाला विषय समजून सांगाना कशासाठी हे झालं. नंतर दत्ताकाका बोलतील, नक्की काय झालयं. कशाला आपल्या सगळयांमध्ये समज, गैरसमज आपल्या सगळयांमध्ये. आपल्या सगळयांना एकत्र काम करायचे आहे. आज तुम्ही सांगितलं कदम, निषेध वगैरे रामाच्या नावाचा अपमान वगैरे तो एक पार्ट निषेधाचा आहे. परंतु याठिकाणी आयुक्त साहेब आणि आपण सर्वजण चांगले रिलेशन राहिले पाहिजेत. मागे सिमाताईनीं आयुक्त साहेबांना प्रश्न विचारला होता त्यावेळेस आयुक्त साहेबांनी स्वतः क्लेरिफिकेशन दिलं होतं तस आयुक्त साहेबांनी एक मिनिटांमध्ये बोलून तो विषय संपवून टाका ना. दत्ताकाका आम्ही सर्वजण आपल्या बरोबर आहोत.

**मा.दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. प्रथमत: मी राम कदमांचा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून, सर्व सभागृहाच्या माध्यमातून मी जाहीर निषेध करतो. जे व्यक्तव्य त्यांनी कालच्या दहीहंडीच्या कार्यक्रमामध्ये केलेले आहे. एका बाजूला पंतप्रधान सांगतात की बेटी पढाओ, बेटी बचाओ, दुस-या बाजूला त्याच पक्षाचे आमदार सांगतात की बेटी भगाओ. हा एक

विरोधाभास त्याठिकाणी झाला. आणि आख्या  महाराष्ट्रातल्या माझ्या तरुण भगिनींना त्यांचा जो अपमान झालेला आहे. त्या अपमानाचा मी निषेध करतो. आणि कालचे आयुक्तांनी जे स्टेटमेंट माझ्या बाबतीत केलेले आहे. त्याला या काळया फिती बांधण्याचे तेच कारण आहे. मी जरी नगरसेवक असलो तरी अन्य कोणी नगरसेवक असतील. आयुक्तांनी आयुक्तांच्या पध्दतीने रहावे. या महानगरपालिकेचे ते ज्या पध्दतीने काम करतात. बोदरेशन सगळयांना असते. टेन्शन सगळयांना असते. साहेब मी हे क्लीअर सभागृहाला सांगू इच्छितो की, तो विषय कशावरुन झालं. जो सोलरचा विषय सभागृहासमोर आला होता. सोलर एनर्जीच्या विषयामध्ये तुम्ही सगळयांनी ऐकल पण असेल की त्यामध्ये तीन रुपयांनी वीज आपण घेणार आहोत. आणि दुसरी जी वीज आहे वेस्ट एनर्जीची ती आपण साडेपाच रुपयांनी घेणार आहोत. हेच फक्त आदरनीय लक्ष्मणभाऊ जगताप आणि आदरनीय खासदार अमरजी साबळे यांचे आणि माझे व्यक्तव्य चाललं होतं. आणि तो अतीशय हसीमज्जकमध्ये चाललेला विषय होता. मी म्हणत होतो की महानगरपालिकेमध्ये एकच विषय तुम्ही दोन वेगवेगळया पध्दतीने आणत आहेत. आणि त्याच्यासंदर्भात आयुक्तांनी एवढा आवाज वाढविला. मला काही समजले नाही की ते कुठल्या टेन्शनमध्ये बोलत होते. पण माझी विनंती आहे की आयुक्त आपण या महानगरपालिकेमध्ये आमच्या करदात्यांचा पगार घेऊन नोकरीवर आहात. आम्ही या महानगरपालिकेचे सदस्य आहोत, विश्वस्त  आहोत. मालक आहोत. म्हणून आपण ठीक आहे आमची चूक असेल तर आम्ही दहा वेळा जाहीरपणे माफी मागू. साहेब, आपली चूक असेल तर आपण माफी मागावी. आम्ही हा विषय संपवून टाकू. पण तुम्ही टेन्शनमध्ये असाल, पहिले काय झालं होतं, काल काय झालं होतं. आम्ही विरोधक आहोत आम्ही विरोधाच्या माध्यमातून आमचा विरोध राहणार. तुम्ही पुरावे मागणार असाल तर आपण जज नाहीत. आमचे पुरावे सिध्द करुन दयावेत. आमचे आरोप फेटाळण्याचे काम हे तुमचे आहे. आम्ही कोर्टात पुरावे देऊ.  पण माझी विनंती आहे की चूक असेल चूक. आपण ज्या चढया आवाजाने बोलला गेलात त्या आवाजाचा ज्या पध्दतीने बोलला आहात त्याचा सर्वांनी निषेध केलेला आहे, सभेच्या बाहेर आलेलो आहे. खासदार त्याठिकाणी होते, तीनही आमदार ही त्याठिकाणी होते. मा. खासदार श्रीरंग बारणे साहेब पण तेथे होते. संबंधित सर्व सदस्य त्याठिकाणी होते. मला आदरनीय लक्ष्मण भाऊंनी पण सांगितले की काका ते चुकलेले आहेत. आपण ती चूक मान्य करावी, माफी मागावी सभागृह शांत होईल. मी पण आपल्याला मोठया

दिलाने माफ करेन हे सभागृहासमोर सांगतो. जस भाऊसाहेब भोईरांनी सांगितले की हे प्रशासन आणि सभागृह म्हणजे रथाचे दोन चाकं आहेत. एक चाकं मागपुढं चालले तर हे सभागृह चालणार नाही. हे प्रशासन चालणार नाही, ही महानगरपालिका चालणार नाही आम्ही तेवढयाची जाण राखूनच या सभागृहामध्ये बोलत असतो. आयुक्त साहेब, त्या स्मार्टसिटीची माझी पहिलीच मिटींग होती. मी हे सुध्दा सांगितले की आज आमदार साहेबांना मी सांगितले. आयुक्तांना पण सांगितले. आयुक्त साहेब ही माझी पहिली मिटींग आहे. मला पहिलं समजून घेऊ दया. पण तो विषय त्याठिकाणी आणल्यामुळे मी फक्त हेच विचारले की एक वीज दराचा रेट तीन रुपये आणि दुस-या वीज दराचा रेट पाच रुपये. वीज महानगरपालिकेची आहे म्हणून तुम्हाला एवढा राग येण्याचे काहीही कारण नव्हते. म्हणजे मी अज्ञानी जर असेल तर १०० टक्के तुम्ही सज्ञानी आहात. येथून पुढे मी अज्ञान आणि सज्ञानाचा भेदभाव करुन आपल्याबरोबर बोलेन हे मी नक्की सांगतो, धन्यवाद.

**मा.आयुक्त-** मा. महापौर साहेब, सर्व सन्मा. सभागृह. पहिल्याप्रथम आयुक्त या नात्याने ज्यावेळेला एखादया शहरामध्ये मी शासनाचा प्रतिनिधी म्हणून कार्यरत असतो. त्यावेळेला शहराच्या हिताचा पूर्णपणे विचार करुन ज्या संस्थेसाठी काम करतो त्या संस्थेच्या संपुर्ण हिताचा विचार करुन काम करण्याची शपथच ज्यावेळेला आम्ही सेवेत येतो त्यावेळेला घेतलेली असते तीच निभावण्याचा राज्य घटनेनुसार काम करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो आणि त्या अनुषंगाने ज्या दिवसापासून मी पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये उपस्थित झालो त्या दिवसापासून मनोभावी तळमळीन प्रयत्न करीत आहे. तथापि, ज्या खुर्चीवर मी आहे त्या खुर्चीवरुन या लोकशाहीकडे पोस्टींगमध्ये हे लोकशाहीचे स्तंभ आहे त्या सर्वांचा आदर राखणे, सन्मान राखणं हे निश्चितपणे माझ्यासारख्या अधिका-याचे कर्तव्य आहे आणि ते करीत असताना जर मी कुठे चुकलो असेल तर, उत्तेजित झालो असेल, आणि उत्तेजीत स्थितीमध्ये जर कुठले अनुचित असे शब्द माझ्याकडून गेले असतील तर त्याबद्दल मी पहील्याप्रथम सभागृहाचा आणि विरोधी पक्षनेत्यांचा निश्चितपणे दिलगीर आहे. मात्र त्यामागे एकच भूमिका मला आपल्यासमोर मांडायची आहे. की एखादया ठिकाणी एखादा अधिकारी तळमळीने काम करीत असताना माझ्यासारखा अधिकारी ज्यावेळेला लोकशाहीमध्ये काम करीत असतो.

त्यावेळेला माफक अपेक्षा सर्व लोकशाहीतल्या घटकांकडून व्यक्त करीत असतो की कुठल्याही मनामध्ये कोणत्याही स्वरुपाचा किंतु असेल, कुठल्याही स्वरुपाचा संदेह असेल तर ट्रायलबाय मिडीया करण्याच्यापूर्वी माझ्याशी कन्सल्ट करणं एवढीच मी एक आपल्याकडच देखील कर्तव्य आहे अशी अपेक्षा व्यक्त करतो. कारण मी इकडे कायमस्वरुपी उपलब्ध आहे. कुठल्याही स्वरुपाची चर्चा करण्यासाठी, मनातले संदेह दूर करण्यासाठी आणि त्या संदेहाच्या पलिकडे जाऊन जर काही चुकीचे घडत असेल तर निश्चितपणे ते रिव्हर्स करण्यासाठी मी सक्षम आहे आणि त्यासाठीच माझी नियुक्ती याठिकाणी करण्यात आलेली आहे. पुनश्चः आपल्या सर्वांना विनंती आहे की कुठल्याही प्रकरणामध्ये, कुठल्याही प्रकारचा संदेह असेल तर कुठलीही भीड न बाळगता माझ्याशी आपण चर्चा करावी. माझ्याकडन जर समाधान नाही झाल तर जे काही मार्ग न्यायालयाचे असतील, किंवा कुठलेही असतील ते सर्वांना उपलब्ध आहेत. तरी त्या अनुषंगाने कुठलेही अनुचित मिसकम्यूनिकेशन कोणामध्येही राहू नये हीच अपेक्षा मी या निमित्ताने विरोधी पक्षनेते दत्ता साने यांच्याकडे मी वैयक्तिकरित्या व्यक्त करतो. कुठल्याही स्वरुपाच्या कोणाच्याही भावना दुखावण्याचा माझ्या निवेदनामागे हेतू नव्हता. एवढेच आपल्या सर्वांसमोर व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

**मा. दत्ता साने -** आयुक्त साहेब, आपल्याकडून माफी मागावी अशी अपेक्षा अजिबात नव्हती. असे आमच्या सगळयांच्या वतीने मी सांगतो. जी काही घटना घडली आम्ही पुन्हा एकदा आपल्या बरोबर त्याच पध्दतीने काम करु ज्या पध्दतीने आम्ही कालपर्यंत करीत होतो.

**सिमा सावळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. मला असं वाटल की ते महिलांच काही झाले म्हणून तुम्ही पट्टया बांधल्यात. मग लगेच पट्टया काढल्या. म्हणजे स्वत:च्या अभिमानापेक्षा, मानापेक्षा महिलांचा मान हा तुम्हाला कमी वाटतो. खरतर हे मला याठिकाणी नमुद करावेसे वाटते. महापौरांनी याठिकाणी कमिशनरांना त्यांची बाजू मांडण्यास सांगितले होती. काका त्यादिवशी कमिशनरांच्या इथे तुमच जे काही झाले असेल आज त्यासाठी कमिशनरांनी इथ उभे राहून सभागृहामध्ये तुमची माफी मागितली तुमची माफी मागितली आणि तुम्ही काय केलं तुम्ही लगेच पट्टया काढल्या. मगाशी पासून आम्ही भाजपाच्या सगळया नगरसदस्या एका गिल्ट मध्ये होतो. की आम्ही यांच्या बरोबर नाहीत का. आम्ही महिला नाही

आहोत का. असं आम्हाला वाटत होतं. परंतु आज तुम्ही दाखवून दिलंत की आत्मप्रौढी पेक्षा तुम्हाला काहीच महत्वाच नाही. म्हणजे ज्या राम कदमांचा तुम्ही निषेध करायला निघाला होतात. परंतु तुमची आत्मप्रौढी किती आहे. किती अहकांर आहे स्वत:चा. कमिशनरांनी याठिकाणी माफी मागितली. माफी मागितली साहेब तुम्ही. आम्ही त्यादिवशी तुमच्या सभागृहात काय झाले ते ऐकायला नव्हतो. दत्ता काका तीथ काय बोलले. तुमचं त्यांचे काय बोलणे झाले. निश्चितपणे लोकप्रतिनिधींचा आदर राखला गेला पाहिजे, लोकप्रतिनिधींचा आदर राखला गेला पाहिजे. या मताची मी पण आहे. परंतु आम्ही त्याठिकाणी सभागृहामध्ये नसताना सुध्दा आज जाहीरपणे तुम्ही जी याठिकाणी माफी मागितली खरचं या शहराला तुमच्या सारखे कमिशनर मिळाले हे भाग्य समजतो. भाग्य समजतो आम्ही. तुम्ही चांगले काम करीत आहात. आणि जो व्यक्ती चुकतो आणि ज्याला चुकीची जाणीव होते कुठेतरी की नाही चुकून तर तो शब्द नाही वापरला ही जी भावना तुमच्यामधली ती माणुसकी आहे ना साहेब, ती माणुसकी तुम्हाला खूप मोठं करणार आहे. आमची माफी मागितली तर आम्ही मोठे नाही होणार साहेब, आम्ही मोठे नाही होणार साहेब तुम्ही माफी मागितली तुम्ही मोठे होणार. कारण त्यावेळेस तीथे आम्ही नव्हतो. भाऊसाहेब आपण मगाशी जे वक्त्यंव्य केलंत की कुठल्याही पक्षाचा हा विचार नसतो, खर आहे हे. जे काही त्या दहीहंडीत घडलं हे पक्ष म्हणून नाही तर व्यक्ती म्हणून निषेध केला पाहिजे का तर १०० टक्के निषेध केला पाहिजे. पक्षाचे तसे धोरण आहे का. म्हणजे तुम्ही तुमच्या भाषेतला आणि काकांच्या भाषेतला फरक सांगा. काकांनी सांगितलं डायरेक्ट पंतप्रधानाना, देशाचा प्रधानमंत्र्यांना, तुम्ही खाली आलात. हे योग्य नाही. या सभागृहामध्ये ज्या वेळेस सन्माननीय तत्कालीन उपमुख्यमंत्री अत्यंत खालच्या भाषेमध्ये बोलले होते. त्यावेळेस महाराष्ट्राने माफी दिलेली आहे ना, दिलेली आहे ना आणि त्याही पलिकडे जाऊन मी सांगेन की आमचा कोणी कळवळा करण्याची गरज नाही. कोणीच कळवळा करण्याची गरज नाही. आम्ही सक्षम आहोत आमच्यासाठी भांडायला, महिला म्हणून आणि आमच्यामध्ये ती ताकद आहे. ज्या शाळेमध्ये जाणा-या मुली असतील, कॉलेजमध्ये जाणा-या मुली असतील. नोकरी करणा-या भगिनी असतील. राजकारणामधल्या, समाजकरणामधल्या भगिनी असतील. तुम्ही आम्ही एवढे कमजोर आहोत काय. तुमची आणि आमची बाजू आजून कोणी घ्यायला पाहीजे. आपल्यामध्ये धमक आहे. एका नवीन सृष्टीला जन्म देण्याची आपल्यामध्ये ताकद आहे. आपण

कोणाचे मोताज नाहीत. कोणी आपली बाजू घेऊन ताई, आपली बाजू घेऊन कोणी इथ राजकारण करता कामा नये. आपण आपली बाजू मांडतो. आम्ही तेवढे कमजोर निश्चितच नाही आहोत. ज्या महाराष्ट्राने तत्कालीन उपमुख्यमंत्र्यांना माफ केलं होते. पक्ष कुठलाही असू दया. व्यक्ती म्हणून त्या व्यक्तीचे काय करायचं. निश्चितच पण तो जनतेचा विषय आहे. निषेध करायचा का काय करायचे ते. परंतु आज या सभागृहामध्ये कमिशनर साहेब तुम्ही माफी मागितली. आम्ही त्याठिकाणी बघायला नव्हतोत. आम्हाला कळाले पण नव्हते काय झाले होते ते. तरी तुम्ही याठिकाणी मोठया मनाने सभागृहामध्ये माफी मागितली. आणि ती माफी मागितल्यानंतर काका तुमच्याकडून असं आम्हाला अपेक्षित होतं की काका तुम्हीसुध्दा त्यादिवशी मिटींगमधून उठून गेलात असं आम्हाला कळल होत. मग तुम्ही सुध्दा असं म्हणायच होतं की साहेब त्यादिवशी मी रागामध्ये निघुन गेलो होतो. परंतु ते तुम्ही म्हणला नाहीत. ते अपेक्षित होतं तुमच्याकडून. नाहीतर ते भांडण मिटलं असतं. मा.महापौर साहेब, येथून पुढे जी गोष्ट सभागृहामध्ये सगळया नगरसेवकांच्या बाबतीत घडलेली नसेल. परंतु ती खरचं सभागृहात घ्यावयाची असेल तर त्याची शहानिशा करावी. सभागृहामध्ये हा पायंडा पडायला नको होता. समजा तुम्हाला काकांना स्वारी म्हणायच होतं. तुम्ही एकटे स्वारी म्हणू शकला असतात. तुमच्या केबीनमध्ये हे घडले होते तर. हे सभागृहामध्ये घडले असेल एखादया अधिका-याने नगरसेवकाला बोलले असेल तर निश्चितपणे कारवाई करावी. आम्ही सगळे त्याठिकाणी त्यावेळेस नव्हतो. काका सांगा तुम्ही काय केलंत. आम्ही पण या सभागृहामध्ये तीन टर्म काढलेल्या आहेत. महापौर साहेब, येथून पुढे अशा प्रकारची वागणूक कमिशनर साहेबांना मिळता कामा नये. सभागृहात झाले असेल तर सभागृहात सांगा तुम्ही, धन्यवाद महापौर साहेब, पुढचे विषय घ्या.

**मा. तुषार हिंगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह अनेक वर्षापासून या शहराला हॉकर्सची समस्या खूप भेडसावत आहे तरी सदर हॉकर्ससाठी कुठल्याही प्रकारचे नियोजन नाही यासाठी मी माहे ऑगस्टच्या महापालिका सभेसमोर संबंधित सर्व हॉकर्सची संख्या आणि त्या संबंधित समस्या या संदर्भात बोलणार आहे. मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब केंद्राच्या नगरविकास विभागाने व दारिद्रय निर्मूलन विभागाने सन २००४ साली राष्ट्रीय फेरीवाला धोरण तयार केले आहे. त्यासाठी

केंद्र सरकारने वेळोवेळी संबंधित महानगरपालिका यांना मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. त्या फेरीवाला संबंधी प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्या फेरीवाल्यांच्या व्यावसायाचे विनियमन करण्यासाठी सदर उपवीधीच्या धर्तीवर स्थानिक परिस्थितीनुसार उचित फेरफार करुन उपविधी तयार करुन शासनाच्या पूर्व मान्यतेने आपल्या क्षेत्रामध्ये लागू करावेत. परंतु अदयाप ते केलेले नाही. सन २००५ साली शासन निर्णयाने प्रस्तूत केलेप्रमाणे प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रामध्ये शहर फेरीवाला समिती, प्रभाग फेरीवाला समिती व प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती त्वरीत स्थापन करावी असा सन २००९ चा शासन निर्णय आहे. तरी हे धोरण का अवलंबिले नाही. का समिती नेमली नाही. आणि सन २००९ साली राज्य शासनाने त्याचवेळी शहरातील फेरीवाल्याचे सर्वेक्षण त्याच जागी निश्चित करणे. त्यानंतर त्यांना उपविधीप्रमाणे ३ महिन्याच्या आतील कालावधीप्रमाणे करणे बंधनकारक असताना आपण महानगरपालिकेत हे धोरण अवलंबिले होते का. आज या पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे तुम्ही बेशिस्त वाहनांना शिस्त लावण्यासाठी तुम्ही पार्कींग धोरण करीत आहात. त्याआधी हॉकर्स धोरण तयार करा. हे करणे अत्यंत गरजेचे आहे नाहीतर या शहरातील वाहतुक समस्यासारखीच हॉकर्सची समस्या होणार आहे. जर वेळीच आपण हॉकर्सचे धोरण अवलंबिले नाही तर अनेक समस्या वाढतील. हातगाडी आणि फेरीवाल्याचे असे वाटते की सन्मा. महापौर साहेब, आयुक्त साहेब, जे मागे प्रशासनाच्या मान्यतेने आपण सहा हजार, बारा हजार अशी जी दंडाची रक्कम ठेवली आहे ती मला वाटते की ही दंडाची रक्कम खुप अवास्तव आहे. गरीब घरातील लोकांचे हे गाडे असतात. त्यांचे पोट पुर्ण त्यावर अवलंबून असतात. मला तर त्या दंडाची रक्कम पाहिल्यानंतर असे निदर्शनास येते की त्यांची एक महिन्याची जी कमाई असते ती आपण दंडापोटी वसुल करतोय. या शहरातील गरीब लोक जगणार तरी कसे. यामुळे शहरात गुन्हेगारी प्रवृत्ती जास्त वाढू शकते. त्याप्रमाणे शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार आपण व्यवस्था केलेली नाही. तरी लवकरात लवकर हॉकर्सबाबत पॉलिसी करावी.

**मा.सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा सभागृह. खरतर आजचा हा जो विषय आहे. आपल्या संपुर्ण शहरासाठी सर्वात महत्वाचा विषय आज तुषारभाऊ हिंगे यांनी सभागृहासमोर आणलेला आहे. सन्मा. महापौर साहेब, सन

२०१४ मध्ये टपरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात आले त्यामध्ये १०८३० असा सर्व्हे करणेत आला त्यापैकी पात्र फेरीवाले ९०२५ होते आणि त्याच्यातील बायोमेट्रीक पध्दतीचा जो सर्व्हे झाला त्याच्यातील ५९२३ असा बायोमेट्रीक पध्दतीने सर्व्हे करणेत आला. वेळोवेळी या विषयावर आपल्या सभागृहामध्ये चर्चा होत असते. नगरसेवक आपल्या पध्दतीने आपल्या सुचना आपल्यासमोर मांडत असतात. सन्मा.महापौर साहेब, खरतर पिंपरी चिंचवड शहरामध्ये पाहिले तर प्रत्येक चौक असेल, विविध पध्दतीचे रेल्वे स्टेशन्स असतील, महत्वाचे  हॉस्पिटल्स असतील, शाळा असतील प्रत्येक ठिकाणी आपल्याला हॉकर्स दिसतील. याच्यामध्ये या पिंपरी चिंचवड शहरातील सर्वसामान्य भूमिपूत्र तुम्हाला प्रामुख्याने दिसेल. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की ज्या विविध ठिकाणी परप्रांतियांनी सुध्दा वेगवेगळे चौक आपले व्यापले आहेत. महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की कुठेतरी हा गोरगरीब व्यक्ती आपलं पोटपाणी भरण्यासाठी, दिवसाची रोजीरोटी कमविण्यासाठी आपला व्यवसाय करीत असतो. आणि त्यांच्यावर कारवाई केली जाते. कारवाई केलेनंतर त्यांची हातगाडी असेल, टपरी असेल उचलली जाते आणि जप्त केली जाते. त्यावेळेस अशा अनेक हातगाडया जप्त केलेल्या ठिकाणांहून परस्पर कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी न करता आपले काही व्यक्ती कडून त्यांच्या गाडया परस्पर विकल्या जातात. ही मोठी खेदाची गोष्ट आहे. अशा अनेक घटना या शहरामध्ये घडलेल्या आहेत. सन्मा महापौर, हॉकर्सवर काम करणे, प्रत्येक चौकामध्ये  शिस्त लावणे हे आपल्या प्रशासनाचे आणि पालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. आज आपण पाहिले की त्याच्यावर कोणत्याही प्रकारचे काम करताना प्रशासन कुठेही दिसत नाही. जर आपण पाहिले तर आताच तुषारभाऊ बोलले की गोरगरीब व्यक्ती रोजीरोटीसाठी दिवसरात्र काबाडकष्ट  करीत रस्त्यावर बसलेला आहे. त्याला जर आपण व्यवस्थितपणे शिस्त लावली. त्याला जर आपण हॉकर्स पध्दतीने व्यवस्थित टप-या लावून दिल्या. तर ते आपल्याला पालिकेला उत्पन्नाचा स्त्रोत सुध्दा ठरेल. आणि व्यवस्थित एक व्यवसाय सुध्दा केला जाईल. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की व्यवस्थीतपणे एका महिलेला म्हणा किंवा तरुणाला म्हणा आपल्या महानगरपालिकेतर्फे एक रोजगार दिला जाऊ शकतो. एकीकडे हा विषय करणे अतिशय गरजेचे आहे. हॉकर्सवर काम करणे खूप गरजेचे आहे. आणि खेदाची गोष्ट म्हणजे अशी आहे की जेवढे या गोष्टीचे मी समर्थन करतोय तेवढेच या गोष्टीचा विरोध सुध्दा करेल. काही बगल बच्चे काही भाई या शहरावर गोरगरीबांच्या नावांवर एक टपरीच्या ऐवजी

कमीत कमी दोन-दोन तीन-तीन चार-चार दहा-दहा टप-या त्यांनी मांडलेल्या आहेत. आणि त्यांच्याकडून दर महिन्याला दहा दहा हजार, पंधरा-पंधरा हजार, वीस हजार रोजचे गोळा करतात. काहींचा हा व्यवसाय झाला आहे. त्याच्यामध्ये आपले अधिकारीवर्ग सुध्दा आहेत. महत्वाची गोष्ट म्हणजे अशी की हे बगल बच्चे जागा महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारचे उत्पन्न न देता काही व्यावसायिकांनी दहा-दहा पंधरा-पंधरा वीस-वीस टप-या टाकून दर महिन्याला पैसे घेतले आहेत. तरी याच्यावर आपल्या महानगरपालिकेनी कुठले काम केल पाहिजे. तसे सर्व सामान्य गोरगरीब कष्टकरी कामगार आहेत, महिला आहेत त्यांना हॉकर्सच्या माध्यमातून व्यवस्थितपणे स्पॉट दिले पाहिजेत. त्यांच्यामुळे कुठे तरी शहराला व्यवस्थितपणे वळण लागेल. अशा प्रकारे व्यवस्थितपणा आणला पाहिजे. आम्ही ज्यावेळेस विविध संघटनेमार्फत या विषयावर चर्चा करतो. संघटनेच्या अध्यक्षांबरोबर चर्चा करतो तर ते सुध्दा स्थानिकतेच्या प्रत्येक नियमाला एकच स्पष्टपणे धरुन आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की आम्हाला व्यवस्थितपणे जागा दया. हॉकर्ससाठी टप-या दया. आम्ही व्यवस्थितपणे महिन्याच्या महिन्याला स्वखूशीने काय पैसे आकारले जातील ते पैसे इथं भाई लोकांना देण्यापेक्षा आपल्या पालिकेच्या तिजोरीमध्ये भरायला तयार आहेत. सन्मा. महापौर साहेब, आपण जर पाहिले तर अनेकांनी टपरीवाल्यांच्या नावाखाली, हातगाडीवाल्यांच्या नावाखाली मोठमोठया चौकामध्ये मोठमोठे धंदे टाकलेत. त्यांच्यावर कारवाई होत नाही. पण त्या मोठया मोठया व्यक्तीवर कारवाई न करता हे छोटया छोटया टपरीधारकांवर कारवाई करतात. आणि आपल्याला लेखी दाखविले जाते की यांच्यावर आम्ही कारवाई केली म्हणून. आणि खर जर बोलायला गेलं तर नीट व्यवस्थित तुम्ही बघा आपले मोठमोठे फूटपाथ सुध्दा या दुकानदारांनी व्यापले आहेत. मग त्यांच्याकडून पैसे कोण कोण घेते. मग त्याच्यामध्ये कोण कोण आहे. याचाही सर्व्हे होणे गरजे आहे. सन्मा. महापौर साहेब, तुम्ही या शहरामध्ये रोजच फिरताय. तुमचा जन्म या भूमीतला आहे. टपरीवाल्याच्या नावाखाली, हातगाडीवाल्यांच्या नावाखाली हे मोठेमोठे भाई लोक हप्ते घेतात यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. आणि महापालिकेच्या बाबत सन्मा. महापौर मी तुम्हाला विनंती करतो. खरतर जो सहा हजार दहा हजार आणि बारा हजार हा जो तुम्ही रेट लावला आहे. एखादया मोठया हॉटेल अनधिकृत आहे त्याचे तोडाना. जे अनधिकृत धंदे करतात आपल्या फुटपाथवर आहेत त्यांच्यावर कारवाई करा ना. हया गोर गरीबांवर काय कारवाई करताय. त्यांना कुठेतरी नियम

दया आणि रोजगार देणं हे आपल धोरण आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये त्यांना व्यवस्थितपणे हॉकर्सच्या पध्दतीने लवकरात लवकर त्याची अंमलबजावणी व्हावी. आणि छान पध्दतीने कुठेतरी त्यांची व्यवस्था करावी. त्यांना जागा दयावी आणि मोठया मोठया ज्या व्यक्ती आहेत की जे एखादया व्यक्तीला हप्ते देतात त्यांच्यावर कारवाई व्हावी अशा प्रकारची मागणी करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे** - मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह. धन्यवाद महापौर साहेब, मी आताच जस्ट एकदा २६ तारखेला कमिशनरांना फोन केला होता. की पिंपरी कॅम्पमध्ये हॉकर्स आणि व्यापा-यांची भांडणे झाली. आमच्या पिंपरी कॅम्पाची अशी परिस्थिती आहे की साईचौक, शगुन चौक आणि मेन मार्केट की दुकानदारांनी पथारीवाले बाहेर बसविलेत आणि हजार, आठशे रुपये डेली चालू आहेत. आणि एकाएका दुकानदाराने ३ ते ४ पथारीवाले बसविलेत. डब्बु आसवानी पण सांगतील. आमच्या पिंपरीत हॉकर्स झोनसाठी प्लॉट अव्हॅलेबल आहेत. पण आतापर्यंत महापालिका प्रशासन या गोष्टी करीत नाही. परिहार चौकांच्या तिथंपण सांगितले आहे तिथे हॉकर्स करा तिथे १०० लोक बसतील. साई चौकाचे कत्तलखान्याच्या जागी पार्कींग म्हणून टेम्पररी मंजुर केलेले आहे. पाच करोडोला एचए कंपनीकडून टॅक्स स्वरुपात तो प्लॉट आपण घेतलाय. पाच कोटी आपण आज तागायात एचए कंपनीला दिलेले नाहीत. अर्धवट काम करुन ठेवल्यामुळे कंपांऊडचे टेंडर काढून पार्कींग करणार होते. अर्ध पार्कींग आणि अर्ध हॉकर्स. आणि पिंपरी कॅम्पामध्ये अशी काही परिस्थिती आहे की पार्कींग म्हणून बिल्डींग सॅंक्शन केली आहे. आणि वरती रेसिडेन्सीयल प्लॉट आणि खाली पार्कींगमध्ये लोकांनी दुकाने केलेली आहेत. साई चौक, शगुन चौक, मेन मार्केट. मेन मार्केटमध्ये तर पिंपरी चिंचवड पुणे शहरामधील सर्वात मोठे मोबाईल हॅंक असेल आशिया खंडामध्ये तर पिंपरी आहे. कपडा मार्केट पण पिंपरीमध्ये आहे. आमच्या पिंपरीला जर हॉकर्स झोन तयार करुन दिले आणि विषय जर मार्गाला लावला तर बर होईल आयुक्त साहेब. डब्बु शेठ पिंपरी के बारेमे तू भी बोल. एवढ बोलून थांबतो.

**मा. केशव घोळवे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. आज या विषयाच्या अनुषंगाने मी सर्वप्रथम आमचे मित्र आणि नगरसदस्य तुषार हिंगे यांचे अभिनंदन करु इच्छितो की अतिशय या शहराचा ज्वलंत असा विषय त्यांनी याठिकाणी दिला आहे. आपण जर पाहिलं तर आपलं शहर हे झपाटयाने वाढत चाललं आहे.

आपलं शहर हे स्मार्ट सिटीकडे मार्गक्रमण करीत असताना या शहरामध्ये जे फेरीवाले असतील, हातगाडी वाले असतील यांच्या धोरणाच्या बाबतीत वास्तव काय आहे हे जर आपण जाणून घेतले आणि त्यावर मार्ग काढलातर मला अस वाटत की या शहरातला खूप मोठा आणि गंभीर प्रश्न याठिकाणी सुटू शकेल. सन २०१८ मध्ये मी स्वत: अ प्रभाग अध्यक्ष असताना हॉकर्स धोरणाचा काही अभ्यास केला. जे २०१४ मध्ये बायोमेट्रीक केलेले आहे त्या बायोमेट्रीक संबंधित ठिकाणी व्हिजीटस केल्या. त्या व्हिजीटसमध्ये असे आढळून आले की त्याठिकाणच्या टप-या, हॉकर्सवाले, फेरीवाले कोणीही नाहीत. संपुर्णत: ते जे बायोमेट्रीक केलेले आहे हेच त्याठिकाणी झालेले आहे. आणि आजही त्याचा तुम्ही अभ्यास करु शकता. अ प्रभागाच्या कमिटीमध्ये आम्ही ठराव सुध्दा मंजुर केला. फेरीवाला धोरण असेल ते बायोमेट्रीक आपण पुन्हा नव्याने करण्यात यावे. की जेणेकरुन जे खरे आहे ते ख-या अर्थाने शहरामध्ये समाजापुढे येईल. आणि म्हणून अजुनही वेळ गेलेली नाही. चुकीचे बायोमेट्रीक घेऊन आपण चुकीचे करण्यापेक्षा जे सत्य आहे ते आपण पहावे. हे शहर आपण स्मार्ट सिटीकडे मार्गक्रमण करायला नेत आहोत तर आपण एक चांगली प्रोफेशनल टीम त्याठिकाणी नेमुन त्याचे सर्व्हेक्षण करण्यात यावे. मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब मी आपल्याकडे मागणी करीत आहे की या माध्यमातून आपण एक प्रोफेशनल टीम नेमावी, संस्था नेमावी आणि शहरामध्ये खरोखरच फेरीवाला धोरण असेल किंवा त्या अनुषंगाने हॉकर्स असेल आपण एक बायोमेट्रीक सर्व्हे त्याठिकाणी पुन्हा करणेत यावा. आणि त्या माध्यमातून शहरातील गोरगरीबांना त्याठिकाणी न्याय दयायचे काम करावे. आणि दुसरे सर्वात महत्वाचे आज टपरीवाले किंवा हॉकर्समध्ये अनेक जण माफिया बनलेले आहेत तर त्यालाही चाप बसेल, खीळ बसेल. निश्चितच हे आपल्या शहरासाठी आणि आपल्या सर्वांसाठी हे चांगल नाही. कारण एक टप-याच्या दहा टप-या आणि त्यांच्याकडून पैसे वसुल करायचे. ही एकप्रकारे अनेक वर्षापासून लागलेली मोठी कीड आहे. ती सुध्दा आपण थांबवू शकतो आणि थोपवू शकतो. तिसरे असं महत्वाचे पाहिले मुख्य रस्ते असतील, मुख्य चौक असतील हे यामध्ये पुर्णत: काबीज झालेले आहेत. त्यामुळे रहदारीला आणि अपघातांना त्यामुळे मोठे निमंत्रण मिळत आहे. तर या विषयाच्या माध्यमातून आपण पाहिलं तर शासनाचे धोरण ठरलेल आहे, उच्च न्यायालयाच्या गाईडलाईन्स आहेत त्यानुसार आपल्याला सॉफ्टवेअर सुध्दा याच्यामध्ये घ्यावे लागतील. आणि त्या निकषानुसार आपण जर काम केलं तर मला असं वाटतं

की पिंपरी चिंचवड शहर हे हॉकर्स मध्ये देशामध्ये नंबर वन होऊ शकते. त्याठिकाणचे बायोमेट्रीक १०० टक्के परफेक्ट केलेले आहे. तरी मी याठिकाणी मागणी करतो की या शहरातील गोरगरीब जनतेला त्याच बरोबर आपल्या शहराच्या सुसूत्रतेसाठी आपण याठिकाणी नव्याने बायोमेट्रीक घेण्यात यावे अशी मी मागणी करतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. आज तुषार हिंगे यांचे खरोखर मनापासून अभिनंदन करते. हे जे फेरीवाला धोरण आहे त्याच्यासाठी त्यांनी प्रश्न विचारले. आज मला वाटते की पिंपरी चिंचवडमध्ये सगळयात मोठं टपरीनगर असेलतर ते संत तुकारामनगर. संत तुकारामनगरचे नाव आयुक्त बदलून टाका आणि त्याला टपरीनगर असे नांव नक्की दया. कारण ते नावच शोभतं संत तुकारामनगरला. आज ४६५ टप-या संत तुकारामनगरमध्ये आहेत. ४६५ टप-या एकटया संत तुकारामनगरमध्ये असताना तुम्ही या सर्व्हेक्षणमध्ये सांगताय की ९०२५ फेरीवाले पात्र ठरवलेत आहेत त्यापैकी ५९२३ चे बायामेट्रीक केले आहे. आता ते बायोमेट्रीक सर्वेक्षण तुम्ही कुठल्या पध्दतीने करताय मग फेरीवाला धोरण त्या अखत्यारीमध्ये येऊन तुम्ही फेरीवाले ठरवताय. हे मात्र आम्हाला अजूनही कळत नाही. संततुकाराममधल्या फेरीवाल्यांचा नुकताच मी अभ्यास केला. तर संत तुकारामनगरमध्ये फेरीवाले म्हणजे कोण. ज्यांचे स्वत:चे मोठमोठे बिझनेस इंडस्ट्रीज आहेत त्यांना या फेरीवाला धोरणामध्ये तुम्ही घेतलेलं आहे. फेरीवाला धोरण असेल, किंवा हॉकर्स धोरण असेल त्यामध्ये कोण असावं. कुठल्या माणसाला त्या हॉकर्स झोनमधला गाळा मिळावा. त्यांच जर धोरण फेरीवाला धोरणामध्ये असेल तर त्या पध्दतीने त्या अनुषंगाने ते फेरीवाले का दिले जात नाहीत. आज मला वाटत आमच्या चौपाटीजवळ आयुक्त आले होते. आयुक्त आल्यानंतर मला वाटत पाच ते दहा मिनिटे आयुक्तांचीच गाडी तिथे अडकली. त्यामुळे दुस-या दिवशी तिथं आमच्या चौपाटीवर अतिक्रमणाची कारवाई झाली. अतिक्रमणाची कारवाई झाल्यानंतर तिथे संपुर्ण चौपाटी रिकामी झाली. त्याचवेळी आम्ही आयुक्तांना फोन केला आयुक्त तुमचे खरोखर धन्यवाद. कारण त्या चौपाटीमध्ये माझेकडे तीन जणांचे बळी गेलेत कारण गाडी वळविताना फोर व्हिलरने टू व्हिलरवरील लोकांना उडविले. आमच्या कांबळे काकू असतील. आल्हाट असतील असे तीन जण मृत्यूमुखी पडले होते. दुस-या दिवशी पुन्हा तिथे चौपाटीमध्ये सगळ रंगरंगोटी त्याच पध्दतीची होती. आज १९९० मध्ये ठराव

झाला होता तिथे शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणेबाबत. त्यामुळे आम्ही त्याच वेळेला स्थापत्यला सांगितले होते. तुम्ही तिथे त्या पध्दतीचे काम करुन घ्या, पण नाही. कुठेतरी माशी शिंकते आणि पुन्हा पुन्हा तीच गोष्ट परत फेरीवाले. एकही अनधिकृत फेरीवाला नसेल असं मी सांगू शकत नाही. अधिकृत फेरीवाले फक्त तीन आणि बाकीचे सर्व अनधिकृत आहेत. अनधिकृत फेरीवाल्यांना जर तुम्हांला शह दयायचा असेलतर ते कुठल्या पध्दतीने तुम्ही शह देणार आहेत हे खरोखर तुम्हांला ठरवावे लागेल. आज एकेकाच्या सातसात टप-या आमच्याकडे आहेत. एकाच घरामध्ये एकाच पत्यावर एका नावावर सात-सात टप-या आयुक्त साहेब तुम्ही दिलेल्या आहेत. हया कुठल्या बेसिसवर दिल्या आहेत. आज तुम्ही मे मध्ये माझ्याकडे ज्या अनधिकृत टप-या आहेत त्यांच्यावर कारवाई केली. आता तिथे संबंधित अधिकारी राऊत मॅडम असतील तर त्यांनी उत्तर दयावे. अनधिकृत टप-यावर तुम्ही कारवाई केली. ज्या टप-या तुम्ही काढल्या त्यावेळेला आमच्यावर गुन्हा देखील दाखल झाला आहे. पण आम्ही आल्यानंतर बघितलं तर तिथे पाच ते सहा दिवसांमध्ये सगळयांच्या सगळया टप-या पुन्हा तिथे बसल्या गेल्या. मग तुम्ही हे नाटक का करता. फेरीवाल्याला उठविण्याचे नाटक फक्त माझ्या वॉर्डामध्ये का केले जाते. आणि जर करीत असाल आणि तुम्हाला जर त्याचा पाठपुरावा करता येत नसेल तर तुम्ही त्या पध्दतीने कारवाई करु नये ही आमची विनंती आहे. आता चिखले साहेबांनी सांगीतल, संदिप भाऊनी सांगीतल, खरोखर तेथे गुंडगीरी आणि दादागीरी आणि भाईगीरी खुप वाढलेली आहे. एक एकाच्या चार चार टप-या असतात. त्या लोकांची चार-चार मजली घर आहेत, त्या लोकांच्या इन्डस्ट्र्या आहेत. त्या लोकांना तुम्ही हॉकर्स झोनमध्ये गाळे दिलेत. आज गणपतीचे स्टॉल असतात. प्रत्येक सिझनचे स्टॉल तुम्ही आमच्या वॉर्डमध्ये देता. स्टँडीगमध्ये ठराव झाला होता फूटपाथवर कुठल्याही प्रकारचे स्टॉल दयायचे नाही. आज माझ्या वॉर्डामध्ये संततुकारामनगरमध्ये सगळयात जास्तीचे स्टॉल स्थापत्यकडून दिले गेले. नगरसेवकांच्या लेटर्सवर, नगरसेवकांच्या लेटरहेडवर जर तुम्हाला स्टॉल जर दयायचे असतील तर तुम्ही अधिका-यांना नेमू नका. नगरसेवक आम्ही आमचे ठरवू आम्हाला कोणाला स्टॉल दयायचे ते. नगरसेवकांच्या लेटरहेडवर तुम्ही स्टॉल देत असाल तर तुमच्या अधिका-यांकडून सांगितले जाते की तीन नगरसेवकांचे लेटर आलेय. चौथ्याही नगरसेवकाचे लेटर आणा. तुम्ही आम्हाला या गोष्टीमध्ये का भागीदार करुन घेता. रुल रेग्युलेशन पध्दतीने तुम्हाला जर स्टॉल

दयायचे असतील तर त्या पध्दतीने तुमचे स्टॉल दिले पाहिजेत. एक स्टॉल पहिला पडतो उन्हाळयामध्ये गु-हाळाचा. गु-हाळाचा स्टॉल संपला की सिझन सुरु होतो गणपतीचा. गणपती झाले की नवरात्र येते. नवरात्र झाले की दिवाळी येते. दिवाळी झाली की पुन्हा गु-हाळाचा सीझन येतो. पादचा-यांसाठी केलेले फूटपाथ हे स्टॉलधारकांसाठी आहेत का. त्या पध्दतीने आयुक्त तुम्हाला काम करावे लागेल. आणि तुमचे अधिकारी कुठल्या पध्दतीने काम करतात हे तुम्हाला पाहावे लागेल. आज नगरसेवकांच्या लेटरहेडवर जर एनओसी देत असालतर मला तो रुल्स दाखवून दया की नगरसेवकांने लेटर दिले आम्ही एनओसी देतो म्हणून. आमच्या एनओसीवर काम केली जातात किंवा लेटरहेडवर कामे केली जातात. आमची एनओसी घेऊन तुम्ही आमच्यामध्ये व नागरीकांमध्ये तेढ निर्माण करण्याचे काम हे प्रशासन करीत असत. हया प्रशासनाचा मी या पध्दतीचा निषेध करते. आज फेरीवाल्यामुळे संततुकारामनगरमध्ये वायसीएमएच आहे, डॉ डी वाय पाटील इंजिनिअरींग कॉलेज आहे. आज तिथे आम्हाला ॲम्ब्युलन्सला जायला जागा नाही. प्रत्येक फूटपाथ हा स्टॉलधारकाने प्रत्येक फूटपाथ हा हातगाडयांनी भरलेला आहे. कारवाई एक दिवसासाठी करायची. त्या कारवाईमध्ये गळाला लागतो आमच्यासारखा एखादा नगरसेवक. बाकीचे त्याची फार मजा घेतात. प्रत्येकाचे दिवस एकदातरी येणार. पण कारवाई केल्यानंतर आपण काय करायला पाहिजे याची कधी आपण तमा बाळगली का किंवा तुम्ही त्या पध्दतीने काम केलयं का. मला आज आयुक्तांना उत्तर दयावे लागेल. आयुक्तांनी हया प्रश्नाचे उत्तर दायचे की मे महिन्यामध्ये केलेली कारवाई मधील त्या ८० च्या ८० टप-या पुन्हा तिथे कशा काय बसल्या आणि त्या कोणाच्या सांगण्यावरुन बसल्या. मग त्या बसवावयाच्या होत्या तर त्यावर कारवाई का केली तुम्ही. संततुकारामनगर तुम्हाला हॉकर्स झोन तयार करायचे असतील तर तीन ते चार ओपन स्पेसेस आहेत. त्या ओपन स्पेसचा वापर दुसरी लोक करतात. का त्याठिकाणी हॉकर्स झोन केला जात नाही. सगळया जनतेला वेठीस धरण्याचे काम जर प्रशासन करीत असेल तर प्रशासनाने ही गोष्ट करु नये. आणि आयुक्तांनी मला उत्तर दयावे कारवाई केल्यानंतर पुन्हा दुस-या दिवशी तिथे हातगाडया किंवा टप-या का बसतात. कोणाच्या सांगण्यावरुन बसतात आणि अधिकारी तिथे का कारवाई करीत नाही. आपल्याकडून ती कारवाई होत नसेल तर आपण ती कारवाई करु नये. कारण त्याचा त्रास तमाम जनतेला होणार असतो. त्याचा त्रास आम्हाला देखील होत असतो. आज जवळ जवळ

४६५ टप-या करताना वायसीएमएचच्या तिथे जर तुम्ही गेलाततर वायसीएमएचला लागून टप-या आहेत. गर्व्हनमेंटचा जीआर आहे की तुम्ही १०० मीटरपर्यंत टप-या ठेवू शकत नाही. का नाही अजूनपर्यंत कारवाई झाली तिथे. वायसीएमएचच्या तिथे भिंतीला लागून एवढया अधिकृत टप-यांना का हॉकर्स झोन निर्माण करुन दिले नाहीत. आणि का निर्मीती झाली नाही त्यांची. आज त्याठिकाणी नागरीकांना चालायला जागा नाही. आठ दिवसांपूर्वी औटीकाका वारले. त्या काकांचा तिथे तीन महिन्यांपूर्वी फूटपाथवर ॲक्सीडेंट झाला होता का तर त्याठिकाणी चालायला जागा नाही. लावलेले बांबू आणि त्या बांबूला लागून तो माणूस पडला आणि पडल्यानंतर त्यांच्या पायाचे हाड फॅक्चर झाले. याला जबाबदार कोण आणि तुम्हाला परमिशन दयायला लागते त्यावेळेला तुम्ही नगरसेवकाचे लेटर मागता. नगरसेवकांच्या लेटरवर तुम्ही एनओसी देणार असाल तर आजपासून कुठल्याही अधिका-याने स्वत:च्या अधिकारामध्ये एनओसी दयायची नाही. मग आम्ही बघतो आमच्या वॉर्डामध्ये कोणाला ठेवायचे आणि कोणाला नाही ठेवायचे ते. आज हॉकर्स झोन, फेरीवाला यांचे नुसते सर्व्हेक्षण करुन चालणार नाही. या सर्व्हेक्षणामध्ये हातगाडया किती आहेत, स्थिर टप-या किती आहेत. स्थिर टप-या या कुठल्या जागेवर आहेत आज माझ्याकडे तुम्ही कारवाई केली. कारवाईमध्ये परत टप-या तुम्ही लावल्या. तुम्हांला माहिती आहे का सुजाता पालांडेचा हा माणुस आहे किंवा आमक्याचा हा माणुस आहे याला आपण काढल पाहीजे. फक्त तुम्ही जागा बदल म्हणून दोन दोन टप-या उचलून तुम्ही क्रशमध्ये टाकून देता. दुस-या दिवशी आम्ही तिथे गेल्यानंतर तुमच्या टप-या फेकून दिल्यात हा कुठला निर्णय. आणि ही कुठली कारवाई मग बाकीच्या टप-या जेव्हा बसल्या त्यावेळेस तुमच्या प्रशासनाचे डोळे उघडे का नव्हते. अशा प्रकारे कारवाई करायची असेल तर मी प्रशासनाचा निषेध करते. योग्य ती कारवाई झाली पाहिजे. टपरीनगर म्हणून आम्ही संबोधतो ते टपरीनगर मुक्त करण्याचे काम हे प्रशासनाचे आहे. आज स्थिर हातगाडया तुम्ही दिल्या असतील. फिरत्या हातगाडया दिल्या असतीलतर फक्त तुम्ही आम्हाला सांगताय की कुठल्या पध्दतीने आम्ही दिलंय. महापौर साहेब, अटी नियमामध्ये हे लोक काम करतात का. अटी नियमामध्ये हे जर काम होत नसेल तर हे सर्व्हेक्षण करुन किंवा या पध्दतीचे काम करुन आयुक्त चालणार नाही. तुम्ही आम्हाला उत्तर दया. जी कारवाई केली त्या कारवाई केलेल्या टप-या उचलल्यानंतर आठ ते दहा दिवसांमध्ये त्या टप-या तिथे कशा बसल्या. कोणी त्यांना लायसन्स दिले. जर हे लायसन्स दिले नसतील तर ही

कारवाई का केली होती. आणि पुन्हा काय करणार आहात तुम्ही. हयाचे उत्तर आयुक्त साहेब तुम्हाला आम्हाला दयावे लागेल. संततुकारानगरचे टपरीनगर जे झाले ते हॉकर्समध्ये त्याची निर्मिती करुन अधिकृत असलेल्या टप-यांना तुम्ही हॉकर्स झोनमध्ये जागा दयावी. ही तुम्हाला नम्र विनंती आहे. नाहीतर आमच्या तिथे राहणारा एकाही माणसाला जे आता तिथे फूटपाथ नाहीतच. मगाशी संदीपभाऊ म्हणाले की सगळे दुकानदार हे फूटपाथवर आलेत, फूटपाथच्या बाहेर आलेत. आता अधिकारी फक्त तिथे जाऊन चर्चा करुन काय करतात. पैसे गोळा करण्याच काम करतात का हासे मागण्याच काम करतो. हयाचे उत्तर तुम्हाला आयुक्त साहेब दयावे लागेल. प्रशासनाने उत्तर दयावे ही नम्रतेची विनंती आहे. अटी आणि नियम दाखवू नका. त्या अटि आणि नियमानुसार काम करण्याचा प्रयत्न करा. एवढेच बोलते आणि थांबते, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह आज तुषार हिंगे यांनी जो विषय आणला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करीत आहे. हॉकर्स झोनच्या पॉलिसीमध्ये नगरसेवकांनाही समाविष्ट करुन घेतले पाहिजे. आज आमच्या प्रभागामध्ये हॉकर्स झोन कुठे केला आहे ते आम्हाला ही माहीत नाही. त्यांना आमच्या इथे काय अडचण आहे. कशा पध्दतीने आणि काय प्लॅनींगने तिथे हॉकर्स झोन हे घोषित करतात. हे आम्हाला ही आपण सांगावे. त्याच पध्दतीने आयुक्त साहेब, मी आपले मनापासून अभिनंदन करतो आज आपल्या प्रशासनाने एक नवीन मोहीम चालू केलेली आहे, पाणी अडवा आणि नगरसेवकांची जिरवा. आज एवढं पाणी असून सुध्दा आपल्याला पाण्याची एवढी समस्या जाणवत आहे. १०० टक्के पाणी असून सुध्दा, पाणी सोडलेले असताना सुध्दा पाणी येत नाही. ज्या भागामध्ये पाणी येतय ते सुध्दा दुषीत पाणी येतेय. आज आपण मे महिन्यामध्ये एक पॉलिसी केली होती पाण्याबद्दल त्याचे इम्लीपेंट आपण केलेले नाही. त्याच्याबद्दल तुम्ही आम्हाला खुलासा दयावा. त्याच पध्दतीने आयुक्त साहेब आपल्याला सांगायची आहे की आज आपण एकाच अधिका-याकडे एवढी खाती दिली की त्यांना कुठल्याच खात्यामध्ये काय चाललय हे ही सांगता येत नाही. काल शिक्षकदिन झाला त्या शिक्षकदिनाची माहिती आष्टीकर साहेबांनाही माहिती नव्हती मग अशी खाती त्यांच्याकडे कशाला ठेवता. आज शहराचे महापौर त्याठिकाणी जातात व त्याची कल्पना महापालिकेतील कुठल्याही

जबाबदार अधिका-याला नसते. काल शिक्षक दिन हा महत्वाचा विषय होता. त्या शिक्षक दिनाला आपले एकही अधिकारी तिथे उपस्थित नव्हते. म्हणजे शिक्षकदिनाचे महत्व आपल्याला काही नाही का. स्टँडींगला तुम्ही एवढ महत्व देता का. तेव्हा खुलासा असा केला स्टँडींगला आम्हाला जायचं म्हणून. स्टँडीग होती म्हणून आम्ही गेलो नाही, हे सांगणं महत्वाच होतं का.

**मा. महापौर -** तुषार विषयांतर करु नका. विषयास धरुन बोला.

**मा. तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज आपण याचा पाठपुरावा केला पाहिजे. शिक्षक दिनाचे आपल्याला महत्व नसेल तर काही उपयोग नाही. आपण एखादया अधिका-यांना एवढी खाती देता ती खाती कमी केली पाहिजेत. एकाला दोन खाती देतात तर एकाला पन्नास खाती देतात. त्याच काय नियोजन आपल्याजवळ. त्याच पध्दतीने आज स्थापत्य विषयक कामे आमचे इथं एकही काम होत नाहीत. आज आमचे कनिष्ठ अभियंता सुधीर मोरे हे आमच्याकडे न येता फक्त ठेकेदाराल घेवून बसतात. त्यांचे नियोजन आपण काय केलेलं आहे. म्हणजे नगरसेवकांना किंमतच दयायची नाही. प्रशासन फक्त तुम्हीच चालववयाचे आहे का. आज आयुक्त साहेब आपले काम चांगले आहे. आम्हालाही इच्छा आहे की आपण मोदी साहेबांच्या ऑफिसमध्ये सचिव म्हणून जावे. पण अशा पध्दतीने कामे होत असतील आणि आपल्या शहराला गालबोट लागत असेल आम्ही कधीच ते सहन नाही करणार. आम्हाला आमच्या शहराबद्दल आत्मीयता आहे. आपण येताल दोन वर्षात निघुन जाताल पण आज आमचे आयुष्य इथेच जाणार आहे. तुम्ही मला सांगा आपण काय प्रपोजल आणलेले आहे. आज मला इथं खंत वाटते की हिथे पालिकेमध्ये निवडून आलो म्हणून. आज आपल्या शहराचे बद्दल आपले काय नियोजन आहे. आज तुम्ही पाणी देत नाहीत, घंटा गाडी देत नाहीत. स्वच्छतेचा विषय नाही. स्वाईन फ्ल्यूमध्ये आपल्याकडे 65 लोक दगावली तुम्ही सांगताय परंतु तो आकडा त्यापेक्षाही जास्त आहे. आज आपल्याला सांगू इच्छितो की आपल्याला पहील्या दहामध्ये यायच असेल तर आपण त्याच्यामध्ये नियोजन केले पाहिजे. आज आयुक्त साहेब आपण स्वत:हून लक्ष दिले पाहिजे एवढी आपल्याला विनंती आहे. व आमच्या शहराबद्दल आपण चांगल्या योजना आणताल अशी अपेक्षा ठेवतो व माझे दोन शब्द संपवितो.

**मा.हर्षल ढोरे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. आमचे सहकारी मित्र तुषार हिंगे यांनी जो हॉकर्सचा विषय घेतला तो खरोखरच पिंपरी चिंचवड शहरामध्ये खूप अडचणींचा विषय ठरलेला आहे. त्यासंदर्भात आपल्याला चिंचवड मतदार संघाचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी वेळोवेळी आयुक्त साहेब आपल्याशी चर्चा केलेली आहे. आमच्या प्रभाग क्रमांक ३२ मध्ये सांगवी, नवी सांगवीचा परिसर येतो. त्याच्यामध्ये मी असेल माई ढोरे असतील संतोष कांबळे असतील, शारदा सोनवणे असतील, आम्ही सर्वांनी मिळून आमचा जो मेन रस्ता आहे म्हणजे ढोरेनगर पासून शितोळे नगरपर्यंत. हया मेन रस्त्याच्या ज्या हातगाडया आहेत, फळवाल्यांच्या ज्या गाडया आहेत. त्या सर्वांना एकत्रित बोलावून आम्ही चारही नगरसेवकांनी त्यांची मिटींग घेऊन त्यांना ढोरे नगरचा रस्ता आणि दुसरा एक असे दोन रस्ते त्यांना हॉकर्स झोन म्हणून दिले. त्याच्यानंतर परिस्थिती अशी झाली की मेनरोड रस्ता हा पंधरा ते वीस दिवस चांगला तसाच राहिला. पण त्याच्यानंतर परिस्थिती अशी झाली की मेन रस्त्यावर काही बाहेरचे लोक म्हणजे ते सांगवीत रहात नाहीत. ती लोक इथं गाडया लावून व्यापार करायला लागले. ही खरोखर खेदाची गोष्ट आहे. आमच्याच भागातील काही लोक तिथे गाडया उभ्या करतात, त्याच भाडे घेतात. आम्ही चारही नगरसेवक या संदर्भात वेळोवेळी इंगळे साहेबांशी बोलतो. पण इंगळे साहेब त्याच्यावर कुठल्याही प्रकारची एक्शन घेत नाहीत. आम्ही दर वेळेस इंगळे साहेबांना फोन केला. ते म्हणतात उदया होणार आहे, परवा होणार आहे. ते पोलीस बंदोबस्ताची कारणे सांगतात. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप साहेबांनी ही त्यांच्याशी चर्चा केली. पण जर का त्यांच्याकडे पुरेशी यंत्रणा नसेल तर आयुक्त साहेब कसे काय होणार आपल्या शहरांच. आज आमचा फक्त प्रभाग ३२ सांभाळता येत नसेलतर संपुर्ण शहराचे अतिक्रमण कसे पाहणार. हे रस्ते आम्ही सर्व चारही नगरसेवकांनी तेथे थांबून मोकळे केल्यानंतर आता परत तेथे वेगळी स्थिती निर्माण झाली. म्हणजे आम्ही आमच्या स्थानीक भाजीवाल्यांना चांगल्या मार्गाला लावून तिथे रस्ता करुन दिला आणि नंतर तिथे बाहेरची लोक येऊन व्यापार करायला लागली. आताच सचीन चिखले असतील, सुजाताताई असतील, तुषार कामठे असतील, संदीपभाऊ वाघेरे असतील या सगळयांनी आपल्या व्यथा मांडल्या ही सत्य परिस्थिती आहे. खरतर याच्याबद्दल नक्कीच तुम्ही चांगला प्लॅन आखा आणि त्याच्या बद्दल लवकरात लवकर एक्शन घ्या एवढेच सांगतो आणि थांबतो.

**मा.मिनल यादव -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. माझ्या प्रभागामध्ये चिंचवड स्टेशनला अतिक्रमण विभागाकडे गेले दोन महिने कारवाई केलेली आहे. एक पाऊल तुम्ही स्मार्टसिटीकडे नेताय. आयुक्त साहेब, पण चिंचवड स्टेशनला तुम्ही दररोज ये-जा करताय .त्या चौकामध्ये किती अनधिकृत टप-या आहेत. त्याच्यावर कुठलीही कारवाई होत नाही. मी अतिक्रमण विभागाला सांगितले की तेवढयापुरते उदया येतो ताई. हा उदया त्यांचा कधी उजडतोय हे अजुनपर्यंत आम्हाला कळलेले नाही. म्हणजे अतिक्रमण विभागाला फक्त बसून पैसे खायला ठेवले आहेत काय हेच मला कळलेले नाही. इव्हन सगळयांच अधिका-यांची कामे तशी झालेली आहेत रोजचे येऊन पाटया टाकायच्या आणि आम्ही तर बडबड करतोच. आम्हांला काही किमंतच नाही. रोजचे फोन करायचे. प्रत्येक गोष्टीसाठी फोन करायचा. दर दोन दिवसांनी पाण्यासाठी फोन करा. कच-यासाठी फोन करा. एकीकडे आयुक्त साहेब म्हणतात की हाय अलर्ट जारी केला आहे स्वाईन फलयूसाठी आणि अशी प्रेसनोटपण काढली आहे की आपले सरकारी दवाखाने आहेत. तिथे स्वाईन फ्लूयच्या लशी उपलब्ध आहेत. इंजेक्शनस उपलब्ध आहे. जर उपलब्ध नसतील तर तुम्ही कशाला खोटया प्रेस नोट  देता तिथे लोक जाऊन चक्रा घालतात. मग तुम्ही असं सांगितलं की औषधे उपलब्ध आहेत. आयुक्त साहेब, एकाही दवाखान्यामध्ये लस उपलब्ध नाही. म्हणजे काय करतात हे. म्हणजे काय करते तुमचे प्रशासन. एकीकडे रुग्णांची संख्या वाढत चालली आहे. त्याच्या कडे दुर्लक्ष करतात आणि फक्त प्रेस नोट देण्याचे काम चालल आहे. त्याच्यावर काय एक्शन घेतली जातेय. लस का पुरविली जात नाही. फक्त तुम्ही लोकांना अस सांगताय की तुम्ही प्रायव्हेटमधून इंजेक्शन घ्या. आमच्या करदात्याकडून कर घेता, हे घेता ते घेता. मग हे लस पुरविण्याचे काम कोणाचे आहे. प्रशासन काय झोपा काढते काय. दररोज त्यांना हया गोष्टी सांगायच्या. आता माझ्या प्रभागामध्ये दोन डंपींग झोन केलेले आहेत हे तुम्ही कोणाला विचरुन केलेत. बाकीच्या प्रभागामध्ये जागा नाहीय का. मग तीच जागा तुम्ही जर हॉकर्स झोनसाठी केली तर जे गरजू व्यक्ती आहेत त्यांना रोजगार मिळू शकतो. ते पैसे भरायला तयार आहेत ना, तुम्ही हॉकर्स झोन करुन का देत नाहीत. एकीकडे आपल्याकडे रोजगाराची समस्या इतकी मोठी असताना तुम्ही ज्या अनधिकृत टप-या केल्या जातात त्याच्यावर कारवाई कराना. हाप्ते वसुल करण्यातून तुम्हाला वेळ मिळत नाही. त्याच्यामुळे आयुक्त साहेबांना मी विनंती करते की तुम्ही माझ्या प्रभागामध्ये या. किती अनधिकृत टप-या आहेत

आणि किती अतिक्रमणाने कारवाई केलेली आहे. अतिक्रमणवाल्यांची उत्तरे इतकी असतात की त्यांना सवय झाली आहे. रोजच्या बोलण्यानी त्यांना काही फरक पडत नाही. ताई उदया येतो, उदया काढतो. एखादी टपरी काढणार आणि परत आठ दिवसांनी तिथेच असणार म्हणजे काय आम्हाला फक्त टाईमपास काम करुन विरंगुळा करण्यासाठी ती टपरी काढली का.

**मा.झामाबाई बारणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. महापौर साहेब, आपले सर्वप्रथम अभिनंदन. हॉकर्स झोनचा हा विषय खरोखरच काही लोकांच्या रोजीरोटीचा आहे. परंतु काही आता सांगितल की काही लोक भाईगिरी करतात आणि त्या लोकांच्या कडून भाडे घेतात. काही ठिकाणी ही वस्तुस्थिती खरी आहे. परंतु डांगे चौकामध्ये आपल्या सर्वांना माहिती असेल थेरगाव फाटा ते गणेश नगर आपण त्याठिकाणी जाता-येता रविवारचा तर कम्प्लेट एक तास डांगे चौक क्रॉस करायला लागतो आपल्याला. मग तुम्ही लग्नसमारंभाच्या कार्यक्रमाला जा, कुठल्याही कार्यक्रमाला जा. परंतु डांगे चौकामध्ये फक्त एकेरी लाईन चालू असते. म्हणजे हातगाडीवाले वेगळे, पथारीवाले वेगळे. पुर्ण रस्ता इथून तीथून त्यांचा जाम झालेला असतो. पण ही वस्तुस्थिती खरी आहे त्यांचीही रोजीरोटी आहे. त्यांचेही पोटापाण्याचा प्रश्न आहे त्यांना पण कुठेतरी स्थायीक जागा उपलब्ध झाली पाहिजे. म्हणजे त्यांचा प्रश्न मिटेल. कारण थेरगाव फाटा ते संतोषनगर या रस्त्यावर ज्या पध्दतीने हातगाडया, पथारीवाले थांबायचे तो प्रश्न सुटलेला कारण विनायक गायकवाड यांनी कावेरी नगरच्या बाजूला आता ते हलविण्यात आले आहे. अशाच ठिकाणी कुठेतरी एक स्थायीक जागा डांगे चौकातल्या हातगाडीवाल्यांना, भाजीवाल्यांना, सगळयांनाच तिथे व्यवसाय करण्याकरीता मच्छी असेल अमुक तमुक. परंतु मला एक सांगायचय की आयुक्त साहेब पेट्रोल पंपाच्या अलिकडे जागा आहे ती डेअरी फार्मामधील जागा जर आपण उपलब्ध करुन दिलीतर गोरगरीबांच्या व्यवसायाला चालना मिळेल. आणि खरोखर त्या लोकांचे आर्शीवाद आपल्याला मिळतील असे मी याठिकाणी सांगू इच्छिते. ती जागा आहे परंतु त्या लोकांचा प्रश्न सुटला पाहिजे. अशी मी या ठिकाणी आपल्याला विनंती करते आणि खरोखर डांगे चौक मोकळा झाला पाहिजे. आपल्याला त्या रस्त्याच्या वाहतुकीचा खूप मोठा प्रश्न अवघड आहे. पुलाचे काम सुध्दा लवकर झाले पाहिजे साहेब आणि त्याठिकाणचा वाहतुकीचा प्रश्न सुटेल. अशी मी याठिकाणी अपेक्षा व्यकत करते.

**मा.निता पाडाळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. आयुक्तसाहेब जरा काळेवाडी वॉर्डमध्ये संध्याकाळी राऊंड मारा. काळेवाडीमध्ये एक नवीन भाजीमार्केट तयार झाली आहे आयुक्त साहेब. अक्षरश: तेथून टू व्हीलरवाले सुध्दा जाऊ शकणार नाहीत. अशा पध्दतीने पार्वती इंग्लिश मेडीयम पासून माने शाळेपर्यंत दोन्ही बाजूने हातगाडया असतात. टू व्हीलरवाले सुध्दा जाऊ शकत नाहीत. म्हणजे लोकांची चालण्याची गर्दी म्हणजे जसे पिंपरी कँपमध्ये भाजीमंडई आहे तशीच भाजीमंडई आमच्या काळेवाडीमध्ये तयार झाली आहे आयुक्त साहेब. आणि आपले जे अतिक्रमण मधील अधिकारी आहेत आपण जर त्यांना फोन केला की असा त्रास होतोय. आयुक्त साहेब तिथल्या लोकांना कसं कळत की कारवाई होणार आहे म्हणून. हातगाडीवाले सगळे लोक तेथून गायब होतात हातगाडया घेऊन. नक्कीच याच्यामध्ये आपलाच कोणीतरी माणूस असा असतो की तो तिथे जाऊन सांगतो की पाडाळे मॅडमने सांगितले आहे की तिथे कारवाई घ्या. आणि एक दोन तीन हातगाडया उचलतात. की सकाळी ती लोक येतात आमच्याकडे. मॅडम आमच्या हातगाडी तुम्ही उचलायला सांगितल्यात. आयुक्त साहेब आपले हे जे प्रशासन आहे, अतिक्रमण विभाग आहे त्याच्यावर तुम्ही थोडेसे नियंत्रण ठेवा. की जेणेकरुन त्यांनी तिथे नियमित कारवाई केली पाहिजे. आयुक्त साहेब तुम्ही आता फक्त सांगा की आता सहा ते सात वाजता काळेवाडीमध्ये भारतमाता चौकापासून माने शाळेपर्यंत जाऊन या. इतक्या बेशिस्तपणे दोन्ही बाजूने हातगाडया लागलेल्या असतात तीच परिस्थिती आयुक्त साहेब आपल्या पाचपीर चौकामध्ये सुध्दा आहे. पाचपीर चौकात सुध्दा सगळीकडे हातगाडया लागलेल्या असतात. आमच्या तिथे एक ओपन स्पेस आहे तिथे एक कचरा कुंडी आहे. सगळा भाजीपाल्याचा तो कचरा तिथे आणून टाकतात. अक्षरश: तिथे नागरीकांना डेंगू, मलेरिया, चिकन गुनिया असे आजार झालेत कारण आपण रोडने तेथून जाताना एवढा वास तिथे येत असतो. आपले आरोग्याचे कर्मचारी रोज तिथे सकाळी साफ करीत असतात. परंतु आता थोडया वेळापूर्वी साफ केले की परत थोडया वेळाने तिथे आहे तेवढाच कचरा झालेला असतो. साहेब, भाजीपाल्याच्या, चायनीजच्या गाडया लागलेल्या असतात. ते सुध्दा सगळ राहीलेल मटेरीअल तेथे टाकतात. आयुक्त साहेब, हयाच्यावर आपण काहीतरी अंकुश ठेवला पाहिजे. एमएम चौकामध्ये आपण चांगला रस्ता केला आहे आयुक्त साहेब. पण त्या बीआरटी रोडला जर तुम्ही आले तापकीर चौकापासून काळेवाडीच्या बाजूला. तर तुम्हाला एकही फूटपाथ रिकामा दिसणार नाही. प्रत्येक

फूटपाथवर तुम्हाला दोन्ही बाजूने हातगाडया दिसतील. भाजीवाल्यांच्या टप-या दिसतील. आणि आयुक्त साहेब आता तर तिथे टेम्पो असतात. आयुक्त साहेब, तुम्ही जरा प्रत्येक गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. आता पालांडेताईंनी सांगितले, ढोरे यांनी सांगितले. पण आयुक्त साहेब एवढी बिकट परिस्थिती काळेवाडीत आहे ना. की तुम्हाला पिंपरी कॅम्पासारखे तिथे काळेवाडीत पाहायला मिळेल. तरी आयुक्त साहेब आपण नक्कीच हॉकर्स झोन तयार करावा. आपण हॉकर्ससाठी दोन रोड दिले आहेत परंतु त्याच्यावर अदयापपर्यंत तरी काहीही कार्यवाही झालेली नाही. तरी लवकरात लवकर हे हॉकर्स झोनचे धोरण निश्चित करुन प्रत्येकाला हॉकर्सच्या जागा ठरवून दयाव्यात. हीच मी आपणाला विनंती करते आणि थांबते, धन्यवाद.

**मा.जावेद शेख -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. खरतर महापौर मी प्रथमत: तुषार हिंगेचे अभिनंदन करतो कारण की चांगला विषय आणला आहे. आणि या माध्यमातून काही गरीब लोक असतील किंवा काही हातगाडया, टप-यांचे माफीया असतील. आणि हे करीत असताना सभागृहाच्या ही लक्षात येतेय, अधिकारी वर्गाच्याही लक्षात येतय आणि पत्रकारांच्याही लक्षात येतेय. गरीबीच्या नावावर एक किती मोठा व्यापार याठिकाणी चालला आहे. अनेक नगरसदस्यांनी आपल्या आपल्या भावना व्यक्त केल्या. आमचे केशव घोळवे असतील त्यांनी अत्यंत चांगल्या पध्दतीने सांगितले. आमच्या प्रभागामध्ये त्यांच्याबरोबर काम करीत होतो. प्रभागामध्ये खूप खूप फिरले. केशव घोळवेबद्दल मी सांगतो की आतापर्यंत प्रभागांमध्ये जेवढे प्रभाग अध्यक्ष झाले असतील. त्यामध्ये सगळयात जास्त प्रभागामध्ये फिरणारा अध्यक्ष कोण असेल तर आमचे केशव घोळवे त्या प्रभागामध्ये खूप फिरले सगळीकडे आणि त्यांनी सगळी माहिती घेतली. त्याचे प्लॅन देखील भरपूर चांगले होते. त्यांनी विषय ही भरपूर आणले होते. परंतु काही विषय धोरणामध्ये बसतात नाही बसतात. परंतु त्यांना भाजपाने पाच वर्षे अध्यक्षपद प्रभागातले देणे गरजेचे होते. निश्चित त्यांची काहीतरी स्वप्ने पुर्ण झाली असती. चांगले प्लॅन्स त्यांनी आणले होते असो. टपरीचा आणि हातगाडीचा आपला विषय आहे तरी शहरामध्ये क्वचितच कुठली तरी जागा अशी असेल की त्याठिकाणी टपरीचा प्रॉब्लेम नाही. बाकी अनेक ठिकाणी प्रॉब्लेम आहेच. आणि एक असे ब्रॅडेंड घ्या एक असा वडापाववाला आहे. किंवा एखादा डोसेवाला आहे, किंवा एखादा आईसक्रीम वाला आहे. भेळवाले असतील, हयांच्या गाडया भाडयाने

देऊन प्रत्येक ठिकाणी हयांनी लावलेल्या आहेत. आणि आयुक्त साहेब हयाच्यामध्ये मी फक्त प्रशासनाला दोष देणार नाही. आमचेही काही सहकारी त्यांना सामील आहेत. मी स्पष्ट बोलतोय याच्यामध्ये मी कोणाचेही नाव घेत नाही. जे असतील हयाच्यामध्ये त्यांना राग येईल याचा. सगळयांना राग येणार नाही. पण आमचे सदस्य देखील याला कारणीभूत आहेत. एखादा आमचा अतिक्रमणचा अधिकारी कारवाई करायला गेला की लगेच फोन येणार हा माझ्या जवळचा माणूस आहे. त्याच्यावर कारवाई करु नको. तो बिचारा आपला गप्प बसतो. आता आमच्या सुजाताताईंनी सांगितले त्यांनी खूप खंत व्यक्त केली. म्हणजे आशा गोष्टी ब-याच ठिकाणी होतात. आयुक्त साहेब खरच होतात. सुजाताताईचे काही चुकत नाही. त्यांनी त्यांचे अनुभव सांगितले. परंतु मला एक तुम्हाला विनंती करायची आहे. आपण आयुक्त असताना तुमचा जो अधिकारी आहे त्याला जे बळ पाहिजे ते आयुक्त साहेब तुमच्याकडून त्यांना भेटले पाहिजे. मग तो स्थापत्य मधला असू दे, अतिक्रमण मधला असू दे किंवा कुठल्याही खात्यामधला असूदे. हे पहा तुमच्या अगोदर श्रीकर परदेशीसाहेब येऊन गेले. आता तुषार कामठेनी पण चांगली इच्छा व्यक्त केली की आयुक्तांचे काम फार चांगले आहे त्यांनी पीएम ऑफीसला सचिव म्हणून जावे. परंतु त्या कमिशनरांची एक गोष्ट होती की त्यांनी कधीही आपल्या स्टाफला ताकद कमी पडू दिली नाही. ते जेव्हा जॉईन झाले होते तेव्हा त्यांनी स्टाफची मिटींग घेतली होती. त्यांनी मिटींगमध्ये फक्त दोनच वाक्य बोलले जे काम व्हायला पाहिजे श्रीकर परदेशीचे शब्द सांगतोय त्यांनी त्यांच्या अधिका-यामध्ये मिटींगमध्ये एकच सांगितले की जे काम व्हायला पाहिजे ते व्हायलाच पाहिजे. जे काम कायदयामध्ये बसत नाही किंवा होऊ शकत नाही त्यासाठी वेळ घालवायचा नाही. गुड लक, बेस्ट ऑफ लक. कस आहे माहिती आहे का तुम्हाला जर स्मार्ट सिटी करायचीच आहे तुम्हाला जर आयुक्त साहेब या शहरावर छाप पाडायची आहेतर तुम्हाला तुमच्या स्वभावामध्ये, तुमच्या कारर्कीदीमध्ये बदल करावा लागेल. अत्यंत सुंदर अशी गोष्ट आहे. आता माझ्या प्रभागामध्ये मी प्रमोद कुटे सलग चार पाच दिवस त्यांच्याकडे चक्रा मारतो. त्यामध्ये आयुक्त साहेब असतील, इंगळे साहेब असतील, निकम साहेब सुध्दा गेले होते. आपला ताफा दोन-दोन तीन-तीन वेळा जाऊन आला आहे. पण कारवाई काही करु शकला नाही. तेथील संपुर्ण जागा ही ओपन स्पेसने आरक्षित. त्याच्यामध्ये माजी एका नगरसेवकाचे घर आहे. साहेब, तो त्याच घर वाचविण्यासाठी विठ्ठल मंदीराजवळ जे पालखी तळ आहे त्याचे त्याने काम थांबवून ठेवले आहे.

आमच्या देहू आळंदी देवस्थानच्या लोकांना भडकून टाकले आहे. की बाबा हे पालखीतळ बारीक करतात. अहो, मुळामध्ये आम्ही जो पालखी तळ आहे तो प्लेन करुन इतका मोठा करणार की जेव्हा याच्यापुढे तुकाराम महाराजांची पालखी येईल. आता जितके लोक तेथे येतात त्याच्या ऐवजी तीनपट लोक सामील होतील. इतक मोठ आम्ही पालखी तळ करतोय. परंतु एक माणसामुळे एक माजी नगरसेवकामुळे साहेब हे कोणाच्या दबावामुळे आहे साहेब. मी काय म्हणतो काही ठिकाणी दबाव ठीक आहे. मान्य आहे आम्हाला. दबाव येतात परंतु त्याची सखोल माहिती घ्या ना. अहो, हा किती गलिच्छपणा आहे की बाबा दोन-दोन तीन-तीन वेळा पोलीस स्टाफ जातोय. तीस-तीस पस्तीस-पस्तीस पोलीस, आपला अतिक्रमण कारवाईचे अधिकारी तिथे क्रेन घेऊन जातात. अहो काम तर होत नाही. म्हणजे जिथे आपली तुकाराम महाराजांची पालखी येते त्या भागातल्या कामासाठी जर तुम्ही विचार करीत असाल तर म्हणजे दबावाखाली काम करीत असाल तर तुम्ही मग या बाकीच्या टप-या बिप-या उचलण्याचे काय अधिकार देताय त्यांना. काय ताकद मिळणार तुमच्या स्टाफला. काय ताकद मिळणार आहे मला सांगा. मला सभागृहाने सांगावे काय ताकद मिळणार आहे. पक्षनेते साहेब आमचा जो प्रभाग क्रमांक १४ मधला पालखी तळाचे जे काम आहे ते काम आपण नाही केले तर आमचे ते मेमोरेलचे काम आणलेय आम्ही. तुकाराम महाराजांच्या जीवनावर आम्ही चित्रफीती करणार आहोत. तिथे आम्ही लावणार आहो ते काम थांबेल. पालखीमार्गाची मुदत संपत आलेली आहे. मग परत त्या ठेकेदाराला आपण ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे मग चुकी कोणाची. याच्यामध्ये चुकी कोणाची. चुकी प्रशासनाची आणि आमची मी फक्त असं नाही म्हणलं की प्रशासनाची चुक आहे. आमचे सदस्यही त्याला कारणीभूत आहेत. जर का प्रशासनाला आमच्या सदस्यांनी पुर्णपणे वाव दिला, पुर्णपणे ताकद दिली तर ते व्यवस्थित काम करणारनां. आयुक्त साहेब हे जे मोठेमोठे प्रकल्प असतील किंवा ठरावीक प्रकल्प असतील त्याच्यामध्ये वैयक्तिक जबाबदारी आहे तुम्ही मॅप बघा. नगररचनाचे अधिकारी माने साहेब असतील त्यांनी मॅप दाखवावा. आख्ख सभागृह हासेल हे काम कस काय करुन ठेवलय. पालखी मार्गाच काम सुरु होवून जवळ जवळ दिड वर्षे होत आलेत वारंवार सांगून देखील ते काम झालेल नाही. आयुक्त साहेब माझी तुम्हांला अग्रहाची विनंती असेल की अतिक्रमणचा जो स्टाफ आहे तो डबल शिफ्टमध्ये करा. काय होत आपले अधिकारी पाच ते साडेपाचला सुट्टी झाली की जातात. त्याच्यानंतर एक नवीन ताफा तयार होतो

हातगाडयांचा आणि स्टॉलवाल्यांचा. तुम्ही भेळ चौकामध्ये व्यापारी संकुल आहे त्या लाईनला बघा सगळया लाईनशीर टप-या लागलेल्या आहेत. दोसा, आईस्क्रिम, भेळ, पाणीपुरीच्या. त्याठिकाणी तरुण, तरुणी, लोक येतातना ते अगदी रस्त्यावरच गाडया लावतात. व तो सेंट्रल रस्ता आमचा आहे. टिळक चौकातून आपण डायरेक्ट रेल्वेस्टेशनपर्यंत जातो. तसाच अपल्या आकुर्डीचा रस्ता आहे. त्या रस्त्यावर सुध्दा अनधिकृत स्टॉल्स दिसतील. नो परमीशन, नो वर्कींग काही नाही. त्याना कुणाची परमीशन लागत नाही काही नाही. बीनधास्त पऱ्याचे स्टॉल्स ठोकले आहेत. आता कारवाई झाली परत आठ दिवसाने जैसे थे. स्टाफ बद्दल आम्ही काय बोलायच. अनेकवेळा स्टाफ असेलतर त्यांच्याकडे पोलीस नसतात. मग त्या इंगळे साहेबांना काय बोलणार, त्या तिकोणे साहेबांना काय बोलणार, त्यांच्या हाताखालचे जे कोणी काम करणारे असतील त्यांना तरी काय बोलणार. त्यांना जर व्यवस्थितपणे तुम्ही स्टाफ दिलातर चांगले होईल. आपल शहर खुप मोठ आहे. इतक मोठ शहर आहे की या शहराच्या दृष्टिकोनातून तुम्हांला योग्य रीतीने स्टाफच नियोजन केले पाहीजे. प्रत्येक प्रभागाला वेगवेगळा स्टाफ देवून त्या पध्दतीने काम केल पाहीजे. अनेकवेळा ईमर्जन्सी असेल की आपला स्टाफ तीकडे पाठवतो. याबद्दल देखील विचार व्हावा. जसे आता सचिन चिखलेनी सांगीतल की बरेच भाई लोक झालेले आहेत त्याच्यावरती खरच लक्ष दया. ही खुप गांभीर्याची गोष्ट आहे. जेवढे स्टॉल लावलेले आहेतना त्यांचे राशनकार्ड चेक करा. एका एका वडापाववाल्यांचे बंगले आहेत. आपल घर तेवढ भारी नाही असे त्यांचे बंगले आहेत. वडापावच्या गाडयावर खांबामधुन लाईट घ्यायची की लाईट चालू बील नाही. ही फॅक्ट आहे. आताच हर्षल ढोरेनी सांगीतल की एवढा मोठा रस्ता काही ठिकाणी नो हॉकर्स झोन करुन सुध्दा हातगाडी लावतात. मग आपण कुठेतरी अपयशी पडतो. आयुक्त साहेब, तुम्हांला विनंती करायची आहे की आता सिमाताईना थोडासा राग आला की आयुक्त साहेबांनी माफी का मागीतली, माफी मागायला नव्हती पाहीजे.

**मा.महापौर-** हा हॉकर्सचा विषय आहे.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, सगळया गोष्टी ठेवल्यातर ही वेळ येणार नाही. आम्हांला श्रीकर परदेशीच्या वेळेस एकच वेळ सांगायला लागायच ते स्पष्ट सांगायचे तीन दिवस मला वेळ नाही चौथ्या दिवशी तुझ काम होईल आणि चौथ्या दिवशी काम होणार म्हणजे होणार. माझा वॉर्ड त्यांनी आयडल प्रोजेक्टसाठी निवडला होता. तेथे

राजकारण झाल तो भाग वेगळा आहे. आपल्याला फक्त पब्लिकच कामच करायच आहे. माझी सभागृहामध्ये जी भाषा आहेना तीच भाषा बाहेर आहे. तरी महापौर साहेब, आयुक्त साहेब तुम्हांला दोघांनाही विनंती आहे की, याच्यावरती गांभीर्याने एक स्पेशल मिटींग लावावी. त्यामध्ये वाटलेतर सदस्य घ्या आणि दोन शिफ्टमध्ये अतिक्रमणाची कारवाई करा. सकाळची एक शिफ्ट ठेवा आणि संध्याकाळीही नऊ पर्यंत एक ठेवा जास्त नको. साडे आठ ते नऊपर्यंत शिफ्ट ठेवलीतर ब-यापैकी अतिक्रमणावर कंट्रोल येईल, धन्यवाद.

**मा.घुले नानी उर्फ हिराबाई -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. फुटपाथ हे चालण्यासाठी असतात, गणेशनगर मध्ये पण भाजीवाले बसतात, टप-या आहेत. टू व्हिलर, फोर व्हिलर गाडया पण लागतात. १२ मी. चा रस्ता आहे त्यातून या गाडया येणार जाणार. माझी एवढीच विंनती आहे की तेथे कारवाई करावी.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुषारनी चांगले प्रश्न दिलेले आहेत. हा विषय २००० ला झालेला आहे. विषय सुंदर आलेला आहे आणि कारवाई करायला गोल्डन चान्स आलेला आहे. कारण आम्हीच सांगतो आमच्या रोडला येथे येथे प्रॉब्लेम आहे, या या रोडला अतिक्रमण होतं. आज आपण राजीव गांधी चौक रस्ता संरक्षण खात्याकडून जागा घेवून तो रस्ता रुंदीकरण केलेले आहे. आयुक्त साहेब तुम्ही आवश्य एकदा त्या भागातून जाव. पुर्ण टेम्पोवाले फ्रुट विकायला बसलेले असतात. लोक गाडया उभ्या करुन फ्रुट घेतात. अतीशय धोका त्या रोडला निर्माण झालेला आहे. कोटयावधी रुपये खर्च करुन महापालिकेच्या, शासनाच्या निधीतून त्या रस्त्याचे रुंदीकरण केलेले आहे. जाताना मात्र फ्रेश वाटाव, गाडया चालवता आल्या पाहीजे यासाठी लोकांच्या संरक्षणासाठी त्या रस्त्याचे रुंदीकरण केल आहे. त्याठिकाणी एवढ अतीक्रमण झालेल आहे की मला वाटत आपला अतिक्रमण विभाग आहे का. मला वाटत हा विभाग नाही. प्रत्येक नगरसेवक जीव तोडून सांगतो की माझ्या वॉर्डामध्ये अशा अशा भागामध्ये टप-या गाडयावाले उभे राहतात. मग एवढ अतिक्रमण कसं काय. मला वाटते की तो भाजी विक्रेता असतो तो त्या वॉर्डामधील स्थायीक आहे का. तो पाच वर्षापासून त्या भागातला मतदार आहे का. असा काही तरी बेस लावा आणि माणुसकीखातर त्याला एका बाजूला दया, टपरी मार्केट करता करता दहा वर्षे उलटून गेले आहेत. तरी तो विषय फक्त कागदावरच राहतो. आज आपण स्मार्ट सिटी कडे

चाललोत. अजेंडयावर स्मार्ट सिटीचा विषय सुध्दा आहे. मग येथे कोटयावधी रुपये खर्च करुन लोकांची घर पाडून आपण रस्तारुंदीकरण करत असतो. जेथे जेथे रस्ता रुंद करता येईल त्या त्या भागातील रस्ता रुंद करतो हे कशाकरिता करतो की त्या भागातील वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून करतो. ज्येष्ठ नागरीकांना शाळेतील मुलांना त्या रस्त्यावरती व्यवस्थित वावरता आलं पाहीजे. आपण रस्ता रुंद करतो आणि त्याठिकाणी फ्रुटवाले येतात  कुठला खडकीचा माणुस येतो, कुठला औंध वरुन येतो असे विक्रेते येतात आणि बीनधास्तपणे रस्ता आडवून त्याठिकाणी गाडी उभी करुन विक्री करत असतात. जावेद शेख यांनी सांगीतल की जो वडापाव विकतो तो बंगल्यावाला आहे. असो जावेद त्याला बिझनेस करता आला, आपल्याला फक्त माईकमध्ये येथे सभागृहात बोलता येतें. या गोष्टी सभागृहामध्ये सांगाव्यात इतका गहाळ कारभार महापालिकेचा आहे का आयुक्त साहेब, नाही. योगायोगाने आपण चांगली सिटी करत असताना टपरीवाल्यांची सोय करावी अगदीच त्यांना बेघर न करता स्थानिक रहिवासी जर तो असेलतर त्या भागातील नगरसेवकांना विश्वासात घेवून ज्याठिकाणी वर्दळ कमी असेल, मेन रस्ता नसेल त्याठिकाणी त्याला त्या पध्दतीची जागा दयावी आणि त्या त्या पध्दतीने मेन रस्ता करावा. खरतर माझ्या वॉर्डाबद्दल वैयक्तिक मी बोलते की आमचा जो गावठाण भाग आहे तेथील पुर्ण रस्ता हा रुंदीकरण करुन घेतला आहे. त्यामध्ये आम्हांला आता पर्याय नाही. जेथे पर्याय नाही अशा ठिकाणी भाजीवाल्यांना एका ठिकाणी बाजूला केलेले आहे आणि तो रस्ता पुर्ण रीकामा केला आहे. प्रभागाच्या मिटींगमध्ये आम्ही सूचना करत असतोत की आठवडयातून एकदातरी आमच्याकडे अतीक्रमणाची गाडी ही मेनरोडला फिरली गेली पाहीजे. त्याठिकाणी कुठलीही गाडी येत नाही भाजीवाले त्याठिकाणी बीनधास्त कापड टाकून बसतात. पथारीवाले आपआपला बीझनेस करतात, भाजीवाले भाजी विकतात, पाणीपुरीवाला उभा राहतो. हे काय चालले आहे आयुक्त साहेब.  आपल्याला शहर स्मार्ट करत असताना अगोदर या लोकांना आपल्याला चांगल वळण लावल पाहीजे.  आणि त्या त्या पध्दतीने तेथे काम केलेतर आपला पण सुक्षीतपणा दाखवला जाईल. तो आपण करावा अशीच आम्ही इच्छा बाळगतो. त्याप्रमाणे सूचना दयाव्यात. ज्या ज्या नगरसेवकांनी सुचना केलेल्या आहेत त्यांची गाठ घेवून त्यांना विश्वासात घेवून त्या त्या भागातल अतिक्रमण हे काढण्यात यावं, धन्यवाद.

**मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझे सहकारी तुषार हिंगेनी अत्यंत ज्वलंत प्रश्न जो या शहराला भेडसावतो असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्मा.सदस्य आज जे सभागृहात बोलले त्यावरुन एक लक्षात येते की, प्रशासनाच्या कामकाजाच्या बाबतीत या हातगाडीवाल्यांना किंवा टपरीवाल्यांना अजीबात भिती राहीलेली नाही. त्याच कारण एकच आहे की या हातगाडी, टपरीवाल्यांचे संदर्भात आपण कुठेतरी धोरणात्मक निर्णयच घेतलेला नाही. मी पुर्वी सुध्दा या सभागृहामध्ये नगरसेवक म्हणून काम केलेलं आहे. गेली अनेक वर्षापासून आपण कुठलही धोरण निश्चित न केल्यामुळे शहरामध्ये हा फार मोठा प्रश्न भेडसावतो आहे. मी जास्त वेळ घेवू इच्छित नाही कारण या प्रश्नावरती अनेक लोकांनी भाष्य केलेलं आहे. मा.महापौरांना विनंती आहे की काही काही वेळेला असे होते की अनेकदा हा विषय सभागृहामध्ये चर्चेला येतो, दोन तास, तीन तास आपण या विषयावर चर्चा करतो. परंतु त्याचा निर्णय कधीच होत नाही आणि ते कुठेतरी सभागृहाच्या बैठकीच्या मिनीटसमध्ये येते. तरी माझी विनंती आहे की या विषयावर मा.महापौरांनी आयुक्तांना निर्देश दयावा की किती दिवसात आपण हॉकर्स झोन आणि हॉकर्स पॉलीसी, टपरीधारकांच्या संदर्भात निर्णय सभागृहाच्या समोर आणता येईल हे सांगावे. जेणेकरुन भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून आपल्याला एक महत्वाचा निर्णय या शहराच्या दृष्टिकोनातून आपल्याला घेणे आवश्यक आहे. सर्वसामान्य तरुण पिढीला आपण एक उदरनिर्वाहच साधन निर्माण करत असताना अनेक लोक भाईगीरी करुन किंवा वेगळया पध्दतीने उत्पन्न मिळवत असतीलतर ते थांबवणे गरजेच आहे म्हणून महापौरांना विनंती आहे की हे मा.हायकोर्ट आणि मा.सुप्रिम कोर्टाचे निर्देश आहेत. म्हणजे फुटपाथ हे मोकळे राहीले पाहीजेत असे मा.हायकोर्ट आणि मा.सुप्रिम कोर्टाचे निर्देश आहेत. म्हणुन माझी विनंती आहे आयुक्ताना की हे एक उत्पन्नाच महापालिकेला साधन आहे असा विचार केलातर महापालिकेला चांगले उत्पन्न मिळणार आहे. मा.महापौर आणि पक्षनेत्यांना विनंती आहे की याबाबतीत धोरणात्मक निर्णय किती दिवसात होईल याबाबतीत निर्देश दयावेत.

**मा. ॲड. सचिन भोसले** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर फार चांगल्या विषयावरती चर्चा सुरु आहे. संपुर्ण शहरामध्ये फेरीवाले आणि त्या

संदर्भात ज्या काही अडचणी आहेत त्यातील ब-याचशा गोष्टी आपल्या सर्वांच्या समोर आलेल्या आहेत. मला असं वाटत की संपुर्ण शहराच एकत्रीत चित्र पाहीलतर त्यातून आपल्याला काही सोल्यूशन काढायच असेलतर त्यामध्ये पर्याय काय काढता येईल तर पॉलीसी फ्रेम करता येईल आणि ही पॉलीसी फ्रेम करत असताना आपल्या शहरातील कुठल्याही नागरीकांवरती अन्याय होणार नाही अशा पध्दतीनी ती पॉलीसी फ्रेम झाली पाहीजे, तसे नियम लादले गेले पाहीजेत. यामध्ये पहीला प्रश्न विचारला होता की २०१४ मध्ये जे सर्वेक्षण झाल होतं त्यानुसार जी आकडेवारी समोर आली तर आज रोजी प्रत्यक्षात त्या सर्वेक्षणानुसार किती फेरीवाले त्याठिकाणी आपला व्यावसाय करुन उदरनिर्वाह करतात. मला अस वाटत की चार पाच वर्षानंतर पुन्हा एकदा सर्वेक्षण होवून हे जे काही आपल्यासमोर आकडे दिसतात की ९०२५ फेरीवाले पात्र ठरविण्यात आले परंतु प्रत्यक्षात हे ९०२५ फेरीवाले आहेत ते पात्र जरी असलेतरी ते प्रत्यक्षात तो व्यवसाय करतात का. त्याची स्क्रूटीनी होणे गरजेच आहे. दुसरी गोष्ट आज आपण म्हणतो की बायोमेट्रीक पध्दतीने सर्वेक्षण करण्यात आले पाहीजे ते सुध्दा बरोबर आहे परंतु आपल्या या शहरामध्ये अनेक कष्टकरी नागरीक राहतात. आजपर्यंत आपण नवीन जे काही फेरीवाले असतील किंवा नवीन जे काही हॉकर्सचे लायसेन्स देणार आहोत, परवाने देणार आहोत त्याच्यावरती आता इतक्यात तरी कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली दिसत नाही. तरी लवकरात लवकर आपल्या संपुर्ण शहरामध्ये प्रत्येक प्रभागवाईज, त्या प्रभागाची लोकसंख्या लक्षात घेवून त्या ठिकाणी किती फेरीवाले किंवा हॉकर्स किती गरजेचे आहेत त्याच महापालिकेच्या वतीने सर्वेक्षण झाल पाहीजे आणि त्या ऐरीयामध्ये जेवढे आवश्यक असतील तेवढेच फेरीवाल्यांना किंवा त्याठिकाणी कमी असतीलतर नवीन परवाने देवून त्याना त्याठिकाणी परवानगी दिली पाहीजे. म्हणजे प्रत्येक प्रभागातील लोकसंख्या लक्षात घेवून तीतक्या लोकांना त्याठिकाणी व्यावसाय करण्याची परमीशन दिली पाहीजे. त्या व्यतिरीक्त जर आपल्याला कोणी आढळलेतर त्यांच्यावरती शंभर टक्के कारवाई झाली पाहीजे. परंतु हे पहील करण्यासाठी आपल्या प्रशासनाने एक कमिटी नेमून या पुर्ण शहरामध्ये पुन्हा एकदा सर्वेक्षण करुन या सर्वाची माहिती एकत्रीत करणे फार गरजेच आहे. त्यानंतर त्यामध्ये बायफरकेशन व्हायला पाहीजे. उदा. एखादा प्रभाग घ्या की त्या प्रभागात खुप मोठया प्रमाणात हॉकर्स आहेत, फेरीवाले आहेत त्याठिकाणी आपण रिस्ट्रीक्शन्स लावले पाहीजेत की लोकसंख्या किती आहे आणि गरजेच किती आहे हे धोरणच निश्चित केल

पाहीजे. हे प्रशासनाने ठरवाव की अमुक ऐरीयामध्ये वीस हजार नागरीक आहेत तर वीस हजार नागरीकांसाठी त्या प्रभागामध्ये आपल्याला कुठ अव्हेलबल करुन देता येईल, हॉकर्स झोन डिक्लेअर करता येईल आणि किती हॉकर्स त्याठिकाणी गरजेचे आहेत. हे प्रशासनाने निश्चित करावं. त्याच्यावरती प्रशासनाने एक पॉलीसी फ्रेम करावी. त्यानंतर सर्वाचा विचार घेवून या शहरातल्या कुठल्याही व्यावसाय करणा-या फेरीवाल्यांवरती अन्याय होणार नाही अशा पध्दतीची पॉलीसी फ्रेम करुन तीची शंभर टक्के अंमलबजावणी व्हावी एवढ मला याठिकाणी वाटत, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

**मा.आश्विनी जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्या प्रभागात कुदळवाडी भागामध्ये कुदळवाडी ते मोशी चौक या भागात खुप मोठया प्रमाणात खाजगी वाहनांची पार्कींग वाढलेली आहे. मोठमोठया गाडया तेथे लागतात त्यामुळे खुप मोठी वाहतूक कोंडी होते. मा.महापौर साहेब, आपणही त्याच प्रभागात राहतात. त्यामुळे लवकरात लवकर ते अतिक्रमण हाटवून फुटपाथाचे काम करावेत.

**मा.शत्रूघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुषार हिंगे यांनी चांगाला विषय सभागृहापुढे आणलेला आहे. शहरामध्ये सगळयात जास्त वाहतूकीला अडथळा असेलतर आजचे हॉकर्स. मला वाटत नाही की कुठल्या नगरसेवकांनी हॉकर्सचे समर्थन केलं आहे. कारण प्रत्येकाकडे अडचण खुप आहे. प्रत्येकाच्या प्रभागामध्ये चौकामध्ये असेल कुठल्याही मेन रोडमध्ये असेलतर प्रत्येक ठिकाणी हॉकर्सची समस्या खुप मोठी आहे. आयुक्त साहेब आपण परत ती पॉलीसी ठरवण्यासाठी आपल्या माध्यमातून आपण सर्व क्षेत्रिय कार्यालयामध्ये पाठवलेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे ड प्रभागामध्ये आपण हॉकर्स पॉलीसीचा विषय आणला आहे. पण तो आणताना कुठल्याही सुचना विचारात घेतलेल्या नाहीत. माझ्याकडचा शिवार गार्डन चौकाचा तो पुर्ण रोड या रोडवरती पुर्वी दहा हॉकर्स बसायचे आता त्या रोडवर शंभर हॉकर्स बसतात. १.३ कि.मी. रोडवरती आता शंभर हॉकर्स आहेत. कधीही आम्ही त्याच समर्थन केलेल नाही. तरी तुम्ही लोकांनी कधीच हॉकर्सवर कारवाई केली नाही. एक वर्षापुर्वी आम्ही दोन्ही बाजूला फुटपाथ केले. क्षेत्रिय कार्यालयाच्या मिटींगमध्ये आम्ही वारंवार तक्रार करतो. ब-याच वेळा असे ठरावही केले आहेत. तरी आपण हॉकर्स पॉलीसी ठरवताना आपल्या शहराची जर स्मार्ट सिटीकडे वाटचाल असेलतर आणि

सगळयाना वाटत असेल की आपल शहर सुंदर स्वच्छ आणि क्लिन करायच असेलतर त्या हॉकर्समुळ पुर्ण शहराची वाट लागते. रस्त्यावरती क्लिन कधी होत नाही. मुळातच आपण हॉकर्स धोरण ठरवताना व्यवस्थित ठरवाव. २०१४ च्या सर्वेक्षणाप्रमाणे १०८३० हॉकर्स झाले पाहीजे. भोसरी ते वाकडचा किवळे पर्यंत जर पाहीलेतर २ लाख होतात. तुमचा आकडा आणताना प्रशासन चुकीच्या पध्दतीने आणतं. तुमच्याकडे बांधकाम परवानगी घेतल्यानंतर क्षेत्रीय कार्यालयाला कुठलच काम राहीलेल नाही. प्रभाग अधिका-याला कुठल काम राहीलेल नाही त्याच्या हाता खालच्याना कुठल काम राहीलेल नाही. मला वाटत अतिक्रमण क्षेत्रीय कार्यालयाला पुन्हा दयाव. कारण की आम्ही फोन केला की सांगतात आमच्याकडे बंदोबस्त नाही. आमच्याकडे ट्रक नाही, आमच्याकडे मॅनपॉवर नाही. ज्या शॉपधारकांनी वीस वीस पंचवीस पंचवीस स्क्वे.फुट रुपयानी जर तेथे शॉप घेतल असेलतर त्याच्या समोर हॉकर्स बसलेले असतात. तरी कोणीही हॉकर्सच समर्थन केलेल नाही. जागा ताब्यात घ्यायच काम तुमच आहे नगरसेवकांच नाही. हा महत्वाच विषय आहे शहर जर चांगल करायच असेलतर हॉकर्स झोनवर कार्यवाही करावी, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे- शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुमची आज ही पहीली सभा आणि तुम्ही आज सगळयांना मनसोक्तपणे सभागृहात विचार मांडायला संधी दिली त्याबद्दल तुमचे आभार. सगळयांचा जिव्हाळयाचा प्रश्न म्हणजे हॉकर्स. सगळयाच्याच भावना याठिकाणी मुक्त होण्यास एक संधी या सभागृहाच्या माध्यमातून देण्यात आली परंतु हॉकर्स झोन वरती सन्मा.आयुक्त साहेबांनी, गावडे साहेबांनी २००७ पासून या हॉकर्स झोन वर अभ्यास केलेला आहे. परंतु २००७ ते २०१४ अखेर अनेकवेळा भाजीवाले, फेरीवाले जे काही पथारीवाले आहेत या सगळयांना आम्ही सांगतो की तुम्ही आमच्याकडे या आणि तुमचे सगळे कागदपत्र जमा करा त्याप्रमाणे आपण त्याची माहिती गोळा करतो, सर्वेक्षण करतो त्याचे बायोमेट्रीक पण केलेले आहेत पण पात्र अपात्र सुध्दा आपल्याकडन तयार करण्यात आलेले आहेत. परंतु त्यांना त्याठिकाणी हॉकर्स देण्यात आलेल नाही. मग अस करण्या मागच कारण काय. आपण ज्यावेळेस पिंपरी चिंचवड शहरामध्ये काम करतो आज सुदैवाने आम्ही नगरसेवक म्हणून काम करतो. परंतु नेहमी असं वाटत की नागरीकांना तुम्ही देण्याची आशा दाखवू नका आणि जर तुम्ही आशा दाखविणार असतालतर त्या शंभर टक्के पुर्ण केले पाहीजे. कारण घरकुल योजना वगैरे या सगळया गोष्टी तुम्ही स्वतः हून सांगीतल

की आम्ही तुम्हांला देणार आहोत. म्हणून लोकांमध्ये या अपेक्षा आपल्या बाबतीत निर्माण होतात त्यावेळेस पुढे एक पाऊल टाकताना पुन्हा माघारी जाता त्यावेळेला मात्र निश्चितपणे कुठेतरी चुकीचा संदेश, चुकीचा मॅसेज नागरीकांमध्ये गेल्याशिवाय राहत नाही. आज जवळपास सगळया नगरसेवकांचा एकच सुर आहे की चुकीच हॉकर्स नकोत. अनधिकृत फेरीवाले आहेत ते नकोत. अधिकृत फेरीवाले असतीलतर त्यांना नको म्हणण्याचा अधिकार या सभागृहात कोणालाही नाही आणि कुणाचा तो सुरही नाही. अनेक जण याठिकाणी बोलले किंवा काही जणांना बोलायचे असेलही परंतु वेळे अभावी म्हणा परंतु शहरामध्ये अनधिकृतपणे गाडे लागू नयेत अशीच सगळयांची भावना आहे. मग साहेब, आपल घोड आडतं कुठं. सगळे म्हणतात आमच्या येथील तुम्ही अनधिकृत टप-या काढा की ज्यांच्याकड लायसेन्स आहेत त्यांच्यावरती चुकून सुध्दा कार्यवाही झाली नाही पाहीजे. परंतु जे काही आता बोलताना सांगीतल की औंध मधुन काही भाजीवाले आपल्याकडे येत असतात, खडकीमधुन भाजीवाले येत असतात. का तर आपल्याकडे कार्यवाही चांगल्या पध्दतीने केली जात नाही. मैदान मोकळ आहे येथे कुणी काही बोलत नाही. म्हणजे जे नागरीक आहेत त्यांना त्रस्त होण्याच यांच्या माध्यमातून केल जातं. आयुक्त साहेब, दोन दिवसापुर्वी मी पत्र दिलेलं आहे की आपण शंकरवाडी पर्यंतचा रस्ता, म्हणजे आम्हांला कोणालाही नगरसेवकांना म्हणायच नाही की या लोकांच्या पोटावरती पाय दया. परंतु हेही नक्की आहे की चुकीचे किंवा जे अनधिकृत फेरीवाले आहेत त्यांनी याठिकाणी असू नये. मा.आयुक्त साहेब, आपण याच २००७ ला २०१४ ला सर्वेक्षण केलं परंतु तुम्ही दोन महीन्याचा कालावधी घ्या परंतु त्याच्यामध्ये तुम्हांला ठोस पाऊल उचलण्याची गरज आहे. एखादी चांगली संस्था यठिकाणी बोलावून त्यांच्याकडन आपण हे सर्वेक्षणाच काम करुन घेतल. आमच्याकडे किती आहे हे न म्हणता आताच्या लोकसंख्येला किती पथारीवाले आपल्या शहरासाठी गरजेचे आहेत त्यांचे जे नॉर्म्स आणि कंडीशन्स काय आहेत त्या नॉम्स आणि कंडीशन्स प्रमाणे एकदाच फायनल करा की आपल्या शहराची लोकसंख्या २२ लाख आहे त्यामुळे अमुक अमुक आम्हांला इतक्या हॉकर्सची संख्या लागणार आहे आणि मग त्याठिकाणच असणार सर्वेक्षण दया. येथून मागे चार वर्षे दहा वर्षे फेरीवाले असतील किंवा पथारीवाले असतील त्यांची आपण पाहणी केली पाहीजे. जोपर्यंत आपला आराखडा तयार नसेल त्याठिकाणी आपली ब्ल्यू प्रिन्ट म्हणा किंवा आपल्याकडे कागदावरती काही तयार नसेल तोपर्यंत आपण तेथे कोणत्याही गोष्टीची मागणी करु

नये. तुम्ही तयार ठेवा की आपल्याकडे एवढी लोकसंख्या आहे, एवढे सर्वेक्षण आहे. येथून पुढच्या काळामध्ये आपल्याला एवढी लोक घ्यायची आहेत. तुम्हाला हे चार महीन्यामध्ये कराव लागेल. तुम्ही आज म्हणाल आशाताई पात्र ठरल्या आणि सहा महीन्यानंतर तुम्हांला चालणार नाही. किंवा सहा महीने माझ नाव डिक्लेअर करायला वेळ लावला की सातवा माणुस त्याठिकाणी तयार होइल. असं केलतर मात्र आपल्या हाताला जे आजपर्यंत २००७ ते २०१८ पर्यंत मागील ११ वर्षात या पथारीवाल्यांच्या भावनेशी जो खेळ चालू आहे, सभागृहाच्या माध्यमातून असेल, नगरसेवकाच्या माध्यमातून किंवा प्रशासनाच्या तुमच्या माध्यमातून असेल हे जे चुकीच काम तुम्ही करता त्याला कुठेतरी ठोस पाऊल उचलून काम कराव लागेल. फोर्स मार्शल ते शंकरवाडी याठिकाणी दुकान १०X१५ असेल १०X१० असेल, १०X२० असेल सगळे कार डेकोरेटर्सचे दुकान आहेत, सगळयांच्या कार तेथे येतात. येथून मागे आम्ही तुम्हांला बोललो नाहीत किंवा शहरातील नागरीक सुध्दा बोलले  नाहीत. ते लावतात याच दु:ख नाही परंतु या शहराची अवस्था कशी झालेली आहे, एकतर मेट्रोच काम एका साईडला दुसरीकडे बीआरटीएस चालू आहे तीसऱ्या ठिकाणी सध्या एकेरी वाहतूक चालू आहे माझ्या प्रभागामध्ये. असे असताना सुध्दा त्याठिकाणी बीनधास्त व्यावसाय करायचा. आजपर्यंत आपण आळा घातला नाही त्यामुळे ते इतकी लोक निर्ढावले आहेत की त्याठिकाणी अशा दोन दोन लाईन त्याठिकाणी लावून ठेवतात. मग तेथून जाणारा दुचाकीवाला असेल, चार चाकीवाला असेल त्यांना जो काही त्रास होतो ते आपल्या कामकाजावरती, नोकरीवरती वेळेवर जाऊच शकत नाहीत. परवा शाळेची मुल नेणारी रिक्षा तीथ उलटी झाली आणि एका मुलीला जबर मार लागला सुदैव तुमच आणि आमच सुध्दा त्या मुलीला ॲक्सीडेंट असलातरी फार काही लागल नाही. समजा चुकून जर कुणाला काही लागल आसततर काकाच्या चर्चेत सुध्दा त्याच्यावरती आम्हांला सोल्यूशन काढता आल नसतं. त्याच्या आदि ही घटना घडन्यापुर्वी सुध्दा पत्र दिलं. घटना घडल्यानंतर सुध्दा पत्र दिलं. हा झाला माझ्या प्रभागातील विषय परंतु सगळयाच नगरसेवकांच म्हणण आहे की आमच्या येथील अनधिकृत पथारीवाले जे आहेत ते सगळे काढा. मग तुम्हांला आढव येतं कोण. आपण स्ट्रिक्टली सांगीतल पाहीजे आज काळेवाडीमध्ये, उदया कासारवाडीमध्ये कारवाई करायला गेलो असता नगरसेवकांचा असा असा फोन आला तुम्ही सभागृहामध्ये जाहीर करा. कारण या ज्या चुकीच्या घटना घडतात याच्यामागे आमचा हास्तक्षेप असेलतर त्याठिकाणी तुम्ही

आमचे सुध्दा नाव जाहीर करायला मागे पुढे बघता कामा नये. निश्चितपणे सभागृहामध्ये नाव घ्यावीत. मग ते सभागृहात बोलतात आणि समोरच्याचा जर वेगळा बुरखा असेलतर तो फाडताना तुम्ही मागेपुढे पाहू नका. येथून पुढच्या काळामध्ये आपण हॉकर्स झोनवरती एक चांगला डिसीजन घेवू आणि या सभागृहा पुढे विषय आणताल अशी अपेक्षा याठिकाणी व्यक्त करते आणि थांबते, जयहिन्द जय महाराष्ट्र.

**मा.अभिषेक बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज जो हॉकर्स झोनचा विषय चाललेला आहे. ब क्षेत्रिय कार्यालयामध्ये तेथील अधिका-यांना सांगून आपल्या भागामध्ये जेवढया हातगाडया आहेत त्यांच्यावरती कारवाई करावी असे आम्ही सांगीतल होतं. त्यावेळेला आम्हांला असे उत्तर येत होती की कर्मचा-यांची संख्या कमी आहे त्यामुळे तेवढया पध्दतीने काम होवू शकत नाहीत. त्यामुळे असे सांगीतल होत की रोडला जेवढया अनधिकृत हातगाडया आहेत तेवढयांना नोटीस दया. त्यांनी पाचशे ते सातशे लोकांना दिल्या सुध्दा. आज एका ठिकाणी दहा-दहा हजार, वीस–वीस हजार हातगाडया असतीलतर आपले पाच ते दहा कर्मचारी कशा पध्दतीने तेथे कार्यवाही करणार. एका ठिकाणी कार्यवाही केलीतर परत दुस-या ठिकाणी उभ्या राहतात. आपल्या अधिका-यांनी उचलून आणल्यानंतर आज आपण साडेसहा हजार, बारा हजार, दंड घेवून परत एकदा सोडून देतो. परंतु त्या हातगडया जप्त केल्यातर परत कशाला सोडून दयायच्या हे देखील लक्षात घेतल पाहीजे. आज गणेश उत्सव आलेले आहेत, ज्यावेळेस आम्ही गणपती मंडपासाठी परवानग्या घेतो त्यावेळेस स्थापत्य विभागामध्ये एक पावती फाडावी लागते. दोन ते तीन हजार रक्कम भरावी लागते. आज ज्या हातगाडया आपल्या महापालिकेच्या रस्त्यावर अनधिकृतपणे उभ्या आहेत त्यांच्याकडून आपण किती महसूल गोळा केला हे देखील आपण लक्षात घेतल पाहीजे. पिंपरी चिंचवड मध्ये उत्तम पध्दतीने बीआरटी रोड आहेत, बीआरटी रोडला आपण सायकल ट्रॅक दिले, फुटपाथ दिलेले आहेत. आज फुटपाथ पुर्णपणे गायब झालेले आहेत. त्याठिकाणी पुर्णपणे हातगाडयांचे अतिक्रमण झालेल आहे. आजच हा निर्णय घेतला पाहीजे, आज याची सर्व माहिती घेवून ऍटेटाईम कार्यवाही करायची ठरवलं पाहीजे. एका कोप-यामधुन कारवाई चालू करायची आणि मग परत ती लोक त्याच ठिकाणी येणार अशा पध्दतीने कारवाई नको. एक निर्णय झाला पाहीजे की कारवाई कशी करायची. जोपर्यंत तो निर्णय होत नाही तोपर्यंत कारवाई नको. पहीला निर्णय घ्या. आज बघीतल गेलतर पाच हजार सात हजार गरीब लोक इकडून तीकडून गोळा

करुन हातगाडया विकत घेतात. ते म्हणतात बाकीच्यानी लावली म्हणून मी लावली. आज त्याची रोजीरोटी त्याच्यावर चाललेली आहे आणि आज आपण अचानकपणे ती हातगाडी ओढून घ्यायची. हे जरी चुकीच असलतरी पण आपल्याला ते करणं भाग आहे. आज आपण जर त्यावर निर्णय घेतलातर हजारो लोकांच्या कुटूंबीयाला वेगळी दिशा मिळेल. परंतु उदया याच हातगाडीच्या दहा हजार लोकांच्या कुटूंबीयाशी आपण खेळतो. हे सुध्दा आपण सर्व सभागृहाने लक्षात घेतल पाहीजे. त्यामुळे आताच आयुक्त साहेब एक धोरणात्मक निर्णय घ्यावा आणि संपुर्णपणे प्रत्येक ठिकाणी कशी कारवाई केली जाईल याचा विचार करावा. एवढच सांगतो आणि थांबतो.

**मा. अर्चना बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तापकीरनगर ते थेरगाव गावठाण या रस्त्याला गाडया लागतात. त्याठिकाणी गैरव्यवहार होतो. कॉलेजमध्ये मुली जाता येताना खुप वेगळ असं पाहीला भेटतं. त्याचा वापर वेगळा होतो. त्याच्यावर कारवाई करावी म्हणून आयुक्त साहेबांना पत्र पण दिलेलं होतं. त्याच्यावर काही कारवाई केलेली नाही. फुटपाथवरती पण हातगाडया आणि टप-या लागलेल्या आहेत. त्याच्यावर काही कारवाई झालेली नाही तरी आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, तुम्हांला विनंती आहे की त्याच्यावर काहीतरी कारवाई करावी.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुषार हिंगेनी चांगले प्रश्न मांडले आहेत. खरच ही संपुर्ण शहराची गरज होवून बसली. कुठेतरी त्या गोरगरीबांचा विचार केला पाहीजे अशी एक द्विधा मनस्थिती आहे. आपण एका बाजूला शहराचा विचार करतो. प्रचंड प्रमाणात डेव्हलपमेंट होते ते सुध्दा नागरीक हॉकर्सचा धंदा करतात, स्वतःच पोट भरतात त्यांचा पण विचार एका बाजुला करावा लागेल. २०१४ मध्ये प्रश्न विचारले होते, २०१४ मध्ये सर्वेक्षण झाले त्या सर्वेक्षणानुसार जागा ८३० म्हणजे आज जर शहराचे हॉकर्स पाहीलेतर त्याची प्रचंड संख्या आहे. अक्षरशः असा शहरातला कुठला रस्ता नाही की ज्या रस्त्यावर हॉकर्स नाहीत. पण आपल्याला या सभागृहात तोही एक विचार करावा लागेल की ते देखील या शहराचे नागरीक आहेत ते देखील या शहरात राहतात. आज एका बाजुला आपणच त्यांना सांगतो की तुम्ही काहीतरी धंदे करा. कारण की रोजगाराची समस्या देखील आहे, एका बाजूला इन्डस्ट्रीज शहरातून चालल्या आहेत. एका बाजूला उदयोगधंदयाची परिस्थिती अतीशय वाईट आहे आणि दुस-या बाजूला ही हॉकर्स पॉलीसी. तरी कुठतरी साहेब, आपल्या सर्वांना हे

हॉकर्स करताना या सर्व घटकांचा विचार करावा लागेल. आज अपात्र १३७४ आहेत. म्हणजे १३७४ लोकांना आपण अपात्र केल, हे का केलं. आपण पॉलीसी ही किती साली आणली. स्ट्रिट व्हेन्डर आहे २०१४ चा त्याच्या अगोदर देखील केंद्रसरकारने २००९ ला केलेलं आहे. पण आज शहराची अवस्था फक्त आपल्यामुळ झालेली आहे. या प्रशासनामुळे झाली आहे. २४६ जागा तुम्ही २०१४ ला आयडेन्टीफाय केलेल्या होत्या. त्याच्यावर अंमलबजावणी झालेली नाही. हे जर हॉकर्स झोन झाले असतेतर आज शहराची ही अवस्था झाली नसती. एका बाजूला स्मार्ट सिटी, एका बाजुला कोटयावधीच टेंडर दुस-या बाजूला हॉकर्स. म्हणजे कुठेतरी प्रचंड मोठया प्रमाणात विरोधाभास आहे याला कारणीभूत कोण आहे. या शहराच्या एका नगरसेवकाची संस्था होती. त्यांनी बायोमेट्रीक केली, आपल्याला त्यात जायच नाही कोणीची होती, काय होती, संस्थेच काय नाव होतं. पण ते करत असताना त्यांनी २००/- रु. घेतले. हे २०० रुपये घेतले असताना त्यांनी कमीत कमी तीन ते चार हजार लोकांना ओळखपत्रच दिलं नाही. ते लोक आजही प्रभाग समितीमध्ये फे-या घालतात. त्यांच्याकडे २००/- रु. दिलेली ती पोहच आहे, त्यांच काय करणार. म्हणजे आपल्याला या सगळया बाबी विचारात घ्याव्या लागतील. आज बेरोजगार, अपंग, उच्चशिक्षीत पॉलीसी करत असताना उच्च शिक्षीत लोकांनाही विचारात घ्याव लागेल. का तर त्यांच्यापुढेही रोजगारांचे मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. पुणे महानगरपालिकेच मागच्या तीन चार वर्षाच सांगतो. आम्ही कॉलेजला असताना ज्या टप-या होत्या ज्या आम्ही लहानपणापासून बघतो त्या सुध्दा आज नाहीत. त्याची कुठेही पेपरला बातमी नाही, कुठेही काही अक्षरशः प्रसिध्दी नाही. पण आज पुणे शहरात तुम्हांला एकही टपरी दिसून येत नाही. अक्षरशः कुणाल कुमारांच सर्वानी अभिनंदन दहा वेळा केलं. कारण की त्यांनी न्यायही दिला आणि शहराच विद्रूपीकरणही होऊ दिल नाही. आपण गाडयावाल्यांचा विचार करतो वॉकींगवाल्यांचा विचार कोणी करायचा. आपण स्ट्रिट डेव्हलपमेंट करायची हे करत असताना या हॉकर्सचे देखील आयडेन्टीफाय करुन तुम्हांला परत बायोमेट्रीक घ्यावी लागेल. बायोमेट्रीक म्हणजे काय, मोबाईल घेवून ते जागेवर आले त्या माणसाच व्हेरीफाय केलं त्याचे आधार चेक केले, आयडेन्टीफिकेशन चेक केलं. दहा हजार लोक आहेत त्यांच तुम्ही परत व्यवस्थित सर्वेक्षण करा. त्यांनाही एका बाजूला न्याय दया. उदया आमच्या प्रभागात हॉकर्स झोन निश्चितीकरणाचा ठराव आहे. आमच्या येथे जो रोड डिव्हायडर आहे तो १८ मी.च आहे म्हणजे तुम्ही हॉकर्स केल्यानंतर त्याच ड्रॉईंग

होणार, परत लोक म्हणणार यांना इथ पहील्यांदा करा. आज ज्यादिवशी आपली लोक कारवाई करायला जातात मग तीथ नगरसेवकांच संगमनमत म्हणायच का अधिका-यांच म्हणायचं. ज्या दिवशी कारवाईला जाणार त्या दिवशी त्या गाडया तीथं नसतात. का नसतात, कुठतरी आपल्या अधिका-यांच देखील हे संगनमताने होते. माफीया माफीया शंभर टक्के आहे. आमच्या परिसरात १०० रु.२०० रु. राजरोषपणे हातगाडीवाल्याकडून घेतले जातात. मी मागेही तुम्हाला सांगीतल होत, कोण घेत काय केल तुम्ही त्याच्यावर. का आपण पोलीसाना कळवल नाही. दुस-या बाजुला या हॉकर्समधुन गुन्हेगारीकरण वाढते. हे होत असताना त्या हॉकर्सना न्याय देण्याच कामपण आपलं आहे. जर आपण हे २४६ आयडेन्टीफिकेशन केलेले हॉकर्स झोन जर डेव्हलप केले असतेतर आज शहरात ही अवस्था झाली नसती. तुम्ही डांगे चौकात जा, दत्तवाडीमध्ये या काय अवस्था आहे पहा. आम्हांला अपेक्षीत आहे तुम्ही त्याच्यावर नोटींग ठेवून संबंधीत अधिका-यांवर कारवाई झाली पाहीजे. पण हे करत असताना त्या हॉकर्सचा देखील विचार करावा लागेल. चार हजार अपात्र का राहीले, चार हजार पेन्डीग का राहीले. १३०० लोक अपात्र का राहीले, दहा हजार लोकांच पुर्ण का झाल नाही हे सर्व क्लेरीफिकेशन करा. हे करत असताना अपंग असतील, बेरोजगार असतील आणि उच्च शिक्षीत देखील असतील त्यांचा देखील अंतर्भाव कशा पध्दतीने यामध्ये करता येईल परत बायफरकेट करता येईल नाही येईल आणि हि केंद्राची पॉलीसी २००९ ला आली आणि ती २०१४ लाही आली. ती इम्प्लीमेंट झाली असतीतर आज ही परिस्थिती आली नसती. भविष्यात आज जरी त्यात व्यवस्थित चेंजेस होवून जर त्यात लक्ष घातलतरी निश्चितच शहराचे एका बाजूला झालेले बकालीकरण थांबेल. दुस-या बाजुला त्या लोकांचा रोजगाराचाही प्रश्न मिटेल आणि तीस-या बाजूला ही सिटी स्मार्ट सिटीच्या बाजूला जाईल त्याच देखील नावलौकीक होईल. मी तुम्हांला पुन्हा एकदा सांगेल की तुम्ही बायोमेट्रीक सर्व्हे परत करता येईल का नाही ते पहाव. त्याच्यात अंतर्भाव कशाप्रकारे करता येईल आणि तो टपरीवाला जर तेथून गेलातर आणि त्याच्या फॅक्टरीतला माणूस जर त्याच्यावर असेलतर त्या संदर्भात काही करता येईल अशा विवीध गोष्टींचा त्यात अंतर्भाव करावा. एक्सपर्ट काही असतीलतर त्यांना बोलावून घ्याव. आणि प्रभागाप्रमाणे दोन हॉकर्समधले किती अंतर असाव, किती मीटर रोडवर असाव, आजही आम्ही ताथवडे बाजार लावतो तर काही लोक भाजी घेणारे म्हणतात की बरं झाल आठवडयातून एकदा लावतात आणि काही लोकांच्या तक्रारी पण येतात

की याच्यामुळे आम्हांला ट्रॅफिकला अडचण होते. जाता येता आम्हांला टॉन्टींग केलं जातं. तरी आपण यात लक्ष घालाव. ज्यादिवशी कारवाई होईल त्या दिवशी हातगाडया नसतात. परंतु हातगाडीवाल्यांना दोष न देता पहील्यांदा हॉकर्स झोनवाल्याना त्याठिकाणी शिफ्ट करावं त्यानंतर अंमलबजावणी अतीशय कडक करावी. त्याच्या अगोदर त्यांना शिफ्ट करावं. त्याच्यावर धोरण करा. परत बायोमेट्रीक करता आलतर करा. अपात्र केलेले आहेत त्यांचाही विचार करा. ज्यांना न्याय देवू शकलो नाहीत त्यांना न्याय देता येईल का ते पहा आणि अशा वंचित घटकाना समाविष्ट करता आलतर त्यांना देखील कराव असं मी या ठिकाणी सभागृहाला सुचित करतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुषार हिंगे यांच मी मनापासून अभिनंदन करेल. त्यांनी अत्यंत चांगला प्रश्न प्रश्नोत्तरच्या माध्यमातून सभागृहात मांडला. साधकबाधक त्यावर चर्चा झाली त्याबद्दल त्यांच अभिनंदन. त्याच्याही पेक्षा पुढ जावुन सांगतो की महापौर आपल अभिनंदन. आता पावणेपाच वाजेलेले आहेत आणि बराचसा वेळ आपण चर्चा करायला सर्वाना दिला त्याबद्दल आपलेही अभिनंदन. या हॉकर्स झोनच्या माध्यमातून शहरामधले अनेक विषय याठिकाणी मांडले गेले आहेत. हॉकर्स झोनच धोरण २०१४ मध्ये आपण केल होतं. पुढे का आणि कुठे माशी शिंकली हे आजपर्यंत कळाल नाही. पिंपरी चिंचवड शहरामध्ये सर्व टपरीवाले असतील, हातगाडीवाले असतील पथारीवाले असतील, त्या त्या विभागातून त्या त्या ठिकाणी प्रत्येक रस्त्यावर म्हणजे तुम्ही कुठल्याही गल्लीत गेलात, कुठल्याही मोठया रस्त्यावर गेलात किंवा अजून कुठेजर जायच असेलतर गर्दी असते. तरी त्यांना आम्ही अनेकवेळा सांगीतल होत की आपण हॉकर्स झोन डिक्लेअर करुन त्यांना कुठेतरी बसायची जागा निश्चित करा. आजपर्यंत आपल हॉकर्स झोन निश्चित करायच कधीही ठरले गेलेल नाही. या विषयाची आपण एखादी स्वतंत्र मिटींग घेणेत यावी अशी आमची मागणी आहे. आयुक्त साहेब, आपल्याला काही गोष्टी सांगू इच्छितो की से. २० मध्ये भाजीमंडई २००७ च्या स्टॅण्डींगमध्ये केली गेली होती. त्याठिकाणी प्राधिकरणाची जागा आपल्या महापालिकेला हस्तांतरीत करुन त्याठिकाणी आपण जवळपास ८४ गाळे बांधण्याचा प्रयत्न केला. त्याठिकाणी अतीशय चांगली भाजीमंडई बांधली असता आता गेल्या तीन महीन्यापासून आपली प्रॉपर्टी जस आता अनेक नगरसेवकांनी सांगीतल की जागा आपलीच आणि तेथे दुसरे धंदा करतात. काही गुन्हेगार असतील किंवा अन्य कोणाला त्या व्यावसायातन, टपरीधारकांकडन हाप्ते

घेण्याच काम माझ्या ऑफिसच्या समोर ती भाजीमंडई आहे तेथे चाललेल आहे. मी अनेकवेळा पत्र पण दिलेले आहेत की अधिकृत भाजीमंडई आहे तेथे अतिक्रमण काढायचतर पहील काढा आणि महानगरपालिकेनी त्यांच भाड काय घ्यायच ते घ्या. तीथ लोकांना ते रितसर दया. तीथ राजरोषपणे धंदा चाललेला आहे. आणि बाहेरचे लोक तेथे व्यावसाय करतात. दोन ते पाच हजार रु. पर्यंत पैसे वसुल करतात. माझीतर विनंती आहे की ते पहील ताबडतोब काढाव. मा.महापौर साहेब, देहू-आळंदी रस्ता बीआरटी रस्ता आहे त्यामध्ये आपल्या फुटपाथवरती दुस-यानी धंदा मांडलेला आहे. कुदळवाडीला येतो आपण तेथे अनेक गाडया लागलेल्या आहे, रस्ता पुर्ण पॅक आहे. मग अशा माध्यमातून आपली लोक काय करतात. आता सांगीतल्याप्रमाणे अतिक्रमण जर माझ्या येथील काढायच असेलतर त्याना लगेच अर्ध्या तासात कळलं जातं की बाबारे आज तुझ्याकडे अतिक्रमणची गाडी येणार आहे आज हातगाडी लावू नकोस. असा निरोप जातो. याचा अर्थ आर्थीक व्यवहारही आपले जे कोणी तेथे अधिकारी असतील ते व्यवहारही करतो की काय अशी या निमीत्तानी शंका येते. मी हॉकर्स झोन बाबत तुम्हांला सांगतो की हॉकर्स झोनला आपण जी जागा दिलेली आहे ४ फुट X ४ फुट त्याऐवजी त्याची जागा वाढवली पाहीजे त्यांची जागा निश्चित केली पाहीजे. ४ फुट X ४ फुट मध्ये तो कसा भाजी विकणार, कसा बसणार. साने चौक ते थरमॅक्स चौक जे अधिकृत आहेत अनेकवेळा पत्र दिलेले आहेत. मागे एक एक दोन दोन कोटी रुपयाला लोकांनी दुकान घेतलेले आहेत व त्यांच्या पुढ पथारीवाले बसतात. त्याच्यापुढे हातगाडीवाला असतो. त्यांचीही कोणी संघटना तयार केली. चुकून त्या गाडया गेल्या की संघटनेवाले अंगावर धावून येतात. म्हणून माझी विनंती आहे की कोणीही संघटनेवाले येवू की कोणीही येवू चुकीचा बसला असेल, चुकीच काम करत असेलतर, रस्त्यावर बसला असेलतर त्याला उचलून बाजूला ठेवाव अशी माझी विनंती आहे. जे जे रस्त्यावर, फुटपाथवर असतील हातगाडीवाले असतील, पथारीवाले असतील त्या लोकांना काढण्याची व्यवस्था ताबडतोब व्हावी. आपण अतिक्रमण विभाग हा मुख्यालयात घेतलेला आहे. मुख्यालयातून आज एका प्रभागात दुस-या दिवशी दुस-या प्रभागात असे केले जाते परंतु तो त्या प्रभागातून येईपर्यंत परत पाठीमागे बसलेले असतात. म्हणून त्या त्या प्रभागामध्ये अतिक्रमणाची जी काही सिस्टीम असेल ती आपण करावी अशी विनंती. मेन जे रस्ते आहेत त्याठिकाणचे पहीले हातगाडीवाले, टपरीवाले जे कोणी बसणार असतील त्यांना बसू दयाव अशी मी विनंती करतो. आयुक्त

साहेब, पुन्हा एकदा सांगतो की माझ्या येथील भाजी मंडईमध्ये अतिक्रमण झालेलं आहे ते ताबडतोब काढाव नाहीतर त्या भाजीमंडईला आम्ही जावुन लॉक लावू एवढच सांगतो आणि थांबतो.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी खरंतर तुषार हिंगेच मनापासून अभिनंदन करतो. दोन तीन तास एखादया विषयामध्ये चर्चा होते. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. प्रत्येक जण आपल्या पध्दतीन या संदर्भामध्ये भाषण करता करता मत देत होतं. काही जणांनी रस्त्याच्या संदर्भामध्ये फुटपाथवर अतिक्रमण आहेत अशा पध्दतीची भावना व्यक्त केली. काही जणांनी सांगीतल की टप-या या भाईगीरीच्या माध्यमातून आहेत. खरतर सगळयांच्या भावनांचा जर आपण विचार केलातर दोन गोष्टी निश्चितच करण्याची गरज आहे. ज्या पध्दतीन पथारीवाल्यांच नियोजन होण्याची गरज होती. कोणीतरी सांगीतल केशव घोळवेनी खुप चांगल काम केलं. मला असं वाटत की हातगाडीवाल्यांना, टप-यावाल्यांना न्याय देवून या शहराच विद्रूपीकरण थांबवण्याची ख-या अर्थान गरज आहे. सगळयाच्या भावना ज्या होत्या त्या टप-या कमी झाल्या पाहीजे, काही जणांनी सांगीतल की टप-याच्या माध्यमातून जे उदरनिर्वाह करतात त्यांच्याही माग ताकदीन उभा राहील पाहीजे. मा.महापौर साहेब, मी आपला अधिक वेळ घेणार नाही, मला कल्पना आहे की दोन तीन तास आपण याच विषयावर चर्चा करतो. फिरुन फिरुन तेच विषय येतात. खरतर हॉकर्सच धोरण हे गेल्या अनेक वर्षापुर्वी झालं. परंतु हॉकर्सच्या संदर्भामधली पॉलीसी या महापालिकेच्या माध्यमातून आजून पर्यंत केलेली नाही खरतर हे आपल्या सगळयांच दुर्भाग्य आहे. आता दत्ताकाकानी सांगीतल ४ फुटा ऐवजी १० फुट जागा दिली पाहीजे. माजी सर्व नगरसेवकांना विनंती आहे की पहील्या आपल्या भागातल्या टप-या काढायच्या, आपल्या भागातील फुटपाथवरच्या सगळया लोकांना एका जागेवरती घेवून जायचं कृपाकरुन माझी विनंती आहे की त्या जागांना सुध्दा विरोध करा. ती जागा आपल्या घराच्या जवळ आहे ती जागा आपण नाही दिलीतर टप-यावाले टप-याच्याच जागेवर राहतील, हॉकर्सवाले हॉकर्सच्याच पध्दतीने राहतील. आणि पुन्हा एकदा टप-याच नगर कुणीतरी सांगीतल एवढा क्रमांक आला तेवढा क्रमांक आला, खरतर दहा वर्षापुर्वीच शहराच चांगल प्लॅनिंग केल असतंतर आपला हा क्रमांक पण खाली आला असता. वर्षात आम्ही चांगलच करण्याचा प्रयत्न करतो. या महापालिकेच्या सभागृहाच्या माध्यमातून चांगले विचार, चांगली क्वालीटी, चांगल्या पध्दतीचे हॉकर्स

झोन म्हणजे आयुक्त साहेब माझी विनंती आहे यानिमीत्तान खरंतर दोन भाग अतिक्रमणाचे केले पाहीजे. आज अशी परिस्थिती आहे की संध्याकाळी सहाच्यानंतर एखादया चौकामध्ये टप-या एवढया वाढलेल्या असतात की एकही अधिकारी तीथे जात नाही. त्यांना आपण तशा पध्दतीची डयुटी देणे भाग आहे म्हणजे टप-यासाठी वेगळा भाग आणि बाकी अतिक्रमण विभाग वेगळा अशा पध्दतीने केलंतर शहराच विद्रूपीकरण थांबेल. नाहीतर अतिक्रमणाची, बांधकामाची कारवाई करण्यासाठी तोच ताफा आहे तोच अधिकारी आहे, तोच कर्मचारी आहे. आणि टप-या काढायला पण तोच कर्मचारी तोच अधिकारी आहे. मागच्या आठवडयामध्ये आपण ठरवल होत की पहीले दहा हॉकर्सतर आपण करु. या पध्दतीने आपण एखादा विषय गांभीर्याने घेतला, कोणीतरी स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भामध्ये सांगीतलं. याबाबतीत जेवढ आपण तातडीन करतो तसं दहा हॉकर्स झोन जर आपण केलीतर त्या भागामधल्या पथारीवाल्यांना न्याय दिल्यासारख होईल. मागच्या स्टॅण्डींग कमिटीच्या माध्यमातून आपण एक विषय केला की किती दंड आकारायचा. आपण दंड आकारुन किती टप-या कमी झाल्या. पुन्हा त्याच टप-या येतात. खरतर टप-याच शहर हे नाव आपल्याला पुसायच असेलतर आयुक्त साहेब माझी विनंती आहे या निमीत्तान की आपण पथारीवाल्यांबरोबरच हॉकर्सच धोरण हे त्वरीत राबवल पाहीजे. मी नगरसेवकांना सांगतो की आपण टपरीवाल्यांसाठी फोन नका करु. आपणच म्हणायच राहू दे माझ्या मित्राची टपरी आहे. माझ्या भावाची टपरी आहे आणि दुस-या बाजूला आपण काय म्हणतो अधिकारी काम करत नाहीत. अधिका-यांना सुध्दा आपण ताकद दिली पाहीजे. कुठल्याही चौकात जा सगळया ठिकाणी टप-याच साम्राज्य आहे. तरी आयुक्त साहेब माझी विनंती आहे की या धोरणाची त्वरीत अंमलबजावणी करुन वेगवेगळया जागा महापालिकेच्या माध्यमातून देता येतील अशा संदर्भामधली कारवाई आपण त्वरीत करावी अशा पध्दतीची विनंती करतो आणि मा.महापौरांनाही विनंती करतो की खरतर प्रश्नोत्तराचा तास हा एक तासाचा असतो आणि तीन तीन चार चार तास त्या विषयावर चर्चा करतो. अत्यंत महत्वाचे विषय आहेत परंतु आपण एखादया विषयावरच बोलतोय. खरतर हा विषय विषयपत्रीकेवर आला असतातर अजूनही आपण चर्चा केली असती. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करतो की आपण विषयाला चालू कराव, धन्यवाद.

**मा.माधवी राजापूरे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १

दिनांक- ६/९/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र लेखा/१५/कावि/६९६९/२०१८ दि.१३/०६/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९२५ दि.१८/०७/२०१८

बँक ऑफ बडोदा, पिंपरी चिंचवड विस्तारित शाखा येथे दि.२३/५/२०१८ अखेर आधार निधी खाते क्र.३१०६०२००००००००९ खात्यावर र.रू.१८,१६,०८,३९५/- (अक्षरी र.रू.अठरा कोटी सोळा लाख आठ हजार तीनशे पंच्याण्णव फक्त) शिल्लक आहेत. तसेच मागासवर्गीय कल्याणकारी निधी खाते क्र.३१०६०२०००००००१२ मध्ये र.रू.३,२७,५३४५५/- (अक्षरी र.रू.तीन कोटी सत्तावीस लाख त्रेपन्न हजार चारशे पंचावन्न फक्त) शिल्लक आहेत. आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधीमध्ये मागील ३ वर्षामध्ये कुठलाही खर्च झालेला नाही. आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधी बंद करण्यात येईल व उपलब्ध शिल्लक निधी सर्वसाधारण निधीमध्ये वर्ग करण्यात येईल. सदर खात्यांवरील रकमांना FFD सुविधा असल्याने रोजची शिल्लक रक्कम बदलत असते. तरी सदर खात्यामधील रक्कम वर्ग करण्याच्या दिवशी मुदत ठेव, मुदत ठेवीवरील व्याज व जो Effective Balance असेल ती शिल्लक ग्राह्य धरण्यात येऊन शिल्लक सर्वसाधारण निधीकडे वर्ग करण्यात येईल. तरी आधारनिधी व मागासवर्गीय कल्याणकारी निधी ही दोन्ही निधी बंद करून सदर निधीच्या खात्यावरील उपलब्ध शिल्लक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ६ परिशिष्ट ड नियम (३) ३ अन्वये सर्वसाधारण निधीमध्ये जमा करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आशा धायगूडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - २५४ विषय क्रमांक – १

दिनांक- ६/९/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र लेखा/१५/कावि/६९६९/२०१८ दि.१३/०६/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९२५ दि.१८/०७/२०१८

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक- ६/९/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/कावि/७६४८/२०१८ दि.३०/०६/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२८६८ दि.१८/०७/२०१८

कायदा सल्लागार (प्र) कायदा विभाग यांनी दि.१२/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये कायदा विभागाकडील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता 'मनपा न्यायालय अस्थापना खर्च' या लेखाशिर्षावर र.रु ८०,००,०००/- इतकी तरतुद वार्षिक अंदाज पत्रकात करण्यात आलेली आहे. तथापि, आकुर्डी न्यायालयाचे सन २०१७-२०१८ चे वार्षिक वेतन व भत्ते खर्चाची मागणी बील र.रु.८०,९०,९२८/- इतके देय होत आहे. त्यामुळे सदरचे बिल अदायगीकामी उपलब्ध तरतुद अपुरी पडत आहे. या शिवाय पुणे न्यायालय येथील मनपा चेंबर नं.५२ चे देखभाल दुरुस्ती, वार्षिक वर्गणी व इतर खर्च यासाठी सदर लेखाशिर्षावर रक्कम शिल्लक ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी "वाहन

नुकसान भरपाई" लेखाशिर्षातून "मनपा न्यायालय आस्थापना" लेखाशिर्षावर र.रु.२,००,०००/-(अक्षरी र.रू. दोन लाख फक्त) विभागाअंतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.माधवी राजापूरे-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देत

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना माडते- प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागरमध्ये नागरी वस्तीमध्ये मोठयाप्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने खालील नमूद केलेली विकास कामे करणे गरजेची आहेत. त्यामुळे खालील नमुद केलेल्या विकास कामांचा समावेश सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षकात नव्याने समावेश करुन आवश्यक तरतूद करणेस मान्यता देणेत यावी.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक तरतुद रक्कम रुपये | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथील गंगा पार्क चौक ते स्वराज गार्डन चौकाकडे जाणारा १८.०० मी..रुंद रस्ता व यशदा गोविंद चौकाकडे जाणारा २०.०० मी. रुंद डी.पी.रस्ता अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | २०००००००० | ५०००००० | ५०००००० | -- |
| २ | अखर्चित कामांमधुन शिल्लक तरतूद | -- | -- | -- | ५०००००० |
| | एकूण | २०००००००० | ५०००००० | ५०००००० | ५०००००० |

तसेच प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर मध्ये नागरिक वस्तीमध्ये मोठयाप्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे खालील नमूद केलेल्या विकास कामे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टिने करणे गरजेची आहेत. तथापि खालील विकास कामांना सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असलेली अंदाजपत्रकीय रक्कम अपुरी पडत आहे. तरी सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकातील खालील कामांना वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम मिळणेकामी मान्यता देणेत यावी.

| अनु. क्र. | कामाचे नाव | पान क्र/अनु.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | पिंपळे सौदागर प्रभाग क्र. ५५ मधील झरवरी रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसीत करणे. | ३५/११७ | १५,००,००० | २०,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर मधील सिमरण कॉर्नर ते ट्रिओसे सोसायटी पर्यंतचा १८.०० मी. डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ३५/११८ | ३०,००,००० | १०,००,००,००० |

तसेच मा.महापालिका सभा क्रमांक १७ विषय क्र. १५ ठराव क्र.२०२ दि. २२/६/२०१८ अन्वये विद्युत विषयक ८ कामांसाठी रक्कम रू.६,८०,००,०००/- तरतूद वर्गीकरणास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

वरीलप्रमाणे उपसूचनेद्वारे मंजूर केलेल्या प्रस्तावातील अ.क्र. ७ व ८ कामांसाठी अनुक्रमे र. रू. २,००,००,०००/- व रु.रु. १,००,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. तसेच स्थापत्य उदयान विभागामधील मनपाच्या सन २०१८-१९ च्या नवीन अंदाजपत्रकात खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कामाचे नावात बदल व सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे मुळ नाव | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नवीन नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रक पान क्र. | अंदाज पत्रक अ.क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता | सुधारीत प्रशासकीय मान्यता | सन २०१७-१८ ची मुळ तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १२ मधील उदयानांची कामे करणे (भाग-२) | प्रभाग क्र. १३ मधील उदयानांची दुरुस्तीची व अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे. | स्थापत्य उदयान | २७८ | २१२ | १५०००००० | १५०००००० | ६०००००० |
| २ | प्रभाग क्र. १३ यमुनानगर येथील सदगुरु दत्त उदयानामध्ये जुने वॉचमन कॉर्टर पाडून त्या जागेवर नविन वॉचमन कॉर्टर व विरंगुळा केंद्र उभारणे. | प्रभाग क्र. १३ यमुनानगर येथील सदगुरु दत्त उदयानामध्ये जुने वॉचमन कॉर्टर पाडून त्या जागेवर नविन वॉचमन कॉर्टर व विरंगुळा केंद्र उभारणे आणि इतर उदयानांची स्थापत्य विषयक काम करणे. | स्थापत्य उदयान | २७९ | २२८ | ३५०००००० | ८०००००० | २२८५००० |

तसेच स्थापत्य उदयानामधील सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये तक्त्यामध्ये नमूद केलेल्या अ.क्र. १ च्या कामाचा समावेश करुन खालीलप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये वाढ/घट करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | वॉर्ड क्र. | पान क्र. /अ.क्र. | प्रशासकीय मान्यता | सन २०१८-१९ ची सुरु तरतुद | तरतूदीमध्ये वाढ करावयाची | तरतूदीमध्ये घट करावयाची | एकुण उपलब्ध तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य उदयान | प्रभाग क्र. ३ च-होली येथील वाघेश्वर मंदिर परिसरात उदयान विकसित करणे (टप्पा-२) | ३ | | ३०००००००० | ० | २५०००००० | ० | २५०००००० |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र. ७ च-होली दत्तनगर (काळी भिंत रस्ता) विकास आराखडयातील रस्ता विकसीत करणे. | ३ | २३/१०४ | - | १२०००००००० | - | २५०००००० | ११७५०००००० |

तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. २३६ दि.२०/०७/२०१८ च्या ठरावातील प्रस्तावात नमुद केलेल्या प्रभाग क्र. २५ च्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कम चुकले असल्याने खालील प्रमाणे दुरुस्त करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | ठरावातील अनु.क्र. | कामाचे नाव | ठरावातील अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १०५ | प्रभाग क्र. २५ वाकड येथील भुजबळ वस्ती मधुन वाकडकर वस्ती मार्गे भुमकरवस्ती येथील हिंजवडीकडे जाणा-या एम.डी.आर. ३१ रस्त्याला जोडणारा ३०.०० मी. रुंद डी.पी.रस्ता विकसीत करणे. (पान क्र. ३५, अनु.क्र.१२७) | १०,००,००,००० | ३५,००,००,००० |
| २ | १०९ | प्रभाग क्र. २५ वाकड गावठाण येथील रस्ते सिमेंट कॉँक्रीटचे करणे. (पान क्र.३६, अनु.क्र.१३५) | ५,००,००,००० | २५,००,००,००० |

तसेच पिंपरी चिंचवड मनपा मार्फत नव्याने भोसरी, जिजामाता पिंपरी, थेरगांव, आकुर्डी, मासुळकर कॉलनी व चिंचवड येथे तालेरा रुग्णालयाच्या ठिकाणी असे एकुण ६ नवीन रुग्णालये स्थापत्य विभागामार्फत बांधणेत येत आहेत. तथापि मा.शहर अभियंता यांनी कळविलेनुसार सदरच्या नवीन रुग्णालयांसाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ETP) बांधणे बाबत पर्यावरण विभागास कळविले आहे. पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये या कामांचा आंतर्भाव नसल्याने परंतु रुग्णालये चालू होणेच्या दृष्टीने या सर्व रुग्णालयांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ETP) बांधणे आवश्यक आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने ठिकठिकाणी नव्याने बांधणेत येत असलेल्या रुग्णालयाकरिता (जिजामाता पिंपरी, थेरगांव, आकुर्डी, मासुळकर कॉलनी व चिंचवड येथे तालेरा रुग्णालय) आवश्यक त्या क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ETP) बांधणेच्या कामाचा अंतर्भाव पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागातील 'रुग्णालये व दवाखाने' या लेखाशिर्षावरील आवश्यक ती रक्कम रुपये ५०.०० लाख इतकी तरतूद पर्यावरण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २५५ विषय क्रमांक – २
दिनांक- ६/९/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/कावि/७६४८/२०१८ दि.३०/०६/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२८६८ दि.१८/०७/२०१८

कायदा सल्लागार (प्र) कायदा विभाग यांनी दि.१२/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये कायदा विभागाकडील सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता 'मनपा न्यायालय अस्थापना खर्च' या लेखाशिर्षावर र.रु ८०,००,०००/- इतकी तरतुद वार्षिक अंदाज पत्रकात करण्यात आलेली आहे. तथापि, आकुर्डी न्यायालयाचे सन २०१७-२०१८ चे वार्षिक वेतन व भत्ते खर्चाची मागणी बील र.रु.८०,९०,९२८/- इतके देय होत आहे. त्यामुळे सदरचे बिल अदायगीकामी उपलब्ध तरतुद अपुरी पडत आहे. या शिवाय पुणे न्यायालय येथील मनपा चेंबर नं.५२ चे देखभाल दुरुस्ती, वार्षिक वर्गणी व इतर खर्च यासाठी सदर लेखाशिर्षावर रक्कम शिल्लक ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी "वाहन

नुकसान भरपाई" लेखाशिर्षातून "मनपा न्यायालय आस्थापना" लेखाशिर्षावर र.रु.२,००,०००/-(अक्षरी र.रू. दोन लाख फक्त) विभागाअंतर्गत वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागरमध्ये नागरी वस्तीमध्ये मोठयाप्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने खालील नमूद केलेली विकास कामे करणे गरजेची आहेत. त्यामुळे खालील नमुद केलेल्या विकास कामांचा समावेश सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षकात नव्याने समावेश करुन आवश्यक तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | आवश्यक तरतुद रक्कम रुपये | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथील गंगा पार्क चौक ते स्वराज गार्डन चौकाकडे जाणारा १८.०० मी.रुंद रस्ता व यशदा गोविंद चौकाकडे जाणारा २०.०० मी. रुंद डी.पी.रस्ता अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | २००००००० | ५०००००० | ५०००००० | -- |
| २ | अखर्चित कामांमधुन शिल्लक तरतूद | -- | -- | -- | ५०००००० |
| | एकूण | २००००००० | ५०००००० | ५०००००० | ५०००००० |

तसेच प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर मध्ये नागरिक वस्तीमध्ये मोठयाप्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे खालील नमूद केलेल्या विकास कामे

नागरिकांच्या सोयीच्या दृष्टिने करणे गरजेची आहेत. तथापि खालील विकास कामांना सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असलेली अंदाजपत्रकीय रक्कम अपुरी पडत आहे.तरी सन २०१८-१९ चे मुळ अंदाजपत्रकातील खालील कामांना वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम मिळणेकामी मान्यता देणेत येत आहे.

| अनु. क्र. | कामाचे नाव | पान क्र/अनु.क्र. | अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | पिंपळे सौदागर प्रभाग क्र. ५५ मधील झरवरी रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने विकसीत करणे. | ३५/११७ | १५,००,००० | २०,००,००,००० |
| २ | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर मधील सिमरण कॉर्नर ते ट्रिओसे सोसायटी पर्यंतचा १८.०० मी. डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ३५/११८ | ३०,००,००० | १०,००,००,००० |

तसेच मा.महापालिका सभा क्रमांक १७ विषय क्र. १५ ठराव क्र.२०२ दि. २२/६/२०१८ अन्वये विद्युत विषयक ८ कामांसाठी रक्कम रू.६,८०,००,०००/- तरतूद वर्गीकरणास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे उपसूचनेद्वारे मंजूर केलेल्या प्रस्तावातील अ.क्र. ७ व ८ कामांसाठी अनुक्रमे र. रू. २,००,००,०००/- व रु.रु. १,००,००,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच तसेच स्थापत्य उदयान विभागामधील मनपाच्या सन २०१८-१९ च्या नवीन अंदाजपत्रकात खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कामाचे नावात बदल व सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे मुळ नाव | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नवीन नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रक पान क्र. | अंदाज पत्रक अ.क्र. | मुळ प्रशासकीय मान्यता | सुधारीत प्रशासकीय मान्यता | सन २०१७-१८ ची मुळ तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १२ मधील उदयानांची कामे करणे (भाग-२) | प्रभाग क्र. १३ मधील उदयानांची दुरुस्तीची व अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे. | स्थापत्य उदयान | २७८ | २१२ | १५०००००० | १५०००००० | ६०००००० |
| २ | प्रभाग क्र. १३ यमुनानगर येथील सदगुरु दत्त उदयानामध्ये जुने वॉचमन कॉर्टर पाडून त्या जागेवर नविन वॉचमन कॉर्टर व विरंगुळा केंद्र उभारणे. | प्रभाग क्र. १३ यमुनानगर येथील सदगुरु दत्त उदयानामध्ये जुने वॉचमन कॉर्टर पाडून त्या जागेवर नविन वॉचमन कॉर्टर व विरंगुळा केंद्र उभारणे आणि इतर उदयानांची स्थापत्य विषयक काम करणे. | स्थापत्य उदयान | २७९ | २२८ | ३५००००० | ८०००००० | २२८५००० |

तसेच स्थापत्य उदयानामधील सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये तक्त्यामध्ये नमूद केलेल्या अ.क्र. १ च्या कामाचा समावेश करुन खालीलप्रमाणे कामाच्या तरतूदीमध्ये वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | वॉर्ड क्र. | पान क्र. /अ.क्र. | प्रशासकीय मान्यता | सन २०१८-१९ ची सुरु तरतुद | तरतूदीमध्ये वाढ करावयाची | तरतूदीमध्ये घट करावयाची | एकुण उपलब्ध तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्थापत्य उदयान | प्रभाग क्र. ३ च-होली येथील वाघेश्वर मंदिर परिसरात उदयान विकसित करणे (टप्पा-२) | ३ | | ३००००००० | ० | २५००००० | ० | २५००००० |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र. ७ च-होली दत्तनगर (काळी भिंत रस्ता) विकास आराखडयातील रस्ता विकसीत करणे. | ३ | २३/१०४ | - | १२०००००० | - | २५००००० | ११७५०००० |

तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र. २३६ दि.२०/०७/२०१८ च्या ठरावातील प्रस्तावात नमुद केलेल्या प्रभाग क्र. २५ च्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कम चुकले असल्याने खालील प्रमाणे दुरुस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | ठरावातील अनु.क्र. | कामाचे नाव | ठरावातील अंदाजपत्रकीय रक्कम | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १०५ | प्रभाग क्र. २५ वाकड येथील भुजबळ वस्ती मधुन वाकडकर वस्ती मार्गे भुमकरवस्ती येथील हिंजवडीकडे जाणा-या एम.डी.आर. ३१ रस्त्याला जोडणारा ३०.०० मी. रुंद डी.पी.रस्ता विकसीत करणे. (पान क्र. ३५, अनु.क्र.१२७) | १०,००,००,००० | ३५,००,००,००० |
| २ | १०९ | प्रभाग क्र. २५ वाकड गावठाण येथील रस्ते सिमेंट काँक्रीटचे करणे. (पान क्र.३६, अनु.क्र.१३५) | ५,००,००,००० | २५,००,००,००० |

तसेच पिंपरी चिंचवड मनपा मार्फत नव्याने भोसरी, जिजामाता पिंपरी, थेरगांव, आकुर्डी, मासुळकर कॉलनी व चिंचवड येथे तालेरा रुग्णालयाच्या ठिकाणी असे एकुण ६ नवीन रुग्णालये स्थापत्य विभागामार्फत बांधणेत येत आहेत. तथापि मा.शहर अभियंता यांनी कळविलेनुसार सदरच्या नवीन रुग्णालयांसाठी सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ETP) बांधणे बाबत पर्यावरण विभागास कळविले आहे. पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये या कामांचा आंतर्भाव नसल्याने परंतु रुग्णालये चालू होणेच्या दृष्टीने या

सर्व रुग्णालयांसाठी आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ETP) बांधणे आवश्यक आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने ठिकठिकाणी नव्याने बांधणेत येत असलेल्या रुग्णालयाकरिता (जिजामाता पिंपरी, थेरगांव, आकुर्डी, मासुळकर कॉलनी व चिंचवड येथे तालेरा रुग्णालय) आवश्यक त्या क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र (ETP) बांधणेच्या कामाचा अंतर्भाव पर्यावरण विभागाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामधील भांडवली खर्चामध्ये नव्याने लेखाशिर्षाव्दारे करुन सदर कामाकरिता अंदाजे रुपये ०५.०० कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व या सर्व कामासाठी चालू आर्थिक वर्षात सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात स्थापत्य विभागातील 'रुग्णालये व दवाखाने' या लेखाशिर्षावरील आवश्यक ती रक्कम रुपये ५०.०० लाख इतकी तरतूद पर्यावरण विभागाच्या भांडवली कामाच्या लेखाशिर्षावर वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आरती चोंधे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक- ६/९/२०१८ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९१६

दि.१८/०७/२०१८

पिंपरी चिंचवड मनपा मा.महापालिका सभा ठराव क्र.९१० दि.२३/०८/२०१६ अन्वये पिं.चिं.मनपाच्या वतीने पी.एम.पी.एम.एल. ६०:४० या तत्वानुसार घेण्यात येणा-या १५५० बसेस पैकी ५५० वातानुकूलित बसेस ए.एस.आर.टी.यु. या केंद्र शासनाच्या अंगिकृत संस्थेकडून घेण्यास, १०० बसेस पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ६०:४० या

तत्वानुसार खरेदी करण्यास व उर्वरित ९०० बसेस मार्केट फायनान्स मेकॅनिझम या प्रमाणे महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत ४ सदस्य समितीने ठरविलेल्या स्पेसिफिकेशन व सेवास्तर कराराप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे. आज रोजी पी.एम.पी.एम.एल. कडून फक्त २०० बसेस खरेदी झाल्याचे समजते. सुमारे दोन वर्षापुर्वी मान्यता देवून सुध्दा पी.एम.पी.एम.एल. कडून बसेस खरेदीस अत्यंत विलंब होत आहे परिणामी शहरातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे पी.एम.पी.एम.एल. च्या मागणीनुसार व स्पेसिफिकेशन नुसार लेखा विभागाकडील बसेस खरेदी या तरतूदीमधून बसेस मनपा मार्फत खरेदी करून पी.एम.पी.एम.एल. ला उपलब्ध करून देणे बाबतचा विषय धोरणात्मक बाब म्हणून मान्यता देणेत यावी.

**मा. योगीता नागरगोजे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलच्या बाबतीत कालच्या स्टॅण्डीक कमिटीमध्ये सुध्दा मी या गोष्टी बोललो. कारण पीएमपीएमएलच्या बाबतीत ब-याचशा तक्रारी असतात एक अधिकारी आपल्याला पीएमपीएमएलच्या वतीने देण्यात आलेला आहे. मा.महापौर साहेब, आज तुमचा अपमान झालेला आहे, आज स्टॅण्डींग कमिटीच्या चेअरमनचा अपमान झालेला आहे. महापौर हे या शहराचे आहेत कुठल्या पक्षाचे नाहीत. पुण्या मधल्या महापौरांनी पत्र एक तारखेला दिल्यानंतर चार तारखेला मिटींग लागली. स्थायी समिती चेअरमनने १४ तारखेला पत्र दिल्यानंतर अजूनही पिंपरी चिंचवडच्या महापौरांना आणि स्टॅण्डींग कमिटी चेअरमनला विचारात घेतलेल नाही. आम्ही सर्व सदस्य पीएमपीएमएलच्या बाबतीत स्टॅण्डींगला बोलत असतो. आज तीन तीन वर्षे, पाच पाच वर्षे, आठ आठ वर्षे चालू असलेले रुट आपल्या एकाही सदस्यांना न सांगता हे रुट यांनी बंद केले आहेत. महापौर साहेब, याठिकाणी पीएमपीएमएलचे जबाबदार अधिकारी आले असतीलतर त्यांना आपण बोलवा आम्हांला त्यांना जाब विचारायचा आहे. आमच्या शहरांला तुम्ही दुय्यम वागणूक का देता. तसेच आपल्या १५४ कामगारांचा पण विषय आहे. आयुक्त साहेबांनी प्रत्येक विभागाला विचारल होत की ही लोक आपल्याला हवी आहेत का. काही अहवाल सुध्दा त्याचे सादर झालेले आहेत. कोणी आडवलेत, कोणापर्यंत कोण पोहचवत नाहीत हे आम्हांला पण माहिती आहे. आज आपल्या शहरातील प्रॉपटर्या त्यांच्या ताब्यात दिल्या आहेत. काही ठिकाणी डेपोच्या संदर्भातील

असतील, रुटच्या संदर्भाती असतील आम्हांला माझ्या प्रश्नाच उत्तर पाहीजे की जर पुण्याच्या महापौरांनी पत्र दिल्यानंतर चार दिवसामध्ये मिटींग लागते तर आपल्या स्टॅण्डींग चेअरमननी दिलेल्या पत्राला, पिंपरी चिंचवड शहरातील प्रथम नागरीकानां काही किमंत आहे का नाही. हा असा दुजाभाव का. याच उत्तर दयाव नंतर बोलण्याची संधी दयावी.

**मा.विकास डोळस -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब काल स्टॅण्डींग मिटींगला तुम्ही नव्हते. पीएमपीएमएलमध्ये ४० टक्के भागीदारी आपली आहे आणि ६० टक्के पुण्याची आहे. जर १० टक्क्यामुळ मींद बनायच असेलतर ते १० टक्के देवून टाका. महापौर साहेबांनी त्यांना पत्र दिलं त्या पत्राला केराची टोपली आणि पुणे महापालिकेच्या महापौरांनी पत्र दिलेल असेल आणि चार दिवसात मिटींग लागत असेलतर आपल अवघड आहे. आज अनेक रुट चालू करावेत म्हणून आपले नगरसदस्य पत्र देत असतात. पाठीमागच्यावेळेस माझ्या प्रभागात अर्मीच्या मुलांसाठी एका बससाठी प्रस्ताव होता तत्कालीन महापौर नितीन आप्पा त्यांनी पत्र दिलं. नंतर आमदार साहेबांनी पत्र दिलं. वेळोवेळी फोलोअप घेवून पण तो रुट चालू झाला नाही. मग शेवटी स्टॅण्डींगला त्यांचा निधी थांबवल्यानंतर आठवडयात रुट चालू झाला. नाक दाबल्यावर तोंड उघडत अशी परिस्थिती आहे. पिंपरी चिंचवड शहरात चालणा-या बसेस आणि पुणे शहरात चालणा-या बसेस बघीतल्यातर त्यांच्याकडे प्रिपरेशन जास्त आहे, आपल्याकडे कमी आहे. विषय फक्त पैशाचाच असेलतर एकदा इकड ठराव करा आणि दहा टक्के रक्कम एकदा देवून टाका आणि ते पीएमपीएमएलच ऑफिस मध्येभागी कुठतरी आणा. काल सांगीतल होतं की गुंडे मॅडमला बोलवा त्या आल्या असतीलतर त्यांनी येवून पहील्यांदा खुलासा करावा की आमच्या महापौरांनी पत्र दिलं त्याच त्यांनी काय केलं, नंतर मी बोलतो.

**मा.पंकज भालेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलच्या संदर्भातील विषय आलेला आहे आताच माझ्या सहकार्यांनी सांगीतल की आपला ४० टक्के सहभाग कायम असुन सुध्दा त्यांच्याकडून आपल्याला दुजाभावाची वागणूक मिळते कारण की गेल्या चार महीन्यापासून एक रुट चालू करण्याबाबत पाठपुरावा करतो मी त्यांना पत्र दिल की विदयार्थ्यांची, नागरीकांची गैरसोय होते. त्यांनी पत्र दिलं की ड्रायव्हर, कन्डक्टरची संख्या कमी आहे त्यामुळे हा रुट चालू करु शकत नाहीत. अशा ब-याचशा सन्मा.सदस्यांनी मागणी करुन सुध्दा कुठलाही रुट चालू केला जात नाही. जे रुट चालू केलेले आहेत ते रुट

बंद केले जातात सन्मा.नगरसेवकांना विश्वासात घेतल जात नाही. त्याच काळात आमच्याच प्रभागातून चाकण एमआयडीसीमध्ये जाण्यासाठी रुट चालू केला गेला आणि आम्हांला त्याची माहिती सुध्दा दिली नाही आणि आम्ही चार-पाच महीन्यापासून रुट चालू करावा म्हणून पाठपुरावा करतो तर तो रुट चालू केला जात नाही. तरी असे पीएमपीएमएलचे अधिकारी का दुजाभाव करतात हा जाब त्यांना विचारला पाहीजे. नगरसेवकांनी मागणी केलेले रुट काहीतरी कारण देवून चालू केले जात नाहीत आणि पुणे महानगरपालिकेचे सगळे रुट चालू केले जातात असे का. असे बरेचसे प्रश्न याठिकाणी सन्मा.सदस्यांना विचारायचे आहेत. त्यांची उत्तर आज याठिकाणी मिळाली पाहीजेत. ऑगष्ट २०१७ मध्ये एसटीचे काही अधिकारी आपल्या येथे पीएमपीएमएलने भरलेले आहेत, आपल्याकडे अधिकारी चांगले नाहीत का. एसटीचे सेवानिवृत्त अधिकारी आपल्याकडे भरले गेलेले आहेत आणि ते अधिकारी आम्हांला बस उपलब्ध होवू शकत नाही म्हणुन पत्र देतात. हे अधिकारी त्याठिकाणी कशासाठी भरले गेले आहेत याची माहीती मी घेतली आहे, ज्या बस ब्रेकडाऊन होतात त्याची संख्या ६० होती आणि आज त्या ब्रेकडाऊनची संख्या ही ४५० झालेली आहे. मग त्या अधिका-यांनी याच्यामध्ये काय सुधारणा केली आहे. आपण त्यांना ४० टक्के हिस्सा देतो त्यामुळे आपल्याकडची पीएमपीएमएलची सुविधा ही सुधारली पाहीजे. मी एक वर्षापुर्वी आपल्या पीएमपीएमएलच्या कर्मचा-यांना जी मेडीक्लेमची पॉलीसी दिली जाते त्या संदर्भामध्ये पीएमपीएमएलला एक पत्र दिलेलं होतं. की एखादा कर्मचारी जर आजारी पडलातर त्या कर्मचा-याला ९० टक्के पैसे मंजूरीची योजना आहे त्याला पुणे महानगरपालिकेमध्ये जाव लागतं त्याच्या नातेवाईकानी जायच आणि पुणे महानगरपालिकेच ९० टक्केच मंजूरीच लेटर घेवून यायचं. म्हणजे माणुस आजारी पडला पिंपरी चिंचवडमध्ये किंवा ऍक्सीडेंट येथे झालातर पत्र पुण्यामध्ये आणायला जायचं. मी एक वर्षापुर्वी त्यांच्याकडे मागणी केली होती की ही सुविधा आमच्या महानगरपालिकेमध्ये सुरु करा. मी याचा एक वर्षापासून पाठपुरावा करतो पत्र दिलं दोन ते तीन वेळा त्यांना भेटलो तरी ती सुविधा आपल्याकडे चालू करण्यात आलेली नाही. मग आपल्या कर्मचा-याच्या बाबतीत हा दुजाभाव का. का आपले कर्मचारी नाहीत का. का ती योजना पीएमपीची आहे म्हणून तीकड आपल्याला जाव लागत. त्यांचा जो डॉक्टर असेल, किंवा मोठा अधिकारी असेल त्यांना आपल्याकडे बसवानां. आपल्या महापालिकेत ती सुविधा दया, का आपण देवू शकत नाहीत, आपल्या लोकांना तीकड का पत्र घ्यायला जाव लागतं. आपण त्याना निरोप देत नाहीत का. १५४ कर्मचारी गेल्या वर्षी

२०/७/२०१७ आपल्याकड घेण्याबाबत महापालिका सभेने ठराव केलेला होता. हे कर्मचारी आमच्याकडे वर्ग करायला आमची काहीही हरकत नाही असा ठराव या महानगरपालिकेनी केलेला होता. एक वर्षानंतर याठिकाणी पीएमपीएमएलने असे पत्र पाठवले की हे कर्मचारी वर्ग करण्यास काहीही हरकत नाही. तीकडून वर्ग करायला तयार आहेत, आपणही घ्यायला तयार आहोत मग ते कर्मचारी का घेतले जात नाहीत. आज दिड महीना झाला त्यांचे पत्र येवून ते लोक दयायला तयार आहेत, आपल्या विभागालाही विचारा, गेली आठरा वर्षे त्यांनी आपल्या महापालिकेमध्ये काम केलं आहे. त्यांचा इकडील अनुभव व आपल्यालाही लोकांची गरज आहे आज वायसीएम हॉस्पिटलमध्ये, विदयूतमध्ये लोक कमी आहेत. सगळयाच विभागाना मनुष्यबळ कमी आहे. त्यांनी या महानगरपालिकेत काम केलं आहे. त्या लोकांना इथ का घेतल जात नाही. आज महापालिकेचा ठराव झाला आहे तेही लोक दयायला तयार आहेत. तरी मा.महापौर साहेब, तुम्ही आणि आयुक्त साहेबांनी विशेष लक्ष घालून त्या लोकांना इकडे वर्ग कराव. आज ती लोक एवढया लांब कामाला तीकड जातात. आपल्यालाही मनुष्यबळाची गरज आहे तरी कृपया या सगळया सुचनांचा आपण निश्चित विचार करावा ही विनंती, धन्यवाद.

**मा.नितीन (आप्पा) काळजे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज पीएमपीएमएलच्या विषयावरती चर्चा सुरु आहे. या पीएमपीएमएलच्या संचालकपदी मी सुध्दा काम केलेलं आहे. त्याठिकाणी काम करत असताना आपण जोपर्यंत महापौर असू, स्टॅण्डीग कमिटीचा चेअरमन असू त्याचा कार्यकाल असतो तोपर्यंत तो तेथे संचालक म्हणून असतो. ज्यावेळेस संचालक म्हणून आपण तेथे जातो त्यावेळेस त्याला एक वर्षाचा कार्यकाल काम करण्यासाठी मिळतो. आपल्याला तेथे शिकायला समजून घेईपर्यंत सहा महीने निघून गेलेले असतात. पीएमपीएमएलमध्ये अत्यंत घाणेरडा कारभार चालू आहे. त्याठिकाणी कोणालाही विचारल जात नाही. मी तर सांगतो की मुंढे साहेबांसारखेच अधिकारी त्याठिकाणी पाहीजे होते. काही दिवसानंतर अशी परिस्थिती येणार आहे की पुर्ण पीएमपीएमएल ही डुबली जाणार आहे. त्याठिकाणी एसटीचे अधिकारी ठेवलेले आहेत मला असे म्हणायच आहे की गुंडे मॅडमला काम करता येत नसेलतर त्यांनी या पदाचा कार्यभार सोडलातरी चालेल. कारण की एसटीचे जे तेथे येवून बसलेले आहेत ते सगळ वाटोळ करायला बसलेले आहेत. अत्यंत घाणेरडा कारभार चालू आहे. आपल्याला माहिती होईपर्यंत ही लोक पुर्ण माहिती सुध्दा देत

नाहीत आणि माहिती दिलीतर आपल्याला या महापालिकेचे काम करत असताना पुर्णवेळ आपल्याला तेथे मिळत नाही. त्यासाठी मला अस वाटत की जसा पुणे महानगरपालिकेनी ६० टक्के प्रमाणे त्यांचा एक सदस्य पाच वर्षासाठी जादा दिलेला आहे तसा पाच वर्षासाठी आपल्या येथील एखादया सदस्याला जरी चान्स मिळालातर तो तेथे चांगल्या प्रकारे काम करु शकतो आणि तेथे आपला वचक राहू शकतो. आता काही सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे त्यांचे पत्र चार दिवसापुर्वी गेले आणि लगेच मिटींग लागली. मी महापौर असताना त्यांनी एक सीआयआरटीमध्ये मिटींग घेतली त्याच मला व चेअरमनला सुध्दा पत्र नाही. बस खरेदीचा विषय होता ती परस्पर मिटींग घेतली त्यानंतर माझा राजीनामा झाला त्यामुळ मला त्या विषयावर जास्त काही बोलता आलं नाही. परंतु माझ अस मत आहे की या पीएमपीएमएलचा जोपर्यंत या महापालिकेमध्ये सक्षम अधिकारी दिल्याशिवाय जो दिला त्याच काहीही ऐकल जात नाही. व जोपर्यंत हे एसटीचे चार अधिकारी घरी बसविले जात नाहीत तोपर्यंत आपण पैसेही देवू नयेत आणि कुठलीही मदत करु नये. आपल्या भागातील काही कामगार आहेत त्यांच्या समस्या मांडल्या जातात त्यासाठी तेथे कधी कधी भांडण करावी लागतात. परंतु आपल्या भागातील कर्मचा-यांना तेथे डॉमिनेट केलं जातं. तेथील कर्मचा-यांना त्यांच्या मनाप्रमाणे जेथे डयुटी पाहीजे तेथे डयुटी दिली जाते. मी स्वतः आपल्या कितीतरी कामगारांची पत्र दिली. परंतु अजूनही काही कामगारांच्या बदल्या झालेल्या नाहीत. एखादया कामगाराला काही अडचण असेल म्हणून त्यांनी बदली मागीतलीतर ते बदली देतात परंतु अजून थोड मुद्दाम लांब टाकतात. म्हणजे जाणुनबुजून आपल्या लोकांना हे त्रास देतात. माझी सभागृहाला व महापौराना विनंती आहे की आपण जोपर्यंत त्या एसटीच्या अधिका-यांना घरी बसवत नाहीत तोपर्यंतत हा विषय मंजूर करु नये अशी मा.महापौरांना विनंती करतो आणि गुंडे मॅडम स्वतः काहीच निर्णय घेत नाहीत. त्यामुळ त्यांना विनंती करावी की ही चारही लोक घरी बसवावेत, धन्यवाद.

**मा.स्विनल म्हेत्रे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सदर विषय हा ६०-४० या रेशोनुसार ९०० बसेस खरेदी करुन पीएमपीएमएलची वाहतूक व्यवस्था सक्षम, सुलभ व जलद करण्यासाठी आपल्यापुढे आलेला आहे. हा जो विषय आपल्यापुढे आलेला आहे याचा नक्कीच शहरातील नागरीकांना बसेस सेवा उपलब्ध व्हावी यादृष्टीने आलेला आहे. सदर विषयामध्ये २०० बसेस खरेदी केलेल्या आहेत बसेस खरेदी करण्याच्या विषयाला दोन

वर्षापुर्वी मान्यता दिलेली असतानाही फक्त २०० बसेस खरेदी करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे संपुर्ण शहरातील वाहतूक व्यवस्थेची किती दयनीय अवस्था झालेली आहे हे आपल्याला प्रसार माध्यमातून वारंवार दिसतच आहे. वाहतूक कोंडीमध्ये तासंनतास नागरीक अडकून पडतात. त्यामुळे नागरीकांचा कल नक्कीच खाजगी वाहने घेण्याकडे जास्त वाढलेला आहे. आपण जर या ९०० बसेस घेतल्यातर त्या बसेस घेवून आपल्या शहरामधील वाहतूक कोंडीमध्ये भर घालणार आहोत का. जर हिंजवडी, वाकड, तळवडे, चिखली, मोशी, चाकण, खेड अशा सर्वच भागामध्ये प्रचंड वाहतूक वाढून वाहतूक कोंडीमध्ये भर घालणार आहोत का याचा विचार करणे नक्कीच गरजेचे आहे. आपण पीएमपीएमएलला संचलन तुटीचा सुध्दा आपला ४० टककेचा वाटा आजपर्यंतचा देत आहोत तसेच बीआरटीएस मार्गासाठी सुध्दा कोटयावधी रुपये खर्च झालेले आहेत. असे असताना देखील अदयापही पीएमपीएमएलकडून सक्षम, वेळेवर आणि समाधानकारक वाहतूक व्यवस्था झालेली नाही. अनेक मार्गावर बसेस बंद पडतात. बस ब्रेकडावूनची संख्या ही अधिक प्रमाणात आहे. मागच्याच आठवडयामध्ये बीआरटीएस मार्गावर बस बंद पडल्यामुळे इतर पाच बसेस अडकवून पडल्या पर्यायाने प्रवाशांची किती गैरसोय झाली आहे याबद्दल आपणा सर्वानाच कल्पना आहे. म्हणून मा.महापौर साहेब, माझी एवढीच विनंती आहे की या बसेस खरेदीसाठी आपण जो ४० टक्के निधी देणार आहोत त्याच्या बदल्यामध्ये आपण शहरातील नागरीकाना तत्पर व वेळेवर, समाधानकारक अशी सेवा मिळेल का याकडे लक्ष दयावे व याचे उत्तर पीएमपीएमएलच्या अधिका-यांनी आपणास देणे गरजेचे आहे.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलचा हा विषय जूना आहे, आपल्या बजेटच्यावेळेस या विषयावर आपण बोलतो. दोन-दोन, तीन-तीन तास चर्चा होते. पण माझ्या माहितीप्रमाणे ही तीसरी वेळ आहे पीएमपीएमएलवर चर्चा होण्याची. आतापर्यंत आपण त्यांना ठरल्याप्रमाणे सगळया रक्कमा आदा करतो. पीएमपीएमएलची दयनीय अवस्था आहे. जाणुनबुजून ते आपल्याला खराब गाडया देतात. पुण्यामध्ये तुम्ही बघा, माझा पुणे शहरात ब-यापैकी प्रवास हातो. पुणे शहरात कुठल्याही भागात जा कुठलीही बस बंद पडलेली दिसत नाही मग आपल्या पिंपरी चिंचवडला का बस बंद पडते. पास केंद्र हे पास टपरीप्रमाणे त्यांनी ठेवलेले आहेत मग आन्याय आपल्याला का. आपण कररुपाने हे पैसे गोळा करुन त्यांना देतो त्याप्रमाणे ते आपल्याला न्याय देतात का.

किती बसेस आपल्याकडे चालू आहेत. जानुनबुजून गाडया चेंज करतात. जर आपल्याकडील एखादा कर्मचारी पिंपरी मध्ये राहत असेलतर त्याला हाडपसरला, कात्रजला, कोंढव्याला टाकतात. मी पहील्यांदाच याठिकाणी आलेलो आहे पण मला माहित नाही कोणत्या परिस्थितीनी पीसीएमटी आणि पीएमटीच विलीनीकरण केलं. त्या परिस्थितीनुसार त्यांनी त्यावेळेस निर्णय घेतलेला असेल पण आपल्याला आता निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे . पिंपरी चिंचवडच ट्रान्स्पोर्ट हे स्वतंत्र असाव. अशी माझी मागणी राहील. आपल्या आयुक्तानी सर्व नगरसेवकांना ऍटोक्लस्टरला बोलवून माहिती दिली. मी आयुक्त साहेबांनाही म्हणल थोडा जास्त वेळ आम्हांला मिळाला असतातर जे शिकणारे नगरसेवक आहेत त्यांच्यासाठी खरंच ही चांगली बाब होती. आपल्या पिंपरी चिंचवडची स्वतंत्र अशी ओळख आहे, भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी आज शहरात स्वतंत्र असं पोलीस आयुक्तालय १५ ऑगष्टला चालू केलं आणि त्याचा कारभार चालू आहे. आपण काय सांगतो मी पुण्यातला आहे तसं जर आपल्या पिंपरी चिंचवडची ओळख तयार करणार आहोत, आयुक्तालय करणार आहोत आता कोर्ट सुध्दा पिंपरी चिंचवडला येतंय. तर मग ट्रान्सपोर्ट का नको साहेब, आपण प्रत्येकवेळेस पीएमपीएमएलला करोडो रुपये देतो कारण गाडया घेण्यासाठी ते त्या गाडया आपल्याकडे देतात का. आताच सांगीतल बीआरटीएसमध्ये गाडी बदं पडली होती, त्याचा ब्रेकपायडल पुर्णपणे बंद पडलेला होता मी सुध्दा त्याठिकाणी होतो म्हणालो ती गाडी आपण बाजूला काढू. पण ती गाडी ढकलता सुध्दा येत नव्हती. म्हणजे ते आपल्याकडे जाणुनबुजून खराब गाडया पाठवितात. ती गाडी काही एक दिवसात किंवा दहा मिनीटामध्ये खराब होत नाही. ती गाडी एक दिवसात किंवा दहा मिनीटामध्ये खराब होत नाही. खराब झालेल्या गाडया तीकड बेल्ट लावून चालवायच्या असलेल्या गाडया फक्त रोडवर आल्या पाहीजेत म्हणून त्या पिंपरी चिंचवडला सोडल्या जातात. म्हणून माझ स्पष्ट मत आहे की त्यावेळेसच्या सत्ताधारी पक्षनेत्यांनी काय निर्णय केला तो परिस्थितीनुसार केला पण मला वाटते या नेत्यांना आणि महापौरांना सांगु शकतो की साहेब, आता आपल सरकार आहे. तरी मला वाटत आपल्या ट्रान्सपोर्टची स्वतंत्र ओळख या पिंपरी चिंचवडला स्वतंत्र पाहीजे म्हणून ही विंनती करतो की आपण आपल पिंपरी चिंचवडच ट्रान्सपोर्ट स्वतंत्र कराव, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.विलास मडिगेरी-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलच्या संदर्भामध्ये ब-याच वेळापासून चर्चा याठिकाणी सुरु आहे. अनेक सन्मा.नगरसेवकांना

यासंदर्भामध्ये बोलायच आहे. पीएमपीएमएलला प्रत्येक महीन्यामध्ये साडेसात कोट रुपये तुटीच्या माध्यमातून प्रत्येकवेळेला स्थायी समितीच्यामध्ये मंजूर करत असतो. स्थायी समिती जेव्हा सहा महीन्यापुर्वी आली त्यावेळेला प्रशासनाने प्रस्ताव आणला होता की पुर्ण बारा महीन्याची संचलन तुटीचा मंजूरीचा एकच प्रस्ताव आणलेला होता. त्याला स्थायी समितीमध्ये उपसूचना दिली की प्रत्येक महीन्याला स्थायी समितीसमोर त्यांना आदा करण्यात येणा-या रक्कमेस मंजूरीसाठीचा विषय आणावा अशाप्रकारची उपसूचना दिल्यानंतर प्रत्येक महीन्यामध्ये विषय मंजूरीसाठी याठिकाणी येत असतो. स्थायी समितीमध्ये सोळा सदस्य आहेत, प्रत्येक सदस्यांची पीएमपीएमएलच्या संदर्भामध्ये खुप नाराजी त्याठिकाणी आहे. माझी पत्नी दोन टर्म नगरसेवीका होती, आता मी या टर्ममध्ये आहे. आमच्या इंद्रायणीनगर भागामध्ये सुध्दा अनेक गाडया आम्ही सुरु केल्या व नंतरच्या काळामध्ये पण सुरु झाल्या. असे अनेक नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये शहराच्या दृष्टीने पीएमपीएमएलच्या बसेस सुरु आहेत. कुठल्याही प्रकारची पुर्वकल्पना न देता, त्या नगरसेवकांला कुठल्याही प्रकारची माहिती न देता परस्पर ती बस बंद केली जाते. मागच्या झालेल्या स्टॅण्डींग कमिटीमध्ये सुध्दा विकास डोळस असतील, राजाभाऊ चिंचवडे असतील, अर्चनाताई बारणे असतील या सर्वांनीच त्याठिकाणी पीएमपीएमएलच्या बाबतीत नाराजी व्यक्त केली. त्यादिवशी आयुक्त साहेब मुंबईला काही कोर्ट कामा निमीत्ताने गेले होते. सकाळी साहेबांची सभापती महोदयाशी आणि माझ्याशी चर्चा झाली. तुटीच्या माध्यमातून प्रत्येक महीन्याला साडेसात कोटी रु. आपण जे देत आहोत त्यात पुढच्या तीन महीन्यासाठी उपसूचना देवून मंजूर करावी अशाप्रकारची विनंती आयुक्त साहेबांनी याठिकाणी मांडली. प्रशासनाचे प्रमुख म्हणुन आयुक्त साहेब ज्या ज्या गोष्टी सांगतात त्या त्या गोष्टी याठिकाणी आम्ही करण्याचा प्रयत्न करतो. त्यामध्ये काही सुधारणा असतीलतर महापौर, पक्षनेते असतील यांच्या माध्यमातून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण याठिकाणी काम करत असतो. त्यांनी तीन महीन्याचा प्रस्ताव सांगीतला त्याप्रमाणे साडेबावीस कोटी रु. मागच्या झालेल्या स्थायी समितीमध्ये देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. ते देत असताना सर्व सदस्यांनी विरोध केला सर्व सदस्यांना मी विनंती केली की आयुक्त साहेबांनी मागणी केलेली आहे त्यांच्या मागणीचा आदर ठेवून आपण हे काम करणे गरजेच आहे. पीएमपीएमएलचे हे जे कर्मचारी आहेत त्यांना वेळेत पगार मिळाला पाहीजे, त्या गाडया वेळेवर धावल्या पाहीजेत त्यांच्या सीएनजीच बील आदा केल पाहीजे. त्या अनुषंगाने आपण साडेबावीस कोटीची मंजूरी दिलेली आहे. परंतु ते देत असताना

आम्ही त्यास उपसूचना दिली की पुढच्या मंगळवार पर्यंत स्थायी समिती सदस्यांनी ज्या ज्या तक्रारी मांडल्या त्या पुढच्या मंगळवार, बुधवार पर्यंत त्या गोष्टी पुर्णत्वास नाही केल्यातर केलेला ठराव सुध्दा रद्द करण्याच्या सुचना त्याठिकाणी स्थायी समितीमध्ये सभापतीच्या मंजूरीने केलेलं आहे. अशा अनेक तक्रारी आहेत त्या तक्रारीच निरसन झाल पाहीजे. माजी महापौर नितीन काळजे यांनी सांगीतल की एसटीचे निवृत्त कर्मचारी त्याठिकाणी कामावर आहेत. ते जनरल मॅनेजर पोस्टवर त्याठिकाणी आहेत. त्या अधिका-याना आर्थीक अधिकार कोणत्या बेसवर दिले अशाप्रकारची तक्रार विनायक देशपांडे नावाचे माजी पीएमपीएमएलचे अधिकारी यांनी दि. ९/७/२०१८ रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेचे तत्कालीन महापौर आहेत त्यांना पत्र दिल होत त्या पत्राच्या अनुषंगाने आपल्या स्थायी समितीच्या अध्यक्षा ममताताई विनायकराव गायकवाड यांनी पीएमपीएमएलच्या नयनाताई गुंडे मॅडमला दि. ११/६/२०१८ रोजी पत्र दिलं होतं. त्या चौकशी अहवालाच्या संदर्भामध्ये आपण काय कारवाई केली या संदर्भातील अहवाल आमच्या कार्यालयात कळवावा अशा प्रकारच दि. ११/६/२०१८ रोजी पत्र दिलं होत त्या संदर्भातील कुठलाही पत्रव्यवहार सीएमडी मॅडमनी किंवा प्रशासनाच्या माध्यमातून काम करणारे पीएमपीएमएलच्या अधिका-यांनी त्याला उत्तर दिलं नाही. त्याच उत्तर का दिलंल नाही याचा खुलासा करण्यासाठी याठिकाणी सांगाव. त्याचबरोबर मा.महापौर साहेब, आपणही १४ तारखेला पीएमपीएमएलला पत्र दिलेंलं होतं की त्याच्यामध्ये पीएमपीएमएलच्या संदर्भामध्ये महापालिकेचे पदाधिकारी, आपण आणि आमदार आणि सर्व नगरसेवक यांच्या सोबत पंधरा दिवसाच्या आतमध्ये ऍटोक्लस्टर मध्ये मिटींग ठेवावी अशाप्रकारची सूचना लेखी पत्राव्दारे आपण केली होती. त्याचीही कोणत्याही प्रकारची सीएमडीनी दखल घेतली नाही परंतु दि. १/९/२०१८ रोजी पुण्याच्या महापौर सौ. मुक्ताताई टिळक यांनी पत्र दिलं होत. त्यांनी १ तारखेला पत्र दिल पण पत्र देतांना त्यांनी वेगळया पध्दतीन त्यांनी पत्र दिलं, त्यांनी स्पष्ट उल्लेख केला पुणे महानगरपालिकेनी महानगर परिवहन महामंडळस या प्रश्ना संदर्भात त्यांनी डायरेक्ट डेट कळवली की ५ सप्टेंबर २०१८ रोजी जवाहरलाल नेहरु सभागृह येथे आपण सर्व अधिका-या समवेत उपस्थित रहावे अशाप्रकारचे स्पष्ट आदेश पुण्याच्या महापौरांनी दिल्यामुळे त्यांनी ती बैठक घेतली. आपण त्यांच्या नियोजनासाठी १५ दिवसाची मुदत देवून सुध्दा आपली बैठक त्यांनी त्याठिकाणी केलेली नाही. म्हणून आमच्या शहराचा, महापौरांचा अवमान झालेला आहे अशा पध्दतीची परिस्थिती याठिकाणी निर्माण झालेली आहे. पीएमपीएमएलच्या संदर्भामध्ये बस खरेदीच्या

संदर्भामध्ये ६०-४० प्रमाणे विषय मंजूरीसाठी याठिकाणी आलेला आहे. आपण सभागृहाच्या माध्यमातून हा विषय मंजूर करायचा की काय करायच हे चर्चेच्या माध्यमातून शेवटी महापौर, पक्षनेता यांच्या माध्यमातून आपण निर्णय घेणार आहोत. याठिकाणी पीएमपीएमएलच्या सीएमडी मॅडम स्वतः उपस्थित आहेत. अनेक वक्त्यांना बोलायच आहे तरी अधिक वेळ न घेता या तीन्ही संदर्भात पुण्याच्या महापौरांनी सांगीतल्यानंतर लगेच मिटींग घेतली व इकडील महापौरांनी सांगून पंधरा दिवस झालेतरी कोणत्याही प्रकारच पत्रोत्तर न देणं, महापौरांचा, शहराचा अपमान करणं अशा संदर्भामध्ये याठिकाणी विषय झालेला आहे तरी या संदर्भात खुलासा करावा परत मला बोलायच आहे.

**मा.महापौर-** पीएमपीएमएलच्या नयना गुंडे यांनी आमच्या सदस्यांनी जे जे प्रश्न विचारले आहेत त्यासंदर्भात खुलासा करावा.

**मा.नयना गुंडे** **(अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम मी हा खुलासा देते की, दुजाभाव हा बिलकुल नाही. पीसीएमसीने सांगीतल की तुम्ही आमच्या नगरसेवकांची एक मिटींग घ्या किंवा प्रेझेन्टेशन दया. तेव्हा आम्ही स्वतः याठिकाणी येवून प्रेझेन्टेशन दिलेलं आहे. तेव्हा चाळीस ते पन्नास नगरसेवक होते. प्रत्येकाच्या प्रश्नाची उत्तर दिलेली आहेत, माझी टिम होती त्यामुळे दुजाभाव कुठल्याही प्रकारचा केलेला नाही. दुसर पुणे महानगरपालिका मा.महापौर मॅडमने पत्र दिलं होते त्यांच पत्र असं होतं की पुण्याच्या ज्या काही ट्रॅफिकच्या अडचणी आहेत त्याबाबतीतला जनसंवाद आहे आणि त्याच्यामध्ये फक्त पीएमपीएमएलला बोलवलेलं नव्हतं त्याच्यामध्ये ट्रॅफिकच्या डीजी होत्या आणि महानगरपालिकेचे चिफ ईंजिनीअर होते आणि तेथे आम्ही गेलो होतो. तेथे पीएमपीएमएलच्या काही समस्या मांडल्या गेल्या व ट्रॅफिकच्या पण होत्या आणि महानगरपालिकेच्या पण होत्या आणि ती मिटींग मी कॉल केलेली नव्हती. आपण जर मिटींग कॉल केलीतर आम्ही डेफिनेटली यायला तयार आहोत. आम्ही आमची सगळी टिम घेवून येवू व आपल्या सगळया प्रश्नांचे उत्तर देवू.

**मा.राजू मिसाळ-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमच्या महापौर साहेबांनी १४ तारखेला पत्र दिलेलं आहे तर आता पुढची १४ तारीख येवू लागली आहेनां. ज्यावेळेला आमच्या महापौरांनी, स्थायी समितीच्या चेअरमननी पत्र तुम्हांला दिलं की पिंपरी

चिंचवड शहराच्या ज्या काही पीएमपीएमएलच्या बाबतीत समस्या आहेत त्यासंदर्भात मिटींग घ्यावी असं १४ तारखेला पत्र दिलेंल आहे मग १४ तारखेपासून अजून वेळ मिळालेला नाही.

**मा.नयना गुंडे** (अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)**-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दोन महीन्यापुर्वी आम्ही प्रेझेन्टेशन केलेल होत. आता तुम्ही तारीख ठरवावी आम्ही आणि आमची टिम येतो.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.महापौर तारीख देतील पण तुम्ही जे इकड अधिकारी नेमलेले आहेत तुम्ही त्याना काय केल माहिती का, आमच्या नगरसेवकांचे काम होत नाहीत त्यासाठी त्यांना याठिकाणी बाऊल तयार करुन ठेवलं आहे. तो तीकड सांगायला गेला की तुमच्या अधिका-यांनी त्यांना टार्गेट करायच. तुमचे जनरल मॅनेजर विलास बांदल कोण आहेत ते आम्हांला सांगा. ज्या ज्या नगरसेवकांनी फोन केल्यानंतर ते कशा पध्दतीने बोलतात तुम्ही त्यांच्याशी कधी बोललात का. काय वागणूक ते देतात.

**मा.नयना गुंडे** (अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)**-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी यायच्या अगोदरच त्यांची नेमणुक झालेली आहे. एसटीचे ते चार अधिकारी आपल्याकडे कार्यरत आहेत. सगळे रिटायर्ड अधिकारी आहेत. त्यांची नेमणुक पुर्वीच झालेली आहे.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पीएमपीएमएलचे मेन अधिकारी म्हणून तुम्ही आज तेथे काम पाहता. तुम्ही काम पाहत असताना हे रिटायर्ड अधिकारी यांच तुमच्या अगोदर पोस्टींग झाल असेल. ते लोकांशी कशा पध्दतीने बोलतात, एखादा लोकप्रतिनिधी तेथे आपल्या भागातील अडचणी सांगत असतो त्यांवेळेस त्यांची पध्दत जसं काही आमच्यावर उपकार केल्यासारखे बोलतात. दुसरी गोष्ट आमच्या नगरसदस्यांचे आमच्या भागातील जे रुटस बंद झाले आहेत आम्हीतरी स्टॅण्डीग कमिटीमध्ये बोलू शकतो परंतु येथील नगरसदस्यांचे जेवढे प्रॉब्लेम आहेत त्याला फेस करण्यासाठी कोणीही प्रॉपर अधिकारी अव्हेलेबल होत नाही. प्राधिकरण ते किवळे तीन तीन वर्षाचे रुट बंद झालेले आहेत व ते पण न सांगता बस बंद झालेली आहे. कालतर मडिगेरी साहेब सांगत होते की आठवर्षे चालू असलेली बस बंद झालेली आहे. मग जर तुम्ही सन्मा.सदस्यांना

विश्वासात न घेता डायरेक्ट रुट बंद करता ते पण आठ आठ वर्षाचे रुट. मग हा दुजाभाव नाही का.

**मा.नयना गुंडे** (अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. फक्त पिंपरी चिंचवडचे रुट बंद केलेले नाहीतर पुणे शहरातीलही रुट बंद केलेले आहेत. टोटल १८ रुट बंद केलेले आहेत. त्यापैकी ६ रुट पिंपरी चिंचवडमधले आहेत व बाकी १२ रुट पुण्यातले आहेत. हे सगळे रुट बंद करण्यामागच कारण हे होतं की त्यांच अर्निंग पर कि.मी. ३० पेक्षा कमी होतं. म्हणून ते रुट बंद केलेले आहेत. जेव्हा कुठल्याही नगरसेवकांची मागणी येते तेव्हा आपण बसेस सुरु करतो. दोन तीन महीने ट्रायल घेतो पण त्याच इपीके हे ३० पेक्षा कमी असेलतर आपण बस बंद करतो आणि हे रुटीन मॅटर आहे. आता फर्स्ट टाईम केलेलं आहे असं नाही. आम्ही असेच रुट बंद करतो जिथे पर्याय उपलब्ध आहेत. टोटली रुट बंद करण्यात आलेला नाही.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्या प्रभागामधला रुट आहे त्याला पर्यायी व्यवस्थाच नाही. आकुर्डी रेल्वेस्टेशन ते निगडी हा रुट आहे, निगडी ते मुकाई चौक.

**मा.नयना गुंडे** (अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. निगडी ते मुकाई चौक तेथे एक गाडी होती त्याचा मागचा इपीक फक्त २१.६७ रु. आहे. जर खरच लोकांची तीथे डिमांड असेलतर त्याचा इपीक सुध्दा चांगला यायला पाहीजे. ५० च्या पुढेतरी येणे अपेक्षीत आहे. ३० रु. हा मीनीमम आहे.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचे महापौर साहेब, आयुक्त साहेब तुमच्या कमिटीवर आहेत त्यांना तरी तुम्ही कल्पना दयानां. आम्ही नागरीकांना काय तोंड दयायच. नागरीक आम्हांला विचारतात आज महीना ते दिड महीना झाल गाडी नाही.

**मा.नयना गुंडे** (अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ठिक आहे आपल्या सूचनांची दखल घेतली जाईल. आम्ही जेव्हाही रुट बंद करु तेव्हा प्रत्येक स्टॅण्डीग कमिटीला माने साहेब माहिती देतील.

**मा.राजू मिसाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आमचे १५४ कर्मचारी तुमच्याकड आहेत ते आमचे कर्मचारी आम्हांला दया.

**मा.नयना गुंडे** **(अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याबाबतीत आम्ही नाहरकत दिलेली आहे. आमची काहीही हरकत नाही. मी तस पत्रही दिलेल आहे.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या किती नगरसेवकांनी रुटची मागणी केलेली होती आणि किती चालू केलेले आहेत.

**मा.नयना गुंडे** **(अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता ते माझ्याकडे डिटेल्स नाहीत.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्याकडे ७० टक्के आयटी वर्ग आहे, नौकरदार वर्ग आहे तो पुण्याकडे, हिंजवडीकडे, कोथ्रूडकडे जातो. माझे तुम्हांला पत्र आहे एकाही पत्राचे आपल्याकडून उत्तर आलेले नाही. पीएमपीएमएलला फक्त पैसे लागले की अमच्याकडे येतात. पीसीएमटी आणि पीएमटी याच विलीनीकरण करुनच चुक झालेली आहे. तुमच्या किती बसेस ब्रेकडाऊन आहेत.

**मा.नयना गुंडे** **(अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल)-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्याकडे रेकॉर्ड आहे ते आपल्याला मी दाखवते.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे करदात्यांचे पैसे आहेत. १०० कोट रुपये आम्ही तुम्हांला देणार आहेत. आम्ही तुमच्याकडे प्रॉफिट मागत नाहीत. फक्त आमच्या लोकांना सेवासुविधा दयावी म्हणून आम्ही सांगतो.

**मा.महापौर -** प्रत्येक सदस्यांना पीएमपीएमएलला सामोरे जाव लागलेल आहे. पीएमपीएमएलच्या सुध्दा समस्या असतील. आज पीएमपीएमएलच्या बस कमी आहेत म्हणून आपल्याला त्यांना बस खरेदी करुन दयायच्या आहेत. परंतु त्यांना आज खुलासा करण्यासाठी आपण बोलवलेल होतं. यासाठी आपण स्पेशल मिटींग लावू.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौरांच्या पत्राचा अपमान केलेला आहे. त्यांची बाजू कशाला महापौर साहेब घेता. आपण त्यांना प्रश्न विचारले त्याचे उत्तर ते देवू शकत नाहीत का.

**मा.महापौर -** त्यांची पण पुर्ण टिम येईल आपलेही सर्व सदस्यां बरोबर मिटींग लावू या.

**मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** हा विषय तहकूब करणेत येत आहे. पीएमपीएमएलच्या स्पेशल मिटींगची तारीख दिली जाईल त्या मिटींगला पीएमपीएमएलची सर्व टिम येइल. ती मिटींग ऍटोक्लस्टर मध्ये होईल. तरी आपले सर्व प्रश्न आयुक्त साहेबांकडे दयावेत व प्रत्येकांनी आपआपली समस्या त्याठिकाणी सांगावी.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - २५६ विषय क्रमांक – ३

दिनांक – ६/९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९१६

दि.१८/०७/२०१८

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – ६/९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा. महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.लेखा/०६/कावि/८३५८/२०१८ दि.१९/०७/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९८६
दि.२५/०७/२०१८

प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग यांनी दि.२७/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील भाग तीन मधील ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर जमा व खर्च र.रु.२,१८,७००/- वाढ करणेबाबत प्रस्तावीत केले आहे. ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर भाग - ३ मधील सन २०१५-१६ - ४,५४,८००/-, सन २०१६-१७ - ४,४०,२००/- सन २०१७-१८ - ९,३०,७००/- खर्च झालेला आहे. ध्वजदिन निधी या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात र.रु.१०,००,०००/- तरतूद करण्यात आलेली असून र.रु.९,२१,१००/- खर्च झालेला आहे व र.रु.७८,९००/- शिल्लक आहेत. प्रशासन अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग यांचे ध्वजदिन निधी वजातीचे बील र.रु.२,१८,७००/- रकमेचे आहे. सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- भाग - ३ जमा व खर्चात तरतूद वाढविणे आवश्यक असलेने त्यास मान्यता देणेत यावी.

**मा.मनिषा पवार -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत भोसरी एम.आय.डी.सी. येथील जे ब्लॉक येथील मोकळी जागा क्र. ५६ येथे कुस्ती प्रशिक्षण केंद्र इमारत आहे. सदर इमारतीमध्ये “इ” वेस्ट व प्लास्टीक वेस्ट प्रकल्प कार्यान्वित करणेच्या दृष्टीकोनातून सदर इमारतीची डागडूजी व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून खाली नमुद केलेली काम सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये नव्याने समावेश करुन कामांच्या पुढे नमुद केलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | वॉर्ड क्र. | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ चा सुधारीत अंदाज | सन २०१८-१९ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | विशेष योजना | | | | |
| १ | प्रभाग क्र. ८ येथील भोसरी एम.आय.डी.सी. येथील जे. ब्लॉक मधील मोकळी जागा क्र. ५६ येथील कुस्ती प्रशिक्षण केंद्र इमारतीचे स्थापत्य विषय दुरुस्तीची कामे करणे. | ८ | ७५,००,००० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | | ७५,००,००० | ०.०० | ०.०० |

तसेच क क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. ८ येथे इंद्रायणीनगर क्रिडा संकुल येथे कबड्डी मैदानासाठी अच्छादीत शेड करणे आवश्यक अहे, त्या दृष्टीकोनातून खाली नमुद केलेली काम सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये नव्याने समावेश करुन कामांच्या पुढे नमुद केलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | वॉर्ड क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ चा सुधारीत अंदाज | सन २०१८-१९ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | विशेष योजना | | | | |
| १. | प्रभाग क्र. ८ | ८ | ५०,००,००० | ०,०० | ०,०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | येथील इंद्रायणीनगर क्रिडा संकुल येथे कबड्डी मैदनासाठी अच्छादीत शेड व इतर अनुषंगिक कामे करणे. | | | | |
| | | | ५०,००,००० | ०,०० | ०,०० |

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.प्रियंका बारसे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा शिक्षणमंडळाचा विषय आहे. सर्वात प्रथम मी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी मा.सदाशिवराव खाडे यांची नियुक्ती झालेली आहे त्याबद्दल मी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडते. दुसरा विषय असा आहे की कालच शिक्षक दिन झालेला आहे, त्या शिक्षक दिनाला अनावधनाने का होईना आपल्याकडून चुक झालेली आहे. त्यांच आपण अभिनंदन केलेल नाही किंवा शुभेच्छा दिलेल्या नाहीत. एक पत्रकार परिषद घेवूनही आपण त्यांना शुभेच्छा देवू शकलो असतो. त्या राहील्या होत्या त्या मला याठिकाणी दयायच्या होत्या पण काय एकदा कानपटया नाव पडलेल आहे त्यामुळे मला बोलू देत नाहीत. मी पवार साहेबांना पण सांगते मला तुम्ही बोलू दयायला पाहीजे होतं. फोन करुन सांगतात तुम्ही उठू नका. ही सुध्दा चुकीची बाब आहे. असं व्हायला नाही पाहीजे. आपल्या निवडणूक प्रक्रीयेचा शिक्षक हा एक महत्वाचा कणा आहे. आगदी निवडणूक डिक्लेअर झाल्यापासून रिझल्ट लागेपर्यंत शिक्षक जीवाच रान करुन आपल्या पाठीशी उभा असतो. अशा शिक्षकाना आपण शिक्षक दिना दिवशी विसरन खुप दुर्दैवी बाब आहे. शिक्षण समिती नवीन असेल पण आपल्या प्रशासन अधिकारी अनुभवी आहेत. त्यांनी तरी या कार्यक्रमाच नियोजन करायला हवं होतं. या सभागृहात आपण कार्यक्रमाच नियोजन केल नाही याची दिलगीरी व्यक्त करावी. अशी अपेक्षा

मी व्यक्त करेल. परत एकदा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व माध्यमाच्या आणि खाजगी आणि अनुदानीत शिक्षकांना या सभागृहातर्फे भारतीय जनता पार्टी पक्षातर्फे आणि या संपुर्ण सभागृहातर्फे शुभेच्छा देते आणि अपेक्षा करते की शिंदेताई सुध्दा दोन शब्द शिक्षकांच्या बाबतीत बोलतील.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २५७ विषय क्रमांक – ४

दिनांक – ६/९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा. महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.लेखा/०६/कावि/८३५८/२०१८ दि.१९/०७/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९८६
दि.२५/०७/२०१८

प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग यांनी दि.२७/०६/२०१८ चे प्रस्तावान्वये सन २०१८-१९ अंदाजपत्रकातील भाग तीन मधील ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर जमा व खर्च र.रु.२,१८,७००/- वाढ करणेबाबत प्रस्तावीत केले आहे. ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर भाग - ३ मधील सन २०१५-१६ - ४,५४,८००/-, सन २०१६-१७ - ४,४०,२००/- सन २०१७-१८- ९,३०,७००/- खर्च झालेला आहे. ध्वजदिन निधी या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात र.रु.१०,००,०००/- तरतूद करण्यात आलेली असून र.रु.९,२१,१००/- खर्च झालेला आहे व र.रु.७८,९००/- शिल्लक आहेत. प्रशासन अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग यांचे ध्वजदिन निधी वजातीचे बील र.रु.२,१८,७००/- रकमेचे आहे. सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात ध्वजदिन निधी या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- भाग - ३ जमा व खर्चात तरतूद वाढविणे आवश्यक असलेने त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत भोसरी एम.आय.डी.सी. येथील जे ब्लॉक येथील मोकळी जागा क्र. ५६ येथे कुस्ती प्रशिक्षण केंद्र इमारत आहे. सदर इमारतीमध्ये “इ” वेस्ट व प्लास्टीक वेस्ट प्रकल्प कार्यान्वित करणेच्या दृष्टीकोनातून सदर इमारतीची डागडूजी व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून खाली नमुद केलेली काम सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये नव्याने समावेश करुन कामांच्या पुढे नमुद केलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | वॉर्ड क्र. | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ चा सुधारीत अंदाज | सन २०१८-१९ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | विशेष योजना | | | | |
| १ | प्रभाग क्र. ८ येथील भोसरी एम.आय.डी.सी. येथील जे. ब्लॉक मधील मोकळी जागा क्र. ५६ येथील कुस्ती प्रशिक्षण केंद्र इमारतीचे स्थापत्य विषय दुरुस्तीची कामे करणे. | ८ | ७५,००,००० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | | ७५,००,००० | ०.०० | ०.०० |

तसेच क क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. ८ येथे इंद्रायणीनगर क्रिडा संकुल येथे कबड्डी मैदानासाठी अच्छादीत शेड करणे आवश्यक अहे, त्या दृष्टीकोनातून खाली नमुद केलेली काम सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये नव्याने समावेश करुन कामांच्या पुढे नमुद केलेली अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | वॉर्ड क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१७-१८ चा सुधारीत अंदाज | सन २०१८-१९ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | विशेष योजना | | | | |
| १. | प्रभाग क्र. ८ येथील इंद्रायणीनगर क्रिडा संकुल येथे कबड्डी मैदनासाठी अच्छादीत शेड व इतर अनुषंगिक कामे करणे. | ८ | ५०,००,००० | ०,०० | ०,०० |
| | | | ५०,००,००० | ०,०० | ०,०० |

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.निर्मला गायकवाड -** मा.महापौर साहेब विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – ६/९/२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/७/कावि/१२/२०१८
दि.०८/०८/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३०४१
दि.०८/०८/२०१८

महानगरपालिकेच्या सार्वजनिक जागेवर, रस्त्यावर, चौकाचौका मध्ये लावणेत येणा-या फ्लेक्स, हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी ठिकाणी अशा प्रकारचे जाहिरात करणेस महानगरपालिकेकडुन कोणत्याही प्रकारची परवानगी दिली जात नाही. सदर ठिकाणी लावणेत येणा-या अशा प्रकारच्या जाहिरात फ्लेक्सवर अतिक्रमण विभागाकडुन कारवाई केली जाते. शहरामध्ये महानगरपालिकेच्या मिळकतीवर ब-याच ठिकाणी हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी लावले जातात. त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होते. यावर अनेक वेळा मा.स्थायी समितीमध्ये चर्चा केली जाते. वर्तमानपत्रामध्ये सुध्दा अशा प्रकारच्या बातम्या येतात. अशा प्रकारच्या अनधिकृत लावणेत येणा-या जाहिरातदारांना आळा घालणेसाठी व त्यावर नियंत्रण येणेसाठी कारवाई करणेबाबत धोरण ठरविणेस मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या मिळकतीवर चिकटविण्यात, लावणेत येणा-या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके यावर कारवाई करावयाची झालेस हे काढुन सदरची जागा पुर्ववत करणेस येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक स्थापत्य विभागाकडुन दिनांक 4/8/2018 रोजी च्या पत्रान्वये मागविणेत आलेले आहेत. त्यांनी सदर कामासाठी र.रु.375/- प्रती चौ.मी.इतका दर कळविलेला आहे परंतु सदरचा दर हा फक्त लावलेली जाहिरात काढणे व ती जागा पुर्ववत करणे याचेकरीता आहे. ज्या व्यक्तीने/जाहिरातदाराने जाहिरात लावलेली आहे त्यांना प्रशमन शुल्क म्हणुन र.रु.375/- प्रती चौ.मी. इतकी रक्कम आकारावी असे मत आहे. अशी मिळुन र.रु.750/- प्रती चौ.मी.इतका दर आकारावा लागेल. अशा प्रकारच्या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी वर कारवाई करणेबाबत तत्कालीन आयुक्त सो यांनी आदेश क्रमांक-आ/7/कावि/418/2013 दि.14/10/2013 अन्वये आरोग्य निरिक्षक यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. परंतु त्यांच्याकडुन किती प्रशमन शुल्क आकारावा? याबाबत रक्कम ठरविणेत आलेली नव्हती. सदरची रक्कम निश्चित करणेस धोरण ठरविणे आवश्यक आहे. सदर

धोरणाची अंमलबजावणी करताना संबंधितांना प्रथम नोटीस देऊन जाहिरात काढणेस व सदरची जागा पुर्ववत करणेस फर्मावणेत यावे. नोटीस कालावधीमध्ये जाहिरात काढुन न घेतलेस त्यांचेवर कारवाई करणेत यावी. सबब महानगरपलिकेच्या मिळकतीवर व सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावणेत येणा-या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके लावून शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्या जाहिरात धारकांना र.रु.750/- प्रती चौ.मी. इतका प्रशमन शुल्क आकारणेस मान्यता देणेत यावी.

**मा.साधना मळेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके –** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- प्रशासनाचे वतीने महापालिकेच्या मिळकतीवर व सार्वजनिक ठिकाणी अनाधिकृतपणे लावणेत येणा-या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके लावुन शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्या जाहिरातधारकांना र.रु. ७५०/- प्रति चौ.मि. इतका प्रशमन शुल्क आकारणेस मान्यता मिळणेकामी विषय सादर केलेला आहे. तथापी पिंपरी चिंचवड शहरामध्ये महानगरपालिकेच्या रस्त्यावरील, उद्यानातील अथवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या झाडांवरही जाहिरांतीचे हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके लावुन विद्रुपीकरण करणेत येते त्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे. सबब विषयात नमुद केल्याप्रमाणेच रस्त्यावरील, उद्यानातील अथवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या झाडांवरही अनाधिकृतपणे जाहिरांतीचे हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके लावुन विद्रुपीकरण करणाऱ्यावरही प्रशमन शुल्क आकारण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौर साहेब, हा विषय चांगला आहे शहराचे विद्रूपीकरणाच्या दृष्टीने कोणी फ्लेक्स लावते. यात वाढवा, डबल घ्या. शहराच विद्रूपीकरण करतात, कुठलेही डीपी बॉक्स असतील किंवा कुठले बोर्ड असतील किंवा आपले बोर्ड आहेत त्याच्यावर पत्रक लावलेले आहेत. हा विषय चांगला आणलेला आहे. त्यामुळे आमचा तुम्हांला पाठींबा आहे. पण हा जो विषय आणलेला आहे यामध्ये अर्थकरण व्हायला नको. करायच असेलतर थेट कराव.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरच हा चांगला विषय आहे. पुर्ण शहरामध्ये आपण पाहीलतर मुख्य मुख्य चौकामध्ये आपल्या पालीकेच्या

जेवढया इमारती असतील, वर्कशॉप असतील इतरही महानगरपालिकेच्या वस्तु असतील त्या वस्तुवर विनाकारण कोणीही जाहीरात करत बसत आणि त्या जाहीराती वेगवेगळया प्रकारच्या असतात. माझी अशी नम्र विनंती आहे की नव्याने आपल्याकडे आता आयुक्तालय पण चालु झालेल आहे. त्या लोकांना सुध्दा कामाला लावल पाहीजे. जी लोक अनधिकृतरीत्या पोस्टर्स वगैरे लावतील त्यांच्यावर कायदयाने गुन्हा देखील दाखल करावा. जेणेकरुन या सर्व गोष्टीला आळा बसेल. जी लोक बस स्टॉपच्या ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना प्रशासनाला विश्वासात न घेता डायरेक्ट आपल्या चांगल्या वास्तूच विद्रूपीकरण करत असतीलतर नक्की त्यांच्यावर कायदयाची कार्यवाही झाली पाहीजे. दंड सुध्द ठिक आहे पण कायदयाने सुध्दा गुन्हा दाखल झाला पाहीजे. त्याचप्रमाणे डांगे चौकामधली स्वयंसेवी संस्था आहे त्यांच मी मनापासून हार्दीक अभिनंदन करतो गेल्या महीना दोन महीन्यामध्ये ही सर्व तरुण मुलं डांगे चौकाच्या खालचा जो परिसर आहे, कोणतीही परवा न करता स्वतःच्या स्वखर्चाने हे सर्व स्वच्छ करणे, पोस्टर्स काढणं हे स्वतः स्वयंसेवी संस्था करतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरीक असतील हे चांगल काम करतात त्याच्या बद्दल मी त्यांच मनापासून अभिनंदन करतो. पुन्हा एकदा सांगतो जे या शहराच विद्रूपीकरण करतील त्याच्यावर कायदयान्वये गुन्हा दाखल झाला पाहीजे. ही सूचना आपण मान्य करावी, धन्यवाद.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपला निगडीचा डेपो आहे त्याच काम तातडीने करुन घ्याव. विषय फार चांगला आहे, सुंदर आहे. स्वच्छ भारत या माध्यमातून हा विषय अतीशय सुंदर आहे. परंतु हे विषय करत असताना फक्त पेपरमध्ये बातमी येते, फायदा नाही. आयुक्त साहेबांना खुलासा विचारायचा आहे की आपण याच्यासाठी नियोजन कस केल आहे. कोणाच्या हातात कारभार दिल काय केल.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा दंड आकारण्याबद्दल माझ दुमत नाही. पण आपले कार्यकर्ते बर्थडेचे कटआऊट लावतात, त्याच काय. त्याला दंड आकारणार का. याच्यामध्ये कार्यकर्त्यांना जर वेठीस धरत असतीलतर कार्यकर्त्यांनी बर्थडे करु नाही का, त्यांनी कटआऊट लावू नये का. पेपरमध्ये जाहीरात दयायची म्हणलतर ४० हजाराच्या पुढ खर्च करावा लागतो. तरी यामध्ये बर्थडेचे कटआऊट असतीलतर ते धरले गेले नाही पाहीजे. आकाश चिन्हचे अधिकारी लगेच पकडतील. यामध्ये

सर्व कार्यकर्ते नाराज होतील. बर्थडेचे बोर्डाला हात नका लावू. फक्त जो लावीन त्याला सांगा की तुझा कटआऊट लगेच उदयाची उदया दोन दिवसात खाली घ्या.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय चांगला आहे पण अंमलबजावणी कशी करणार हा फार मोठा इश्यू आहे. आताच माईनी सांगीतल की वाढदिवसाचे फ्लेक्स वगळण्यात यावेत. विषय असा आहे की काम चांगल करायला जाणार परंतु काम करता येणार नाही. आता आपण बघीतलच असेल की शहरभरामध्ये वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळे फ्लेक्स लागलेले असतात. अधिका-यांना फोन करुन सांगीतल, काढायला गेलेतर आमच्या सारख्यांचा कुणाचातरी फोन येतो की माझा कार्यकर्ता आहे काढू नको म्हणून. आणि मग दंड वगैरे मला नाही वाटत वसुल होईल म्हणून. तरी केलेला प्रयत्न काही वाईट आहे असंही नाही. यामध्ये अस लिहील की सदर धोरणाची अंमलबजावणी करताना संबंधितांना प्रथम नोटीस देऊन जाहीरात काढणेस व सदरची जागा पुर्ववत करणेस फर्मावणेत यावे, म्हणजे काय. त्याचा वाढदिवस झाल्यावरच तो काढणार किंवा त्याची ती जाहीरात झाली की मगच काढणार. नोटीस कालावधीमध्ये जाहिरात काढुन न घेतलेस त्यांचेवर कारवाई करणेत यावी. जो अनधिकृतपणे फ्लेक्स लावेल किंवा स्टिकर लावेल किंवा स्टिक करेल त्यांना नोटीस दयायच काय कारण, कार्यवाहीच झाली पाहीजे. कारण त्यानी विद्रूपीकरण आपल्याला विचारुन केलेल नाही त्यामुळे त्याच्यावर कारवाई झाली पाहीजे. ज्या संस्था हे शहर वेगवेगळया ठिकाणी जावुन स्वच्छ करतात त्यांना सुध्दा आपण या उपक्रमामध्ये सामील करुन घेतल पाहीजे. त्यांच्या पाठीवर सुध्दा शाबासकीची थाप मारली पाहीजे. त्यांच्या माध्यमातून असेल, ज्येष्ठ नागरीक आहेत, महिला बचत गट आहेत त्यांच्या माध्यमातून सुध्दा आपण ही योजना खुप चांगल्या प्रकारे राबवू शकतो, नुसता दंड मारुन नाही साहेब, तर तुम्हांला लोकांमध्ये भावना रुजवावी लागेल हे शहर तुमच आहे हे शहर घाण करु नको म्हणून तुम्हांला सांगाव लागेल. परंतु त्याचबरोबर काही ठिकाणी अपरिहार्य कारणामुळे तुम्हांला परवानगी सुध्दा दयावी लागेल. मग परवानगीची पध्दत आपण सुटसूटीत करणार आहोत का. एक खिडकी करणार आहोत का आणि त्यांनी छापलेले जे बील आहेत, जसं आम्ही इलेक्शनला करतो की दहा दहा हजार हॅण्डबील छापले असतीलतर तेवढेच आम्ही बील तुम्हांला देतो, तस त्यांच्याकडे सुध्दा तुम्ही किती चिटकवणार आहात, कोणाकडन छापून घेतले, त्यांच्याकडच बील आलं का आणि तीतकेच चिटकवले गेले का याच्यावर मॉनेटरींग करणे मला वाटत

इम्पॉसीबल आहे. परंतु त्या इम्पॉसीबल मध्ये सुध्दा पॉसीबल हा शब्द असल्यामुळ मला असं वाटत तुम्ही तो दंड घेतला तो चांगला आहे. दंडाची रक्कम थोडीशी वाढवायला पाहीजे होती. जे हॅण्डबील आहेत त्याची साईज फार कमी आहे. एका चौ.मी.ला तर चौ.मी.मध्ये बसतच नाहीनां हॅण्डबील. म्हणजे पर्यायाने तो ३५० रुपये देणार. म्हणजे एकीकडे आपण सांगीतले की ३५०/- रु. हा त्याचा दंड विनापरवाना लावला म्हणून आणि प्रश्मन शुल्क ७५०/- रु. चौ.मी. केल. म्हणजे ती मुळ रक्कम पण कमी होते आणि प्रश्मन शुल्क सुध्दा कमी होते. मला असं वाटत की असे विषय आणताना, विषय आणा विषय आणण्याबद्दल आमच दुमत नाही. हे शहर चांगल करताना, स्वच्छ करताना जे तुम्हांला पाऊल उचलायचे आहेत ते उचला आम्ही तुमच्या बरोबर आहोत. परंतु घाई कशाची आहे. का आपण विषय अभ्यास करुन आणत नाहीत. मग चौ.मी. ला असेल आणि चौ.फुटामध्ये ते बसत नसेल तर आपण काय केल पाहीजे. जास्तीत जास्त हॅण्डबील किती मोठ असंत हे सगळ माहिती आहे. घाई घाई आणि घाई. आपणच ठराव करायचे, आपणच मागे घ्यायचे. प्रशासनाने या विषयाचा चांगला अभ्यास करावा. ज्या काही संस्था तुम्ही नेणार असाल त्यांची नाव दया, अधिका-याकडे आता तुम्ही गेलातर गणपती आहेत त्यानंतर नवरात्र आहे. दररोज कुणाचे न कोणाचेतरी वाढदिवस असतात. आम्ही साजरे करतो आमच्या नेत्यांचे असतात, आमच्या कार्यकर्त्याचे असतात. या सगळयां वरचा ताण फार मोठा आहे. तुम्ही इन्सेन्टीव्ह देत नाहीत. काम तुम्ही करुन घेता. एखादे कटआऊट काढायला गेल्यानंतर ज्या प्रकारची शिवीगाळ होते ती सुध्दा त्या अधिका-याने झेलायची. पोलीस प्रशासन मदत करत नाही, आपल्याकडन मदत होत नाही. त्यानी बघायच कुणाकड. जर अतिक्रमण विभाग सक्षम करायचा असेलतर याच्यामध्ये एक नियमावली ठरवा जसं अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात जर एखादया नगरसेवकांचा फोन गेलातर त्याच नगरसेवक पद रद्द का करण्यात येवू नये अशा दिलीप बंड साहेबांनी याठिकाणी आयुक्त असताना २००७ ला त्यांनी नगरसेवकांना नोटीसा बजावल्या होत्या. एक नाही दोन नाही तर जवळपास सदोतीस आडतीस नगरसेवकांना नोटीसा होत्या. अशा नोटीसा देवून टाका आणि कोणाचाही फोन येवू दयात त्या अधिका-याला सांगा रेकॉर्ड करा, तुमची नोटीस गेलीच पाहीजे. साहेब, हे जे काही चक्र आहेना ते जर तुम्हांला सुरळी करायच असेलतर साहेब, तुम्हांला त्याठिकाणी स्ट्रीक्ट व्हावच लागेल. मगाशी हातगाडयाच्या संदर्भात, पथारीच्या संदर्भात जसं आम्ही बोललो, क्विक फॅसिलीटी आहे आमची. आम्ही काय करतो इकड आल, इकड पत्रकार आहेत म्हणून त्यांनी

चांगल छापाव म्हणून चांगल बोलतो. वॉर्डात गेलतर आम्ही वेगळी भाषा करतो. हे जे काही आपल्याला वेगवेगळया प्रकारची माणस बघायला मिळतात. अनधिकृत फ्लेक्स लावला, अनधिकृत बांधकामाच्यामध्ये आला, अनधिकृत हातगाडी पथारीमध्ये आला, फोन आला, फ्लेक्स काढताना आला, स्टिकर काढताना आला, आम्हांला साहेब, अनधिकृतच्या संदर्भात नगरसेवक पद रद्द करण्याची जी नोटीस आहे कलम १० (ड) च्या नुसार आम्हांला बजावा आणि मग बघु किती लोक पाठींबा देतात. जोपर्यंत कायदा आपण कडक करणार नाहीत तोपर्यंत अशाप्रकारच्या नियमांच पालन होणार नाही पायमल्ली निश्चित होणार. ती पायमल्ली होवू नये म्हणून आपण त्याठिकाणी कडक पाऊल उचलावीत. साहेब, आपल्याला विनंती आहे आता गणपती लवकरच ठिकठिकाणी सजरा करण्याचे दिवस जवळ येतात, आपण प्रशासनाला कळवून टाका तीन दिवस आदि जास्तीत जास्त चार दिवस आदि तुम्ही स्टेज परवानगी दया. तुम्ही पंधरा पंधरा दिवस अगोदर स्टेज परवानगी देणार असाल रस्ता जर आडवणार असालतर कस होणार. तीन दिवस ते पाच दिवस आदि करा. दहा ते बारा दिवस गणपती असतो. हिंदूच आमच आराध्यदैवत आहे. संपुर्ण देश गणपती उत्सव साजरा करतो. पण त्याचबरोबर वाहतूक सुरळीत राहीली पाहीजे. त्यासाठी सुध्दा आपण तेवढेच प्रयत्न करण गरजेच आहे. तसे आपण एक आदेश काढावेत. कारण की जोपर्यंत आपण परवानगी देत नाहीत तोपर्यंत पोलीस प्रशासन परवानगी देत नाहीत. तुम्ही पोलीसाना कळवा. रस्त्याच्या कडेची एक बाजु सोडली पाहीजे. अर्धा रस्ता वाहतूकीसाठी मोकळा असला पाहीजे याची काळजी प्रशासनाने सुध्दा घेतली पाहीजे आणि तस आपण पोलीस प्रशासनाला कळवल सुध्दा पाहीजे. तुम्ही हा विषय मंजुर करणार आहेत, कारण की हा विषय चांगला आहे. परंतु याच्यामध्ये दंडाची जी रक्कम आहे ती तुम्ही एकदा निश्चित करा आणि हा विषय अभ्यास करुन सभागृहापुढे आणावा. एवढीच विनंती करते आणि थांबते, जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा.निर्मला गायकवाड -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सिमाताई ज्या बोलल्या त्याच्याशी मी मनापासून सहमत आहे. त्यांनी बरेच पॉईंट घेतले की जे माझ्या मनामध्ये शंका होती. आयुक्त साहेब, आपल्या शहरामध्ये डेंग्यूची साथ चालू आहे. जो तुम्ही कायदा आणता तो अभ्यासपुर्वक आणायला पाहीजे होता. त्यांच्या भावनेशी मी पुर्णपणे सहमत आहे. हे काम आरोग्याधिका-यांकडे देणार आहेत. त्यांनी फोटो काढायचे किंवा

त्याच्यावरती कसे करायचे. नंतर काय होणार, ऑलरेडी आरोग्य अधिका-यांनी त्या डेंग्यू साथीवरती किती दंड वसुल केला हे सांगाव. आज आपण हा कायदा आणतो, या कायदयाबरोबर  ज्या सक्षम अधिका-याकडे हे काम देणार आहेत त्याच्या माग प्रशासनाची आणि आपली सभागृहाची सगळयाची मिळून जर त्याच्या मागे ताकद असेलतरच तो सक्सेस होणार. नाहीतर हा फक्त जीबीमध्ये विषय आला आपण सगळयांनी चर्चा केली आणि कचरापेटीमध्ये गेला. आयुक्त साहेबाची चांगली भावना आहे, शहर स्वच्छ रहाव, चांगल रहाव आणि विद्रूपीकरण न व्हाव या भावनेतून मनापासून त्यांनी काहीतरी गोष्ट आणलेली आहे. आताच सिमाताईनी सांगीतल की याच्यावर पुर्णपणे अभ्यास करुन आणला पाहीजे. हा विषय घ्या वाटलतर त्याची रक्कम वाढवा परंतु सध्यातरी हा विषय तहकूब ठेवून पुढच्या मिटींगला घ्यावा. त्याच्यामध्ये जे काही बदल करायचे असतील त्यात चांगले बदल घेवून या, चांगल कायदे घेवून या. एकनाथदादा पवार असतील, पक्षाचे गटनेते असतील यांना घेवून बसा यांचे विचार घ्या याच्यामध्ये आपण काय काय टाकल पाहीजे. हे व्यवस्थित पणे घेवून व्यवस्थित अधिनियम तयार करुन, असा नियम करा कि कुठलाही राजकीय नेता असेल, सदस्य असेल त्यांनी त्याच्यामध्ये हास्तक्षेप करु शकत नाही. अशाप्रकारचे चेंजेस करुन आणा, धन्यवाद.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आदरणीय सिमाताईनी जो गणपती उत्सवाच्या मंडपाचा विषय घेतला त्याबाबतीत बोलायच होतं. ताई बोलल्या की त्याची अंमलबजावणी आयुक्त साहेब १०० टक्के करणार, कारण की ताईचा दरारा आम्ही दिडवर्षे झाले बघतो. ताई मी शहरातील गणेशमंडळाच्या वतीने बोलतो तुम्ही जो आता विषय घेतला तो शंभर टक्के मान्य पण आहे आणि एक गोष्ट आपल्याला सांभाळून घेतली पाहीजे. काही मंडळ ही गणेश उत्सावाची वर्षानुवर्षे वाट बघत असतात. एक एक सेट उभा करण्यासाठी काही गणेश मंडळ सहा सहा महीने आदि फिरतात की आपला या वर्षीचा देखावा काय पाहीजे यासाठी आणि विशेष म्हणजे पुणे महानगरपालिकेतर्फे श्रीमंत दगडूशेठ हालवाई ट्रस्ट मार्फत पिंपरी चिंचवड शहराच्या.....  ठिक आहे पिंपरी चिंचवडनी आजून त्या मंडळाला पारितोषीक दिल नाही, ते पेडींग आहे त्याच्याबद्दल मी निषेध व्यक्त करतो. पण ही मंडळ दगडू शेठ ट्रस्ट तर्फे पारितोषीक मिळवण्यासाठी आणि लोकमान्य टिळकानी सांगीतल आहे समाजामध्ये समाजप्रबोधन करण्यासाठी गणेश उत्सव आपण साजरा करत आहोत. त्याच्या मागचा हेतू एकच असतो की सर्व तरुण मंडळ एकत्र येतील आणि समाजप्रबोधन

करतील या दृष्टीकोनातून उत्सव मंडळ साजरा करत आहे. ताई तुमच्या सर्व गोष्टीशी आम्ही सहमत आहोत पण आयुक्तांनी आपण सांगीतल्याबरोबर दोन मिनीटात पॉईंट आऊट केल. हायवेला असेलतर शंभर टक्के आपल्या विचाराशी सहमत आहे पण मंडप आतमध्ये असेलतर त्याची थोडी दखल घ्यावी. कमीत कमी पंधरा दिवस ते एक महीना अगोदर त्याचा सेट बांधावा लागतो. तरी सहकार्य करावे, धन्यवाद.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय आयुक्त साहेबांकडून आलेला आहे. आयुक्त साहेब हा विषय आणताना आपण फ्लेक्सची एक पॉलीसी करावी की दोन फ्लेक्समध्ये किती अंतर असाव. त्याला काय रेट असावा. हे करत असताना आपण पाहील असेल की त्या जाहीरातीवर पब्लिक ट्रान्सपोर्ट सेवा चालते. पीएमपीएमएलच्या बसमधील जाहीराती असतील आणि जे अनधिकृत हे करतील त्यांच्यावर निश्चितच कार्यवाही करा. सचिनने सांगीतल्याप्रमाणे ताई म्हणल्याप्रमाणे पटकन कार्यवाही करु नका. कारण गणपती आहेत, सर्वाचेच कार्यकर्ते आहेत याच्यावर अंमलबजावणी झालीतर ते तुम्हा-आम्हांला बसू देणार नाहीत. परंतु त्यांच्यामुळे शहरातील रहदारीला त्रास होणार नाही याची काळजी घेवून त्यांना आदेश दया. ७५० रु. प्र.चौ. मी हा जो रेट सांगीतला आहे तो कसा काय केला, त्याच क्लेरीफिकेशन दया. सर्व जाहीराती इन्डोअर, आऊट डोर फ्लेक्स असतील किंवा गणपती काळामध्ये त्याना पाच ते दहा दिवसाची सुट असे केलेतर असं व्यवस्थित टाकावे. याचा तुम्ही व्यवस्थित अभ्यास करुन आणलातर तो निश्चित पेडमार्क होईल. व वर्षानुवर्ष त्या पॉलीसीला सर्व फॉलोअप करतील आणि त्याचा फायदा निश्चित शहराच्या सौंदरीकरणात होईल. आणि जेणेकरुन त्यातून महापालिकेला जे अर्निंग यायच आहे ते सुध्दा येईल. या सर्व गोष्टीचा अंतर्भाव करुन विषय करावा.

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी आष्टीकर साहेबांना एक प्रश्न विचारु इच्छितो की आपल्याकडे आता कोणते कोणते चार्जेस आहेत त्याबद्दल सांगावे.

**मा.आष्टीकर** **(प्र.अति.आयुक्त (१)) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्याकडे आता भांडार विभाग, प्रशासन विभाग, इलेक्शन आणि अति.आयुक्त (१) याचा अतिरीक्त चार्ज आहे. हे चार चार्ज माझ्याकडे आहेत.

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शहरामध्ये अनधिकृत फ्लेक्स हे आज नव्याने उभा केलेले नाहीत किंवा एका रात्रीत उभा केलेल नाहीत. बरेच वर्षापासून हे फ्लेक्स उभारणीच काम चालू आहे. आपण आता चर्चा करतो ती छोटयावरती पण शहरामध्ये जे मोठे होर्डींग्ज उभा झालेले आहेत ते दोन वर्षात चार वर्षात उभा झालेले नाहीत. दहा- पंधरा वर्षात थोडे थोडे करुन आज एवढया मोठया प्रमाणात उभे राहीलेले आहेत. याच्यावर कार्यवाही करण्याची मागणी आज सभागृहात पहील्यांदाच होते अशातलाही काही प्रकार नाही. येथून मागे ज्यावेळेस मी प्रथमतः निवडून आलो होतो त्यावेळेस या गोष्टीची मागणी केली होती. पण आजही याच्यावरती कुठलीही कारवाई झालेली नाही. तसेच शहरामध्ये जे अनधिकृत पोस्टर चिटकवले जातात त्या संदर्भात मागील सहा महीन्यापुर्वी मी स्वतः चिंचवड गावात चाफेकर चौक येथे जकात नाक्यापर्यंत स्वच्छता मोहीम घेतली होती आणि मी स्वतः तेथे आपल्या फिडरवरचे सर्व कागद काढले होते. त्यावेळेस प्रभाग अध्यक्ष मीच होतो आणि प्रभागात असताना त्याच्यावरती गुन्हा दाखल करण्याची मागणी करत होतो. पण त्यावरती कुठलाच गुन्हा दाखल झाला नाही. आयुक्त साहेब, अनधिकृत, अनधिकृत, अनधिकृत हा शब्द फक्त आपल्या प्रत्येक मिटींगमध्ये येतो. आज होर्डींग्जची परमीशन देताना अधिकृत आहे, परमीशन दिली म्हणजे अधिकृत झालं. ज्यांना परमीशन नाही ते अनधिकृत आहेत. पण महापालिका प्राधिकरण ऍक्वायर जागेमध्ये परमीशन देते आणि तीथले होर्डींग्ज अधिकृत होऊन जातात. अनधिकृत ईमारतीवरती आपण परवानगी देतो ते होर्डींग्ज अधिकृत होवून जातात. म्हणजे आपण त्यांना परवानगी देवून चुकीच असो, बरोबर असो ते अधिकृत झाले म्हणजे त्यांनी काहीही केलेतरी चालतं. ईथ लोकांनी गोरगरीबानी काही केल की त्याच्यावरती आपण छोटया मोठया प्रमाणावरती कारवाई दाखवतो आणि कारवाई झाली असे सांगतो. यामध्ये मला अस सुचवावस वाटत की अनधिकृत हा शब्द तेथे सुरवात होते, रेडझोन असु दया किंवा कुठही असू दया. आपल्या परवानगी शिवाय जी गोष्ट घडते त्याला आपण अनधिकृत म्हणतो. ज्यावेळेस आपण होर्डींग्जला परवानगी देतो आज कोटयावधी रुपयाचा व्यावसाय शहरामध्ये या होर्डींग्जवाल्यांनी करुन ठेवलेला आहे. बहुतांशी बोर्ड हे जुन्या सत्ताधारी लोकांनी किंवा सत्तेत असताना त्यावेळेस या गोष्टी होवून गेलेल्या आहेत. त्याच्यावरती त्याच काळात कारवाई झाली असतीतर आज ही वेळ आली नसती. आज एक होर्डींग्जची परमीशन घेतली जाते त्याच्यावरती दुसरा अनधिकृत होर्डींग्ज उभा केला जातो. दोनच्या जागी चार उभे केले

जातात. आपल्याला फक्त एका होर्डीग्जची माह्तिी असते किंवा आपण माहितीच्या अधिकारामध्ये सुध्दा त्या गोष्टी काढलेल्या आहेत पण प्रत्यक्ष फिरल्यानंतर त्याच्यात आणि याच्यात खुप तफावत दिसून येते. आपण ज्यावेळेस अनधिकृत बांधकामावरती कारवाई करतो त्यावेळेस आपले बीट निरीक्षक फिरत असतात तर ते बीट निरीक्षक फिरताना ठरावीक त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये किती बांधकाम चालू आहेत आणि किती बांधकामांवरती आपण कारवाई केलेली आहे ही जर आपण माहिती काढलीतर तुमच्या लक्षात या गोष्टी येतील. बीट निरीक्षकांच काम तेथे अनधिकृत बांधकाम काय काय चाललेले आहेत त्याची माहिती गोळा करुन आणायच असतं. सकाळी येतात दोन तीन तास चक्रा मारतात ऑफिसला त्याच्यानंतर ती लोक फिरकत सुध्दा नाहीत. त्यांच्याकडे फक्त दोन तीन तासाच काम असंत दुपारनंतर त्यांना पालीकेमध्ये बसून माहिती पुरवायची हे काम त्यांच्याकडे असतं. त्याच्यानंतर काय घडत हे सगळयांना माहिती आहे. वेगळ काही सांगण्याची गरज नाही. पण आज तेच अधिकारी जर संध्याकाळच्या वेळेस तास दोन तास फिरवलेतर आणि आता ज्या गोष्टीची आपण चर्चा करत होतो अनधिकृत हा कुठलाही विषय असू दयात, बांधकाम असू दयात, फ्लेक्स असू दयात किंवा पथारीवाले असू दयात. आज दुसर एक आपण केलेल आहे की सेंट्रलाईज करुन ठेवलेल आहे. अनधिकृतची कुठलीही कारवाई करायची म्हणलतर मग ती फ्लेक्सची असू दयात सेंट्रलाईज केल्यामुळे आपल्याला असं वाटत की त्याची ताकद वाढलेली आहे. जीथ शंभर लोकांचा ताफा जातो कारवाई करतो तीच शंभर लोक दहा वेगवेगळया ठिकाणी कामकाज करु शकतात. आज दहा ठिकाणची काम फक्त एकाच ठिकाणी होते. म्हणजे दिवसातून जिथ शंभर ठिकाणी कारवाई व्हायला पाहीजे होती तीथ आज दहा ठिकाणीच रिझल्ट आला म्हणून याच्यावरती आज दोन तास चर्चा झालेली आहे. ते दोन तास सुध्दा अपुरे पडलेले आहेत. अजून दोन तास जरी त्याच्यावर चर्चा झाली असतीतरी कोणाच समाधान झाल नसंत त्याच कारणच असं आहे की आपण जे अनधिकृतच्या संदर्भात पाऊल उचलतो ते पाऊल उचलताना ज्या गोष्टींचा विचार केला गेला पाहीजे त्याचा विचार न करता फक्त काहीतरी आपण नवीन आयडीया आणतो आणि त्या आयडीयाच किंवा कंपनीच रुपांतर कशात होतं याचा विचार न करता त्या दिशेनी चाललेलो आहोत. शहरामध्ये ज्या पध्दतीने कारवाई करण्यासाठी मॉप तयार करुन कारवाई करायचा विचार करतो, एक हातगाडी जिथ लागते ती हातगाडी एकाची दोन, दोनाची चार, चाराचे आठ, सोळा अशा पाच पन्नास ज्यावेळेस हातगाडया तयार होतात त्यावेळेस तेथे युनिटी तयार होते आणि त्या

युनिटीला तोडण्यासाठी आपल्याला एवढा मोठा मॉप तयार करावा लागतो. माझ म्हणण अस आहे की त्यांच्यावरती कारवाई त्याचवेळी केली पाहीजे. की ज्यावेळेस सुरवातीला एक दोन जण थांबतात त्याचवेळेस लक्ष दयायला पाहीजे परंतु त्याकडे लक्ष दयायला आपल्याकडे कोणीही नाही आणि ते नसल्यामुळे या गोष्टी वाढत जातात. आपण अनधिकृतवर कारवाई करण्यासाठी सेंट्रलाईज केल आहे जसं सेंट्रलाईज केल तसं मी निकम साहेबांना ब-याचवेळा फोन केला आहे. एकदाही कुठे कारवाई झालेली नाही. मी स्वतः बीर्ला हॉस्पिटलपासून वाल्हेकरवाडीला जो रस्ता जातो दोन्ही साईडला जैन शाळेची जागा आहे. तीथ जागा मालक कोणीही नसल्यामुळे तेथे कोणीही येतात डांगे चौका सारख स्वरुप आमच्या तेथे व्हायला दोन महीने पुष्कळ झाले. दोन महीन्यात तेथे डांगे चौका सारख स्वरुप तयार होईल आणि आज आपल्यालाही माहिती आहे की डांगे चौकात अतिक्रमण जे झालेल आहे ते अतिक्रमण आज आपण काढू शकतो का आणि किती दिवसात काढू शकतो. जरी काढू शकलो तरी किती दिवस आपण तस वातावरण टिकून ठेवू शकतो. त्यासाठी कुठलीही गोष्ट सुरवात जेथे होती त्यावेळेसच त्या दाबल्या गेल्यातर आणि वेळीच आपण जर एक टाका घातलातर पुढचे टाके घालायचे वाचतात. त्यामुळे या बाकीच्या पुढच्या गोष्टीवर विचार करण्यापेक्षा सुरवात ज्यावेळेस होती त्याचवेळेस बीमोड केलातर ते पुढ आपल्याला सर्वांना सोप जाईल. एवढच बोलतो आणि थांबतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर शहराच विद्रूपीकरण झाल नाही पाहीजे अस सगळया सन्मा. सदस्यांची भावना आहे. ज्यांनी ज्यांनी भाषण केल त्यांनी त्यानी हे मत व्यक्त केलं. आपल शहर हे स्वच्छ राहील पाहीजे, सुंदर दिसल पाहीजे अशी मानसीकता आहे याचा मला खरतर खुप आनंद वाटला. खरतर याच्या संदर्भात सांगीतल की खुप कमी दर आहेत. पण एखादा विषय ज्यावेळेस पहील्यांदा सभागृहामध्ये आणतो ती सुरवाततर झाली. एखादया विषयाला आपण एवढा दंड आकारला पुन्हा तो दंड कमी करा त्यासाठी आपल्याला काही करण्याची गरज लागते, तरी मला असं वाटत की आपण एक चांगली सुरवात या निमीत्ताने केलेली आहे. आपल्याला महिती आहे एवढे चांगले बीआरटीचे बसस्टॉप आपण केले त्या बसस्टॉपवर कोणीही येतं आणि चिटकून जातं. त्यांना असं वाटत की आपल्या स्वतःच्या व्यवसायाची हाक्काची जागा आहे. तसेच मुता-यामधील परिस्थिती बघतो. ही जी परिस्थिती आहे या परिस्थितीला एक चांगली

सुरवात करतो आणि चांगला प्रयत्न करतो. सन्मा. सदस्यांनी गणेश मंडळाच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. याठिकाणी उदया किंवा परवा पोलीस आयुक्तांबरोबर गणेश मंडळाचे सगळे पदाधिकारी व आपल्या सगळया पदाधिका-याबरोबर बैठक आहे आणि गणेशजी तर खर आपल्या सगळयाच आराध्य दैवत आहे. थोडासा गणपतीसाठी आपण त्रास सहन केलातर मला अस वाटत की मंडळालाही बर वाटेल कारण तेही कार्यकर्ते आपलेच आहेत. माझी तुम्हांला विनंती आहे त्याचबरोबर ट्रॅफिक किंवा हायकोर्टाचे जे निर्देश आहेत तेही पाळून आपल्याला त्याचा जास्तीत जास्त मदत करता येईल यादृष्टीने आपण सगळयानी प्रयत्न करु यात व मा.महापौरांना विनंती करतो की हा विषय मंजूर करुन पुढच्या विषयाला सुरवात करावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- २५८ विषय क्रमांक- ५

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/७/कावि/१२/२०१८ दि.०८/०८/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३०४१ दि.०८/०८/२०१८

महानगरपालिकेच्या सार्वजनिक जागेवर, रस्त्यावर, चौकाचौका मध्ये लावणेत येणा-या फ्लेक्स, हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी ठिकाणी अशा प्रकारचे जाहिरात करणेस महानगरपालिकेकडुन कोणत्याही प्रकारची परवानगी दिली जात नाही. सदर ठिकाणी लावणेत येणा-या अशा प्रकारच्या जाहिरात फ्लेक्सवर अतिक्रमण विभागाकडुन कारवाई केली जाते. शहरामध्ये महानगरपालिकेच्या मिळकतीवर ब-याच ठिकाणी हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी लावले जातात. त्यामुळे शहराचे विद्रुपीकरण होते. यावर अनेक वेळा मा.स्थायी समितीमध्ये चर्चा केली जाते. वर्तमानपत्रामध्ये सुध्दा अशा प्रकारच्या बातम्या येतात. अशा प्रकारच्या अनधिकृत लावणेत येणा-या जाहिरातदारांना आळा घालणेसाठी व त्यावर नियंत्रण येणेसाठी कारवाई करणेबाबत धोरण ठरविणेस मा.आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या मिळकतीवर चिकटविण्यात, लावणेत येणा-या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके यावर कारवाई करावयाची झालेस हे काढुन सदरची जागा पुर्ववत करणेस येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक स्थापत्य विभागाकडुन दिनांक 4/8/2018 रोजी च्या पत्रान्वये मागविणेत

आलेले आहेत. त्यांनी सदर कामासाठी र.रु.375/- प्रती चौ.मी.इतका दर कळविलेला आहे परंतु सदरचा दर हा फक्त लावलेली जाहिरात काढणे व ती जागा पुर्ववत करणे याचेकरीता आहे. ज्या व्यक्तीने/जाहिरातदाराने जाहिरात लावलेली आहे त्यांना प्रशमन शुल्क म्हणुन र.रु.375/- प्रती चौ.मी. इतकी रक्कम आकारावी असे मत आहे. अशी मिळुन र.रु.750/- प्रती चौ.मी.इतका दर आकारावा लागेल. अशा प्रकारच्या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके इत्यादी वर कारवाई करणेबाबत तत्कालीन आयुक्त सो यांनी आदेश क्रमांक-आ/7/कावि/418/2013 दि.14/10/2013 अन्वये आरोग्य निरिक्षक यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. परंतु त्यांच्याकडुन किती प्रशमन शुल्क आकारावा? याबाबत रक्कम ठरविणेत आलेली नव्हती. सदरची रक्कम निश्चित करणेस धोरण ठरविणे आवश्यक आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करताना संबंधितांना प्रथम नोटीस देऊन जाहिरात काढणेस व सदरची जागा पुर्ववत करणेस फर्मावणेत यावे. नोटीस कालावधीमध्ये जाहिरात काढुन न घेतलेस त्यांचेवर कारवाई करणेत यावी. सबब महानगरपलिकेच्या मिळकतीवर व सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावणेत येणा-या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके लावून शहराचे विद्रुपीकरण करणा-या जाहिरात धारकांना र.रु.750/- प्रती चौ.मी. इतका प्रशमन शुल्क आकारणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रशासनाचे वतीने महापालिकेच्या मिळकतीवर व सार्वजनिक ठिकाणी अनाधिकृतपणे लावणेत येणा-या हँडबिल्स, कागदी भिंतीपत्रके लावुन शहराचे विद्रुपीकरण करणा-या जाहिरातधारकांना र.रु. ७५०/- प्रति चौ.मि. इतका प्रशमन शुल्क आकारणेस मान्यता मिळणेकामी विषय सादर केलेला आहे.

तथापी पिंपरी चिंचवड शहरामध्ये महानगरपालिकेच्या रस्त्यावरील, उद्यानातील अथवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या झाडांवरही जाहिरांतीचे हँडबिल्स, कागदी भिंत्तीपत्रके लावुन विद्रुपीकरण करणेत येते त्यावरही कारवाई होणे आवश्यक आहे. सबब विषयात नमुद केल्याप्रमाणेच रस्त्यावरील, उद्यानातील अथवा इतर सार्वजनिक ठिकाणच्या झाडांवरही अनाधिकृतपणे जाहिरांतीचे हँडबिल्स, कागदी भिंत्तीपत्रके लावुन विद्रुपीकरण करणाऱ्यावरही प्रशमन शुल्क आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजेंद्र लांडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २५९ विषय क्रमांक- ६

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/११/कावि/८७६/२०१८ दि.०२/०८/२०१८
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.२८ दि.०३/०८/२०१८

पिंपरी चिंचवड महापालिकेतील मा.पदाधिकारी/अधिकारी यांनी महापालिकेच्या वाहनाऐवजी स्वतःचे खाजगी वाहन ऐच्छिक पध्दतीने शासकीय कामकाजासाठी वापरल्यास त्यापोटी खाजगी वाहन वापर खर्च अनुज्ञेय करण्याची योजना महापालिकेच्या दृष्टीने आर्थिक हिताचे असल्याने प्रशासन विभागाकडील विषय पत्र क्र.प्रशा/११/कावि/८७०/२०१७, दि.०६/१०/२०१७ अन्वये मा. विधी समिती ठराव क्र. ३७, दि.०६/१०/२०१७ व मा. महापालिका सभा ठराव क्र. ८९, दि.१६/१०/२०१७ अन्वये महापालिकेतील पदाधिकारी व अधिकारी यांचेकरिता वाहन वाटप धोरणानुसार वर्ग १ व वर्ग २ च्या वाहन देय अधिका-यांना व पदाधिका-यांना मनपाचे वाहना ऐवजी स्वतःचे खाजगी चारचाकी वाहन ऐच्छिक पध्दतीने शासकीय कामकाजासाठी वापरण्यास व त्यासाठी निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे व सदर धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे. धोरण आदेश क्र. प्रशा/११/कावि/१०५०/२०१७, दिनांक ०४/१२/२०१७ मधील अटी व शर्तीतील अनु.क्र. २ नुसार मनपा कामकाजासाठी वापरण्यात येणारे खाजगी वाहन हे मा. पदाधिकारी/अधिकारी यांच्या स्वतःच्या अथवा कुटुंबातील (पती / पत्नी / अविवाहीत मुलगा/अविवाहीत मुलगी/आई/वडील) या सदस्यांचे नांवावर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. परंतू सदर अटी मध्ये मनपा कामकाजासाठी वापरण्यात येणारे खाजगी वाहन हे मा.पदाधिकारी/अधिकारी यांच्या स्वतःच्या अथवा कुटुंबातील (पती/पत्नी /मुलगा /मुलगी/आई/ वडील) या सदस्यांचे नांवावर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. असा बदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सागर गवळी -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भाजपच्या काळामध्ये निर्णय झाला की आम्ही कुठल्याही गाडया वापरणार नाहीत. यामध्ये किती पदाधिका-यानी गाडया वापरल्या नाहीत किंवा वापरल्या आहेत आणि वापरल्या असतीलतर कोणी कोणी वापरल्या. वापरल्या नसतीलतर त्याचे पैसे कोणी कोणी घेतले. याची माहिती दयावी. महानगरपालिकेच्या ड्रायव्हराना आपण विस्थापीत करणार आहात का. आपल्या कामगारांचाही आपण विषय घेतला पाहीजे. जर खाजगी वाहन वापरल तर येथील जे ड्रायव्हर आहेत त्यांना कुठ ठेवणार आहेत. त्याला काही शिपाई म्हणूनतर वापरणार नाहीत. म्हणून त्याचाही खुलासा करावा. ज्यांनी ज्यांनी गाडया वापरल्या त्यांचा आणि ज्यांनी ज्यांनी गाडया वापरल्या नाहीत त्यांनी महानगरपालिकेच्या गाडया न वापरता पैसे घेतले त्याचा खुलासा व्हावा अशी विनंती आहे.

**मा.सचिन चिखले –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय चांगला आहे पण जे पदाधिकारी आहेत, जे प्रशासन आहे त्यांच स्वतःच खाजगी वाहन कामकाजासाठी वापरणार पण त्याच्यात काही लिमीटेशन आपण ठरवलेत का. दहा, वीस, तीस हजार खर्च किती देणार. का आपल कुठेही गाडी फिरवत बसायच दिवस रात्र त्याला काही लिमीटेशन आहेत का नाहीत.

**मा.महापौर-** याची लेखी स्वरुपात सर्व माहिती तुम्हांला दिली जाईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.बाबासाहेब त्रिभूवन -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- २६०  विषय क्रमांक- ७

दिनांक – ६.९.२०१८  विभाग- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.नगररचना/रहाटणी/८/२३०/२०१८, दि.०३/०७/२०१८
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१२
दि.२४/०७/२०१८

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्रं.टिपीएस - १८९३।१४१२।युडी- १३, दि. २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजुर विकास आराखड्यातील तसेच पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजुर विकास योजनेतील वगळलेल्या भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.टिपीएस- १८९३।१४१२।युडी- १३, दि. २८ डिसेंबर १९९९ अन्वये मंजुर झालेली आहे. सदर विकास आराखड्यातील काही क्षेत्र महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र. पीसीएन - १६९७।९३४।प्र.क्र.८९।नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यापैकी मौजे रहाटणी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजुर विकास योजनेतील स.नं. २८ पै, २९ पै, ३७ पै, ३८ पै. मधील १२.०० मी. रुंद रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. सदर रस्त्याची सुमारे ५८० मी. इतकी लांबी असून त्यापैकी स.नं. २८ पै, २९ पै. मधील २००.०० मी. लांबीचा रस्ता १२.०० मी. रुंदीनुसार विकसित झालेला आहे. उर्वरीत स.नं. ३७ पै. व ३८ पै. मधील रस्ता पुर्ण रुंदीचा विकसित झालेला नाही. या क्षेत्रात बांधकामे असून सदर रस्त्याच्या जागेचे भूसंपादन होणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावित रस्त्याखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नवीन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो– पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास योजनेतील गट नं.......

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.बाबासाहेब त्रिभूवन-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली नाही.

**मा.महापौर –** उपसूचना वगळून विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. कमल घोलप –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ८

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१५/२०१८ दि.२५/०६/२०१८

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.२४५ दि.२०/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागा मार्फत महानगरपालिका हद्दीमधिल ओला व सुका कचरा संकलन करण्यात येत असून प्रत्येक प्रभाग स्थरावर कचरा संकलनासाठी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठी छोट्या वाहनांची व्यवस्था महानगरपालिके मार्फत करण्यात आलेली आहे. तथापी ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलन करण्यासाठीची वाहने पार्किंग करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था नाही. त्यामुळे महानगरपालिका हद्दीमध्ये महानगरपालिकेच्या नियोजन प्राधिकरण कक्षेमधिल काही आरक्षित जागांमध्ये "ट्रान्सफर स्टेशन" या प्रयोजनार्थ जागा आरक्षित करणे आवश्यक वाटते. त्यास अनुसरुन मा. आयुक्त यांचा दिनांक २८/०७/२०१७ चे मंजूर प्रस्तावानुसार, तसेच आरोग्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २२/०३/२०१७ चे पत्रान्वये मागणी मौजे भोसरी (कासारवाडी) आ.क्र.३१ एस.टी.पी. अंतर्गत स.नं.५१४, मौजे सांगवी मधिल हरितपट्ट्यातील स.नं.८४, व मौजे भोसरी आ.क्र.४०५ अंतर्गत स.नं.२१० या ठिकाणी ४०० चौ.मी. क्षेत्राची जागा, तसेच मौजे पिंपळे निलख आ.क्र.३७४ गार्डन अंतर्गत स.नं.६५ मधिल

४०० चौ. मी. क्षेत्राची जागा १२.०० मी. रुंद पोहच रस्त्यासह महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये "ट्रान्सफर स्टेशन" या प्रयोजनार्थ आरक्षित करणेचा फेरबदल बाबत सर्व वैधानिक कार्यवाही करुन फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणेस मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.ज्ञानदेव थोरात -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो-

**मा.केशव घोळवे –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- २६१ विषय क्रमांक- ८

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१५/२०१८ दि.२५/०६/२०१८

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.२४५ दि.२०/०७/२०१८

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. उषा उर्फ माई ढोरे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ९

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.

नरवि/कावि/३६/१७८/२०१८ दि.९/०७/२०१८

२)मा.महापालिका सभा ठराव क्र.२४७ दि.२०/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित खाजगी जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीचा अवलंब करुन महापालिकेच्या ताब्यात घेण्यात येतात. त्यापैकी खाजगी वाटाघाटी हा एक जागा ताब्यात घेण्याचा पर्याय आहे. महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूचीमधील दर व सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांचे आधारे संपादनाखालील जागेचे मूल्यांकन करण्यात येते.

मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४, दिः- २०/११/२०१५ व ठराव क्र. ९१५, दिः- २९/८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचा धोरणात्मक निर्णय आहे. त्यानुसार मिळकतधारकाचे मिळकतीपैकी रस्त्याने / आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पर्यंत असल्यास रेडीरेकरनुसार होणारे मूल्यांकन अधिक १०० टक्के अतिरिक्त रक्कम, तर रस्त्याने / आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पेक्षा जास्त असल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मूल्यांकन अधिक ३० टक्के अतिरिक्त रक्कम मोबदला म्हणून अदा करण्याची प्रचलित पध्दत आहे.

विकास योजनेतील काही आरक्षणे/ रस्ते बाधित खाजगी मिळकती पाटबंधारे विभागामार्फत निश्चित केलेल्या नदी ते निळी पूररेषा यामधील निषिध्द क्षेत्रात आहेत. अशा आरक्षण/ रस्ता बाधित खाजगी मिळकती खाजगी वाटाघाटीने महापालिकेच्या ताब्यात देण्याबाबत प्रस्ताव महापालिकेस प्राप्त होतात. तथापी महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूचीत नदी ते निळी पूररेषा ( निषिध्द) क्षेत्रातील काही मिळकतींचे खूल्या जमीनीचे दर हे ना विकास विभागाचे मूल्य विभागात नमूद नसून विकसनक्षम ( उदा. रहिवास) विभागात नमूद आहे. त्यामुळे नदी ते निळी पूररेषा (निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण/ रस्ता बाधित मिळकतीवार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य

विभागात असल्यास मूल्यांकन करतांना किती दर विचारात घ्यावा याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूची विषयी असलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील सूचना क्र. २० ह) मध्ये विकास योजनेतील ना विकास / हरितपट्टा/ शेती विभागातील जमीनीसाठी वार्षिक मूल्य दर तक्त्यात स्वतंत्र मूल्य विभाग/ दर दिले नसल्यास सदर जमीन ज्या मूल्य विभागात समाविष्ट आहे त्या मूल्य विभागाच्या दराच्या ४० % दर व संबंधित जागेचे क्षेत्रासाठी स्थूल जमिनीबाबत असणारी सूचना क्र. १६ अ) येथील कोष्टक वापरुन मूल्यांकन करण्यात यावे असे नमूद आहे. याप्रमाणे नदी ते निळी पूररेषा ( निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण/ रस्ता बाधित मिळकती वार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य विभागात समाविष्ट असल्यास अशा मिळकतींचे मूल्यांकन त्या मूल्य विभागाच्या दराच्या ४० % दर विचारात घेऊन मा. महापालिका सभा ठराव  क्र. ७७४, दिः- २०/११/२०१५ व ठराव क्र. ९१५, दिः- २९/८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचे धोरणानुसार करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शत्रुघ्न काटे-** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-- मौजे वाकड येथील स.नं. १११ पै. मधील विकास योजनेस महाराष्ट्र नगरविकास विभाग क्र. टी.पी.एस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३ दि.१८/०८/२००९ अन्वये भागशः मंजूरी मिळालेली असून महाराष्ट्र नगरविकास विभाग, निर्णय क्र. टीपीएस-१८१२/१६०/सी.आर.-५८/१२/ पुर्नरचना नं. २७/१२ ई.पी.मंजूर/यु.डी.-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजुर झालेली आहे. सदर मंजुर विकास योजनेमध्ये स.नं. १११ पै. मधील जागा औदयोगीक विभागात समाविष्ट केलेली आहे.

मौजे वाकड येथील स.नं. १११ पै.हिस्सा नं. १/२ याठिकाणी श्री.चाणक्य एज्युकेशन सोसायटी यांना शैक्षणिक इमारतीकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने क्र. बी.पी./वाकड/४२/२००६, दि.११/०८/२००६ नुसार बांधकाम परवानगी  देण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री.चाणक्य एज्युकेशन सोसायटी या संस्थेने जागेवर शैक्षणिक इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. सदर बांधकाम परवानगी देतेवेळी या ठिकाणचा विकास आराखडा मंजूर झालेला नव्हता व प्रादेशिक विकास आराखडयात सदर जागा हरीत विभागात समाविष्ट होती.

त्यामुळे हरित विभागात अनुज्ञेय असणा-या शैक्षणिक वापरासाठी व अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधकाम परवानगी दिलेली आहे. प्रारुप विकास आराखडयात सदर जागा औदयोगिक क्षेत्रामध्ये दर्शवण्यात आलेली होती.

सदर भागाचा विकास आराखडा दि.०२/०३/२०१५ रोजी मंजूर झाला, परंतु विकास आराखडा मंजूर होताना अस्तित्वात असणारा जागेचा वापर विचारात न घेतल्यामुळे सदर जागा औदयोगिक विभागात समाविष्ट झालेली आहे. सदर ठिकाणी शाळा इमारत अस्तित्वात असल्याने सदर औदयोगिक विभागाचा फेरबदल निवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत यावी तसेच त्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही करुन प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करण्यास मा.महापलिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित खाजगी जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदीचा अवलंब करून महापालिकेच्या ताब्यात घेण्यात येतात. त्यापैकी खाजगी वाटाघाटी हा एक जागा ताब्यात घेण्याचा पर्याय आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४, दि.२०/११/२०१५ व ठराव क्र.९१५, दि. २९/०८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचा धोरणात्मक निर्णय आहे. त्यानुसार मिळकतधारकाचे मिळकतीपैकी रस्त्याने/आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पर्यंत असल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक १०० टक्के अतिरिक्त रक्कम, तर रस्त्याने/आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी.पेक्षा जास्त असल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक ३० टक्के अतिरिक्त रक्कम मोबदला म्हणून अदा करण्याची प्रचलित पद्धत आहे.

केंद्र शासनानचा नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार विकास योजनेतील विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित खाजगी जागा समुचित प्राधिकरणास तातडीने उपलब्ध व्हावेत तसेच जमीन मालकास योग्य मोबदला मिळावा हा हेतू आहे.

नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार रस्त्याने/आरक्षणाने बाधित क्षेत्रासाठी मोबदला द्यावयाचा झाल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक १०० टक्के अतिरिक्त रक्कम देणे बाबत तरतूद आहे. सदर कायदांतर्गत रस्त्याने/आरक्षणाने बाधित जागा ही हरित

विभागात अथवा नदी ते निळी पूररेषा (निषिद्ध) क्षेत्रातील आहे किंवा नाही याचा विचार केला जात नाही.

तरी शहराच्या नियोजनबद्द विकासासाठी मंजुर विकास योजनेतील रस्त्याने/आरक्षणाने बाधित जागा खाजगी मिळकतधारकांकडून मनपा मार्फत खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेताना जमीन मालकास हरित विभाग, नदी व निळी पुररेषेमधील क्षेत्रासाठी सुद्धा जमिनधारकास मोबदला देताना पुर्वी मा. महापालिका सभेमार्फत मंजूर झालेल्या प्रस्तावाप्रमाणे त्याच प्रमाणात मोबदला द्यावा. तसेच जमिनीचा दर हा रेडीरेकनर मधील ना विकास विभागातील न घेता सदर जमिनीचा रेडीरेकनर मध्ये त्या स.न./ग.न./सि.स.न. यासाठी जो दर नमूद केलेला आहे तोच दर विचारात घेऊन मोबदला अदा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २६२ विषय क्रमांक- ९

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
नरवि/कावि/३६/१७८/२०१८ दि.९/०७/२०१८
२)मा.महापालिका सभा ठराव क्र.२४७ दि.२०/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित खाजगी जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीचा अवलंब करुन महापालिकेच्या ताब्यात घेण्यात येतात. त्यापैकी खाजगी वाटाघाटी हा एक जागा ताब्यात घेण्याचा पर्याय आहे. महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूचीमधील दर व सर्वसाधारण मार्गदर्शक सूचनांचे आधारे संपादनाखालील जागेचे मूल्यांकन करण्यात येते.

मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४, दिः- २०/११/२०१५ व ठराव क्र. ९१५, दिः-२९/८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचा धोरणात्मक निर्णय आहे. त्यानुसार मिळकतधारकाचे मिळकतीपैकी रस्त्याने / आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पर्यंत असल्यास रेडीरेकरनुसार होणारे मूल्यांकन अधिक १०० टक्के अतिरिक्त रक्कम, तर रस्त्याने / आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पेक्षा जास्त असल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मूल्यांकन अधिक ३० टक्के अतिरिक्त रक्कम मोबदला म्हणून अदा करण्याची प्रचलित पध्दत आहे.

विकास योजनेतील काही आरक्षणे/ रस्ते बाधित खाजगी मिळकती पाटबंधारे विभागामार्फत निश्चित केलेल्या नदी ते निळी पूररेषा यामधील निषिध्द क्षेत्रात आहेत. अशा आरक्षण/ रस्ता बाधित खाजगी मिळकती खाजगी वाटाघाटीने महापालिकेच्या ताब्यात देण्याबाबत प्रस्ताव महापालिकेस प्राप्त होतात. तथापी महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूचीत नदी ते निळी पूररेषा ( निषिध्द) क्षेत्रातील काही मिळकतींचे खूल्या जमीनीचे दर हे ना विकास विभागाचे मूल्य विभागात नमूद नसून विकसनक्षम ( उदा. रहिवास) विभागात नमूद आहे. त्यामुळे नदी ते निळी पूररेषा (निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण/ रस्ता बाधित मिळकतीवार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य विभागात असल्यास मूल्यांकन करतांना किती दर विचारात घ्यावा याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्र शासनाचे नोंदणी व मुद्रांक विभागाचे वार्षिक मुल्यदर सूची विषयी असलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील सूचना क्र. २० ह) मध्ये विकास योजनेतील ना विकास / हरितपट्टा/ शेती विभागातील जमीनीसाठी वार्षिक मूल्य दर तक्त्यात स्वतंत्र मूल्य विभाग/ दर दिले नसल्यास सदर जमीन ज्या मूल्य विभागात समाविष्ट आहे त्या मूल्य विभागाच्या दराच्या ४० % दर व संबंधित जागेचे क्षेत्रासाठी स्थूल जमिनीबाबत असणारी सूचना क्र. १६ अ) येथील कोष्टक वापरुन मूल्यांकन करण्यात यावे असे नमूद आहे. याप्रमाणे नदी ते निळी पूररेषा (निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण/ रस्ता बाधित मिळकती वार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य विभागात समाविष्ट असल्यास अशा मिळकतींचे मूल्यांकन त्या मूल्य विभागाच्या दराच्या ४० % दर विचारात घेऊन मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४, दि. २०/११/२०१५ व ठराव क्र. ९१५, दिः- २९/८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला

अदा करण्याविषयीचे धोरणानुसार करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे वाकड येथील स.नं. १११ पै. मधील विकास योजनेस महाराष्ट्र नगरविकास विभाग क्र. टी.पी.एस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/नवि-१३ दि.१८/०८/२००९ अन्वये भागश: मंजूरी मिळालेली असून महाराष्ट्र नगरविकास विभाग, निर्णय क्र. टीपीएस-१८१२/१६०/सी.आर.-५८/१२/ पुर्नरचना नं. २७/१२ ई.पी.मंजूर/यु.डी.-१३ दि.०२/०३/२०१५ अन्वये विकास योजना मंजुर झालेली आहे. सदर मंजुर विकास योजनेमध्ये स.नं. १११ पै. मधील जागा औदयोगीक विभागात समाविष्ट केलेली आहे.

मौजे वाकड येथील स.नं. १११ पै.हिस्सा नं. १/२ याठिकाणी श्री.चाणक्य एज्युकेशन सोसायटी यांना शैक्षणिक इमारतीकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने क्र. बी.पी./वाकड/४२/२००६, दि.११/०८/२००६ नुसार बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री.चाणक्य एज्युकेशन सोसायटी या संस्थेने जागेवर शैक्षणिक इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. सदर बांधकाम परवानगी देतेवेळी या ठिकाणचा विकास आराखडा मंजूर झालेला नव्हता व प्रादेशिक विकास आराखडयात सदर जागा हरीत विभागात समाविष्ट होती. त्यामुळे हरित विभागात अनुज्ञेय असणा-या शैक्षणिक वापरासाठी व अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधकाम परवानगी दिलेली आहे. प्रारुप विकास आराखडयात सदर जागा औदयोगिक क्षेत्रामध्ये दर्शवण्यात आलेली होती.

सदर भागाचा विकास आराखडा दि.०२/०३/२०१५ रोजी मंजूर झाला, परंतु विकास आराखडा मंजूर होताना अस्तित्वात असणारा जागेचा वापर विचारात न घेतल्यामुळे सदर जागा औदयोगिक विभागात समाविष्ट झालेली आहे. सदर ठिकाणी शाळा इमारत अस्तित्वात असल्याने सदर औदयोगिक विभागाचा फेरबदल निवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच त्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही करुन प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करण्यास मा.महापलिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित खाजगी जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदीचा अवलंब करून महापालिकेच्या ताब्यात घेण्यात येतात. त्यापैकी खाजगी वाटाघाटी हा एक जागा ताब्यात घेण्याचा पर्याय आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.७७४, दि. २०/११/२०१५ व ठराव क्र.९१५, दि. २९/०८/२०१६ याव्दारे खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचा धोरणात्मक निर्णय आहे. त्यानुसार मिळकतधारकाचे मिळकतीपैकी रस्त्याने/आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी. पर्यंत असल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक १०० टक्के अतिरिक्त रक्कम, तर रस्त्याने/आरक्षणाने बाधित क्षेत्र ३०० चौ.मी.पेक्षा जास्त असल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक ३० टक्के अतिरिक्त रक्कम मोबदला म्हणून अदा करण्याची प्रचलित पद्धत आहे.

केंद्र शासनानचा नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार  विकास योजनेतील विविध सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित खाजगी जागा समुचित प्राधिकरणास तातडीने उपलब्ध व्हावेत तसेच जमीन मालकास योग्य मोबदला मिळावा हा हेतू आहे.

नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार रस्त्याने/आरक्षणाने बाधित क्षेत्रासाठी मोबदला द्यावयाचा झाल्यास रेडीरेकनर नुसार होणारे मुल्यांकन अधिक १०० टक्के अतिरिक्त रक्कम देणे बाबत तरतूद आहे. सदर कायदांतर्गत रस्त्याने/आरक्षणाने बाधित जागा ही हरित विभागात अथवा नदी ते निळी पूररेषा (निषिद्ध) क्षेत्रातील  आहे किंवा नाही याचा विचार केला जात नाही.

तरी शहराच्या नियोजनबद्द विकासासाठी मंजुर विकास योजनेतील रस्त्याने/आरक्षणाने बाधित जागा खाजगी मिळकतधारकांकडून मनपा मार्फत खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेताना जमीन मालकास हरित विभाग, नदी व निळी पुररेषेमधील क्षेत्रासाठी सुद्धा जमिनधारकास मोबदला देताना पुर्वी मा. महापालिका सभेमार्फत मंजूर झालेल्या प्रस्तावाप्रमाणे त्याच प्रमाणात मोबदला द्यावा. तसेच जमिनीचा दर हा रेडीरेकनर मधील ना विकास विभागातील न घेता सदर जमिनीचा रेडीरेकनर मध्ये त्या स.न./ग.न./सि.स.न. यासाठी जो दर नमूद केलेला आहे तोच दर विचारात घेऊन मोबदला अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १०

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.

नरवि/कावि/०६/ताथवडे/२२३१/१८ दि.२७/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या मौजे ताथवडे क्षेत्राच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस – १८१५/२०१२/प्र.क्र.- ८४/१५/वियो मंजूरी/नवि-१३, दिनांक – ०६/०१/२०१७ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस – १८१५/२०१२/प्र.क्र.- ८४/१५/ई.पी. प्रसिध्दी/नवि-१३, दिनांक – ०६/०१/२०१७ अन्वये मौजे ताथवडे, येथील विकास योजनेला भागश: मंजूरी मिळालेली आहे.भागश:मंजुर विकास योजनेत मुंबई – बँगलोर ६०.०० मी. रुंदीचा रस्ता दर्शविण्यात आला आहे.

मौजे ताथवडे गावातील सदर रस्त्यासाठी पुणे प्रादेशिक विकास योजनेत मुंबई – बँगलोर ६०.००मी रस्त्यास लागुन रस्त्याच्या दोन्ही बाजुस १२.०० मी. सेवा रस्ता म्हणून दर्शविण्यात आलेला होता व त्याअनुषंगाने सदर रस्त्याच्या लगत असलेल्या मिळकतीस विकास परवानग्या अनुज्ञेय करण्यात येत होत्या. मात्र भागश:मंजुर विकास योजनेत पुणे प्रादेशिक विकास योजनेप्रमाणे मुंबई – बँगलोर ६०.००मी रस्त्यास लागुन रस्त्याच्या दोन्ही बाजुस १२.०० मी. सेवा रस्ता दर्शविलेला नाही मौजे ताथवडे गावाच्या पश्चिम्म बाजुस पुनावळे हद्दीत व पुर्व बाजुस वाकड हद्दीत मुंबई – बँगलोर ६०.०० मी रस्त्याला लागुन १२.०० मी. सेवा रस्ता मंजुर विकास योजनेत दर्शविण्यात आला आहे. मौजे ताथवडे गावातील भागश: मंजूर विकास योजनेत १२.० मी. रूंद रस्ता दर्शविले नसल्यामुळे भविष्यात सदर मौजे वाकड – ताथवडे – पुनावळे गावातील १२.०० मी सर्व्हीस रस्त्यामार्फत Connectivity होण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे.

सबब मौजे ताथवडे येथील मनपाच्या हद्दीतील मुंबई–बँगलोर रस्त्यालगत ६०.०० मी रस्त्याच्या दोन्ही बाजुने १२.०० मी चा सर्व्हीस रस्ता प्रस्तावित करण्यास व त्याअनुषंगाने लगत असलेल्या आरक्षणाचे हद्दीत/ क्षेत्रात सुधारणा करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- दिघी येथील स.नं. ६४, ८७ पैकी मधील आरक्षण क्र. १/१३४ जकातनाक्यासाठी ०.८० हेक्टर इतके क्षेत्र आहे. सदर आरक्षणाच्या बाजूस सद्यस्थितीस स्मशानभूमी आहे. सद्या जकात कर बंद झाल्याने जकात नाके बंद झालेले आहेत परंतु सदर स्मशानभुमीची जागा खुपच लहान असल्याने कमी पडत आहे. दिघी येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्मशानभुमीसाठी जास्तीची जागा लागणार आहे. तसेच भविष्यात सदर ठिकाणी विदयुतदाहीनी बांधावी लागणार आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाची जागा जकात नाका ऐवजी स्मशानभुमी वापरासाठी असा बदल करणेस मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिखली येथील साने चौक ते सतसंग चौका पर्यंत मंजुर विकास योजनेत ३० मी. रुंद रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. तथापि साने चौकाच्या पुढे स्पाईन रस्त्यापर्यंत मंजुर विकास योजनेत २४ मी. रस्ता आहे तसेच सतसंग चौकाच्या पुढे चिखली पर्यंत मंजुर विकास योजनेत २४ मी. रस्ता आहे. त्यामुळे दोन्ही बाजुला २४ मी. रस्ते असताना मध्येच ३० मी. रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे. त्यामुळे सदर ३० मी. रस्ता सुध्दा २४ मी. करणेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.संदिप कस्पटे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिंचवडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- २६३ विषय क्रमांक- १०

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
नरवि/कावि/०६/ताथवडे/२२३१/१८ दि.२७/०७/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या मौजे ताथवडे क्षेत्राच्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ ( १ ) अन्वये महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस – १८१५/२०१२/प्र.क्र.- ८४/१५/वियो मंजूरी/नवि-१३, दिनांक – ०६/०१/२०१७ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस – १८१५/२०१२/प्र.क्र.- ८४/१५/ई.पी. प्रसिध्दी/नवि-१३, दिनांक – ०६/०१/२०१७ अन्वये मौजे ताथवडे, येथील विकास योजनेला भागशः मंजूरी मिळालेली आहे.भागशः मंजुर विकास योजनेत मुंबई – बॅंगलोर ६०.०० मी. रुंदीचा रस्ता दर्शविण्यात आला आहे.

मौजे ताथवडे गावातील सदर रस्त्यासाठी पुणे प्रादेशिक विकास योजनेत मुंबई – बॅंगलोर ६०.००मी रस्त्यास लागुन रस्त्याच्या दोन्ही बाजुस १२.०० मी. सेवा रस्ता म्हणून दर्शविण्यात आलेला होता व त्याअनुषंगाने सदर रस्त्याच्या लगत असलेल्या मिळकतीस विकास परवानग्या अनुज्ञेय करण्यात येत होत्या. मात्र भागशः मंजुर विकास योजनेत पुणे प्रादेशिक विकास योजनेप्रमाणे मुंबई – बॅंगलोर ६०.००मी रस्त्यास लागुन रस्त्याच्या दोन्ही बाजुस १२.०० मी. सेवा रस्ता दर्शविलेला नाही मौजे ताथवडे गावाच्या पश्चिम बाजुस पुनावळे हद्दीत व पुर्व बाजुस वाकड हद्दीत मुंबई – बॅंगलोर ६०.०० मी रस्त्याला लागुन १२.०० मी. सेवा रस्ता मंजुर विकास योजनेत दर्शविण्यात आला आहे. मौजे ताथवडे गावातील भागशः मंजूर विकास योजनेत १२.० मी. रूंद रस्ता दर्शविले नसल्यामुळे भविष्यात सदर मौजे वाकड – ताथवडे – पुनावळे गावातील १२.०० मी सर्व्हीस रस्त्यामार्फत Connectivity होण्यास अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे.

सबब मौजे ताथवडे येथील मनपाच्या हद्दीतील मुंबई–बॅंगलोर रस्त्यालगत ६०.०० मी रस्त्याच्या दोन्ही बाजुने १२.०० मी चा सर्व्हीस रस्ता प्रस्तावित करण्यास व त्याअनुषंगाने

लगत असलेल्या आरक्षणाचे हद्दीत/ क्षेत्रात सुधारणा करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच दिघी येथील स.नं. ६४, ८७ पैकी मधील आरक्षण क्र. १/१३४ जकातनाक्यासाठी ०.८० हेक्टर इतके क्षेत्र आहे. सदर आरक्षणाच्या बाजूस सद्यस्थितीस स्मशानभूमी आहे. सद्या जकात कर बंद झाल्याने जकात नाके बंद झालेले आहेत परंतु सदर स्मशानभुमीची जागा खुपच लहान असल्याने कमी पडत आहे. दिघी येथील वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्मशानभुमीसाठी जास्तीची जागा लागणार आहे. तसेच भविष्यात सदर ठिकाणी विदयुतदाहीनी बांधावी लागणार आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाची जागा जकात नाका ऐवजी स्मशानभुमी वापरासाठी असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे चिखली येथील साने चौक ते सतसंग चौका पर्यंत मंजुर विकास योजनेत ३० मी. रुंद रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. तथापि साने चौकाच्या पुढे स्पाईन रस्त्यापर्यंत मंजुर विकास योजनेत २४ मी. रस्ता आहे तसेच सतसंग चौकाच्या पुढे चिखली पर्यंत मंजुर विकास योजनेत २४ मी. रस्ता आहे. त्यामुळे दोन्ही बाजुला २४ मी. रस्ते असताना मध्येच ३० मी. रुंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे. त्यामुळे सदर ३० मी. रस्ता सुध्दा २४ मी. करणेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शर्मिला बाबर -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ११

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र

क्र.स्वभाअक/३/कावि/२४९/२०१८ दि.०४/०८/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०७/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र“अ”

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | १४५१९ | |

| | | | |
|---|---|---|---|
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १४२२० | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ११२७७ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण- १०७८१ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ७१४० सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३६४१ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ७९५१ लाभार्थी | GOI+GOM=४७७.०६ लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १५९.०२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६३६.०८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ७०४१ लाभार्थी | GOI+GOM=४२२.४६ लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१४०.८२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५६३.२८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.कमल घोलप -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- क क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र. २ मधील खालील विकास कामांचा सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मधील गट नं. ६०६ आरक्षण १/१४६ येथे माध्यमिक शाळा इमारत बांधणे. | २७,००,००,००० | |
| २ | प्रभाग क्र. २ मधील मनपाचे विवीध सांस्कृतीक कार्यक्रम व क्रिडा विभागामार्फत भरविण्यात येणा-या स्पर्धासाठी मंडप व्यवस्था करणे. | ५०,००,००० | |
| ३ | प्रभाग क्र. २ मध्ये अस्तित्वातील मोडकळीस आलेली सार्वजनिक स्वच्छतागृह पाडून त्याठिकाणी नविन स्त्री व पुरुषांसाठी सुलभ स्वच्छतागृह बांधणे. | ३,५०,००,००० | |
| | एकूण | ३१,००,००,००० | |

तरी वरील प्रमाणे कामे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १६ मधील मामुर्डी हद्दीलगत गहुंजे ग्रामपंचायतीची हद्द आहे. गहुंजे हद्दीमध्ये गट क्र. १८४, १८६, १८९, १९०, १९२, १९५, २२२, २२३, २२४ पेनिनसुला लँण्ड लि. (पुर्वीचे नाव- सिटी पार्कस प्रा. लि.) या कंपनीतर्फे विकसित करणेत येत आहे. सदर विकसित करणेत येत असलेल्या निवासी/बिगरनिवासी प्रकल्पासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मा.महापालिका सभा ठराव क्र. ८२ दिनांक २०/०२/२०१० अन्वये

१०२० केएलडी पाणी पुरवठा करणेस मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन पाणीपुरवठा होत आहे. सद्यस्थितीत होणारा पाणीपुरवठा हा कमी पडत असुन अत्यल्प आहे. तरी सदर पाणीपुरवठ्यात अजुन १२३० केएलडी अतिरिक्त पाणी पुरवठा होणे अपेक्षित आहे. पुर्वीचा होत असलेला १०२० केएलडी व आताची मागणी १२३० केएलडी असे एकुण २२५० केएलडी पाणीपुरवठा होणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत यावी. तसेच १) प्रभाग क्र. २ मधील बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना आश्वरुढ पुतळा उभारणे व अनुषंगिक कामे करणे (पान क्र. ३७ अ.क्र.१५९) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आला असुन या कामाचे नावामध्ये “प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वरुढ पुतळा उभारणेकामी अनुषंगिक कामे करणे” असा बदल करणेस मान्यता देणेत यावी.

२) प्रभाग क्र. ५ जाधववाडी कुदळवाडी मधील डि.पी. रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ५०/४-२०१७-१८) या चालू असलेल्या कामामधुन नवीन प्रभाग क्र. २ मधील डिपी. व नॉन डिपी. रस्त्याचीं काम करणेस मान्यता देणेत यावी.

३) प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे (पान क्र. ५५/ अ.क्र.२७) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश असून या कामास रक्कम रुपये १६ कोटीचे खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.
**मा.शर्मिला बाबर –** मा.महापौर साहेब, उपूसचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – २६४ विषय क्रमांक- ११
दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/२४९/२०१८ दि.०४/०८/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०७/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र"अ"

<table>
<tr><th colspan="2">महानगरपालिकेचे नाव</th><th>पिंपरी चिंचवड महानगरपालिका</th><th>शेरा</th></tr>
<tr><td colspan="2">जिल्हा</td><td>पुणे</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या</td><td>१४५१९</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">केंद्र शासनाचे "स्वच्छ भारत अभियान"च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या</td><td>१४२२०</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">मंजूर अर्जांची एकूण संख्या</td><td>११२७७</td><td></td></tr>
<tr><td>बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या</td><td>वैयक्तिक घरगुती शौचालय</td><td>एकुण बांधकाम पुर्ण- १०७८१</td><td>मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ७१४० सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३६४१</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ७९५१ लाभार्थी | GOI+GOM=४७७.०६लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १५९.०२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६३६.०८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ७०४१ लाभार्थी | GOI+GOM=४२२.४६लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१४०.८२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५६३.२८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे. तसेच क क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र. २ मधील खालील विकास कामांचा सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | शेरा |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मधील गट नं. ६०६ आरक्षण १/१४६ येथे माध्यमिक शाळा इमारत बांधणे. | २७,००,००,००० | |
| २ | प्रभाग क्र. २ मधील मनपाचे विवीध सांस्कृतीक कार्यक्रम व क्रिडा विभागामार्फत | ५०,००,००० | |

| | | | |
|---|---|---|---|
| | भरविण्यात येणा-या स्पर्धासाठी मंडप व्यवस्था करणे. | | |
| ३ | प्रभाग क्र. २ मध्ये अस्तित्वातील मोडकळीस आलेली सार्वजनिक स्वच्छतागृह पाडून त्याठिकाणी नविन स्त्री व पुरुषांसाठी सुलभ स्वच्छतागृह बांधणे. | ३,५०,००,००० | |
| | एकूण | ३१,००,००,००० | |

तरी वरील प्रमाणे कामे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करुन अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १६ मधील मामुर्डी हद्दीलगत गहुंजे ग्रामपंचायतीची हद्द आहे. गहुंजे हद्दीमध्ये गट क्र. १८४, १८६, १८९, १९०, १९२, १९५, २२२, २२३, २२४ पेनिनसुला लॅण्ड लि. (पुर्वीचे नाव- सिटी पार्कस प्रा. लि.) या कंपनीतर्फे विकसित करणेत येत आहे. सदर विकसित करणेत येत असलेल्या निवासी/बिगरनिवासी प्रकल्पासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मा. महापालिका सभा ठराव क्र. ८२ दिनांक २०/०२/२०१० अन्वये १०२० केएलडी पाणी पुरवठा करणेस मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन पाणीपुरवठा होत आहे. सद्यस्थितीत होणारा पाणीपुरवठा हा कमी पडत असुन अत्यल्प आहे. तरी सदर पाणीपुरवठ्यात अजुन १२३० केएलडी अतिरिक्त पाणी पुरवठा होणे अपेक्षित आहे. पुर्वीचा होत असलेला १०२० केएलडी व आताची मागणी १२३० केएलडी असे एकुण २२५० केएलडी पाणीपुरवठा होणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच १) प्रभाग क्र. २ मधील बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना आश्वरुढ पुतळा उभारणे व अनुषंगिक कामे करणे (पान क्र. ३७ अ.क्र.१५९) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आला असुन या कामाचे नावामध्ये “प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वरुढ पुतळा उभारणेकामी अनुषंगिक कामे करणे” असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

२) प्रभाग क्र. ५ जाधववाडी कुदळवाडी मधील डि.पी. रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ५०/४-२०१७-१८) या चालू असलेल्या कामामधुन नवीन प्रभाग क्र. २ मधील डिपी. व नॉन डिपी. रस्त्याचीं काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

३) प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे (पान क्र. ५५/ अ.क्र.२७) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश असून या कामास रक्कम रुपये १६ कोटीचे खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १२

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
मातंवि/२/कावि/३०/१८ दि.८/०८/२०१८

केंद्र शासनामार्फत नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी स्वच्छ, शाश्वत व पर्यावरण पुरक शहरे तयार करण्यासाठी "स्मार्ट सिटी अभियान" या महत्वकांक्षी अभियानाची घोषणा मा. प्रधानमंत्री महोदयांच्या हस्ते दि. २५/०६/२०१५ रोजी करणेत आलेली होती.

केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार Smart City Proposal तयार करणेकरिता चार मुख्य पर्याय सुचवले आहेत. १) Retrofitting २) Redevelopment ३) Green Field आणि ४) १ ते ३ पैकी पर्यायांचा एकत्रित अवलंब करणे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने Retrofitting या पर्यायाचा प्राधान्याने वापर करून Smart City Proposal तयार केलेले आहे. महानगरपालिकामार्फत तयार करणेत आलेल्या Smart City Proposal मध्ये प्रामुख्याने Area Based Development (ABD) आणि Pan City Solutions हे दोन घटक असून त्यांचे करीता एकूण

र.रू.११४९.२ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पांचा समावेश आहे. त्यापैकी Area Based Development (ABD) चे अंतर्गत एकूण र.रू.५९३.६७ कोटी इतक्या व Pan City Solutions अंतर्गत एकूण र.रू ५५५.५३ कोटी इतक्या रक्कमेच्या प्रकल्पांचा समावेश करणेत आलेला आहे.

केंद्र शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा स्मार्ट सिटी अभियानांतर्गत तिस-या फेरीत निवड केलेनंतर राज्यस्तरीय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता विशेष उद्देश वहन(एस.पी.व्ही) स्थापन करणेबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. स्मार्टसि-२०१६/प्र.क्र.५०३/नवि -२३ दि.९ जानेवारी २०१७ अन्वये मान्यता दिलेली असुन महानगरपालिकेने विशेष उद्देश वहन(एस.पी.व्ही) चे तात्काळ गठन करणेकामी निर्देश दिलेले होते व महाराष्ट्र शासनाकडुन निश्चित केलेल्या अटी शर्तीनुसार दि. १३ जुलै २०१८ रोजी " पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड " या नावाने विशेष उद्देश वहन स्थापन करणेत आलेली आहे.

केंद्र शासनाने घोषित केलेल्या स्मार्ट सिटी अभियानाचा कालावधी पाच वर्ष असुन या योजनेत प्रत्येक पात्र शहराला पाच वर्षाच्या कालावधीत अंदाजे रु. ५०० कोटींचे केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त होणार असुन राज्य शासनाचा अनुदान हिस्सा रु. २५० कोटी व महानगरपालिकेचा स्वहिस्सा अंदाजे रु. २५० कोटी द्यावा लागेल. याप्रमाणे अभियानाचे पाच वर्ष कालावधीत महानगरपालिकेस अंदाजे एकुण र.रु १००० कोटी पर्यंतचे प्रकल्प स्मार्ट सिटी अभियानाचे निर्देशानुसार पुर्ण करावे लागतील. त्यामध्ये शहारातील नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा, खात्रीशीर वीज पुरवठा, शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, कार्यक्षम शहरी दळणवळण व सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सक्षम इंटरनेट सुविधा, शहरी आरोग्य आणि शिक्षण सुविधा, ई-गव्हर्नन्स व नागरिकांचा सहभाग, शाश्वत पर्यावरण, नागरिकांची सुरक्षा व संरक्षण इ. घटकांचा समावेश असेल. या सर्व बाबींचा समावेश करून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्मार्ट सिटी प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे दि. ३१/३/२०१७ रोजी सादर करणेत आलेले आहे. त्यास मा. महापालिका सभेने ठराव क्र. २९ दि.१९/०७/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

तथापी, वरील प्रकल्प स्मार्ट सिटी कंपनीमार्फत राबविताना महापालिकेच्या मालकीच्या जागा, रस्ते, उद्याने, विद्युत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणे आवश्यक आहे.

सबब, स्मार्ट सिटी योजने अंतर्गत PAN City प्रकल्प व Area Based Development (ABD) प्रकल्प राबविणेकामी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड या विशेष उद्देश वहनास मनपाच्या मालकीची जागा, रस्ते, उद्याने, विद्युत पोल, मनपा हद्दीतील चौक, शाळा, इमारती व इतर मालमत्तांचा वापर करणेस मान्यता मिळणेकामी व त्याअनुषंगीक परवानगी देणेचे अधिकार पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीस देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर साहेब, विनंती करतो की स्मार्ट सिटी संदर्भामध्ये येणा-या दोन तीन दिवसामध्ये सगळया गटनेत्यांच्या बरोबर बसून आपण या संदर्भामधील धोरण, म्हणजे काहीवेळा अशी परिस्थिती या विषयाच्या संदर्भामध्ये झाली की पीएमपीएमएल सारखी परिस्थिती पुन्हा स्मार्ट सिटीची होती की काय. महापालिकेच्या जागा स्मार्ट सिटीत गेल्यातर त्याच्यामध्ये चांगला मेसेज जाईल त्यामुळे मी विनंती करतो की हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. त्यामध्ये दोन ज्या जागा आहेत महापालिका वायसीएम आणि डब्ल्यूटीपीच्या ठिकाणी सोलर सिस्टीम उभारण्याच्या संदर्भामधील हा विषय मंजूर करुन त्यांना १० ऑक्टोंबर पर्यंत तो विषय करणे गरजेचे आहे, या दोन जागेच्या संदर्भामध्ये. हा विषय समाविष्ठ करुन एक चांगल्या पध्दतीच पुढच्या जीबी पर्यंत आपण काम करणार आहोत अशा पध्दतीची सुचना करतो. आपण वायसीएम आणि डब्ल्यूटीपीला काम करायला त्याठिकाणी परवानगी देवू. त्याच्यासाठी महापालिकेच्या उपसूचनेची त्याला गरज नाही. ठिक आहे हा विषय तहकूब करा.

**मा.विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर-** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- २६५ विषय क्रमांक- १२

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
मातंवि/२/कावि/३०/१८ दि.८/०८/२०१८

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.माई उर्फ उषा ढोरे -** मा.महापौर साहेब, ठराव क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १३

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
नरवि/कावि/३६/२०५/२०१८ दि.९/०८/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे सांगवी येथील विकास आराखडा दि. २१ सप्टेंबर १९९५ व ११ सप्टेंबर १९९७ अन्वये मंजुर झालेला असून स.नं. ५ (सि.स.नं. ६००) व स.नं. ६ (सि.स.नं. ५९५) येथील नदी लगत असलेल्या स्मशानभुमी समोरील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता | स.नं. ५ (सि.स.नं. ६००) | १९६.९४ चौ.मी. |
| २ | - | मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता | स.नं. ६ (सि.स.नं. ५९५) | ११५.०० चौ.मी. |
| **एकूण** | | | | **३११.९४ चौ.मी.** |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.चंदा लोखंडे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.संतोष कांबळे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रामणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सांगवी येथील स्मशानभूमीलगत असणा-या स.नं.५ व स.नं. ६ मधील मंजूर विकास आराखडयातील सर्व रस्ते मनपाच्या ताब्यात घेवून सदर रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी मा.जिल्हाधिकारी पुणे यांना प्रस्ताव पाठविणेकामी तसेच सदर सांगवी स्मशानभूमीचे प्रत्यक्ष वापरातील जागा व स्मशानभूमीतील अंत्यविधीकरीता वापरात असणारी सर्व प्रकारची जागा तथा पवना नदीलगतचे नदीघाट याठिकाणी मनपाने केलेली विकासकामे पाहता एकूणच सर्व जागेचा मोबदला देणे व त्याप्रमाणे योग्य प्रक्रिया करणे उचित आहे त्यामुळे स.नं. ५ मधील जागा मनपाच्या ताब्यात येणेकामी व मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदर जागेचा मोबदला देणेकामी या प्रस्तावाद्वारे आयुक्तांना अधिकार देणेत

यावे याकरीता सदर प्रस्तावाची कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही होणेकामी मान्यता देणेत यावी व सदर कामाचे येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी. सदर जागा पवनानदीकाठी असून प्रतिवर्षी जलपर्णीचा त्रास दुर करणेसाठी याच भागाचा वापर होतो व इतर अनेक धार्मिक कार्यक्रमांसाठी होत आहे म्हणून वरील प्रमाणे जागा नागरिकांच्या सार्वजनिक उपयोगाची असल्याने तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. हर्षल ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आमच्या सांगवीमध्ये स्मशानभूमीचा विषय आहे. सांगवी गावामध्ये स्मशानभूमीची एक निवीदा काढण्यात आली होती. स्मशानभूमी नुतनीकरणाची निवीदा क्र. ३४/१२/२०१५-१६ ला काढण्यात आली होती. त्या निवीदेची रक्कम होती २ कोटी ६१ लाख ३३ हजार ४३७. हे काम त्या कंपनीच नाव राहूल कन्स्ट्रक्शन यांना आडीच टक्के बीलोनी काम देण्यात आल होतं. कामाची मुदत ही फक्त बारा महीने होती. बारा महीने मुदत असल्यामुळे हे काम बारा महीन्यात व्हायला पाहीजे होतं. त्याच्यानंतर वाढीव मुदत देण्यात आली ती ३१/६/२०१८ ला. खरतर आमच्या भागातील ज्येष्ठ नगरसेवीका माई ढोरे असतील, नगरसेवक संतोष कांबळे असतील, शारदा सोनवणे असतील आम्ही चौघानीही आयुक्त साहेब यासंदर्भात तुम्हांला दि.११/६/२०१८ ला एक लेखी पत्र आमच्या चारही नगरसेवकांच्या स्वाक्षरीन दिलेलं होतं. की तुम्ही आम्हांला या विषया संदर्भात वेळ दयावी ती वेळी तुम्ही आम्हांला दिली त्याबद्दल अभिनंदन. ती वेळ आम्हांला दोन महीन्यानंतर मिळाली. त्यावेळे दरम्यान तुम्ही संबंधित अधिका-यांना बोलावून घेतले होते. तुम्ही सर्व अधिका-यांना काम करण्यासाठी सुचना दिली आजही आमच काम ज्या पध्दतीने स्मशानभूमीच पाहीजे त्या पध्दतीचे काम चालू नाही. आज जेव्हा जेव्हा सर्वसामान्य नागरीक स्मशानभूमीमध्ये अंतीम संस्कार करण्यासाठी जातात तेव्हा आमच्या भागातील लोकांना अक्षरशः उन्हात, पावसात बाजूला उभ रहाव लागतं. आमच्या प्रभागातील सर्वसामान्य जनतेला अजीबात तेथे कुठल्याही प्रकारची बसायला जागा नाही. जेव्हा एखादा कुटूंबातील माणूस जातो ते कुटूंब हे दु:खात असतं....

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारलेली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता---

ठराव क्रमांक – २६६ विषय क्रमांक- १३

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.
नरवि/कावि/३६/२०५/२०१८ दि.९/०८/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे सांगवी येथील विकास आराखडा दि. २१ सप्टेंबर १९९५ व ११ सप्टेंबर १९९७ अन्वये मंजुर झालेला असून स.नं. ५ (सि.स.नं. ६००) व स.नं. ६ (सि.स.नं. ५९५) येथील नदी लगत असलेल्या स्मशानभुमी समोरील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता | स.नं. ५ (सि.स.नं. ६००) | १९६.९४ चौ.मी. |
| २ | - | मंजूर विकास योजनेतील १२ मी. रुंद रस्ता | स.नं. ६ (सि.स.नं. ५९५) | ११५.०० चौ.मी. |
| **एकूण** | | | | **३११.९४ चौ.मी.** |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या सांगवी येथील स्मशानभूमीलगत असणा-या स.नं.५ व स.नं. ६ मधील मंजूर विकास आराखडयातील सर्व रस्ते मनपाच्या ताब्यात घेवून सदर रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी मा.जिल्हाधिकारी पुणे यांना प्रस्ताव पाठविणेकामी तसेच सदर सांगवी स्मशानभूमीचे प्रत्यक्ष वापरातील जागा व स्मशानभूमीतील अंत्यविधीकरीता वापरात असणारी सर्व प्रकारची जागा तथा पवना नदीलगतचे नदीघाट याठिकाणी मनपाने केलेली विकासकामे पाहता एकूणच सर्व जागेचा मोबदला देणे व त्याप्रमाणे योग्य प्रक्रिया करणे उचित आहे त्यामुळे स.नं. ५ मधील जागा मनपाच्या ताब्यात येणेकामी व मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदर जागेचा मोबदला देणेकामी या प्रस्तावाद्वारे आयुक्तांना अधिकार देणेत येत असून याकरीता सदर प्रस्तावाची कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही होणेकामी मान्यता देणेत येत आहे व सदर कामाचे येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदर जागा पवनानदीकाठी असून प्रतिवर्षी जलपर्णीचा त्रास दुर करणेसाठी याच भागाचा वापर होतो व इतर अनेक धार्मिक कार्यक्रमांसाठी होत आहे म्हणून वरील प्रमाणे जागा नागरिकांच्या सार्वजनिक उपयोगाची असल्याने तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २६७ विषय क्रमांक- १४

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>विधी समिती</u>**

अ) दिनांक १५/०६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक ०६/०७/२०१८ व दि.१३/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक २०/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल-८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २६८ विषय क्रमांक- १५

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक ०३/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १७/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-- ८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २६९ विषय क्रमांक- १६

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दिनांक २२/०५/२०१८ व दिनांक १२/०६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २६/०६/२०१८ व दिनांक ०२/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल--८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २७० विषय क्रमांक- १७

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिति</u>**

**अ)** दिनांक ०८/०६/२०१८, दिनांक२२/०६/२०१८ व दिनांक २५/०६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २२/०६/२०१८ व दि.२५/०६/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दिनांक १३/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल--८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.नितीन काळजे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – २७१ विषय क्रमांक- १८

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.शिक्षण समिती</u>**

अ) दिनांक ०९/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १९/०७/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल--८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १९

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.राहूल कलाटे यांचा दिनांक ०३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

२) मा.ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४ दि.०३/०८/२०१८

३) मा.क्षेत्रिय अधिकारी ड क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. ड/सभा/कावि/१३९/२०१८ दि.०८/०८/२०१८

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ड प्रभाग कार्यक्षेत्रात जी कामे करण्यात येत आहेत त्याची माहिती त्या सर्व प्रभागांच्या सदस्यांना अदयाप पर्यंत देणेत आलेली नाही. स्मार्ट सिटी ही स्वायत्त संस्था असतानाही मा.स्थायी समितीमध्ये ज्याप्रमाणे काही विषय मान्यतेकामी घेतले होते त्याप्रमाणे स्मार्ट सिटीची जी कामे प्रभागांतर्गत करण्यात येतात त्यांची माहिती संबंधित प्रभागातील स्थानिक सदस्यांना होण्याच्या दृष्टीकोनातून सदर प्रस्ताव ड प्रभाग समिती मार्फत मा.महापालिका सभेसमोर घेणेबाबतचे धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा. विलास मडिगेरी-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर** – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक – २७२ विषय क्रमांक- १९

दिनांक – ६.९.२०१८ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.राहूल कलाटे यांचा दिनांक ०३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

२) मा.ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४ दि.०३/०८/२०१८

३) मा.क्षेत्रिय अधिकारी ड क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. ड/सभा/कावि/१३९/२०१८ दि.०८/०८/२०१८

विषय क्रमांक १९ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापोर यांनी प्रकट केले.

-----

**मा.राजु मिसाळ –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपले महापौर महापौर परिषदेसाठी बाहेरच्या देशात रवाना होणार आहेत मी त्यांच अभिनंदन करतो कारण की महापौर खुर्चीवर बसल्यानंतर एक महीन्याच्या आतच त्यांना परदेशी दौरा करण्याची संधी मिळाली. सर्व सदस्यांच म्हणण आहे की तुम्ही चाललात आम्ही सुध्दा आपआपल्या स्वखर्चाने येण्यास इच्छूक होतो. तरी तुम्ही पुढच्या वेळेस कुठ परदेशी दौरा कराल त्यावेळेस सर्व गटनेत्यांना ज्यांना कुणाला इच्छा आहे, स्वखर्चाने येण्याची त्यांना घेवून जावे.

**मा.राहूल कलाटे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौर साहेब हे आपल्या शहराच प्रतिनिधीत्व करण्यासाठी महापौर परिषदेला निघालेले आहेत. महापौरांना सर्व सभागृहाच्या वतीने हॅपी जर्नी हा प्रवास आपला सुखाचा होओ अशी मी शुभेच्छा व्यक्त करतो.

**मा.महापौर -** सर्वानी आज पहील्या मिटींगला मला सांभाळून घेतल त्याबद्दल सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**(**राहुल गुलाब जाधव**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/४६१/२०१८
दिनांक - १/११/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.